☸️☸️🦚🦚🦚💎 गौतम बुद्धांना चुंदने खरच डुकराचे मांस खाऊ घातले होते काय? सत्य काय? अपप्रचार थांबवा...

भगवान गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या कथा सांगताना अनेक लोक अनेक लोक व अगदी धंम्मप्रचारकदेखील अपुर्या माहितीमुळे हे सांगतात की चुंद नामक व्यक्तीने गौतम बुद्धांना डुकराचे मांस खाऊ घातल्याने त्यांना मरण आले. परंतु ही माहिती चुकीची असून हा अपप्रचार का झाला व नेमके खरे काय हे विस्तृतपणे जाणून घ्या व असा अपप्रचार होऊ देऊ नका.

भगवान बुद्धांचे शेवटचे जेवण आणि चुंद लोहार :

भगवान बुद्धांच्या शेवटच्या जेवणाबाबतीत प्रामुख्याने असे सांगितले जाते की, त्यांनी डुकरांचे मांस खावून आपली जीवनयात्रा संपविली. अलीकडेच काही विचारजंत असा प्रचार करताना आपल्याला दिसतात की, चुंद नावाच्या व्यक्तीने ब्राम्हणांच्या कडून भगवान बुद्धांची हत्या करण्याची सुपारी घेतली होती. त्या अनुषंगाने त्याने अंन्नामध्ये विष मिळवुन ते अन्न भगवान बुद्धांना खायला दिले. आणि अशा प्रकारे त्यांची हत्या केली गेली. ही दोन्ही मते खोडसाळ आणि धंम्मविरोधी आहेत. त्यासाठी आपण पुढील गोष्टींचा विचार करू.

१. ज्या उपासकाने भगवान बुद्धांना शेवटचे अन्न दान दिले त्याचे 'चुंद' हे नाव डुकरांची कत्तल करणार्या व्यक्तीच्या नावासोबत जोडल्यामुळे लोक गोंधळात पडले. इथे लोक हे विसरतात की, तो डुकरांची कत्तल करून त्यांचे मांस विकणारा 'चुंद' नावाचा व्यक्ती हा भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या आधीच मरण पावलेला आहे.

२. ज्या उपासकाने बागवान बुद्धांना शेवटचे अन्न दान दिले त्याचे नाव 'चुंद करमारपुत्र' होते, जो व्यवसायाने लोहार होता. कुशीनाराच्या वाटेवर पावा येथील ह्याच उपासकाच्या आरामांत भगवान बुध्दांनी रात्र घालविली.

३. तीन महिन्यांपूर्वी भगवान बुध्दांनी सांगितले होते की येणार्या वैशाख पौर्णिमेला कुशिनारा येथे त्यांचे महापरिनिर्वाण होणार आहे. कारण सहा महिन्यांपासून भगवान बुद्धांची प्रकृती खालाविली होती, पोटाच्या विकाराने ते अशक्त बनले होते. त्यांचे वय एंशीच्या आसपास होते.

४. भगवान बुद्ध पावा येथे आले असून ते आपल्या आम्रवनात उतरले आहेत असे चुंदाने एकले. ह्यामुळे आनंदित होऊन चुंद भगवानांना म्हणाला, "उद्या माझ्या घरी भिक्खुंसह भगवानांनी येऊन भोजन घेण्याची कृपा करावी." भगवान बुध्दांनी मौनानेच संम्मत्ती दर्शविली. भगवानांनी त्याच्या आमंत्रणाचा स्वीकार केला. दुसर्या दिवशी चुंदने आपल्या घरी खीर वगैरे मिष्टांनांबरोबर भगवान बुद्धांच्या बिघडलेल्या तब्बेतीला पाहून सुकरमद्यव याचीही सिद्धता केली. तयारी होताच त्याने भगवानांना कळविले, "भगवान, वेळ झाली. भोजन तयार आहे !"

५. त्या औषधीयुक्त पदार्थाला पाली भाषेमध्ये 'सुकर मद्दव' असे म्हंटले गेले. इथूनच सर्व गोंधळ झाला.

६. सामान्यतः 'सुकर' या शब्दाचा अर्थ डुक्कर असा घेतला जातो. या शब्दसाधर्म्यामुळे धंम्माच्या विरोधकांनी 'डुकराच्या भाजीची' दंतकथा रचली.

भोजनानंतर बुद्धांना झालेला त्रास व गैरसमज :

गौतम बुद्धांना जे भोजन दिले गेले होते ते एक प्रकारचे मशरूम (टेकोय) होते. तत्पूर्वी आपणाला हे माहीत आहेच की, गौतम बुद्ध महापरिनिर्वाणापूर्वी अनेक दिवसांपासून पोटाच्या विकाराने त्रस्त होते व सुकरमद्यव हा पदार्थ यावर इलाज आहे.

परंतु चुंद लोहाराने तथागत बुद्ध आणि भिक्खुसंघाला भोजनासाठी तयार केलेली मशरूम (टेकोय) ही विषारी मशरूम (टेकोय) होती. काही मशरूम (टेकोय) विषारी व जीवघेणे असतात, त्याला ओळखिन्यात मनुष्याकडुन चूक होऊ शकते. चुंदही त्या मशरूमला (टेकोय) ओळखु शकला नाही. परंतु तथागतांनी ती मशरूम (टेकोय) विषारी असल्याचे ओळखिले.

तेव्हा तथागतांनी चुंदला सांगितले की, ही जी 'सुकर मद्दव' ची भाजी माझ्या पात्रात वाढली आहेस ती भाजी भिक्खुसंघाला किंवा इतर कुणालाही देऊ नकोस. या भाजीला तथागतांशिवाय कुणीही पचवू शकणार नाही. तेव्हा उरलेली भाजी कुणी खाऊ नये म्हणून जीवरहित पाण्यात सोडून दे. (बुद्धांना वा भिक्खुंना दिलेले दान हे त्यांना नाकारता येत नाही कारण उपासकाने दिलेले अन्न किंवा एखादी वस्तु ही त्यांच्याप्रति असलेल्या आदरभावनेने दिलेली असते.)

हे भोजन केल्यानंतर भगवानांनी चुंदला धंम्मोपदेश केला आणि आसनावरून उठून ते निघाले. चुंदने सिद्ध केलेले भोजन भगवंतांना मानवले नाही. त्यामुळे त्यांना घोर आजार जडला. अतिसारामुळे त्यांना मरणप्राय वेदना होऊ लागल्या. पण भगवंतांनी 'स्मृती–संप्रजन्य' चा नियोग करून सर्व सहन केले.

इथे ही दोन मुद्दे लक्षात घ्या :

१. सामान्यतः कोणत्याही व्यक्तीला जो पोटाच्या विकाराने ग्रस्त आहे पचायला जड असल्यामुळे त्यांना मांस खायला दिले जात नाही. २. याच धर्तीवर निःशंक शाकाहारी असलेला 'चुंद करमारपुत्र' सारखा व्यापारी मांस वाढणे शक्य नाही. तेही बुद्धांना. ज्यांनी प्राणीहत्या न करण्याचा संदेश दिला होता व बुद्धांप्रती त्याची भावना अत्यंत प्रेमळ होती.

मशरूम/सुकर मद्दव/टेकोय हा काय प्रकार आहे? :

नेपाळ आणि भारतातील गोरखपुर (पावा आणि कुशिनारा गोरखपुर जिल्ह्यामध्ये येतात.) जिल्ह्यामध्ये राहणारे लोक आतासुद्धा अशा अनेक प्रकारचे मशरूम (टेकोय) खातात.

१. सुकर मद्दव : एखाद्या विशिष्ट जमीन पट्टयावर काही डुकरे चिखल करून तिथे घाण करतात, अशा जमिनीवर जे मशरूम (टेकोय) उगविले जातात त्याला सुकर मद्दव असे म्हणतात.

२. अजा मद्दव : एखाद्या विशिष्ट जमीन पट्टयावर काही बकरे चिखल करून घाण करतात आणि त्या जमिनीवर जे मद्दव उगवितात त्यांना अजा मद्दव असे म्हणतात.

३. गोमद्दव : एखाद्या विशिष्ट जमीन पट्टयावर चिखल करून गायी तिथे घाण करतात अशा जमिनिवर जे मद्दव उगवितात त्यांना गोमद्दव असे म्हणतात.

४. वेळूमद्दव : काही विशिष्ट मद्दव वेळूच्या झाडाखाली उगवितात त्यांना वेळूमद्दव असे म्हणतात.

कुशिनाराचे आदरणीय महापंडित अच्छुतानंद थेरो, बुद्धमित्त थेरो, काठमांडुचे अमृतानंद थेरो, लुंबिनीचे मैत्री थेरो आणि अनेकांच्या मते सुकर मद्दव हा अत्यंत पचनशिल पदार्थ आहे. जो पोटाच्या विकारग्रस्तांना दिला जातो.

नेपाळ आणि परिसरात रुग्णांसाठी आजही औषधी म्हणून ह्या पदार्थाचा वापर केला जातो. सुकर मद्दव प्रमाणेच पोटाच्या विकारावर औषधीयुक्त असा पदार्थ अस्तित्वात आहे ज्याला सुकर बन असे म्हणतात. पाश्चात्य देशांमध्ये त्याला 'Hog mushrooms' असे म्हणतात.

अशा प्रकारचे मद्दव अत्यंत दुर्मिळ आहेत. जे उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, कमकुवत दृष्टी इत्यादी आजारावर सहजपणे मात करू शकते. परंतु मशरूम (टेकोय) ओळखिण्यात अनेकदा चूक होऊ शकते, ज्यामुळे मनुष्याला त्रास होऊ शकतो. आणि हेच चुंदच्या बाबतीत घडले.


वरील सर्व पुरावे आपल्याला सांगतात की भगवान बुध्दांनी सुकर मद्दवाचे सेवन केले होते, डुकराच्या मांसाचे नाही. त्यामुळे भगवान बुद्धांनी आपल्या शेवटच्या जेवणामध्ये डुक्कराच्या मांसाचे सेवन केले नव्हते, हा प्रश्न निकालात येतो.

आणि हेही खरे आहे की सुकर मद्दवाच्या भोजनाने गौतम बुद्धांचे महापरिनिर्वाण झाले नाही. जर असे असते तर संम्यक संबोधी गौतम बुध्दांनी वैशाख पौर्णिमेला त्यांचे महापरिनिर्वाण होणार आहे असे सांगितले नसते आणि तेही तीन महिन्यांपूर्वी. जे कोणी धंम्मद्रोही लोक हा प्रचार करतांना दिसतात की, "चुंदने बुद्धांची हत्या केली होती." त्यांचा हा अपप्रचार अत्यंत घातक आहे.

स्वतः बुद्ध म्हणाले होते की, ना कोणी मार किंवा ब्रम्हा, ना कोणी श्रमण किंवा ब्राम्हण, देवांच्या सहित मनुष्यसुद्धा बुद्धांची हत्या करू शकत नाहीत...

संबोधी प्राप्तीच्या वेळेस सुजाताने दिलेली खिर हे प्रथम भोजन आणि चुंद करमारपुत्र यांच्याद्वारे दिले गेलेले सुकर मद्दव हे शेवटचे भोजन बुद्धांच्या जीवनातील सर्वांत अविस्मरणीय भोजन आहेत. ही खरी सत्यता आहे.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 भारतीय पासपोर्ट धारकांना ५७ देशांत व्हिसा फ्री प्रवास करता येणार. 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या पासपोर्ट निर्देशांकामधील स्थितीत सुधारणा झाली आहे. यामुळे ५७ देशांमधे भारतीय पासपोर्ट धारकांना व्हिसा फ्री प्रवेश मिळणार आहे. या सुविधेमुळे एक आठवड्यापासून तीन महिन्यांपर्यंत प्रवास करण्याची संधी भारतीय पर्यटकांना उपलब्ध झाली आहे. यासाठी भारतीय पर्यटकांना दिशानिर्देशही जारी केले आहेत.

संबंधित व्हिसा फ्री देशात लँडिंग केल्यानंतर पर्यटकांना ऑनलाईन अथवा ऑफलाईन रजिस्ट्रेशन करावे लागणार आहे. त्यासाठीचे निर्धारित शुल्क अदा करावे लागणार आहे.

सिंगापूरचा पासपोर्ट जगात अव्वल आहे. या देशातील नागरिक जगातील १९२ देशांचा प्रवास व्हीसाशिवाय करू शकतात.

व्हिसाशिवाय फिरता येणारे ५७ देश पुढीलप्रमाणे :

१. सेंट विंसेंट एंड ग्रेनेजियंस २. त्रिनिनाद और टोबैगो ३. कंबोडिया ४. इंडोनेशिया ५. भूतान ६. सेंट लुसिया ७. लाओस ८. मकाओ ९. मालदीव १०. म्यांमार ११. नेपाळ १२. श्रीलंका १३. थायलंड १४. तिमोर–लेस्ते १५. बोलिविया १६. फिजी १७. मार्शल आईलंड १८. माईक्रोनीशिया १९. नियु २०. पलाऊ आईलंड २१. समाओ २२. तुवालू २३. वनुआटू २४. ईरान २५. जॉर्डन २६. ओमान २७. कतर २८. अल्बानिया २९. सर्बिया ३०. बारबाडोस ३१. ब्रिटिश वर्जिन आईलंड ३२. डोमिनिका ३३. ग्रेनेडा ३४. हैती ३५. जमैका ३६. मोंटेसेराट ३७. सेंट किट्स एंड नेविस.


पर्यटनासाठी भारतातील टॉप १० ठिकाणे :

१. ताजमहल, आग्रा (उत्तर प्रदेश) २. हवामहल, जयपूर (राजस्थान) ३. कुतुबमिनार (दिली) ४. जिम कॉर्बेट नॅशनल पार्क, रामनगर (उत्तराखंड) ५. सुवर्णमंदिर (अमृतसर) ६. सूर्यमंदिर, कोणार्क (उडीसा) ७. अजिंठा आणि वेरुळ लेणी (छत्रपती संभाजीनगर) ८. खजुराहो मंदिर (मध्यप्रदेश) ९. हुमायुं मकबरा (दिल्ली).



☸ ☸ 🦚 🦚 🦚 💎 आचार्य धंम्मानंद दामोदर कोसंबी (जन्म :– ९ ऑक्टोबर, १८७६ – मृत्यू :– २४ जून, १९४७ (वय ७०); सेवाग्राम, ब्रिटिश भारत) 💎 🦚 🦚 🦚 ☸ ☸

आचार्य धंम्मानंद दामोदर कोसंबी हे एक बौद्ध धंम्माचे व पाली भाषेचे अभ्यासक व मराठी लेखक होते. त्यांनी श्रीलंकेत जाऊन तेथील विद्योदय विद्यापीठात बौद्ध धंम्माचा व तत्वज्ञानाचा अभ्यास केला. तसेच म्यानमारमध्ये (ब्रह्मदेशात) जाऊन त्यांनी ब्रह्मी भाषेतील बौद्ध साहित्याचा तौलनिक अभ्यास केला. भारतीय संख्याशास्त्रज्ञ व इतिहासकार दामोदर धंम्मानंद कोसंबी हे त्यांचे पुत्र, आणि डॉ. मीरा कोसंबी या त्यांच्या नात होत.



धंम्मानंद कोसंबी

जन्म :– ९ ऑक्टोबर, इ. स. १८७६.

मृत्यू :– २४ जून, १९४७ (वय ७०) सेवाग्राम, ब्रिटिश भारत.

राष्ट्रीयत्व :– मराठी, भारतीय.

कार्यक्षेत्र :– समाजशास्त्र, साहित्य.

भाषा :– मराठी.

विषय :– बौद्ध तत्वज्ञान, पाली भाषा.

अपत्ये :– दामोदर धर्मानंद कोसंबी.

जन्म : धंम्मानंद कोसंबी यांचा जन्म दक्षिण गोव्यातील सांखोल येथे झाला. गोवा ही तेव्हा पोर्तुगीजांची वसाहत होती.

कार्य : ज्ञानदेवांनी सातशे वर्षांपूर्वी भागवत धर्माचा पाया रचला, त्याप्रमाणे बौद्ध धंम्माचा पाया आचार्य धंम्मानंद कोसंबी यांनी रचला आहे. भागवत धर्म हजारो वर्षे ज्ञानदेवांपूर्वीही प्रचलित होता, तरी त्याला पुन्हा नवा पाया देणे भाग पडले. त्याचप्रमाणे बौद्ध धंम्म २५६७ दोन हजार पाचशे सदुसष्ट वर्षांपेक्षा अधिक काळपर्यंत निम्म्या मानवी जगात प्रचलित असूनही त्याला पुन्हा नवा पाया देण्याचे आवश्यक कार्य धंम्मानंदांनी केले आहे. नवा पाया देण्याचे कारण, बौद्ध धंम्माला या विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी नव्या युगाच्या प्रेरणांना अनुरूप स्वरूप देणे आवश्यक होते, हे होय. अद्भुत पौराणिक कथा, कल्पित प्रसंग, आणि पारलौकिक तत्त्वज्ञान यांची शेकडो पुटे मुळच्या विवेकवादी शुद्ध बौद्ध धंम्मावर आणि बुद्धचरित्रावर शतकानुशतके चढलेली आहेत, त्यामुळे नव्या युगाच्या प्रेरणांशी सुसंगत असे त्याचे स्वरूप राहिलेले नाही. परंतु बुद्धचरित्राचे व बौद्ध धंम्माचे मूळचे शुद्ध स्वरूप या नव्या युगाच्या प्रेरणांशी सुसंगत असेच आहे, असे ध्यानात आल्यामुळे अनेक आधुनिक पश्चिमी पंडितांनी व विशेषतः धंम्मानंदांनी ते स्वरूप यशस्वी रीतीने विवेकबुद्धीने शोधून काढण्याचा प्रयत्न केला.

प्रकाशित साहित्य :

पुस्तकाचे शीर्षक	वर्ष (इ. स.)	भाषा	विषय/वर्णन
जातककथा	अनेक भाग	मराठी	बुद्धकथा
निवेदन		मराठी	आत्मचरित्र
भगवान बुद्ध	इ. स. १९४०	मराठी (तसेच अन्य भाषांमध्ये अनुवादित)	बुद्धचरित्रात्मक ग्रंथ
बोधि-सत्त्व (नाटक)		मराठी	नाटक
विसुद्दीमग्ग		पाली	पाली ग्रंथ

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 आचार्य धंम्मानंद दामोदर कोसंबी (जन्मदिनांक : ९ ऑक्टोबर १८७६. मृत्युदिनांक : २४ जून १९४७.) 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

बौद्धधंम्म संशोधक, बुद्धोपासक, चिकित्सक

जन्मदिनांक : ९ ऑक्टोबर १८७६. मृत्युदिनांक : २४ जून १९४७.

कार्यक्षेत्र : प्राच्यविद्या.

जन्मस्थळ : संखोल, गोवा.

धंम्मानंद दामोदर कोसंबी यांचा जन्म भारतामधल्या गोवा राज्यातील दक्षिण गोव्यातील सांखोल या लहानशा खेड्यात झाला. त्यांच्या आईचे नाव आनंदीबाई, तर वडिलांचे नाव दामोदर होते. लहानपणी त्यांची प्रकृती तोळामासाच होती. त्यांचे केवळ शालेय शिक्षण पाचव्या इयत्तेपर्यंत झाले. धंम्मानंद फर्ग्युसन महाविद्यालय, बनारस हिंदू विद्यापीठ, काशी विद्यापीठ, कोलकात्याचे नॅशनल महाविद्यालय, कोलकाता विद्यापीठ, महात्माजींनी अहमदाबादेत स्थापलेल्या गुजरात विद्यापीठात (पाली भाषा व बौद्ध धंम्म या विषयांचे प्राध्यापक, विभागप्रमुख) व अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात एकूण चार वेळा संशोधक साहाय्यक म्हणून निमंत्रित केले गेले. धंम्मानंद यांनी साधलेली संस्कारित, चिकित्सा केलेली, संपादित आचार्य बुद्धघोष 'विशुद्धिमार्ग–विसुद्धिमग्ग' या अभिधंम्मविषयक लघुज्ञानकोशांची रोमन लिपीतील आवृत्ती हार्वर्ड विद्यापीठाने प्रथम व भारतीय विद्या भवन प्रकाशनाने देवनागरी लिपीत त्यानंतर प्रथम प्रकाशित केली. हार्वर्ड विद्यापीठाने ग्रंथ प्रकाशित करावा, असे पहिले भारतीय व आपल्या दृष्टीने महाराष्ट्रीय संशोधक पंडित म्हणजे आचार्य धंम्मानंद कोसंबी होत.

१८९७ मध्ये 'बालबोध' या मासिकात प्रकाशित झालेला बुद्धाच्या जीवनावरचा लेख वाचून व मग हाती पडेल ते बुद्धचरित्र व बौद्धविचारधारा या विषयांवरची पुस्तके झपाटल्यासारखी वाचून काढून स्वत:चे आयुष्य बौद्धपरंपरेचा प्रचार–प्रसार–विकास यांस वाहून घेण्याचा निर्धार करून हे स्वप्न प्रत्यक्षात साकारणारे बुद्धोपासक म्हणजे धंम्मानंद कोसंबी. तरुणपणातच नैराश्यजनक विचारांनी ग्रस्त होऊन, शरीराने व मनाने पार कमकुवत झाल्यामुळे आत्महत्येच्या विचारांपर्यंत पोहोचलेले धंम्मानंद कोसंबी, तुकाराम महाराजांचे चरित्र, तुकाराम गाथा यांचे पारायण करून, त्यांतून प्रेरणा घेऊन अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी उत्साहित झाले. याच उत्साहित मन:स्थितीत, खिशात पैसा नसतानाही धंम्मानंद कोसंबी ज्ञानार्जनासाठी जगप्रवासाला निघाले. कधी बैलगाडी, आगगाडी, आगबोट आणि नाही तर निव्वळ पायपीट करत, तहान–भूक विसरून, जवळजवळ पूर्ण भारतवर्ष, नेपाळ, सिक्कीम, तिबेट, श्रीलंका, ब्रह्मदेश, इंग्लंड, रशिया, अमेरिका (थोडक्यात त्रिखंडी) संचार करून मिळेल तेवढे ज्ञान व अनुभव गाठी बांधतच राहिले. या सर्व स्थळांना पर्यटकांप्रमाणे धावती भेट न देता यांतील बर्याच ठिकाणी बर्यापैकी मुक्काम करून धंम्मसाधना करणारा चिनी ह्युएनत्संग, फाहिआन, इत्सिंग यांचा नकळत अनुसार करणारा श्रेष्ठ प्रवासी, राहुल सांकृत्यायनांच्या आधीचा जागतिक ज्ञानक्षेत्राचा एक ज्ञानवेचक प्रवासी ठरले.

बौद्धधंम्मविषयक इतके विपुल व दर्जेदार लेखन त्यांनी केले, की त्यांतील अनेक ग्रंथांचे हिंदी–गुजराती इत्यादी भाषांत अनुवाद करण्याचा मोह रत्नपारखी अभ्यासकांना आवरता आला नाही. कित्येक ग्रंथांच्या कितीतरी पुनरावृत्त्या काढाव्या लागल्या. उच्च सारस्वत ब्राह्मण कुळात जन्मलेल्या, हीन वागणूक प्राप्त न झालेल्या धंम्मानंदांनी बौद्धधंम्माचे वैश्विक कार्य प्रज्ञेने जाणून स्वेच्छेने केवळ बौद्धधंम्माची उपासक–दीक्षाच नव्हे, तर श्रामणेर–दीक्षा आणि पुढे जाऊन उपसम्पदापूर्वक बौद्ध–भिक्षु–दीक्षा धंम्मद्वीप मानल्या गेलेल्या श्रीलंकेत सुमंगलाचार्यांसारख्या थोर महाभिक्षूंकडून घेऊन 'भगवान बुद्ध' हे अद्वितीय पुस्तक लिहिले.

या पुस्तकाची महती ओळखून भारताच्या केंद्र शासनाने राष्ट्रीय पातळीवर भव्य रितीने साजर्या केलेल्या बौद्धधंम्माची २५०० वर्षे (२५०० Years of Buddhism) आता २५६७ वर्षे झालीत. या राष्ट्रव्यापी ज्ञानसोहळ्यात मूळ मराठी भाषेसहित इतर तेरा राष्ट्रीय भाषांमधून या पुस्तकाचा अनुवाद भारतीय साहित्य अकादमीतर्फे प्रसिद्ध केला व त्यांतील हिंदी अनुवादाची एक छापील प्रत तत्कालीन राष्ट्रपती व भारतीय धर्म–तत्त्वज्ञानाचे मूलग्रही गाढे अभ्यासक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना २४ ऑक्टोबर १९५६ या दीक्षा दिनाच्या आधीच २२ मे १९५६ रोजी सादर करण्यात आली. धंम्मानंदांच्या कार्यकाळात अशोकाच्या शिलालेखांचे धांम्मिक–सांस्कृतिक–राष्ट्रीय–ऐतिहासिक महत्त्व जाणून, चिकित्सक लेखन भारतीयेतर, विशेषत: पाश्चात्य बौद्ध अभ्यासकांकडून झाले होते. ज्या अशोकस्तंभाच्या चक्राचा प्रतीक म्हणून स्वीकार भारतीय राष्ट्रध्वजावर झाला, त्या अशोकाच्या एकूण शिलालेखांपैकी महत्त्वाच्या शिलालेखांचा मराठी अनुवाद करून त्यावर महत्त्वाचे चिकित्सक लेखन करणारे पहिले भारतीय महाराष्ट्रीय विद्वान म्हणजे धंम्मानंद कोसंबी. पुढे श्री. व्यं. केतकर यांनी महाराष्ट्रीय ज्ञानकोशात अशोकाच्या शिलालेखांची सुयोग्य दखल, त्यासाठी पुष्कळ पाने खर्चून घेतली आणि आचार्यांकडून स्फूर्ती घेऊन ज्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आचार्यांनी पालीचे अध्यापन केले, तेथेच पुढे ज्यांची शिक्षक म्हणून नेमणूक झाली, त्या ना. वा. तुंगार यांनी 'अशोकाचा राजधर्म' या नावाची संस्थाच पुण्यातील नारायण पेठेतील मुंजाबाच्या बोळात, राहत्या घरात स्थापून त्या विषयावर सहस्राधिक व्याख्यान–यज्ञांचे सत्र यशस्वी रितीने पार पाडले. त्यांचे स्फूर्तिस्थान होते ते अर्थातच आचार्य धंम्मानंद कोसंबी.

अनेक बौद्धसंस्था व प्रार्थना मंदिरांसारख्या बौद्धेतर–संस्थांशी आचार्यांचा केवळ कार्यरूप संबंध होता एवढेच नाही, तर प्रार्थना समाजाच्या व्यापक समाज सुधारणात्मक कार्याची माहिती 'सुबोधपत्रिके' सारख्या बहुवाचित दैनिकातून अनेकविध लेख लिहून धंम्मानंदांनी जनतेपर्यंत पोहोचवली.

विवाह झालेला असूनही संकुचित स्वरूपाच्या कौटुंबिक आयुष्यात न रमता, घर सोडून, जागतिक कुटुंबकार्य करत असतानाही विवाहप्राप्त अशा स्वत:च्या कुटुंबासाठीची कर्तव्ये धंम्मानंद कधीही विसरले नाहीत. भिक्षुपद स्वीकारून, विशाल मानव कुटुंबाचे कार्य पुरेसे आटोपून धंम्मानंद मात्र पुन्हा एकदा गृहस्थ झाले व त्याही आधी कालिदासाचा महत्त्वाचा शब्द वापरून सांगायचे झाले, तर या 'सर्वोपकारक्षम' गृहस्थाश्रमाच्या कर्तव्यांचा भिक्षू जीवनातही त्यांना कधीच विसर पडला नव्हता. माफक प्रमाणात का होईना, पण कुटुंबाच्या चरितार्थासाठी नोकरी करून अर्थार्जन साधणे, मुलाच्या शिक्षणाची पुरेपूर काळजी व व्यवस्था करणे, रुग्ण व नातेवाइकांना आर्थिक मदत व वडिलांचे कर्ज फेडण्याची जबाबदारी पार पाडणे, अशा कर्तव्यांच्या बाबतीत धंम्मानंदांनी कधीच कसूर केली नाही. त्यांचे कुटुंबीय व नातेवाईक एका गोष्टीला मात्र मुकले. माया–मोहपाश व डोळ्यांतील अश्रू यांना टाळण्यासाठी निग्रह कठोर धंम्मानंदांनी आसन्नमरण अवस्थेतही एकाही कुटुंबियाला, जवळच्या वा दूरच्या नातेवाइकाला; वर्धास्थित पवनार आश्रमात भेटीस येण्यासाठी मरणापर्यंत मज्जाव केला. पण धंम्मानंद एकाच वेळी रामकृष्ण भांडारकरांना अपेक्षित असे 'ज्ञानयोगी' व 'कर्मयोगी' असे दोन्ही एकस्थ होते व त्यांचे वर्णन करण्यास गीतेतील पदसंहती 'स संन्यासी च योगी च' ही अतिशय समुचित वाटते.

एकदा बौद्ध विचारधारा सतत प्रवाहित ठेवण्याचे जीवनकार्य अंगीकारले म्हटल्यावर आपल्या पश्चातही ही गंगा वाहती कशी राहील व आटली कशी जाणार नाही या दूरदर्शी विचाराने आचार्यांनी, विशेषत: पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात अध्यापन करत असताना भक्कम अभ्यासाची बैठक असलेली, संशोधनाची कुवत असणारी, सतत व्यासंगी राहणारी छात्रांची एक मांदियाळीच जन्माला घातली. याला आपल्या भारतीय परंपरेत 'शिष्यवंश' असे म्हणतात.

रशियातील वास्तव्यात रशियन भाषेच्या ज्ञानाबरोबरच रशियन क्रांती, त्या आधीची फ्रान्सची क्रांती, मार्क्सवाद, समाजवाद इत्यादी विषयांवरील ग्रंथांच्या वाचन–मननाने समाजवाद–साम्यवाद यांकडे धंम्मानंद ओढले गेले. अशा प्रकारच्या विचारांचा काही स्वरूपात पाली–बौद्ध ग्रंथांत, अशोकाच्या शिलालेखात आढळ झाल्यावर त्यास अनुसरून आचार्यांनी 'सुबोधपत्रिके' सारख्या दैनिकातून क्रमश: लेख लिहिले. पैकी तीन लेख एकाच मुख्य मथळ्याखाली होते. त्यांचा विषय मराठी–हिंदी कामगारांची स्थिती सुधारण्यास उपाय : १) हिंदुस्थान सरकारचे कर्तव्य, 'आलसस्य बलं राजा', २) हिंदी धनिकांचे कर्तव्य, ३) उपोद्घात ४) नगरपालिकांचे कर्तव्य असा होता. या विषयावर लिहिताना धंम्मानंदांनी अचूकपणाने ज्ञानेश्वरीतील अशा विचारांची पार्श्वभूमी असणाऱ्या ओव्यांचे उद्धरण दिले हे त्यांचे विशेष.

१९३० मध्ये महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र्यविषयक सत्याग्रह आंदोलनात सक्रिय सहभाग व तुरुंगवास, अनेक सत्याग्रही छावण्यांचे पुढारीपण व एकूणच मानव समतेविषयी आंतरिक ओढ असल्याने १९३७ मध्ये त्यांनी विपुल वस्तीच्या मुंबईमध्ये 'बहुजनविहार' स्थापण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

महात्मे हे सर्वधर्मियही असतात व सर्वधर्मातीतही असतात व म्हणूनच खरेखुरे 'निधर्मी' ही असतात. त्यांचा धर्म असलाच तर एकच : 'सर्व–मानव–कल्याणकारी–धर्म.' धंम्मानंद तसेच होते. म्हणूनच सर्व धर्मियांसाठी त्यांनी बहुजन विहाराची द्वारे खुली ठेवली होती. बुध्दांनी बोधिप्राप्तीनंतर म्हटले होते, 'अपारुता तेसं अमतस्स द्वारा' (तेसं म्हणजे त्यांच्यासाठी, अमतस्स–अमृताची, द्वारे म्हणजे कवाडे, अपारूता–अपावृत, उघडी आहेत.) पण धंम्मानंद केवळ ब्राह्मणवादी, जैनवादी, बौद्धवादी नव्हते. ते राष्ट्रवादी, गांधीवादी, प्रार्थना समाजवादी, बहुजनविहारवादी, विश्वमानव–कल्याणवादी विश्वपुरुष होते. विशाल, उदार, असीम, परमेश, तसेच ते होते.

ब्राह्मणवादी... गांधीवादी... मार्क्सवादी... विश्वकल्याणवादी असे आपणांस भासणारे धंम्मानंद खरे तर होते 'धंम्मानंदवादी'. गांधीजींचा संलेखना सोडण्याचा आग्रह त्यांनी मानला; पण अखेर संलेखना स्वीकारलीच. ते बौद्ध भिक्षू झाले आणि पुन्हा गृहस्थही झाले. या सर्वांचे कारण म्हणजे अंधपणाने गांधीवाद, बौद्धवाद, प्रार्थना–समाजवाद, तुकारामवाद, मार्क्सवाद पूर्णपणे स्वीकारणारे ते नव्हते. ते वैचारिक निवड करणारे 'निवडक' होते. त्यांचा वाद 'वि–वेचक' वाद (मराठीतील 'वेच' करणारा हा शब्द) होता. त्यांचा ism हा Electecism होता.

गांधीजींचा मान राखायचा म्हणनू संलेखनाव्रताची केलेली 'धारणा' त्यांनी 'पारणा' रूपात परिवर्तित केली, पण करण्यासाठी काही उरलेले नाही. म्हणूनच आपण 'कतकिच्च' (कृतकृत्य) झालो आहोत या प्रत्ययाने त्यांनी २४ जून १९४७ मध्ये, विदर्भात वर्धा येथील पवनार आश्रमात देह ठेवून निर्वाणग्रामी महाप्रस्थान केले.

– प्रा. डॉ. मो. गो. धडफळे.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 बौध्द संघ स्थापना दिन :

संघ हा बुद्धांच्या शिष्यांचा आध्यात्मिक समाज होय पूर्वी होऊन गेलेला आणि सध्या अस्तित्वात असलेला, भिक्खू–भिक्खूणी आणि उपासक–उपासिकांचा बनवलेला, प्रबुद्ध आणि अप्रबुद्धांचा समावेश असलेला. संघाला अनुसरणे म्हणजे संघातील सदस्यांच्या धांम्मिक मार्गावर पुढे असणाऱ्यांच्या प्रभावास ग्रहण करणे, त्यांच्यै उदाहरणाने उत्साहित होणे आणि त्यांच्या सल्ल्यानुसार आचरणास सिद्ध असणे होय.

गौतम बुद्धांनी आपले विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या अनुयायांना संघटिन करून बौद्ध संघ स्थापन केला. जे पुरूष अनुयायी या संघात प्रवेश करत त्यांना 'भिक्खू' तर स्त्री अनुयायांना 'भिक्खूणी' असे म्हणत. त्यांना आचरणाचे कडक नियम पाळावे लागतात. बौद्ध संघात सर्व जातींच्या लोकांना व स्त्रियांनाही प्रवेश आहे.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 🔥 🔥 *२२ प्रतिज्ञा कालबाह्य झाल्या आहेत ! व पूर्वज वंशजांनी बौध्द धंम्म घेतला त्यामुळे आज प्रत्येकाला धंम्मदीक्षा घेण्याची गरज नाही ! असे म्हणणारे महाभग.* 🔥 🔥 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला "बौध्द धंम्मदीक्षा देतांना २२ प्रतिज्ञा दिल्या !" त्या "आज वर्तमानमध्ये कालबाह्य झाल्या" आहेत. तसेच आमच्या वंशजांनी बौध्द धंम्म घेतला त्यामुळे आम्हाला धंम्मदीक्षा घेण्याची गरज नाही ! असे म्हणणारे म्हणतात की, त्यामुळे आज २२ प्रतिज्ञा नाकारल्या पाहिजेत व धंम्मदीक्षा घेण्याची आज त्यांना गरज नाही" हे मत आंबेडकरी बौद्धांना पटते व रुजते काय? याकरीता "द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया" (सर्व दावेकरी), Ssd (सर्व गट), व सर्व आंबेडकरी बौध्द सामाजिक व धार्मिक संघटना यांना आव्हाहन ! पुढे या व यावर स्पष्टपणे भूमिका घ्या व स्वतःची मते द्या !

*२२ प्रतिज्ञा विरोधकांचे व बौध्द धंम्मदीक्षा घेण्याची आवश्यकता नाही. यांचे नामकरण ओळख पुढील प्रमाणे आहे. (१) अनेक वर्षापासून व वर्तमानात आजही अनेक "महाभाग" व त्यांचे शिष्य जे दिवंगत ही झाले. ज्यात दलित पँथर संस्थापक *#राजा ढाले* व त्यांचे शिष्य व अनुयायी. (२) त्रिपीटकात जे लिपीबद्ध आहे तेच मानणारे लोक व अनेक विपस्सना समर्थक. (३) काही स्वतःला आंबेडकरी म्हणवून घेणाऱ्या सामाजिक संस्था व राजकीय पक्ष. यांचे म्हणणे आहे की, *"२२ प्रतिज्ञा या कालबाह्य झाल्यात" या प्रतिज्ञा म्हणणे म्हणजे स्वतःचा अपमान करून घेणे असे क्रमांक १ चे म्हणणे आहे. म्हणून आजही राजा ढाले समर्थक २२ प्रतिज्ञा याला नाकारून त्यांचा विरोध करीत आहेत ! बाकीचे क्रमांक २ व तिसरे यांचे व्ययक्तिक हितसंबंध आड २२ प्रतिज्ञा येतात त्यामुळे ते लोक २२ प्रतिज्ञाचे विरोध करतात. तसेच यातील बरीचशी मंडळी व काही समता सैनिक दल संबधित यांचे म्हणणे आहे की वर्तमानात जे बौध्द आहेत त्यांनी स्वतः व त्यांच्या मुलांनी स्वतः बौध्द धंम्माची दीक्षा घेण्याची आवश्यकता नाही.*

स्वतःला आंबेडकरी बौध्द म्हणणारे "मान्यवर" जे २२ प्रतिज्ञाला विरोध करतात, विरोध करताना हे लोक प्रामुख्याने ९ कारणे देत आहेत !

(१) *ज्यांनी १९५६ ला व नंतर भारतात बौद्ध धंम्माची दीक्षा घेतली त्यांनी व त्यांच्या वंशजांनी "२२ प्रतिज्ञा घेण्याची व म्हणण्याची" आज गरज नाही असे २२ प्रतिज्ञा विरोधकांचे म्हणणे आहे !"*

(२) *बाबासाहेबांनी धम्मचक्र प्रवर्तन करून ६८ वर्षे उलटून गेली व "१९५६ ला जन्मलेला माणूस आज म्हतारा झाला !" "तरीही ब्रम्हा, विष्णू, महेश, गणपती या हिंदुंच्या देवांची नावं घेऊन स्वतःचा बाप हिंदू होता याची आठवण स्वतः केली पाहिजे काय?" तसेच हे म्हणतात की, "हा प्रकार असा झाला की धंम्मातराला ६८ वर्षे झाली" तरी "माझा बाप हिंदू होता हे पुढच्या पिढ्यांवर बिंबवत राहायचं काय?"* हे म्हणजे असे झाले की "अमिताभ बच्चनच्या एका सिनेमात" त्याच्या हातावर काही समाजद्रोही गोंदून ठेवतात "मेरा बाप चोर है !" "तशातला प्रकार झाला!" व धंम्मातराला ६८ वर्षे झाली तरी माझा बाप हिंदू होता हे पुढच्या पिढ्यांवर बिंबवत राहायचं ! असे २२ प्रतिज्ञा विरोधकांचे म्हणणे आहे !*

(३) तसेच बाबासाहेबांच्या परिनिर्वाणाचा फायदा घेऊन जे बुध्दीस्ट झालेले आहेत त्याच्यावर २२ प्रतिज्ञांची जबरदस्ती का म्हणून? ६८ वर्षा नंतरही २२ प्रतिज्ञा घ्याव्या लागाव्यात हा बाबासाहेब आंबेडकर नंतरच्या आपल्या पिढ्यांचा कमीपणा नाही का? त्यांना व त्यांच्या मुलांना वारंवार २२ प्रतिज्ञा म्हणतांना हिंदू धर्म देवतांचे आठवण देणे हे योग्य नाही ! असे २२ प्रतिज्ञा विरोधकांचे म्हणणे आहे.

(४) हे म्हणतात की, *तुमच्या हातावर गोंदून घ्या की "मी ब्रह्मा, विष्णू व महेश यांना देव मानणार नाही !" आणि "सांगा जगाला माझा बाप हिंदु म्हणजे गुलाम, काळा होता म्हणून !"* *हे म्हणजे असं झालं की हिंदु धर्माची ही गटारगंगा पार करण्यासाठी १९५६ ला बाबासाहेबांनी ही २२ प्रतिज्ञांची होडी बसायला दिली होती. जी नदी पार केल्यावर ती किनाऱ्यावरच सोडून द्यायला पाहिजे होती. तरीपण आज ही २२ प्रतिज्ञा म्हणजे नदी पार करण्यासाठी दिलेली होडी आहे, ती नदीकिनारी सोडून न दिल्यामुळे, स्वतःला हिंदू होतो ही जाणीव करून देणे होय. (या महाभागांनी व त्यांच्या वंशजांनी १९५६ लाच २२ प्रतिज्ञा सोडायच्या असत्या.) असे २२ प्रतिज्ञा विरोधकांचे म्हणणे आहे.

(५) २२ प्रतिज्ञा विरोधकांचे म्हणणे, *आपण "अशी कल्पना करू या की आज बाबासाहेब आंबेडकर जिवंत असते !" आणि "२२ प्रतिज्ञांना नाकारणे व सोडणे" व "२२ प्रतिज्ञा स्वीकारणारे" ही प्रतिज्ञा घेऊन मिरवण्याचा वाद बाबासाहेब आंबेडकरांच्या कानावर गेला असता तर बाबासाहेबांनी कोणाची बाजू घेतली असती?* तर बाबासाहेबांनी आज २२ प्रतिज्ञा नाकारल्या असत्या.

(६) *त्रिपीटक मध्ये २२ प्रतिज्ञा दिलेल्या नाहित. त्यामुळे २२ प्रतिज्ञा या आवश्यक नाही ! असे २२ प्रतिज्ञा विरोधकांचे म्हणणे आहे.*

(७) *विपस्सना करणे म्हणजेच खरा बौद्ध बनणे होय, त्यामळे बौद्ध धंम्मदीक्षा घेण्याची गरज नाही व २२ प्रतिज्ञा म्हणण्याची आवश्यकता नाही !*

(८) *आज एखादा ख्रिश्चन किंवा मुस्लीम धर्मीय व्यक्ती बौध्द धंम्माची दीक्षा घ्यायला जर आला तर या व्यक्तीला २२ प्रतिज्ञा मधील हिंदुंच्याच देवांच्या प्रतिज्ञा देऊन चालेल का?* असे २२ प्रतिज्ञा विरोधकांचे म्हणणे आहे.

(९) २२ प्रतिज्ञा व धंम्मदीक्षा आज स्वतःला व भारतीय बौद्धांना घेण्याची गरज नाही. कारण आमच्या वंशजांनी बौध्द धंम्मदीक्षा घेतली आहे. त्यामुळे आम्ही बौध्द आहोत.

वरीलप्रमाणे मुद्दा क्रमांक १ ते ९ मधील मुद्दे हे २२ प्रतिज्ञाला विरोध करणाऱ्या "मान्यवर" जे स्वतःला बौद्ध म्हणवून घेतात त्यांचे २२ प्रतिज्ञा विरोध करतांना आहेत !

बाबासाहेब आंबेडकरांनी जे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य घटनेत दिलेले आहेत, या स्वातंत्र्य याचा हे फायदा/वापर किंवा गैरवापर हे २२ प्रतिज्ञा विरोधक स्वतःला बौद्ध म्हणवणारे धर्मबंधू घेत आहेत/नाहीत हे आंबेडकरी बौद्धांना आज ठरवायचे आहे !

याकरीता जाहीर नम्र निवेदन :– *ज्या संघटना बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या आहेत त्यांनी व त्यात कार्यरत व्यक्तींनी "२२ प्रतिज्ञा या आज गरजेच्या व आवश्यक आहेत का? व त्यात सुधारणा करण्याची किंवा बदल करण्याची आवश्यकता आहे का?" याकरीता "कार्यशाळा, चर्चासत्र व भाषणाची कार्यक्रम लावून किंवा संगीती भरवून योग्य तो निर्णय घेणे !*

२२ प्रतिज्ञाला विरोध करणाऱ्यांचे मुद्दा क्रमांक (१) ते मुद्दा क्रमांक (८) मधील २२ प्रतिज्ञा विरोधात असणारे मुद्दे याचे लेखकर्ते (उमेश गजभिये) उत्तर देण्याचे प्रयत्न करीत आहे ! (यात समविचारी आंबेडकरी बौद्धजन सूचना किंवा दुरुस्ती सुचवू शकतात, त्यांचे स्वागत आहे !)

२२ प्रतिज्ञा विरोध करणारे, यांना उत्तरं :

बुद्ध जयंती २३, मे, १९५६, मुंबई, बाबासाहेब म्हणतात :– *बौद्ध धंम्मात काही त्रुटी आहेत !* "बौद्ध धंम्मात उपासकाला दीक्षा दिली जात नसे ! त्यामुळे बौद्ध धंम्माच्या संघ दीक्षेवर त्याचा विपरीत परिणाम होतो." त्यामुळे धम्माबद्दल उपासकाच्या मनाची परिपूर्ण तयारी झालेली नसते. "परंतु माझ्या बौद्ध धंम्मात उपासकाला ही धम्मदीक्षा दिली जाईल."*

वरीलप्रमाणे मत बाबासाहेब आंबेडकर यांचे आहे, *बौद्ध धंम्मात पूर्वी उपासकाला दीक्षा दिली जात नसे ! त्यामुळे "बौद्ध उपासक संघ दीक्षेवर याचा फारच वाईट परिणाम झाला!"* "कारण उपासकाला अनिवार्य धम्म दीक्षा नसल्यामुळे तो वैदिक धर्म म्हणजेच आजचा हिंदू धर्म याचा व बौद्ध धंम्म या दोन्ही धर्माचा अनुयायी असे !'

बाबासाहेब आंबेडकरांनी, महाबोधी सोसायटीचे जनरल सेक्रेटरी डी. वली सिन्हा यांना १६ फेब्रुवारी १९५५ ला उपासकाला बौद्ध धंम्मदीक्षा बद्दल एक लेटर लिहिले आहे, त्यातील मजकूर असा आहे; "In Buddhism I have prepared formula which I call Dhamma Diksha. Every one who wishes to be converted to Buddhism shall have to undergo through ceromony otherwise he will not be regarded as a Buddhist."

मराठीत भाषांतर. बौद्ध धंम्मात मी एक सूत्र तयार केले आहे ज्याला मी धम्मदीक्षा म्हणतो. बौद्धधंम्मात धर्मांतर होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकाला हा धम्म दीक्षाविधी पार पाडावा लागेल, अन्यथा तो बौद्ध म्हणून गणला जाणार नाही."

परंतू झाले उलट *आजही १९५६ मध्ये व त्यानंतर ज्यांनी बौद्ध धंम्माची दीक्षा घेतली त्यांचे वंशज स्वतः "उपासकाला अनिवार्य केलेली बौद्ध धंम्मात प्रवेश करण्यासाठी धम्मदीक्षा ज्यात २२ प्रतिज्ञा अनिवार्य आहेत !" ही धंम्मदीक्षा व्ययक्तिक न घेता आमच्या पूर्वजांनी बौद्ध धंम्माची दीक्षा घेतली असल्याने; आम्हांला घेण्याची गरज नाही असे जाहीरपणे म्हणतात. कारण त्यांचे म्हणणे आहे त्यांच्या रक्तातच बौद्ध धंम्म आहे !*

"वरील प्रमाणे म्हणणारे व स्वतःला बौद्ध म्हणवून घेणारे हे वंशज, बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करीत आहेत, असे मला वाटते !"

कारण यातलं बहुसंख्य नवीन वंशज हे "पंढरपूर, गणपती, दुर्गा (गौरी), महादेव यात्रा (महेश), कृष्णाची दही हंडी (विष्णूचा अवतार) यातच गुंतले आहेत ! हे लोक लक्ष्मी पूजा, दुर्गा पूजा, दिवाळी व होळी उत्साहात साजरी करून स्वतः आजही हिंदू आहोत, हे जारीरपणे स्वतःचे प्रदर्शन करीत आहेत !

याचे खरे कारण म्हणजे या १९५६ च्या बौध्द धंम्मांतरित यांचे नवीन वंशज यांनी बाबासाहेब आंबेडकर ज्याप्रमाणे म्हणतात त्याप्रमाणे "प्रत्येक उपासकाला अनिवार्य बौध्द धंम्माची दीक्षा घेतली नसल्याने" ते जीवन जगतांना हिंदू व बौध्द म्हणूनच भेसळयुक्त जीवन जगत असतात ! तसेच या वंशजांचे व त्यांच्या पूर्व व वर्तमान पिढीचे आदर्श हे "आज बाबासाहेब आंबेडकर हे नसून दुसरेच कोणीतरी आहेत !" ज्यांनी २२ प्रतिज्ञा व धंम्मदीक्षा स्वतः घेण्याला विरोध केला आहे.

आज भारतात २२ प्रतिज्ञा शिवाय कोणीही आंबेडकरी बौध्द, *"बौध्द धंम्माची दीक्षाविधी कार्यक्रम घेत नाहीत!" त्यामुळे २२ प्रतिज्ञा विरोधी यांना ही बौध्द धंम्मदीक्षा घेणे आवश्यक वाटत नाही व स्वतःही बौद्ध धंम्मदीक्षा घेत नाहीत! त्यामुळे यांना व नवीन पिडीचे वंशज यांना बाबासाहेब आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे हे दोन्ही धर्माचे अनुयायी राहण्याची संमभवणा असते. त्यामुळे हे लोक हिंदू व बौद्ध यातील दोन्ही परंपरा याचे पालन करत असतात !*

१९५६ च्या नंतर आजपर्यंत जे बौध्द धंम्मांतर कार्यक्रम झालेत ! "ते sc हिंदूंचे असो, st चे असो किंवा obc हिंदू व इतर हिंदूंचे असो, हे "सर्व बौद्ध धंम्मांतर कार्यक्रम हे बौध्द धंम्मदीक्षा घेतांना २२ प्रतिज्ञा देऊनच झालेले आहेत !" त्यामुळे "२२ प्रतिज्ञा विरोधी लोकांनी" कितीही आरडाओरडा केला तरी "२२ प्रतिज्ञा या आंबेडकरी बौद्धांचा सन्मान व स्वाभिमान आहेत हे बहुसंख्य बौद्धांनी मान्य केले आहे व विरोध करणारे हे नगण्य लोक आहेत, ज्यांची दखल भारतात कोणीही घेत नाही !"

बाबासाहेबांनी धम्मचक्र प्रवर्तन करून ६८ वर्षे उलटून गेली, तरी १९५६ ला जन्मलेला माणूस म्हतारा झाला तरीही ब्रम्हा, विष्णू, महेश, गणपती या हिंदुंच्या देवांची नावं घेऊन स्वतःचा बाप हिंदू होता याची आठवण द्यायचीच का? असे म्हणून हे लोक २२ प्रतिज्ञा यांना विरोध करून बौद्ध धंम्मात धंम्मांतरित होण्यासाठी "धंम्मदीक्षा ही बाबासाहेब आंबेडकरांनी अनिवार्य/सक्तीची" केलेली आहे त्यातच अडथळा निर्माण करीत आहेत व *भारत बौद्धमय करण्यात हे लोक आज अडथळा निर्माण करीत आहेत !* कारण *२२ प्रतिज्ञा या बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धंम्मदीक्षा देतांना दिल्या आहेत व त्यानंतर चंद्रपूर धर्मदीक्षा व भारतातील इतर धर्मदीक्षा कार्यक्रम याकरीता अनिवार्य व बंधनकारक आहे.* प्रथम या लोकांनी पूर्णपणे बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान मान्य करावे व नंतरच दुसऱ्यांना सांगावे !

१९५६ नंतरच्या वंशजांनी "२२ प्रतिज्ञा" मुळे आजही हिंदू धर्मीय देवतांची नावे घेऊन स्वतःचा बाप हिंदू होता अशी आठवण होते, असे म्हणणारे हे लोक "नौकरी वेळेस, स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाच्या वेळेस जी कास्ट सर्टिफिकेट व कास्ट वॅलीडिटी सर्टिफिकेट सादर करतात तेथेच त्यांचे पूर्वज हे १९५० च्या पूर्वीचे #अस्पृश्य, दलित sc होते असे स्पष्ट लिहले आहे !" हे आरक्षण घेतांना त्यांना आजपर्यंत शरम आलेली नाही व स्वाभिमान दुखावला नाही, परन्तु जेव्हा "बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा" म्हणण्याची वेळ येथे तेव्हा यांचा आजपर्यंत नसलेला स्वाभिमान उफाळून येतो. ते २२ प्रतिज्ञा नाकारून बाबासाहेब यांनाच नाकारत आहेत व विरोध करीत आहेत याचे आकलन त्यांना आजपर्यंत झालेले दिसत नाही !

एखादे फिल्मी डायलाग व २२ प्रतिज्ञा हे बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले धर्मांतर करीत असणारे एक अमूल्य व अमोघ शस्त्र आहे, हेच या अज्ञानी २२ प्रतिज्ञा विरोधी लोकांना समजले नसल्याने, हे लोक अशी दोघात तुलना करतात व हे विसरतात की फिल्मी डायलाग हे धम्म तत्वज्ञान नाही. तर २२ प्रतिज्ञा हे जीवन आचरण करण्याचे तत्वज्ञान आहे !

२२ प्रतिज्ञा मुळे यांचा नसलेला स्वाभिमान कसा दुखवतो हे यांचे म्हणणे पटण्यासारखे नाहीच. कारण एखादी बाब वारंवार म्हंटल्याने ते मनात घट्ट होते व त्यामुळे हे मला करायचे नाही याचे स्मरण सतत होत असते! व ते कारणासाठी तो इतरांना ही प्रोत्साहित करीत असतो ! २२ प्रतिज्ञा या मनावर बिंबवण्याचे मानसिक संस्कार व आधुनिक धम्माचा पाया आहे. जो सर्व बौध्द होऊ इच्छिणाऱ्या भारतीय बौद्ध, हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती व इतर धर्मीय यांना आवश्यक आहे. कारण हे सर्व संस्कारित भारतीय आहेत. जे गणेश दर्शन, दुर्गा पूजा, गणपती पूजन, महादेव दर्शन, देवीचे दर्शन यात सहभागी होतात. याचे अनेक उदाहरण प्रत्यक्ष अनुभवता येईल.

भारतात महाराष्ट्र काही सोडल्यास इतर राज्यात बाबासाहेब आंबेडकरांना मानणारे हे हिंदुधर्मीय आहेत व यांच्या मनावर हिंदू धर्मीय देव देवतांचा वर्चस्व व पगडा आहे, त्यामुळे यांना भारतात बौद्ध धंम्मात धर्मांतर करीत असतांना, धम्मदीक्षा घेतांना बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा देणे आजही आवश्यक व गरजेचे आहे व त्यामुळेच त्यांचा बौद्ध धर्मात नवीन जन्म होऊ शकतो !

*"यातील ३३ प्रतिज्ञा विरोधी लोक हे बहुसंख्य (अपवाद सोडून) राजकीय ध्येयाने प्रेरित, पछाडलेले, महत्वाकांक्षी व स्वार्थी असतात हा आजवरचा अनुभव आहे !" "कारण २२ प्रतिज्ञा या राजकारणी लोकांना राजकारण करतांना एक मोठी अडचण निर्माण करते व या लोकांना सतत भीती वाटते की, जर हे २२ प्रतिज्ञा याचे समर्थन करतील तर हिंदू लोक व इतर यांच्या राजकीय पक्षाला वोट देणार नाहीत !" या भीतीने हे लोक २२ प्रतिज्ञेला सतत आजपर्यंत विरोध करीत आलेले आहेत !" असे करून, हे लोक बाबासाहेब आंबेडकर यांचाच विरोध करतात व राजकीय खेळी करण्यासाठी आपली पोळी शेकत आहेत असे आढळून येते ! कारण "ज्या संघटना व राजकीय पक्ष दोन ते तीन वर्षातच विभक्त होते व फुटते" तिलाच ते बुद्धीने एकत्र टिकवून ठेऊ शकले नाहीत, तेच लोक बाबासाहेब

आंबेडकरांनी दिलेली बौद्ध धंम्मातील आजचे एक धम्म जीवन जगण्याचे १९५६ नतंरचे बौद्ध तत्वज्ञान "२२ प्रतिज्ञा" याला विरोध करतात म्हणजे बौद्ध धंम्मालाच विरोध करीत आहेत ! हा एक हास्यास्पद प्रकार आहे !*

"२२ प्रतिज्ञा व बौध्द धंम्मदीक्षा या इतर धर्मीय व हिंदू धर्मीय यांना बौद्ध धंम्मिय बनण्यास अडचणीचे ठरत आहेत !" असे म्हणणारे लोक हे विसरत आहेत की भारतात बहुसंख्य हे हिंदू धर्मीय आहेत, यांना बौद्ध धंम्मात धर्मांतर करायचे असेल तर २२ प्रतिज्ञा घेणे आवश्यक आहेत अन्यथा हे लोक बौद्ध धंम्मात आल्यानंतर बौध्द धंम्माला दूषित करणे सुरू ठेवतील ! हे दृश्य आज काही धर्मातरित बौद्धांमध्ये व त्यांच्या वंशज मध्ये दिसत आहेतच ! "त्यामुळे २२ प्रतिज्ञा या भारतात फारच महत्त्वाच्या आहेत हे बाबासाहेब आंबेडकर जाणत होते त्यामुळेच त्यांनी २२ प्रतिज्ञा दिल्यात !"

*बावीस प्रतिज्ञा या त्रिपिटक मध्ये दिलेले नाही असे म्हणणे चुकीचे व असत्य आहे !

कारण "बाबासाहेब आंबेडकरांनी बावीस प्रतिज्ञा या बुद्धांनी सांगितलेल्या तत्वज्ञान मधून फक्त सुटसुटीत व स्पष्टपणे एक एक करूनच शुद्ध धम्म भारतातील लोकांना सोपा जाईल याकरीता दिलेला आहेत !"*

त्रिपिटक साहित्यातील "सुत्त पिटक" साहित्यात "मज्जीम निकाय" मधील "देवदह सुत्त" मध्ये "ईश्वराचे/देवतांचे अस्तित्व नाकारले आहे !" तसेच "दीघनिकाय" मधील "ब्रह्मजाल सुत्त व पाथिक सुत्त मध्येही" ईश्वराला/देवताला नाकारले आहे !

फक्त बाबासाहेब आंबेडकरांनी २२ प्रतिज्ञा मध्ये देव/देवता/ईश्वर यांचे नावे एक एक सविस्तर घेऊन त्यांचे अस्तित्व नाकारून उपासना करण्याचे नाकारले आहे व बौद्ध धंम्मातील साहित्यात व धंम्माला एक मजबूत आधार दिलेला आहे !

*विपस्सना करणे म्हणजेच खरा बौद्ध बनणे होय, त्यामुळे बौद्ध धंम्मदीक्षा घेण्याची गरज नाही व २२ प्रतिज्ञा म्हणण्याची आवश्यकता नाही ! असे म्हणणारे हे जर १९५६ च्या पूर्वीचे अस्पृश्य दलित हिंदू व त्यांचे वंशज असतील, तर त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या करिता जे ही कार्य केले त्याचा लाभ घेणे कृपया सोडून द्यावे व त्यानंतरच २२ प्रतिज्ञा धर्मदीक्षा घेणे विरोधी भूमिका घ्यावी !'

"कारण हे विपस्सना समर्थक अनेक लोक बौध्द धंम्म हा धंम्म नसून पंथ आहे अशी भूमिका घेतात !" व "विपस्सना करणे म्हणजेच बौद्ध होणे असे म्हणून" हे लोक बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा याला विरोध करतात ! व धंम्मदीक्षा घेणे नाकारतात. हे लोक त्रिपीटकात मधील संदर्भ देऊन विपस्सनाच फक्त धंम्म आहे याची मांडणी करीत आहेत ! व त्रिपीटक मध्ये २३ प्रतिज्ञा नाही असे यांचेही म्हणणे आहे ! कारण २२ प्रतिज्ञा या बौध्द धर्मांतर करतांना बाबासाहेब आंबेडकरांनी अनिवार्य केलेले असल्याने व यांना अधिकृतपणे बौध्द धंम्माची दीक्षा घ्यायचे नसल्याने ही भूमिका घेत आहेत !

आज एखादा ख्रिश्चन किंवा मुस्लीम धर्मीय व्यक्ती किंवा हिंदू सोडून इतर धर्मीय व्यक्ती जर बौध्द धंम्माची दीक्षा घ्यायला आला. तर या व्यक्तीला २२ प्रतिज्ञा मधील हिंदुंच्याच देवांच्या प्रतिज्ञा देऊन चालेल का? हा एक महत्वाचा मुद्दा आहे, जो बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संघटना मुख्यतः "द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे सर्व गट मतभेद बाजूला करून, Ssd व आंबेडकरी बौद्ध लोकांच्या सामाजिक व धार्मिक संघटना या सर्वांनी एकत्र बसून" किंवा इतर उपायाने याकरीता एक "संगीती" घेऊन एकमताने किंवा बहुमताने निर्णय घेणे आवश्यक आहे !

याकरीता मी काही उपाय सांगण्याचा प्रयत्न करतो, योग्य असेल तर त्यावर विचार करता येईल किंवा त्यात दुरुस्ती करता येईल !

"बावीस प्रतिज्ञा मध्ये प्रथम ५ प्रतिज्ञा या हिंदु धर्मीय देव देवतांना मानणार नाही व त्यांची उपासना करणार नाही यासंदर्भात आहेत !" यामध्ये जे ईतर धर्मीय जसे मुस्लिम व ख्रिश्चन हे बौध्द धंम्मात धर्मांतर करीत असतील तर "या पाच प्रतिज्ञाच्या ऐवजी त्यांच्या धर्मातील देव देवता, ईश्वर, पैगंबर किंवा ईश्वर दूत किंवा ईश्वर पुत्र यांना मानणार नाही व उपासना करणार नाही हा बदल सर्व समंतीने "संगीती घेऊन किंवा सांघिकपणे किंवा सहमतीने" करता येऊ शकतो !

बावीस प्रतिज्ञा मध्ये सहावी प्रतिज्ञा ही "मी श्राध्दपक्ष करणार नाही, पिंडदान करणार नाही" असा आहे !" यामध्ये ईतर धर्माचे मृत्यूनंतर होणाऱ्या क्रियाविधी मनाई करून त्यांना दीक्षा देताना या सहाव्या प्रतिज्ञेत बदल करता येऊ शकतो !

सातवी प्रतिज्ञा ही बौद्ध धर्माच्या विरुद्ध विसंगत आचरण करणार नाही असे आहे !

"आठवी प्रतिज्ञा, कोणतेही क्रियाक्रम मी ब्राम्हणाच्या हातून करवून घेणार नाही !" याऐवजी इतर धर्माच्या पुरोहित वर्गाकडून कोणतेही क्रियाक्रम करून घेणार नाही हा बदल करू शक्यतो !

नववी व दहावी प्रतिज्ञा ही बौद्ध धम्म तत्व आहेत !

११ वी अष्टांगिक मार्ग पालन करेन व १२ वी दहा पारमिता पालन करेन अशी आहेत !

१३ ते १७ या पंचशील आहेत.

१८ वी धम्म तत्व आहे !

१९ व्या प्रतिज्ञेत हिंदू धर्माचा त्याग करतो याऐवजी जे ही इतर धर्मीय असतील त्या धर्माचा त्याग करतो हा बदल करता येतो !

२० ते २२ व्या प्रतिज्ञा या बौद्ध धंम्म संबंधित आहेत ! व बौद्ध धंम्मात नवीन जन्म या संदर्भात आहेत !

याप्रकारे २२ प्रतिज्ञा यामध्ये इतर धर्मीय हिंदू सोडून बौद्ध धंम्मांत धर्मातर करीत असतील तर हा बदल करता येऊ शकतो !

माझे हे म्हणणे अंतिम नाही ! यामध्ये बदल व फेरबदल होऊ शकतो !

त्यामुळे २२ प्रतिज्ञा या बुद्धांनी सांगितलेला पूर्ण बौद्ध धम्म आहे, हे बाबासाहेब आंबेडकर हे त्यातून प्रतिपादन करीत आहेत ! असेच मला आढळून आले आहे ! बदल-फेरबद्दल हा #अनित्य सिद्धांत बुद्धांनी प्रतिपादन केलेला आहे. धम्म पोषक व आचरणशिल बनण्या करिता बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर अनित्य सिद्धांत सांगतात. मूलतत्व मजबूत करण्यासाठी आधुनिक काळात केलेली नवीन उपाय कौसल्य किंवा उपाय योजना.

त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांनी धंम्मदीक्षा प्रत्येक व्यक्तीला अनिवार्य घेण्यास सांगितले आहे. भारतात बौध्द धंम्मदीक्षा घेतांना २२ प्रतिज्ञा अत्यंत आवश्यक आहेत.

दिनांक २६ मे २०२३ व (सुधारित: १६ ऑक्टोबर २०२३).

✍️उमेश गजभिये (समन्वयक – समता सैनिक दल).

☸️☸️🦚🦚🦚💎 🌺 आधुनिक भारतात बाबासाहेबांनी केलेल्या 'धम्मचक्र प्रवर्तन दिवस (Day) व दिनांकाबाबत (तारखेबाबत/Date)' काहीसे विवेचन 🌺 💎🦚🦚🦚☸️☸️

मित्रांनो, बाबासाहेबांनी दिल्लीहून (२६, अलीपुर रोड, दिल्ली) आपल्या धर्मांतराची जी वृत्तपत्रीय बातमी दिली होती ती पुढीलप्रमाणे...

★ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश ★

"बौद्ध धंम्म स्वीकारण्याचा #दिवस व #ठिकाण मी आता निश्चित केले आहे. #येत्या दसऱ्याला तारीख १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे मी धर्मांतर करणार आहे. या दिवशी सकाळी ९ ते ११ वाजता माझा धर्म दीक्षा विधी समारंभ होईल व सायंकाळी माझे सर्व लोकांसाठी जाहीर व्याख्यान होईल."

बी. आर. आंबेडकर, २३ सप्टेंबर १९५६.

वरील वृत्तपत्रीय बातमीत रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक, बौद्ध धंम्माचे अंगिकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २३ सप्टेंबर १९५६ रोजी प्रेस नोटद्वारे जे कळविले आहे त्यात त्यांनी अगदीच स्पष्टपणे खालील बाबी नमूद केलेल्या आढळतात त्या अशा की, १) त्यांनी बौद्ध धंम्म (Religious conversion to Buddhism) स्वीकारण्याचे निश्चित केले आहे. २) त्यांनी दिवस (Day) निश्चित केला आहे. ['दसरा' हा दिवसास (Day) अनुसरून येतो, तारखेस (Date) नव्हे. म्हणजे 'दिवसावरून तारीख निश्चिती' हा येथे मुद्दा आहे. हे येथे लक्षात घेतले पाहिजे.] ३) त्यांनी ठिकाण (Place) निश्चित केले आहे. ४) 'दिवस व ठिकाण' निश्चितीनंतर त्यांनी 'येत्या दसऱ्याला' (जो की एक 'दिवस/Day' आहे) असे त्यातून स्पष्ट केल्यावर त्या दिवसाला पडणारी 'तारीख' (जी एक दिनांक/Date आहे) म्हणजेच '१४ ऑक्टोबर १९५६' ला धर्मांतर करणार असेन असे स्पष्ट केले आहे. ५) ज्याअर्थी त्यांनी 'दिवस' (Date) निश्चित केला आहे त्याअर्थी त्या दिवसानुरूप येणारी तारीख (Date) म्हणजे तेव्हाची १४

ऑक्टोबर १९५६ राहिलेली आहे. जसे दिवसावरून तारखेकडे (Day to Date) वाटचाल केल्यास तेव्हाची १४ तारीख होती हे अगदीच स्पष्ट आहे. तद्वतच 'ठिकाण' (Place) निश्चिती नंतर 'शहर' (Nagpur) निश्चितीची वाटचाल (Place to City) करून ठिकाणाचे नाव 'नागपूर' शहर असेन असे त्या प्रेस नोटमधून स्पष्ट होते. ६) 'बौद्ध धंम्म स्वीकारणे' म्हणजे 'दीक्षा विधी' समारंभाद्वारे जाहीरपणे 'धर्मांतर' (Conversion) करणे असेन असेही (याअर्थी) त्यांनी त्यातून जनतेपुढे अगदीच स्पष्ट केले आहे. ७) त्याच दिवशी जी तारीख राहणार आहे (जी तेव्हा १९५६ सालची १४ ऑक्टोबर होती) त्या दिवशी येणाऱ्या तारखेस सायंकाळी धंम्म दीक्षा विधी समारंभानंतर लोकांसाठी जाहीर व्याख्यान होईल असेही त्यांनी त्यातून स्पष्ट केले आहे.


यासह त्यावेळी जनमानसांत धर्मांतराच्या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी रूपरेषा असलेली जी हस्तपत्रिका (Pamphlet) बौद्धजन समिती द्वारे छापण्यात आली होती त्यात दिवसाचा (Day) उल्लेख 'अशोका विजयादशमी' असा स्पष्टपणे करण्यात आला आहे. आणि निश्चितच ही बाब बाबासाहेबांच्या ध्यानीमनी नसेल असे कसे शक्य आहे? तेव्हा एकंदरीत या साऱ्या बाबींचा सारासार तार्किकदृष्ट्या विचार करता मी या मतावर पोहोचलो आहे की 'धंम्म दिक्षा दिवस' (धर्मांतर दिवस/Day) हा 'दसरा' आहे. आणि त्या दिवसानुरूप प्रत्येक वर्षी जी कुठली तारीख (दिनांक/Date) येत जाईल तेव्हा–तेव्हा त्या दिवसाच्या तारखेला तो आपण साजरा केला पाहिजे. अशोका विजयादशमी हाच तो दिवस ! जगाची पुनर्रचना (Reconstruction of the world) करण्याचा संकल्प घेऊन बाबासाहेबांनी घडवून आणलेली ती महान क्रांती होय.

आणि म्हणूनच बाबासाहेब हे आधुनिक भारतातील धम्मचक्रप्रवर्तनकार आहेत. यास्तव तो क्रांतिकारी #ऐतिहासिक_धर्मांतर_दिन, हा '#धम्मचक्रप्रवर्तनदिन' म्हणून न्यायसंगत व तर्कसंगतही आहे. बाकी बाबासाहेबांच्या प्रगल्भ विद्वत्तेसह असलेल्या मुत्सद्दीपणाबद्दल मांडावे तितके कमीच ! खरोखरच, आधुनिक भारतात असा धर्मवीर होणे नाही !

जयबुद्ध जयभीम जय आरपीआय

~ प्रशीक आनंद ~ दि. १६ ऑक्टोबर २०२०, दीक्षाभूमी नागपूर.

टीप : दिनांक '१४ ऑक्टोबर हा दिन' साजरा करण्याबाबतही तितकीच सकारात्मकता बाळगावी हे येथे विशेषत्वाने नमूद करावेसे वाटते.



बुद्ध धर्मानेच जगाचा उद्धार होणार आहे

"भारतीय बौद्धजन समितीचे प्रवर्तक आणि अध्यक्ष, भारतातील दलित जनतेचे कंठमणी, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे घटना-पंडित, अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनचे संस्थापक आणि कर्णधार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येत्या १४ ऑक्टोबर १९५६ च्या सकाळी ८ वाजता नागपूर येथे बौद्ध धर्म दीक्षा घेण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा
संदेश

२६, अलीपूर रोड,
दिल्ली, ता. २३ सप्टेंबर १९५६


बौद्ध धर्म स्वीकारण्याचा दिवस व ठिकाण मी आता निश्चित केले आहे. येत्या दसऱ्यास तारीख १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे मी धर्मांतर करणार आहे.

या दिवशी सकाळी ९ ते ११ वाजता माझा धर्म-दीक्षा विधी समारंभ होईल व संध्याकाळी माझे सर्व लोकांसाठी जाहीर व्याख्यान होईल.

बी. आर. आंबेडकर,
२३ सप्टेंबर १९५६.

"प्रबुद्ध भारत" च्या संपादकांना एक विशेष संदेश डॉ. बाबासाहेबांनी पाठविला असून बौद्ध धर्म स्वीकारावयाचा वर दिलेला दिवस, तिथी आणि समय कळविला आहे.


विजयादशमीचा मुहूर्त धर्मदीक्षेसाठी साधण्यात अत्यंत औचित्य आहे. विजयादशमी ही महान बौद्ध सम्राट अशोकाच्या विजयाचा दिन म्हणूनच पाळली जाते. अलिकडील तिनशे वर्षांत पावसाळ्याच्या समाप्ती नंतर मराठे सीमोल्लंघन या विजयादशमीला करीत असत. अस्पृश्य आणि दलित समाजाच्या डोक्यावर



गेली हजार वर्षे जे काळेकुट्ट ढग जमले होते ते या अडीच हजाराव्या बौद्ध वर्षाच्या विजयादशमीला धर्मचक्र नवप्रवर्तन करून डॉ. बाबासाहेब नष्ट करणार आहेत. हिंदू धर्माच्या सीमामध्ये बंदिस्त अस्पृश्य समाज या दिवशी त्यांना शतकानुशतके गुलाम ठेवणारी धार्मिक तटबंदी उल्लंघून नव स्वातंत्र्याचे उदक पिण्यास तयार होणार आहे. हेच ते खरे सीमोल्लंघन. ते केल्यावर परत यावयाचे नाही, या भीम निश्चयाने प्रत्येक अस्पृश्य दलिताचे पाऊल पुढे पडणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा बौद्ध-धर्म-दीक्षा समारंभ ब्रह्मदेशचे महास्थविर पूज्य भिक्षु चंद्रमणी संपन्न करणार आहेत. त्याचवेळी लाखो लोक बौद्धधर्माची दीक्षा घेण्यासाठी नागपूरला एकत्र येतील.

नागपूर शहरात पूर्व दिशेकडून रायपूर, दुर्ग, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यातून





धम्मदीक्षा सोहळ्यात डॉ. आंबेडकरांनी स्वतः बौद्ध धम्म दीक्षा घेतल्यानंतर आपल्या लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली.
After accepting Dhamma Deeksha, Dr. Ambedkar in turn imparted it to lacs of his followers who had gathered on the occasion.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 अशोक विजयादशमी ला १९५६ रोजी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पूज्य भंतेजी चंद्रमणी महाथेरो यांच्या कडून जागतिक बुद्‌ध धम्माची धम्मदिक्षा घेतली (विश्वगुरु भगवान बुद्‌ध यांच्या महापरिनिर्वाणा ला अडीच हजार वर्ष पूर्ण झाले होते; [आता दोन हजार पाचशे सदुसष्ट वर्षे (२५६७) पूर्ण झाली आहेत.]) या भारत देशातील महाराष्ट्र राज्यातील "नागपूर येथे (धम्मदिक्षा देण्यासाठी पूज्य भिकखू संघ एकूण ७ सात होते) भिकखू – चंद्रमणी महाथेरो – ब्रम्हदेश; भिकखू – प्रज्ञातिस्स – श्रीलंका; भिकखू – एम, संघरत्न महाथेरो – श्रीलंका; भिकखू – श्रद्धातिस्स – श्रीलंका; भिकखू – एच, धम्मानंद महाथेरो – श्रीलंका; भिकखू – प्रज्ञानंद गलगेदर – श्रीलंका; भारतनिवासी–भिकखू – सुमेध – वर्धा महाराष्ट्र, भारत -या पूज्य भिकखू संघ यांच्या कडूनच धम्मदिक्षा घेण्याचा आधीच म्हणजे १३ तारखेला सायंकाळी "परित्राण पठण करून घेतले" होते. 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️








☸️☸️🦚🦚🦚💎 अशोक विजय दशमी क्या है?? 💎🦚🦚🦚☸️☸️

अशोक विजय दशमी क्या है?? क्यों मनाते हैं??

२४ अक्टूबर २०२३ को हम सभी अपने गौरवशाली इतिहास को जानेंगे और प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक का गौरवशाली दिवस अशोकाविजय दशमी का उत्सव बड़े हर्षोल्लास के साथ मनायेंगे।

👉 अशोकाविजय दशमी क्या है??

आज ही के दिन चक्रवर्ती सम्राट अशोक ने कलिंगा पर विजय प्राप्त किया था, और विजय प्राप्त करने के दस दिन बाद उस समय के प्रसिद्ध बौद्ध भिक्षु महामोगलायन के पुत्र तिस्स से बुद्ध धम्म अपनाकर खुद विजय प्राप्त किया था। इसीलिए ही भारत इस दिवस को विजय दिवस और सम्राट अशोक के नाम पर अशोका विजय दशमी क्योंकि दशवें दिन ही बुद्ध धम्म ग्रहण किया था नाम से जाना हैं।

👉 दसहरा क्या है??

जैसे कि नाम से अनुमान लगा सकते हैं कि दसहरा का अर्थ है। दस (१०) + हरा (हरा देना) = दसहरा और रावण लंका का राजा था जो कि बौद्ध सम्राट था जिसे पाखंडी ब्राह्मणों ने राक्षस नाम दिया था।

रावण के दस सिरों के नाम :

१ –चंद्रगुप्त मौर्य; २ –बिंदुसार मौर्य; ३ –सम्राट अशोक; ४ –कुणाल मौर्य; ५ –दसरथ मौर्य; ६ –सम्प्रति मौर्य; ७ –शालिसुक मौर्य; ८ –देववरमन मौर्य; ९ –सतधनवन मौर्य; १० –बृहदत मौर्य

ए सभी मौर्य सम्राट थे उस समय भारत समृद्ध था और ब्राह्मणों का वर्चस्व खत्म हो गया ब्राह्मण अंदर ही अंदर झुलस रहे थे जिनका बदला ब्राह्मण सेनापति पुष्य मित्र सुंग ने बृहदत मौर्य की हत्या करके लिया और उस समय से नफरत की आग 🔥 बुझाने के लिए दस मौर्य सम्राटों को मिलाकर एक बौद्ध सम्राट रावण का नाम दिया जिसे हर साल अशोका विजय दशमी के दिन ही जलाने लगे जिससे अपने मुलंनिवासी समाज के अशिक्षित लोग शामिल होकर अपने ही पूर्वजों को जलाकर 'त्योहार (उनकी हार का जश्न)' मनाने लगे।

ब्राह्मणों का अपना कोई भी अस्तित्व नहीं है सब बुद्ध धम्म से चोरी करके या छीन कर कब्जा किये हुए हैं। हम सब भारत के मूलनिवासी आर्य थे अर्थात श्रेष्ट थे बाहर आये बिदेशी अनार्य ब्राह्मणों ने खुद को श्रेष्ट बना लिया और भारत के मूलनिवासियों को अनार्य अर्थात अशिक्षित बना दिया। अब जरूरत है कि अपने असली इतिहास को जाने और ब्राह्मणों द्वारा थोपे गये 'त्योहारों (उनकी हार का जश्न)' जिसमें हमारे ही महापुरुषों की हत्या करके जश्न मनाया गया था उसे छोड़कर अपने गौरवशाली उत्सव और महोत्सव को मनायें ।

– बौद्धाचार्य डॉ एस एन बौद्ध |

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 नागपूरच्या दिक्षाभूमीमधे २४ ऑक्टोबर २०२३ अशोक विजयादशमी रोजी जंबुद्विपाचे महान सम्राट अशोक यांचा १०" फुट उंचीचा पुतळा स्थापन करण्यात येणार आहे. 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️



☸️☸️🦚🦚🦚💎💙 नागांच्या नागभूमीत महान अशोक.❤️💎🦚🦚🦚☸️☸️

#जगज्जेते_चक्रवर्ती_विश्वसम्राट_प्रियदर्शी_महान_अशोक......

भारतात महान अशोकांचे #अशोकराज्य अर्थात #धम्मशासन पुनर्स्थापित करायचे आहे....... महान अशोकांचा भारत निर्माण करायचा आहे.

जगाच्या/पृथ्वीच्या सर्वाधिक भूभागावर राज्य करणारे, आपली हुकूमत निर्माण करणारे जागतिक इतिहासातले जगातले एकमेव चक्रवर्ती विश्वसम्राट, ज्यांच्या काळात भारत पहिल्यांदा व शेवटचा जागतिक महासत्ता बनला होता, ज्यांच्या काळाला सुवर्णयुग म्हणल्या जाते, ज्यांच्या काळात भारतात सोन्याचा धूर निघत होता, ज्यांच्या काळात भारताला सोने की चिडीया म्हणत, तुकड्या–तुकड्यांमध्ये खंडित झालेल्या भारताला एकाच सूत्रात बांधणारे, केवळ माणसांकरिताच नव्हे तर जनावरांसाठी सुद्धा दवाखाने निर्माण करणारे करुणामयी विश्वसम्राट, आपल्या प्रजेच्या सोयीसाठी अनेक ठिकाणी धर्मशाळा बांधणारे, रस्त्याच्या दुतर्फा झाडी लावून लोकांना आवश्यक त्या सुविधा देण्याचा प्रयत्न करणारे, तथागत गौतम बुद्धांच्या महान मानवकल्याणकारी विचारांची जगभर प्रसार आणि प्रचार करणारे, तथागतांच्या महान विचारांना लेण्यांच्या माध्यमातून दगडांवर कोरून ठेवणारे महान धम्माशासक, देवनामप्रिय चक्रवर्ती सम्राट अशोक हे जगातील सर्वात महान सम्राट होते. सम्राट अशोकांना भारताच्या इतिहासात ही सर्वात महान व शक्तिशाली सम्राट म्हणूनच स्थान दिले आहे. प्राचीन भारताच्या परंपरेत चक्रवर्ती सम्राटांची पदवी ज्यांनी जनमानसावर तसेच अखंडित भारताच्या मोठ्या भूभागावर राज्य केले अशाच महान सम्राटांना दिली जाते. सम्राट अशोकांना 'चक्रवर्ती सम्राट' असे म्हणतात, चक्रवर्ती सम्राट म्हणजे 'सम्राटांचा सम्राट.' जगाच्या इतिहासात असे अनेक सम्राट होउन गेले ज्यांचे उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये आहेत परंतु त्यांच्या अस्तित्वाबाबतची साशंकता आहे. असे मानतात की प्राचीन चक्रवर्ती सम्राटांच्या पंक्तीतील सम्राट अशोक हेच असे पहिले आणि शेवटचे महान चक्रवर्ती सम्राट झाले त्यानंतर कोणीही त्या तोडीचा राज्यकर्ता भारतात झाला नाही. सम्राट अशोकांनी अखंड भारताच्या (जंबुद्विप) बहुतांशी भागावर राज्य केले. आजचा पाकिस्तान, अफगाणिस्तान पूर्वेकडे बांग्लादेश ते दक्षिणेकडे केरळ पर्यंत तसेच नेपाळ, भूतान इराण, ताजिकिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या देशांमध्ये अशोकांच्या साम्राज्याच्या सीमा होत्या. अत्यंत शूर असे सम्राट अशोक आपल्या आयुष्यात एक ही युद्ध हरले नाहीत.

सम्राट अशोक सत्य, अहिंसा, प्रेम, सहिष्णूता आणि शाकाहारी जीवनप्रणीली यांचे थोर पुरस्कर्ते होते म्हणूनच एक अतिशय परोपकारी प्रशासक अशीच इतिहासात त्यांची ओळख झाली आहे. अशोकाने आपल्या प्रजाजनांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना आपल्या शीलालेखातून काही राजाज्ञा दिलेल्या आहेत. अशोकाचे शिलालेख हे मौर्य इतिहासाचे महत्वाचे साधन म्हणून ओळखले जाते, ह्या शिलालेखातूनच भारताचा व त्याकाळचा सत्य इतिहास समजला. ह्या शिलालेखांमध्ये महान अशोकांनी स्वतःला 'देवानाम प्रिय' असे संबोधले आहे. कलिंग युद्ध हे त्यांच्या जीवनातला एक महत्वाचा परिवर्तनीय टप्पा ठरला. कलिंग युद्धानंतर त्यांचे झालेले मनपरिवर्तन, त्यांनी स्वीकार केलेला बौद्धधम्म, बौद्ध धम्माची तत्त्वे आणि एकूणच धम्मप्रसाराचे कार्य, महामात्र यांची नेमणूक या सर्व घटनांचा उल्लेख हा शिलालेखात आलेला आहे. सम्राट अशोक हे ह्या काळातील भारतातील पहिले व शेवटचे चक्रवर्ती राजा होय. सम्राट याचा अर्थ ज्याचा रथ घोडा चारी दिशांना कुणीही अडवू शकत नाही असा पराक्रमी शासक व विजेता होय. सम्राट अशोकाने प्रशासकीय संदर्भाने अनेक महत्त्वपूर्ण बदल

केले प्रशासनामध्ये महामांत्रा हे पद निर्माण करून धर्मप्रसाराला उत्तेजन दिले आपल्या मुलांनादेखील धंम्मप्रसारासाठी त्यांनी देशाबाहेर जाण्यासाठी प्रेरणा दिली प्रजा कल्याणाचे हेतूने त्यांनी अनेक उपक्रम राबविले......

साऱ्या जगाच्या इतिहासात #चक्रवर्ती विश्वसम्राट प्रियदर्शी महान अशोकांसारखा महान प्रशासक कोणी झालाच नाही आणि भविष्यातही कोणी होणार नाही, इतकं महान कार्य अशोकांनी करून ठेवलंय. #अश्या ह्या भारताच्या महान सुपुत्राचा १० फूट उंच पुतळा नागभूमीत अर्थात नागपूरच्या दीक्षाभूमीवर #अशोका_विजयादशमी_दिनी म्हणजे २४ ऑक्टोबर २०२३ रोजी स्थापित करण्यात येणार असून, सदरहू ऐतिहासिक क्षणानिमित्त तमाम सुज्ञानी प्रबुद्ध भारतीयांना #भीम_आर्मी संविधान रक्षक दलाच्या वतीने महामंगल सदिच्छा. 🌷 🌷

सदेच्छूक. #भिमपॅंथर मा.राजेश गवळी. भीम आर्मी. संविधान रक्षक दल. महाराष्ट्र राज्य मुख्यप्रवक्ते.

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 *_३ संयोजने / निवारणे ?_* 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

*_(धम्मचक्षू उत्पन्न होणे)_*

_!! ओम मणी पद्मे हूँ !!_

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

तथागतांचे धम्म प्रवचन ऐकता ऐकता प्रवचन ऐकणाऱ्यांचे धम्म चक्षू उत्पन्न झाले असे आपण बऱ्याच वेळा साहित्यांचा अभ्यास करीत असताना, प्रवचनांमध्ये वाचतो ऐकतो. *पण हा धम्म चक्षू आहे तरी काय? त्याचा नेमका अर्थ काय आहे?*

*बुद्धांकडून किंवा प्रज्ञावंत–शिलवंत संघाकडून धम्म श्रवण केल्यानंतर त्याचे चिंतन–मनन केल्यानंतर, त्यानुसार आचरण केल्यानंतर धम्म चक्षू उत्पन्न होऊ शकतो.* त्यासाठी पुढील तीन गोष्टीचे चिंतन–मनन व्हायला हवे जर ते झाले तर *उपासकांमध्येही (मिलिंद प्रश्न–उपासकांचे गुण कोणते हे पहावे) धम्म चक्षू उत्पन्न होऊ शकतो.*

*जेंव्हा तथागतांनी सारनाथ येथे आषाढ पौर्णिमेला धम्मचक्क पवचन केले तेंव्हा सर्वात प्रथम, कौण्डिण्य यांना तो धम्म समजला अर्थात त्यांच्यात प्रथम धम्म चक्षू उत्पन्न झाला. धम्म चक्षू उत्पन्न झाला म्हणजे चित्तामध्ये असलेले तीन विकार/तीन बंधने तुटून पडतात.* हि तीन प्रकारची बंधने अशी आहेत जी मनुष्याला दुःखाकडे–अंधश्रद्धेकडे नेतात, अंधभक्तीकडे नेतात, मिथ्यादृष्टीकडे नेतात तसेच ती विकारे धम्माचे आचरण करू देत नाहीत. केवळ धम्मच माझे जिवन बदलवू शकते, तेच मला दुःखमुक्तीकडून सुख समाधानाचे जीवन देऊ शकते हा गाढा विश्वास तेंव्हाच निर्माण होतो जेंव्हा हि तीन निवारणे/बंधने आपल्या चित्तामधून निघून जातात.

भगवान बुद्धांनी उपासकांना/बहूजणांना हि तीन बंधने/निवारणे आपल्या चित्तामधून निघून जाण्यासाठी धम्मचक्षू उत्पन्न व्हावा यासाठी वेळोवेळी उपदेश केला आहे. तीन बंधने| निवारणे पुढील प्रमाणे :–

*१) विचिकिच्छा :– म्हणजे शंका, एखाद्या वस्तूवर, व्यक्तीवर, त्रिरत्नांच्या गुणांवर–शिकवणुकीवर इ. शंका घेणे.* काहि लोकांच्या मनात आजही अशी शंका आहे कि बुद्ध–धम्म–संघ हे काही माझे कल्याण करणार नाहीत, *ज्यांना बुद्धांचे–धम्माचे–संघाचे तत्व ज्ञान/ज्ञान, त्यांनी दिलेला उपदेश माहित नाही, त्यांना त्रिरत्नांबद्दल कधीही श्रद्धा उत्पन्न होत नाही, त्यामुळे ते त्रिरत्नांच्या शिकवणुकीचे आचरण करीत नाहीत. कारण त्यांचा मनात शंका आहे.* तर असे शंका असणारे तथागत हयात असतांनाही होते आणि बाबासाहेब हयात असतांनाहि होते आणि आत्ता ते दोघेही नाहीत तरीही त्रिरत्नांवर शंका घेणारे, बाबासाहेबांच्या ज्ञानावर शंका घेणारे आजही आहेत.

_तथागतांनी सर्वांना उपदेश देतांना हेच सांगितले कि, हे एक बंधन आहे. प्रथम ते आपल्या चित्तातून बाहेर काढले पाहिजे. विचिकिच्छा म्हणजे शंका जी बुद्धांबद्दल शंका ठेवते त्यांनी दिलेल्या धम्मावर त्यांनी स्थापन केलेल्या संघावर शंका निर्माण करने ते प्रथम दूर केली पाहिजे. ज्यांच्या चित्तात त्रिरत्नांबद्दल

विचिकिच्छा असेल ते धम्माचे आचरण करू शकत नाहीत. *ज्यांना दुःखमुक्ती हवी आहे अशांनी त्रिरत्नांबद्दलची असलेली शंका दूर केली तर ते धम्माचे आचरण करण्यास सुरवात करतील आणि एक–एक बंधने तोडून ते दुःखमुक्त होतील.*_

बाबासाहेबांनी धम्म दीक्षा देतांना आपल्या अनुयायांना २२ प्रतिज्ञा दिल्या होत्या त्यापैकी काही प्रतिज्ञा पुढीलप्रमाणे :–

*प्रतिज्ञा क्र. ७) मी बौद्ध धम्माच्या विरुद्ध, विसंगत असे कोणतेही आचरण करणार नाही.*

*प्रतिज्ञा क्र. ११) मी भगवान बुद्धांनी सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.*

*प्रतिज्ञा क्र.१२) मी भगवान बुद्धांनी सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.*

*प्रतिज्ञा क्र.२०) तोच सधम्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे.*

या वरील प्रतिज्ञांवर आपण कोणतीही शंका | विचिकिच्छा करीत नाही. बाबासाहेबांनी वरील प्रतिज्ञांद्वारे त्रीरत्नांवर, त्यांनी दिलेल्या शिकवणूकीवर कोणतीही शंका न धरता त्यांचे आचरण केले आणि म्हणून बाबासाहेब आपल्या पुढील प्रतिज्ञेत म्हणतात :–

_*प्रतिज्ञा क्र. २१) माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो/मानते.*_

म्हणजे तथागतांच्या धम्मचक्क पवत्तनाचा उपदेश ऐकून पाच परिव्राजकांपैकी कौण्डिण्य यांचा प्रथम धम्मचक्षू उत्पन्न होऊन ते निर्वाणाचा आस्वाद घेऊ लागले आणि त्यांचप्रमाणे इतर अश्वजीत, वप्प, महानाम आाणि भद्दिय यांनीहि त्यांच्या–त्यांच्या निवारणांचा/बंधनांचा त्याग करून अर्हत पद प्राप्त करून निर्वाणाचा आस्वाद घेत समाजाची सेवा करीत राहिले.

या पाच परिव्राजकांनीही तथागतांवर सुरुवातीला जेंव्हा ते सारनाथ येते होते किंवा जेंव्हा त्यांनी तपश्चर्या सोडून अन्न भक्षण केले तेव्हा त्यांच्यावर शंका निर्माण केली होती पण जस–जसे तथागतांनी त्यांना आपला धम्म सांगितला तस–तस त्यांच्यात जी काही निवारणे/बंधने होती, त्यांनी धम्माचरणांनी स्वतःत बदल घडवून आणला आणि त्या बंधनांचा त्याग करून, तोडून टाकून त्यांना अर्हन्त पद प्राप्त झाले, ते दुःखमुक्त झाले.

त्रीरत्नांवर कोणत्याही परिस्थितीत शंका निर्माण न करता ज्या महान महामानवाने आपल्या सर्वांना जे सर्वश्रेष्ठ रत्न आहे–त्रिरत्न, त्यांना आपल्याला आपल्या सुखासाठी–दुःखमुक्तीसाठी दिली आहेत. त्यांचे आचरण करण्यासाठी पहिल्यांदा आपल्याला त्यांच्यावर गाढ श्रद्धा ठेवावी लागणार आहे आणि त्यासाठी विचिकिच्छा हे पहिले बंधन आपल्या सर्वांना तोडावे लागणार आहे.

*२) सक्काय दिठ्ठी :– आपले जे शरीर आहे त्याबद्दल असणारी आसक्ती/अज्ञान.* हे जे शरीर आहे ते माझे आहे, हे मी आहे. डोक्यापासून ते पायापर्यंत हे जे काही आहे ते मी आहे. हे जी काही इंद्रिये आहेत–डोळे–नाक–कान–इ. माझे आहे. तथागतांनी सांगितले कि हे दुःखाचे कारण आहे. बुद्धांनी जे सर्वोच्च सत्य सांगितले *'अनित्य'* उदा. माझे हे सौंदर्य आहे ते सदैव टिकणार आहे हि जी मिथ्यादृष्टी आहे त्याला तथागत सांगतात कि हे नित्य नाही, अनित्य आहे. हे सौंदर्य पुढे जाऊन संपणार आहे, तुम्ही हि म्हातारे होणार आहात, म्हणून तथागत 'स्वतःच्या शरीराबाबत आसक्त राहू नका असे सांगतात. दैनंदिन जिवनात जीवंत राहण्यासाठी आवश्यक त्या गोष्टी अवश्य करा पण अतिरेक करू नका अशी शिकवण ते देत असतात. सक्कायदिट्ठी हे बंधन असे शिकविते कि मी व माझे या बंधनातून मुक्त व्हायचंय, कोणी मला बोलला... अरे पण मी असे इथे काहीच नाही हिथे सर्वच अनित्य आहे.

जे आपल्या शरीराबद्दल आसक्ती बाळगतात त्यांना सक्कायदिठ्ठी हे बंधन कधीच सुखी बनवू देत नाही म्हणून हे दुसरे बंधन सर्वांना तोढायचे आहे. जेव्हा मी व माझे असे काहीच नाही हे सत्य जेव्हा आपल्याला समजेल तेंव्हा बुद्धांच्या 'अनित्यनेचा' सिद्धांत/तत्व ज्ञानाची माहिती आपल्याला समजून येईल आणि तसे आचरण होईल तेव्हा आपण दुःखमुक्तीच्या मार्गातील अजून एक पाऊल पुढे टाकू.

*३) सिलबत्त परामास :– शिलाचे बंधन, शिल पालन करण्याचा अहंकार उत्पन्न करणे. गंगेत मी जर एक डुबकी मारली तर माझे सर्व पापकर्म धूवून निघेल हि जी 'अंध' श्रद्धा बाळगून वावरणे, किंवा त्याप्रमाणे वागणे, त्याप्रकारचा अहंभाव निर्माण होणे.* काहिंना श्रीमंतीचा अहंभाव असतो तर काहींना शिल पालनाचा अहंभाव असतो पण बुद्धांनी हे सुद्धा एक बंधन आहे असे सांगितले आहे.

उदा. क्र १) काही जण विपश्यना शिबीरात जात असतात (सन्मानीय अपवाद वगळता) तेथे ते किती प्रामाणिकपणे अभ्यास करीत असतात हा एक प्रश्नच आहे पण ते सांगतांना मी अमुक एवढे–एवढे शिबीरे केली आहेत, तुम्ही एकपण शिबीर केले नाही असा कुत्सितपणे प्रश्न विचारतात. शिबीर करण्याचा एक अहंभाव त्यांच्यात निर्माण होतो त्यामुळे सामान्य उपासक त्यांच्या बाजूला जात नाहि किंवा ते जे सांगत असतात त्यांना गांभिर्याने हि देखील घेत नाहीत.

उदा क्र २) आज बरेच बौद्धाचार्य (सन्मानीय अपवाद वगळता) काही गाथा पाठ करून ते धार्मिक विधी करीत असतात तर काही प्रवचने हि देत असतात पण त्यांच्याकडे पाहता क्षणीच किंवा त्यांच्या सानिध्यात आलो तर त्यांच्या बोलण्यातून एक प्रकारचा अहंभाव दिसून येतो.

उदा क्र ३) एक उपासक (सन्मानीय अपवाद वगळता) जो अष्टशिलांचे पालन करतो, उपोसथ व्रत धारण करतो त्या उपासकांत ही अशाच प्रकारचा अहंभाव निर्माण होत असतो. तो इतरांना कमी लेखतो.

जीवनात शील पालन करण्याचा अहंभाव निर्माण होणे यालाच सिलबत्त परामास म्हणतात याच बंधनाला आपल्याला तोडून टाकायचं आहे.

*या तीन बंधनातून १) विचिकिच्छा २) सक्कायदिट्ठि ३) सिलबत्त परामास; यामधून आपल्याला मुक्त व्हायचे आहे. धम्माचे आचरण करून या ३ निवारणांपासून आपण मुक्त झालो पाहिजे. जेव्हा एक अनुयायी त्रिरत्नांच्या शिकवणुकीचे आचरण करीत असतो म्हणजेच त्रिरत्नांप्रती श्रद्धा उत्पन्न करीत असतो, जो या ३ बंधनामुक्त झाला, ज्याने हि ३ बंधने तोडली, ज्याचे चित्त या ३ बंधनातून मुक्त झाले त्याच्या चित्तामधून धम्मचक्षू उत्पन्न होतो. यालाच म्हणतात धम्मवान होणे, धम्मचक्षूवान होणे. ज्यावेळी आपण असे वाचतो–ऐकतो कि तथागतांचे प्रवचन ऐकूण उपस्थित उपासकांतील/संघातील व्यक्तीचा धम्मचक्षू उत्पन्न झाला तर काय झाल? त्याच्या चित्तातील हे तीन बंधने तूटून पडतात.*

बाबासाहेबांनी आपल्याला धम्मदिक्षा देण्यापूर्वी किंवा आत्ताही काही प्रमाणात समाजातील काही मते अशी आहेत की त्यांचा उद्धार–जीवनातले दुःख फक्त न फक्त त्यांच्या देवी–देवताच करू शकतात कारण आजही त्यांची अशी श्रद्धा आहे की तेच आमचे सुखकर्ता आणि दुःखहर्ता आहेत.

पण धम्मदिक्षा मिळाल्यानंतर त्रीरत्नांच्या शिकवणूकीनुसार आचरण केल्यानंतर जे खरे दुःखमुक्तीचे चित्र दिसत आहे ते पाहून जे त्रीरत्नांच्या शिकवणुकीवर/बाबासाहेबांच्या ज्ञानावर विचिकिच्छा/शंका उपस्थित करीत होते ते आता त्रीरत्नांवर/बाबासाहेबांवर डोळसपणे श्रद्धा व्यक्त करीत आहेत, त्यांच्यातली शंका/विचिकिच्छा दूर होत आहे.

तथागतांच्या 'अनित्यतेचा' सिद्धांत समजल्यावर मी व माझे असे काहीच नाही ह्याची जी बंधन होते–सक्काय दिठ्ठि हे तोडून टाकतो. हे तोडून टाकल्यानंतर जो अहंभाव/अहंकार निर्माण झाला होता–शिल पालनाचा त्यामुळे निर्माण झालेली अंधभक्ती/अंधश्रद्धा हि बंधने तोडल्यावर आपण हि आपला धम्मचक्षू उत्पन्न करू शकतो, धम्मचक्षूवान बनू शकतो.

*यासाठी बाबासाहेबांनी दिलेला मार्ग, तथागतांनी दिलेली शिकवण आत्मसात करून त्यानुसार आचरण करावे लागणार आहे. आणि ह्या तीन निवारणातून आपण मुक्त होऊ शकतो आणि अशा व्यक्तीस पाली साहित्यात 'श्रोतापन्न' असे म्हणतात. श्रोत म्हणजे प्रवाह, म्हणजे जसा नदीचा प्रवाह असतो आणि पन्न म्हणजे पडणे. ज्या धम्म अनुयायीने आपल्या जीवनातील हि तीन निवारणे तोडून टाकली, ज्याचे चित्त हया तीन निवारणातून मुक्त झाले तो व्यक्ती खऱ्या अर्थाने 'श्रोतापन्न' झाला, म्हणजेच प्रवाहामध्ये प्रतिष्ठित झाला. दुःखमुक्तीच्या मार्गात प्रतीष्ठित झाला.*

_*यापूढील पायऱ्या सकृतागामी, अनागामी, अर्हत अशा आहेत.*_

*या तीन निवरांसोबत इतर सात अधिक निवारणे आहेत म्हणजेच एकून १० निवारणे आहेत -*

४) कामराग (कामवासना) *५) पटीघ (क्रोध)* *६) रूपराग (अरूप देवलोक प्राप्तीची इच्छा)* *७) अरूपराग (अरूप देवलोक प्राप्तीची इच्छा)* *८) मान (अहंकार)* *९) उद्धंच (भ्रांतचित्तता)* *१०) अविज्जा (चार आर्य सत्यांचे अज्ञान)*

ही पुढील निवारणे जसं जसं धम्माच्या मार्गात अधिक प्रतीष्ठित होत जाऊ तस तशी ती निवारणे तुटून जातील आणि निब्बाणाची सर्वोच्च पातळीचा आनंद प्रत्येक व्यक्तीला घेता येऊ दे अशी मङ्गल कामना–मङ्गल मैत्री व्यक्त करतो.

_मंगल होवो! कल्याण होवो ! भले होवो !_

_!! ओम मणी पद्मे हूँ !!_

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

_महेश कांबळे_ *_दिनांक :- १९/१०/२०२३_*

_संदर्भ :-_

१) वर्षावास २०२३ काळातील मान्यवर संघाची प्रवचने *२) बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा* *३) भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर* *४) बुद्ध धंम्मावरील चार निबंध लेखक धर्मानंद कोसंबी* *५) बौद्ध प्रश्नोत्तरी लेखक कर्नल एच एस ऑलकॉट*

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 लांडग्यांमुळे नदि आटली 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

अमेरिकेतील येलो स्टोन नॅशनल पार्कमधली ही नदी गेल्या शंभर वर्षात हळूहळू आटत गेली आणि आता ती फक्त पावसाळ्यातच वाहू लागली. पावसाळ्यानंतर अल्पावधीतच नदी कोरडीच पडू लागली. भरपूर पाऊस पडूनही ती फक्त पावसाळ्यात वाहत होती. शतकभरापूर्वी ती बारमाही वाहत होती.

बऱ्याच अभ्यासानंतर बारमाही वाहणारी ही नदी आटण्याची कारणे आणि तिला पुन्हा वाहते करण्यासाठीच्या उपाययोजनांवर राष्ट्रीय स्तरावर चर्चा झाल्या. त्यातून नदी आटण्याचा संबंध लांडग्यांशी आहे आणि लांडग्यांचा संबंध माणसांशी असल्याचे लक्षात आले.

येलो स्टोन नॅशनल पार्क हे अमेरिकेतील पश्चिम युनायटेड स्टेटमधील वायव्य कोपऱ्यात विस्तारलेले एक राष्ट्रीय उद्यान आहे. हे अमेरिकाच नव्हे, तर जगातील पहिले राष्ट्रीय उद्यान म्हणून मानले जाते. तेथील वन्यजीव आणि अनेक भूऔष्णिक वैशिष्ट्यांसाठी हे उद्यान ओळखले जाते. गेल्या शतकाअखेर म्हणजे १९०० पर्यंत या जंगलातील लांडगे तेथील स्थानिक लोकांनी शिकार करून संपवले होते.

लांडग्यांच्या कातडीपासून बनवलेल्या वस्तूंना अमेरिका व युरोपमध्ये खूप मागणी असल्याने त्यांची बेसुमार शिकार होत होती. त्यातून या लांडग्यांचे अस्तित्त्वच माणसाने पूर्ण संपवले होते. त्यामुळे चक्क नदी आटली होती. पण तुम्ही म्हणाल 'हे कसं शक्य आहे?' तर हे रहस्य पुढे उलगडत जाईल....... अन नदी जीवंत झाली.

ही नदी बारमाही वाहती करण्यासाठी पर्यावरण अभ्यासकांच्या सूचनेनुसार १९९५ मध्ये येलो स्टोन पार्कच्या जंगलात फक्त १४ लांडगे आणून सोडण्यात आले. आणि पुढच्या पंचवीस वर्षांत परिस्थिती हळूहळू चमत्कार व्हावा तशी बदलत गेली. २०१९ मध्ये नदी केवळ वाहू लागली नाही तर असंख्य जीव तिच्या आश्रयाला देखील आले. तिथे एक समृद्ध जैवविविधतेचा मोठा खजिनाच तयार झाला.

तर त्याच झालं असं, की लांडग्यांची शिकार झाल्यामुळे जंगलातील हरणांची संख्या हळूहळू वाढत गेली. अनेक वर्षे जंगलात हरणांचेच राज्य होते. हरणांना कुणीही भक्षक नसल्याने वर्षानुवर्षे त्यांची संख्या बेसुमार वाढत होती. याच हरणांनी नदीच्या पाणलोट क्षेत्रातील झाडे, गवत फस्त करण्याचेच काम केले होते.

गवताबरोबरच जंगली झाडे, त्यांना आलेली कोवळी पाने खाण्याचा सपाटाच लावला होता. थोडे थोडे करून पाणलोटातील सगळं जंगल त्यांनी बोडखं केलं होतं आणि हेच नदी आटण्याचं कारण होतं. कारण झाडे व गवत नसल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत व पुढे खडकात मुरण्याचे प्रमाण जवळपास शून्यच झाले होते.

पुढे अभ्यासकांच्या सूचनेनुसार जंगलात लांडगे सोडल्यानंतर त्यांनी हरणांची शिकार करण्यास सुरुवात केली. त्यामुळे हरणांची संख्या फार कमी झाली नाही. परंतु या लांडग्यांना घाबरून हरणे जंगलाच्या काही मर्यादित भागात राहू लागली. हळूहळू लांडग्यांच्या शिकारीमुळे आणि भीतीमुळे हरणांची पैदासही कमी होऊ लागली.

जंगलातील ठरावीक मर्यादित परिसरात हरणे राहू लागल्याने त्यांचं इतरत्र भागातील गवत आणि झाडं खाणं थांबलं. त्यामुळे हरणे राहत असलेला जंगलाचा भाग सोडून उर्वरित जंगलातील गवताची आणि झाडांची वाढ व्यवस्थित सुरू झाली. अगदी सहा-सात वर्षांतच जंगल उत्तम फोफावलं. जंगलामुळे आणि गवतामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरू लागले. मातीची धूपही थांबली. धूप थांबल्यामुळे नदीत गाळ येण्याच प्रमाण कमी झाले.

मुरलेल्या पाण्याने जमिनीखालचे खडक पाण्याने भरू लागले. पावसाळ्यानंतर याच खडकातले पाणी ओसंडून झऱ्याद्वारे नदीत येऊ लागले. हळूहळू चार महिन्यांवरून सहा महिने नदी वाहू लागली. पुढे हळूहळू सहा महिन्यांवरून आठ महिने आणि नंतर बारमाही वाहू लागली. नदी खळखळू लागली... आता नदीच्या काठावरच्या वाढलेल्या झाडांमुळे काठांची झीज अन पडझडही थांबली.

अन्नसाखळीचे महत्त्व...

आता जंगलातील वाढलेल्या गवतात विविध किडे आले. त्यांना खाण्यासाठी बेडूक, सरडे आले. त्यांना खाण्यासाठी साप आणि इतर सरपटणारे प्राणी आले. सरडे अन सापांमुळे शिकारी पक्षीदेखील येण्यास सुरुवात झाली. अगदी सुवर्ण गरुडही तेथे आला. जंगलात फळे आणि गवतात किडे भरपूर प्रमाणात मिळू लागल्यामुळे स्थलांतरित पक्षीदेखील येऊ लागले. हजारो पक्षी इथे एकेका ऋतूत येऊन राहू लागले.

या सर्व पक्ष्यांनी त्यांच्या विष्ठेतून बिया टाकल्या आणि त्याची झाडं उगवली. या झाडांचे मोठे वृक्ष होण्याकडे वाटचाल सुरू झाली. नदीत शेवाळ आले, कायम पाणी असल्याने सूक्ष्मजीव आले, त्यांना खाणाऱ्या कीटकांच्या प्रजाती आल्या. हळूहळू मासे आले. मासे आल्यामुळे मुंगसासारखा बिवरेज वा पाणमांजरासारखे सस्तन प्राणी आले.

हे प्राणी मासे पकडण्यासाठी नदीत लाकडं, फांद्या टाकून बांध करू लागली. त्यांनी केलेल्या या सापळ्यांमध्ये मासे अडकून त्यांना मेजवानी मिळू लागली. अशातही अनुकूल परिस्थिती असल्याने नदीत माशांची पैदास वाढतच गेली. त्यामुळे बदकं आली, हेरॉन, बगळ्यांसारखी पक्षी आले. जंगलात बेरीची झाडं आणि माशांची संख्या वाढल्याने अस्वलेदेखील आली. बेरीच फळे आणि नदीतील मासे म्हणजे अस्वलांचं आवडतं खाद्य.

तिथे असलेल्या क्वायटीज या लांडग्यासारख्या दिसणाऱ्या रानकुत्र्यांना लांडग्यांनी मारलं. त्यामुळे या रानकुत्र्यांचे भक्ष्य असलेले ससे आणि चिचुंद्र्या यांची संख्या वाढत गेली. त्यांची संख्या वाढल्यामुळे तिथे गरुड, बहिरी ससाण्यासारखे पक्षी आले. तसेच लांडग्यांनी खाऊन शिल्लक राहिलेल्या मांसावर ताव मारायला गिधाड वर्गातील आणि मांस खाणारे पक्षी आले. हे झाले फक्त मोठे ठळक दिसणारे प्राणी.

याशिवाय इतरही बऱ्याच वनस्पती अन प्राणी सृष्टी पुनर्प्रस्थापित झाली. झाडं, गवतं, नदी आणि सर्व प्रकारचे जंगलातले प्राणी यांची एक समृद्ध अन्नसाखळी तयार झाली. ती केवळ चौदा लांडग्यांमुळेच. हीच तर खरी गंमत आहे. म्हणजेच अन्न साखळीतील एक दुवा तुटल्यावर अगदी नदीसुद्धा आटू शकते. हे या लांडग्यांच्या उदाहरणावरून आपल्या लक्षात येईल.

ही गंमत जैवविविधता, निसर्ग आणि पाणी या सगळ्यांचा संबंध किती दृढ आहे हे सांगणारी सत्यकथा आहे. नदीमुळे ही अन्नसाखळी की या अन्नसाखळीमुळे नदी, याचं उत्तर कोंबडी आधी की अंडे याच्या उत्तरासारखंच आहे, नाही का? निसर्गातल्या सगळ्यांच अन्नसाखळ्या अद्वैत म्हणता येतील अशाच आहेत. माणसाच्या बेफाम अन बेफिकीर वागण्याने पाणी प्रदूषणासोबतच विविध जल स्रोतांतील पाणी आटले आहे.

यामुळे आपण अन्नसाखळीतील कोणकोणते दुवे नष्ट केलेत, किंबहुना अन्नसाखळीचे अनेक मनोरे (Food chain pyramid) नष्ट केलेत याची यादी मोठी आहे. यात आपल्याबरोबर सृष्टीचा नाश ही ओढवून घेतला जात आहे. त्यातून वाचायचे असेल तर जैवविविधता, अन्नसाखळ्या यांचे आकलन आवश्यकच आहे.

(लेखक पाणी अभ्यासक असून, पाणी तंत्रज्ञावर लिहिलेल्या 'अभिनव जलनायक' पुस्तकाचे लेखक आहेत.)

संकलन – संदीप संत 🌹🙏

☸️☸️🦚🦚🦚💎🧿 हृदयस्पर्शी बुद्धकथा 🧿💎🦚🦚🦚☸️☸️

एकदा बुद्ध एका गावात येणार, अशी खबर पोहोचली. सगळी नगरी त्यांच्या स्वागताला सज्ज झाली.

गावात एक चांभार होता. त्याला काही ही खबर मिळाली नाही. तो नेहमीप्रमाणे दिवसभराचं काम करून रात्री घरी जाऊन झोपला. सकाळी उठून पाहतो, तो त्याच्या घरामागच्या तलावात एक सुंदर कमळ फुललं होतं.

ते पाहून तो खूप चकित झाला. तो काही कमळांचा हंगाम नव्हता. असं अवकाळी फुललेलं कमळ म्हणजे थोडेफार पैसे कमावण्याची संधी हे लक्षात घेऊन त्याने ते लगेच तोडून घेतलं आणि तो नगराच्या बाजाराकडे निघाला.

बाजारात पोहोचण्याच्या आधीच त्याला शहरातला सगळ्यात धनाढ्य सावकार वाटेत भेटला. त्याने कमळाचं फूल पाहून विचारलं, या मौसमात कमळ? विकायलाच निघालायस ना? मलाच दे.

सेवकाला त्याने आज्ञा केली, पाच मोहरा दे त्या फुलाच्या.

चांभार चकित झाला.

कमळ बेमौसमी होतं, त्यामुळे महागात महाग एखाद मोहरेपर्यंत किंमतीला विकलं जाईल, असा त्याचा अंदाज होता. थेट पाच मोहरा !

तेवढ्यात मागून आवाज आला, थांबा. ते फूल माझं आहे. सावकाराने जी काही किंमत सांगितली असेल, त्याच्या पाचपट किंमतीला मी ते घेतोय. हा आवाज होता नगराच्या प्रधानाचा.

चांभाराचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. एका मोहरेच्या जागी पंचवीस मोहरा.

सावकार चिडला. म्हणाला, प्रधान जी किंमत द्यायला तयार असतील, त्याच्या दुप्पट किंमत मी देईन.

पाठोपाठ आणखी एक आवाज आला. उगाच वाद घालत बसू नका. या फुलाच्या बदल्यात चांभाराने काय हवं ते मागावं. ते त्याला मिळेल. पण फूल मलाच मिळायला हवं.

हा आवाज साक्षात सम्राटाचा होता.

तिन्ही धनवंतांमध्ये वाद सुरू झाला की फुलावर कोणाचा अधिकार आहे?

चांभाराने भीत–भीत विचारलं, पण, या फुलामध्ये असं काय खास आहे?

ते तिघे म्हणाले, फुलात काही खास नाही. आज बुद्ध गावात येणार आहेत. त्यांच्या पायावर वाहण्यासाठी हे फूल हवं आहे.

चांभार म्हणाला, तसं असेल, तर मला हे फूल विकायचं नाही. बुद्धाच्या पायावर ते मीच वाहीन.

ते तिघेही धनवंत बुद्धाला भेटले आणि त्यांनी ही हकीकत सांगितली एक चांभार, दारात आलेलं ऐश्वर्य, राजपाट नाकारू कसा शकला?

बुद्धाने चांभाराला विचारलं, असं तू का केलंस? चांभार म्हणाला, मला त्या फुलाची खरी किंमत आधीपासून माहिती होती. स्वत:ची किंमत माहिती नव्हती, ती आजच समजली.

! जयभीम !   !! जयभारत !!   !!! नमोबुद्धाय !!!



☸️☸️🦚🦚🦚💎🧿 चीवराचे महत्व 🧿💎🦚🦚🦚☸️☸️

१) चीवर हे श्रामणेर व भिक्खूंचे वस्त्र आहे काही इतर संन्याशी ही भगवी वस्त्र परिधान करतात. परंतु संन्याशाने विधीवत ते वस्त्र घेतलेले नसते. ते फक्त पोटासाठी भगवे वस्त्र घेतलेले असते.

२) भिक्षु व संन्याशी यांच्यातील फरक लोकांना कळावा म्हणून भगवान बुद्धांनी चीवराची रचना आपल्या धम्माच्या तत्वाप्रमाणे, शीला प्रमाणे केली आहे. ते चीवर भिक्षूंना सहज परिधान करता येईल हे पाहिले आहे.

३) चीवराची निर्मिती इ. स. पूर्वी ५२८ ला पहिला भिक्षु संघ सारनाथ येथे निर्माण झाला. तेव्हा त्यांचे चीवर वस्त्र कसे असावे याचा विचार केला आहे आणि रचना केली आहे.

४) चीवर किंवा जुन्या रस्त्यावर कचऱ्यात पडलेल्या चिंध्यांचे असावे कारण नव्या वस्त्राने तृष्णा निर्माण होते. चीवर हे त्यागाचे प्रतीक आहे, त्यागाची आठवण करून देणारे आहे. म्हणून नवीन कपड्याचे नसावे. त्याग म्हणजे अकुशल कर्मांचा, विचारांचा त्याग व सत्याचा स्वीकार कसा असा आहे, पवित्रता व निर्माणाचे स्वीकार आहे.

५) भगवान बुद्ध आणि आनंद एकदा एका शेतातून जात असताना आनंदाला एक कल्पना सुचली आणि त्या शेतातील वाफ्याकडे भगवंताचे लक्ष वेधून आनंद म्हणाले की, भगवान आपल्या अंगावरचे चीवर अत्यंत सरळ आणि साधे आहे. त्याला कसलाच आकार नाही, काही नियम नाही. म्हणून त्याचा कोणीही केव्हाही दुरुपयोग करतील. त्यासाठी आपण आपल्या जीवनाला ठराविक नियम किंवा आकार द्यावा. भगवान बुद्ध आनंदास म्हणाले, तुझ्या कल्पनेप्रमाणे शेताच्या वाफ्याप्रमाणे आकार दिल्यास योग्य होईल. चीवराचा ठराविक आकार, फरक लक्षात आल्यावर कोणीही त्याचा गैरवापर करणार नाही. तेव्हापासून चीवर भिक्षु परिधान करू लागले.


६) चीवराचे तीन प्रकार आहेत.

१) आंतरवासक म्हणजे लुंगी प्रमाणे कमरेला नेसण्याचे वस्त्र.

२) उत्तरासंग पाच हात लांब व चार हात रुंद चादरी प्रमाणे पांघरण्याची वस्त्र.

३) संगाटी म्हणजे उत्तरसंगा प्रमाणे लांबी–रुंदीचे वस्त्र दुहेरी शिवलेले असते, थंडीवाऱ्यापासून बचाव करण्यासाठी हे खांद्यावर घेतात.

! जयभिम !   !! जयभारत !!   !!! नमोबुद्धाय !!!





☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 10 Verses on Yasodhara in Pali language written by our Pali teacher Dr. Prafull Gadpal sir. You can memorise them to understand the importance of sacrifice, love and bravery of the mother of Rahul and wife of Siddharth, Theri Yasodhara.

त्याग, समर्पण, प्रेम और साहस का यदि इस दुनिया में एक शब्द बताना है तो भारतीय इतिहास में वो नाम थेरी यशोधरा का है, जिनके अन्य नाम पालि भाषा में यसोधरा, बिम्बादेवी, गोपा, कच्चाना, भद्दकच्चाना, राहुलमाता, गोतमभरिया आदि भी प्राप्त होते हैं। हमारे पालि आचार्य डॉ. प्रफुल्ल गडपाल जी ने थेरी यशोधरा पर 10 पालि गाथाओं में एक सुंदर काव्य लिखा है जिसे उन्होंने *गोपा–दसकं* नाम दिया है। तो आइए स्मरण करते हैं सिद्धार्थ की जीवनसंगिनी और बाद में अरहत हुई थेरी यशोधरा के चरित को तथागत बुद्ध की भाषा पालि में.....

कुमारो नाम सिद्धत्थो, गोपा कुमारिका तथा।

जाता दुवे महान्तो च, इतिहासे पतिट्ठिता ।। १ ।।

कुमारी दारिका गोपा, सुप्पबुद्धस्स पुत्तिका।

धीरा रूपवती जाता, सन्ता सीलवती च सा ।। २ ।।

गोपा उच्चकुलुप्पन्ना, पिया मधुरभासिनी।

विनीता सुन्दरी धीरा, सुब्बता सिनेहमयी ।। ३ ।।

वरा च वरलक्खणा, नारीवरा वरधम्मिका।

वरा सेवामयी चासु, चागमयी पतिब्बता ।। ४ ।।

नाम यसोधरा चापि, ख्यातं तस्सा पुरा बहु।

यसं धारेति नूनं सा, तम्हा च विस्सुता तदा ।। ५ ।।

अज्जापि च यसो तस्सा, जीवितं लोकमानसे।

दारिका भरिया माता, पटिरूपे पतिट्ठिता ।। ६ ।।

निपुणा सब्बविज्जासु, पारंगता कलासु च ।

सिद्धत्थभरिया चासु, लोकमाता नु कीत्तिता ।। ७ ।।

कोमलहदया सिट्ठा, सालिनी साभिमानिनी ।

पिया पतिस्स सा बिम्बा, सहाया लोकमंगले ।। ८ ।।

संयतचारिणी गोपा, कायेन सदाचारिणी ।

वची-सुचरिता तस्सा, मनसा तु संयमिता ।। ९ ।।

बुद्धं वन्देति लोकञ्ञु, पुञ्ञमयी यसो धरा |

सद्धेया लोकवंदिता, वंदामि धंम्मधारिणीं || १० ||

☸️☸️🦚🦚🦚💎 चार्ल मेशन 💎🦚🦚🦚☸️☸️

चार्ल मेशन (जन्म :– १६ फेब्रुवारी १८०० मृत्यू :– ०५ नोव्हेंबर १८५३.)

चार्ल मेशन यांचा जन्म दिनांक १६ फेब्रुवारी १८०० मध्ये लंडन येथे झाला व मृत्यू दिनांक ५ नोव्हेंबर १८५३ मध्ये झाला. या केवळ ५३ वर्षाच्या कालावधी मध्ये त्यांनी जो प्रवास केला आणि बुद्धिस्ट स्तूप ऊतखणं केले ते आज पर्यंत कुणालाही शक्य झाले नाही. त्यांची वडिलोपार्जित निडलंमेकर्स कंपनी होती की जी ईस्ट इंडिया कंपनीला गण पावडर चा पुरवठा करीत असे, त्याच प्रमाणे कलर्स आणि डाय निर्मितीचा कारखाना त्याच्या वडिलांचा होता. सुरुवातीला १६ व्या शतकात जे ब्रिटिश भारतात व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते झाले त्या मध्ये यांचा कुटुंबियाचा समावेश होता.

जेंव्हा त्याचे शिक्षण पूर्ण झाल्या नंतर ते आपल्या वडिलांच्या कंपनीत काम न करता डुरंट आणि कंपनीत एक साधा क्लार्क म्हणून कामाला लागले. हे जेंव्हा त्याच्या वडिलांना माहित पडले त्यावेळी त्याच्या वडिलांचे आणि चार्ल चे भांडण झाले आणि मागचा पुढचा विचार न करता त्याच्या वडिलांनी त्याला आर्मी मध्ये भारती केले तो दिवस होता ५ ऑक्टोबर १८२१, त्यांचे ट्रेनिंग पूर्ण झाल्या नंतर त्यांना बेंगाल आर्टिलरी मध्ये पाठविण्यात आले नंतर त्यांची पोस्टिंग भरतपूर राजस्थान येथे करण्यात आली. त्यांची कामगिरी बघून त्यांना आर्टिलरी डेपोचा प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांचे काम खूप चांगले असल्यामुळे ईस्ट इंडिया कंपनी तर्फे त्यांना अनेक सन्मान चिन्हे आणि प्रशस्थी प्रत्र मिळाले. परंतु ते त्या ठिकाणी मात्र समाधानी नव्हते, म्हणून एके दिवशी रात्रीच त्यांनी कुणालाही न सांगता मिलिटरी कॅम्प सोडला तो दिवस होता ४ जुलै १८२७ व चालत–चालत राजस्थान चे जंगल पार केले व सतलज नदीच्या तिरावर असलेलं बहवालपूर येथे पोहोचले. उद्देश हाच होता की ब्रिटिश टेरीटोरीच्या बाहेर जाणे. नंतर ते सिख टेरीटोरी, सिंध प्रदेश असे करीत–करीत जून १८२८ ला पेशावर येथे पोहोचले. ते जरी ब्रिटिश असले, तरी त्यांची शरिरयष्टी ही मोगलसारखी दिसत असल्यामुळे त्यांना कुठेही अडचण निर्माण झाली नाही.

त्यानंतर खैबर पस्तून मार्गे अफगाणिस्तानला जात असता सकाळीं आठ वाजता एका शेतात जवळपास १५०" फुटांचा अशोक स्तंभ त्यांच्या नजरेत पडला. सोनेरी किरणे त्या स्टंभावर पडल्यामुळे तो अधिकच चमकदार दिसत होता. कुतूहल म्हणून ते त्या स्तंभाजवळ गेले तर तिथे काही लोक पूजा करतांना दिसले व काही लोक काहीतरी शोधत असतांना दिसले. आणि इथूनच त्यांच्या जीवनाला एक वेगळी कलाटणी मिळाली. नंतर त्यांनी जग प्रवासी बौद्ध भिक्खु फाह्यान यांचे प्रवास वर्णन वाचले आणि त्या मुळावर त्यांनी बुद्धिष्ट स्तूपाचा शोध घेतला असता केवळ अफगाणिस्तानात १२५ बुद्ध स्तुप आहेत, त्यांचे जतन झाले पाहिजे, त्यांचे उत्खणन झाले पाहिजे व बुद्धांचा इतिहास जगाला माहित झाला पाहिजे असे त्यांना मनोमन वाटू लागले. म्हणून ते नवाब जबार खान गव्हर्नर ऑफ जलालाबाद आणि काबुल यांना भेटले व आपण करीत असलेल्या कामा बद्दलची माहिती दिली, हे एकूण नवाब खूप प्रभावित झाला व जी काही मदत लागेल ती देण्यास तयार झाला हा चार्लचा पहिला विजय. नंतर ते १८३२ ला बमियान येथे पोहोचले तेथे बुद्धांच्या दोन भव्य मूर्ती बघितल्या आणि इथुनच त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात केली. ते पाहिले ब्रिटिश अधिकारी की बुद्धांच्या भव्य मूर्ती बघणारे, नंतर ते क्वेटा, बलुचीस्थांन व सतलज नदि पार करून मुलतान लाहोर येथे पोहोचले रावी नदीच्या तिरावर असलेलं हडप्पा आणि मोहोंजेदारो स्तुपाचे उत्खणंन ग्रेगरी पोस्चेल करीत असता त्यांची भेट घेतली व कराचीकडे निघाले.

मे १८३० मधे मस्कत, ओमान, सर्बिया, इजिप्त येथे पोहोचले. तर डिसेंबर १८३० मधे टेब्रिज तर बगदाद येथे मार्च १८३१ ला पोहोचले. डिसेंबर १८३२ मधे बमियानला परत आले व परत नंतर लुधियांना, पंजाब प्रांत, सिंध प्रांत, व नंतर १८४१ ला कान्हेरी बुद्ध लेणी आणि एलिफंटा लेणीला भेट दिली.

बमियानला भेट दिली असता ५५ मिटर आणि ३८ मिटर उंच भव्य बुद्ध मुर्ती व त्यावर केलेले कलर पेंटिंग आणि शिल्प यांचा रिपोर्ट तयार करुन ब्रिटिश सरकारकडे पाठविला. ५५ मिटर बुद्ध मुर्तीच्यां खाली तीन शिल्प पिंपळाच्या झाडाखाली बुद्धांचे शिल्प पद्मासन अवस्थेत. तर तीन मुर्ती रंगामधे दिसुन आल्या. तसेच तिथे एकूण चार संघा मधे बुद्ध लेणी आढळून आल्या. त्यांचे उत्खणंन केले असता ओर्णामेंट, स्तंभ व अनेक कॉईंस मिळाले ते सर्व ब्रिटिशांनी नेले. याठिकाणी भिक्खु झूवाझांग यांनी ई. स. ६३२ ला भेट दिली होती.

जून १८३३ मधे काबुल व आसपासच्या परिसरात येथे तख्त ए शाह, खाना शुगी, खोल शाम, तेपे नारंग, तेपे मारंजन या बुद्धिष्ट स्तुपाचे व बुद्धिष्ट कॉम्प्लेक्सचे उत्खणन केले येथे त्यांना बुद्धांचे मातीचे शिर व असंख्य नाणी शिल्प मिळाले. शेवकी बुद्ध स्तुपात एक करंडक मिळाला, मिणार चक्री येथे अशोक स्तंभ मिळाला, तर कामारी बुद्ध स्तूपात प्रचंड प्रमाणात नाणी मिळाल्या. शाह स्तुपात एक सुंदर व कलाकुसर केलेला दिवा मिळाला.

गुलदरा आणि टोपदरा स्तुपाचे उत्खणन १८४१ ला केले असता प्रचंड प्रमाणात नाणी मिळाली. कोटपूर स्तुपाचे उत्खणन केले असता रीलिस्क करंडक व कॉइन्स मिळाले.

पस्साणी स्तुपाचे उत्खणन केले असता ईथे प्रचंड मोठ्या प्रमाणात कॉइन्स, बेड्स, भांडे व कास्केट मिळाले.

बिमारण हा बुद्ध स्तुप जलालाबाद येथे असुन त्या समूहात एकूण आठ स्तूप आहेत. यांचे उत्खणन १८४१ मधे करण्यात आले असता स्तूप क्रमांक २ मधे गोल्डन (सोनेरी) बॉक्स व त्या बॉक्सवर आठ शिल्प तर त्यामधे ३० सोनेरी ओर्णामेन्ट १० हिरे, १८ निलम, क्रिस्टल व ४ सम्राट कुशाण ४ कॉपर कॉइन्स मिळाले.

बिमारण स्तुप क्रमांक ३ मधे सोणेरी पातळ पेपर, लहान पांढर्या रंगाची चटई, १२ कंठमाळा आणि लहान सोन्याचे खडे मिळाले.

स्तुप क्रमांक ४ मधे चंदिचा डब्बा व १७ हिरे किंवा पाचू, ६ कॉपर कॉइन्स मिळाले.

स्तुप क्रमांक ५ मधे एकूण ६ रीलिक्स सेल त्यापैकी ३ मधे राख आणि हड्या, उरलेल्या ३ डब्यात रंगाचे खडे तर एका कास्केट मधे ६८ कॉपर कॉइन्स मिळाले.

डेड रहमान या स्तुपाचे उत्खणन १८४१ मधे केले असता एक चांदीच्या डब्यात कॉपर कॉइन्स मिळाले.

कुठचेरा स्तुपाचे उत्खणन केले असता एका चांदीच्या डब्यामधे ३ कॉपर कॉइन्स मिळाले.

गुडरा बुद्ध स्तुप मधे चांदीच्या डब्यात आणि सोन्याच्या डब्यात लाल मणी व हिरे, आणि पाचू मिळाले.

चहारबाग बुद्ध स्तुप : ईथे एकूण ६ स्तुपांचे कॉमप्लेक्स आहे आणि एक–एका स्तुपाची उंची १०० ते १५० फूट आहे, यांचे उत्खणन १८४१ मधे केले. ईथे पहिल्या स्तुपात काहीच मिळाले नाही, दुसर्या स्तुपातसुद्धा काहीच मिळाले नाही आणि तिसर्या स्तुपातसुद्धा काहीच मिळाले नाही म्हणून चौथ्या स्तुपाचे उत्खणन करण्यास कामगार टाळाटाळ करीत होते व काहीच मिळणार नाही आपली शक्ती वाया जाणार म्हणुन काम करीत नव्हते. परंतु चार्ल मेशनने डिटरमाईन की या स्तुपाचे उत्खणन करायचे, या स्तुपावर एकूण १००० कामगार काम करीत होते आणि त्यांच्याकडे अमिर ऑफ काबुलचा आदेश होता की, चार्ल मेशनला जी काही मदत लागेल ती करण्यात यावी. त्यांनी कामगार लोकांना तो आदेश दाखविला आणि म्हणाले की, कोण–कोण काम करायला तयार नाही त्यांची नावे मी अमिर ऑफ काबुलकडे पाठवितो, असे म्हणताच सर्व कामाला लागले. चौथ्या स्तुपात एक दगडाचा लहान ड्रम मिळाला व त्यावर सोन्याचे झाकण व त्यामधे सम्राट कुशानचे २८ कॉपर कॉईन्स मिळाले.

चहारबाग स्तुप क्रमांक ५ मध्ये एक चांदीच्या डब्यामधे रीलिक्स तर ६ मधे दगडाचा डबा व त्यावर पातळ सोन्याचा मुलामा आणि आत मधे सोन्याचे चेंडु मिळाले.

अहिंनपोष बुद्ध स्तुप हा जलालाबाद येथे आहे. ईथे बुद्धांची गांधार शैलीतील ज्ञांनस्थ मुद्रा असलेली मुर्ती, एक सोनेरी अष्टकोणी डब्बा व त्यामधे २० सोनेरी सिक्के मिळाले.

हड्डा बुद्ध स्तुप : ईथे एकूण १३ स्तुपांचे कॉम्पलेक्स आहे. या ठिकाणी मानवाचे तसेच प्राण्यांचे हाडे मिळाल्यामुळे याला हड्डा बुद्ध स्तुप नाव देण्यात आले. या ठिकाणी एक करंडक मिळाला असून त्यामधे हड्डि आणि २८ कॉपर सिक्के मिळाले त्याचप्रमाणे सोनेरी ओरणामेंट रंगांचे दगड, सोनेरी पाने, हिरे, पाचू मिळाले. एका मोठ्या चांदीच्या डब्या मधे १८० चांदीचे सिक्के, आणि २ सोनेरी सिक्के मिळाले. तसेच २५६ सोनेरी रिंग, ब्रेसलेट इत्यादी मोठ्या प्रमाणात मिळाले.

वर्डक बुद्ध स्तुप : या स्तुपात एक सोन्याचा करंडक मिळाला असून त्यामधे १९ सिक्के सम्राट कुशानच्या मुलीचे आहेत. तर एका दुसर्या करंडकामधे सिकके, रंगाचे दगड, पाचू तसेच मानवाचे हाडे, अवजारे, रिंग, पेडंट इत्यादी मिळाले.

अफगाणिस्तान मधे एकूण एकूण १२५ बुद्ध स्तुप आणि लेणी आहेत त्यापैकी १०० च्या वर स्तुपाचे उत्खणन एकट्या चार्ल मेशनने केले तर इतर स्तूपांचे उत्खणन होनिंग बर्गर यांनी केले.

यांच्या जीवनावर एलिझाबेथ इरींगटनने पिएचडी केली, तर अमेरिकन ऑरका लॉजिचे प्रोफेसर ग्रेगरी पोहेल यांनी चार्ल मेशन वर गौरव ग्रंथ लिहिला. ग्रेगरी पोहेल हे मोहोंजेदारो आणि हडप्पाच्या उत्खणनाचे चीफ सुपरवाईझर होते. चार्ल मेशन कडे एकूण १०००० कामगार होते की, जे अमिर ऑफ काबुलने मिळऊन दिले होते. काबुल मधे दर आठवड्याला काबुल बाजार भरत असे व त्यामधे सिक्के व एंटिक वस्तूंची खरेदी व विक्री होत असे. म्हणुन चार्ल मेशनने ब्रिटिश सरकारकडे सिक्के खरेदी करण्यासाठी पैशांची मागणी केली असता त्यांना १५०० रुपये देण्यात आले. त्यातून त्यांनी ७ सोन्याचे, १६५ चांदीचे, आणि ४५३ कॉपर सिक्के खरेदी केले. तसेच त्यांनी चायनीज भिक्खु फायह्यान यांचे प्रवास वर्णनावरून अफगाणिस्तान, बलुचीस्थान, खलाट, सिंध मधिल स्टुपांचे उत्खणन केले.

जसे सम्राट अशोकच्या शिळालेखाचे संशोधन आणि वाचन जेम्स प्रिंसेप यांनी केले तसेच सम्राट कानिक्षच्या शिळालेखाचे संशोधन आणि वाचन चार्ल मेशनने केले. त्यांनी खरोष्ठी लिपीचा शोध शोध लावला.

त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे सुर्योदयापूर्वी ते साईटवर हजर असायचे तर सूर्योयानंतरच ते साईट वरून निघायचे, हजारो कामगारचे व्यवस्थापन त्यांना काम वाटुन देणे, स्तुपाचे छायाचित्र, प्लॅन तयार करणे आणि उत्खणन करते वेळी काही मिळाले की त्याचे छायाचित्र काढणे, त्यांचे रखांकन तयार करणे, मोजणी करणे व बांधणी करणे. एकदा इंडियन म्युझियम कोलकत्ता येथे एक सिक्क्यांचा डब्बा पाठविला असता तो गायब झाला म्हणुन, तो डायरेक्ट सर्व डब्बे लंडन म्युझियमलाच पाठवित असे.

चार्ल मेशनने एकूण ५२८३४ कॉपर सिक्के, ३०८४ चांदिचे सिक्के व सोन्याचे सिक्के त्यांनी लंडन म्युझियमला पाठविले आणि त्याचबरोबर एंटिकसुद्धा. लंडन म्युझियम मधे त्यांच्या नावाचे विशेष दालन आहे. चार्ल मेशनने प्रथम इंडो ग्रिक किंग मिणांडर (१५५ बिसी) चे चांदीचे सिक्के मिर झकाह येथे शोधून काढले आणि आता ते काबुल म्युझियम मधे आहे. पहिल्या शतकात सम्राट कनिक्षने शिल्क रुटची निर्मिती करुण बुद्धिझम संपूर्ण जगात नेला तो रुट (रस्ता) चार्ल मेशनने शोधून काढला. कनिक्षचे साम्राज्य अर्ध्या जगावर पसरलेले होते. चार्ल मेशनच्या साहित्याचा आधार घेऊन जापान, इंग्लंड, इटली, जर्मनी व चीन इत्यादी देशांनी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान मधे १९ व्यां शतकात उत्खणन केले.

तोरा बोरा हे जगातील सर्वांत मोठे बुद्धिष्ट केव्ह (लेणी) कॉम्पलेक्स हिल्स आहे.

चार्ल मेशनचे काम बघुन पेशावरचे सिख यांनी त्यांना निमंत्रित केले.

त्यांचे केव्ह ऑफ काबुल आणि जलालाबाद प्रसिद्ध पुस्तक आहे.

५ नोव्हेंबर १८५३ ल लंडन येथे असताना अचानक ब्रेन स्ट्रोक आला व त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर ब्रिटिश म्युझियमने असे उद्गार काढले की, "चार्ल सारखा मनुष्य इंग्लंड मधे झाला नाही आणि होणार सुद्धा नाही." त्यांच्या कार्याबद्दल संपूर्ण जग कृतज्ञ राहील.

परंतु त्यांच्या मृत्यूनंतर ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने त्यांच्या परिवाराकरिता पेंशन मंजूर केली नाही. कारण त्यांनी कुणालाही न सांगता अचानक मिलिटरी सोडली होती.

अशा या महान व्यक्तिला त्यांच्या १७० व्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन.

– शामराव सोमकुवर.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 #बौद्ध_वैद्य_धन्वंतरी आणि #धनतेरस ह्यातलं सत्य काय? 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

महान बौद्ध संस्कृतीचा महान परिचय !


महान बौद्ध संस्कृतीचे निर्भिड संशोधक व अभ्यासक सन्माननीय राजीव पटेल (Rajeev Patel) त्यांच्या फेसबुक वॉलवर लिहितात की, पाली भाषेचा झालेला ऱ्हास आणि त्यानंतर भाषेतील चुकांतून गोंधळ उडून #समस्या बनून समाजाला कसे कलुषित करतो, हेच आपल्याला #धन_तेरस वरून समजू शकते.

ह्या सदरहू पोस्ट मध्ये काही छायाचित्रे दाखवली असून ते गुप्तकालीन दगडी स्लॅब आहे, जे कुम्हरार पुरातत्व स्थळ (पाटणा) मध्ये स्थापित केले आहे. त्या दगडी पाटीवर स्पष्टपणे लिहिले आहे की, कुम्हारार येथे #सिरी_आरोग्यविहार_भिक्खू_संघ नावाचे रुग्णालय संचालन करण्यात येत होते, ज्याचे प्रमुख वैद्य #धन्वंतरी होते. ही गुप्त काळातील घटना आहे. #वैद्य_धन्वंतरी यांचा जन्म कार्तिक कृष्ण पक्ष त्रयोदशीला झाला. त्यामुळे कार्तिक कृष्ण पक्ष त्रयोदशीला त्यांची जयंती साजरी करण्याची परंपरा सुरू आहे.


परंतु #त्रयोदासी हा संस्कृत शब्द आहे ज्याला पालीमध्ये #तेरस आणि हिंदीमध्ये #तेरह म्हणतात. म्हणजे #पाली भाषेच्या संस्कृतीत, वैद्य धन्वंतरीची जयंती कातीक कन्ह पक्ख तेरस या दिवशी साजरी करण्याची परंपरा होती, ज्याला #धन_तेरस म्हणतात. परंतु आज ही धनत्रयोदशीची परंपरा कार्तिक त्रयोदशीच्या दिवशी पसरत आहे, समाज कलुषित होत आहे.


तो प्रचंड थाटामाटाचा आणि कर्मकांडाचा डोंगर बनला आहे. भाषेतील चुकांमुळे गोंधळ कसा निर्माण होतो ते तुम्ही पाहू शकता.

(#Rajeev_patel यांचा आज जन्मदिन असून त्यांना जन्मदिनाच्या महामंगल सदिच्छा. ही पोस्ट त्यांची असून ती मूळ हिंदीत आहे, तिचा स्वैर मराठी अनुवाद करून मराठी वाचकांसाठी देण्यात आलाय..... इतिहास संशोधकांनी, अभ्यासकांनी ह्यासंदर्भात अधिकाधिक सत्यवादी प्रकाश टाकावा, ह्याच अपेक्षेसाठी.)









☸️☸️🦚🦚🦚💎 सिंधु घाटी सभ्यता की लिपि दरअसल ब्राह्मी लिपि (अशोक की धम्म लिपि) का पूर्व रूप है। फिर हम क्यों नहीं पढ़ पाते हैं? इसे समझिए। 💎🦚🦚🦚☸️☸️

देवनागरी लिपि आप पढ़ लेते हैं, मगर हजार साल पहले की नागरी लिपि जो इसी देवनागरी का पूर्व रूप है, आप नहीं पढ़ पाइएगे। कारण कि हजार साल में लिपि–चिह्नों में काफी बदलाव आ जाता है।


आप अशोक की लिपि को पढ़ लेते हैं, पर जरूरी नहीं है कि उसके हजार साल पहले की सिंधु लिपि जो उसका पूर्व रूप है, उसको भी पढ़ पाइएगा।

कोई भी अज्ञात लिपि तब पढ़ी जाती है, जब उसका द्विभाषी अभिलेख मौजूद हो जिसमें कि एक लिपि ज्ञात हो। अशोक के अभिलेख द्विभाषी हैं। इसीलिए वे पढ़े जा सके हैं। या फिर अभिलेख काफी लंबे हों ताकि बार–बार किसी खास लिपि–चिह्न को आने पर उसके संकेतों को पकड़ा जा सके। अशोक के अभिलेख लंबे हैं, जिसमें एक ही लिपि–चिह्न बार–बार आ रहा है। इसलिए वे पढ़े जा सके हैं।

मगर सिंधु घाटी के अभिलेख छोटे–छोटे हैं और वे द्विभाषी भी नहीं हैं। इसलिए उसे पढ़ने में कठिनाई आ रही है। सिंधु लिपि को पढ़ने के लिए बैक–सिद्धांत अपनाना होगा और ब्राह्मी के लिपि–चिह्नों का अनुगमन करते हुए पीछे की ओर लौटना होगा यानि सिंधु लिपि तक ! मगर सिंधु लिपि और ब्राह्मी लिपि के बीच की कड़ियाँ गुम हैं। बैक–सिद्धांत के रास्ते में यही बड़ी कठिनाई है। मार्ग कठिन है, मगर असंभव नहीं है।

अंतिम बात यह कि अशोक के अभिलेखों की प्राकृत भाषा ज्ञात थी। सिर्फ लिपि अज्ञात थी। इसलिए अशोक के अभिलेख को पढ़ने में सहूलियत हुई। मगर सिंधु घाटी सभ्यता की भाषा और लिपि दोनों अभी अज्ञात बनी हुई हैं। इसलिए पढ़ने में कठिनाई है।

सिंधु घाटी सभ्यता की लिपि दो प्रकार की हैं। एक चित्रात्मक और दूसरी अक्षरात्मक। अक्षरात्मक लिपि के अनेक चिह्न सम्राट अशोक की लिपि से मेल खाते हैं। आप नीचे की तस्वीर में इसके तुलनात्मक अध्ययन को देखिए।



☸️ *_मानवाच्या सर्व दुःखाचे मुळ–तृष्णा !_*

📝 *_लेखांक – १_*

🌸🌿🌸🌿🌸🌿🌸🌿🌸🌿🌸

दुःखामुळे मानवाचे जीवन अंधकारमय होते आणि त्याचे मुळ कारण तृष्णा असते असा भगवंतांनी उपदेश केला आहे. तृष्णेच्या गुलामीमुळे मानव दुःखी असतो.

जन्म, व्याधी, जरा, मरण, प्रिय गोष्टींचा वियोग, अप्रिय गोष्टींचा संयोग ही दुःखे होत. सतत उद्भवणारी व कधीच संतुष्ट न होणारी, अंत नसलेली तृष्णा, हीच दुःख निर्माण होण्यास कारणीभूत असतात. असंतुष्ट इच्छा आणि अविद्येमुळे तृष्णा निर्माण होते.

तृष्णा ही आपोआप उत्पन्न होत नाही. ती काही कारणांमुळे उत्पन्न होते. कार्य–कारण नियमावर ती अवलंबुन आहे. भगवंतांच्या शब्दात सांगायचे म्हणजे–

*_'इमस्मिन सति इदम होति, इमस्य उप्पादा इदम उपज्झति'_*

हे असे असल्यामुळे त्याची निर्मिती होते. त्याची निर्मिती झाल्यामुळे ह्याचा उद्गम होतो. (This having been, that come to be; from the arising of this, that arises.)

बौद्धधम्मात कार्यकारण नियमास (Law of causation) प्रतीत्यसमुत्पाद (= पटीच्च समुप्पाद) म्हंटलेले आहे. प्रतीत्य म्हणजे ह्या कारणांमुळे कींवा यावर अवलंबुन; समुपत्पाद म्हणजे निर्माण होणे कींवा उद्भवणे म्हणून प्रतीत्य समुत्पाद म्हणजे अवलंबित उद्भव (Dependent Origination) तृष्णेचा उद्भव होण्याचे मुळ कारण, येणेप्रमाणे भगवंतांनी शोधून काढले आणि या प्रतीत्य समुत्पादाच्या नियमाद्वारे (Law of Dependent Origination) त्यांनी संसाराचे रहस्य शोधून काढले. म्हणजे पुनः पुन्हा होणाऱ्या निर्मितीचे कींवा पुनर्जन्माचे, पुनः पुन्हा होणाऱ्या जन्ममृत्युच्या साखळीचे रहस्य त्यांनी शोधून काढले.

🔷 *मनुष्य तृष्णेची गुलामी करतो.*

शरीराच्या भुकेचे शमन करावयास आहार ग्रहण करावयाची नैसर्गिक आवश्यकता असते. परंतु भरपूर जेवल्यानंतर जिभेच्या स्वादासाठी आंबट, गोड, तिखट, चटपटे पदार्थ खात राहणे तृष्णेची गुलामी होय.

तहान लागल्यावर स्वच्छ शीतल जल ग्रहण करणे नैसर्गिकच असते, परंतु केवळ चव वाढवण्याकरीता तहान नसतानासुद्धा स्वादिष्ट पेय पित राहणे तृष्णेची गुलामी होय.

याप्रमाणे नेहमी नवनवीन फॅशनची चमकदार भडक वस्त्रे परिधान करणे व ऐश्वर्य–प्रदर्शनाच्या शर्यतीत लीन होणे, तृष्णेची गुलामी होय. विभिन्न डिझाईनच्या जोडे–चपलांचे ढिग लावणे व वैभवाचे प्रदर्शन करवायाच्या लालासेने त्यांचा उपयोग करणे तृष्णेची गुलामी होय. पद–प्रतिष्ठेकरता व्याकूळ होणे कींवा त्यांना चिपकुन राहणे, विवाह समारोहाच्या वेळी अवडंबर आणि वैभवाचे प्रदर्शन करणे, इत्यादी तृष्णेची गुलामीच होय. आपल्याला प्रत्येक नैसर्गिक आवश्यकतेला तृष्णेच्या गुलामीहुन वेगळे करून, त्यावर नजर ठेवणे आवश्यक आहे आणि आवश्यकता व तृष्णा यांच्या भिन्नतेला जागरुकतेने जाणत राहीले पाहीजे.

☀ तृष्णा उत्पन्न झाल्याबरोबर शरीर आणि मनावर अत्यंत सूक्ष्म संवेदन होऊ लागते. ही संवेदना जागृत मनाला जरी जाणवत नसली तरी ती अर्धजागृत मनाला होतच असते. जोपर्यंत इच्छित वस्तु प्राप्त होत नाही, तोपर्यंत हे स्पंदन–संवेदन सुरूच राहते.

स्नायुमधील तंतुमध्ये ते तणाव उत्पन्न करते. मनामध्ये विकारांच्या गाठी उत्पन्न करते. परंतु ह्या तणावामध्ये आणि ह्या ग्रंथीमध्ये अप्रिय संवेदन असले तरी त्या संवेदनाविषयी एक प्रकारचे संमोहन असते आणि त्या संमोहन शक्तीमध्ये अर्धचेतन मन (sub–concious mind) हळूहळू डुबक्या घेत असते व त्यातच बुडून राहण्याची सवय लागते. ह्या तृष्णेमुळे उत्पन्न झालेल्या संमोहनात डुंबुन राहवायाचे त्यास व्यसनच लागते आणि मन त्या सवयीस चिपकुन जाते.

जेंव्हा इच्छापूर्ती होते, तेंव्हा हे विशिष्ठ प्रकारचे स्पंदन–संवेदन काही वेळेसाठी थांबते. त्यावेळी आपल्या अंतर्मनावर एक वेगळ्या प्रकारचे स्फुरण झाल्यासारखी संवेदना होऊ लागते, जी आपल्याला सुखद वाटते, प्रिय वाटते, रोचक वाटते; परंतु ती खुप वेळ टिकत नाही. ती जेंव्हा थांबते, तेंव्हा कामनेचे, तृष्णेचे पूर्वीचे स्पंदन–संवेदन पुनः जागृत होते. ह्या अग्नीला सतत प्रज्वलित ठेवण्याकरीता आपण नेहमी नवनवीन ईंधन तयार करीत असतो. रूप, रंग, गंध, शब्द, स्पर्श आणि मनोविकल्प यांच्या सहाय्याने नवनविन ईंधन तयार करतो. हीच तृष्णेची आसक्ती.

तण्हाय जायते सोको, तण्हाय जायते भयं |

तण्हाय विप्पमंतस्स, नत्थि सोको कुतो भयं ||

अर्थ :– तृष्णेमुळे शोक उत्पन्न होतो, भय उत्पन्न होते. तृष्णेपासून मुक्त झाल्याने, शोकच राहणार नाही तर भय कसे राहणार?

📋 🖋 *अविनाश पवार* 🔸 *_बुध्द धम्म अनुसरण संघ ®_* 🔸

🌸 🌿 🌸 🌿 🌸 🌿 🌸 🌿 🌸 🌿 🌸

☸ ☸ 🦚 🦚 🦚 💎 ज्यांना बुद्ध समजून घ्यायचा असेल, त्यांनी 'प्रतीत्यसमुत्पाद सिद्धांत' हा ग्रंथ वाचणं, समजून–जाणून घेणं आवश्यक आहे.

ग्रंथनामा - शिफारस\मराठी पुस्तक; राजीव जोशी.

'प्रतीत्यसमुत्पाद सिद्धांत' या ग्रंथाचे मुखपृष्ठ

ग्रंथनामाशिफारसप्रतीत्यसमुत्पाद सिद्धांत PratityasamutpadaSidhhant नितिन भरत वाघ Nitin Bharat Wagh गौतम बुद्ध Gautam Buddha बौद्ध धम्म Buddha Dhamma.

अनेक प्रकारच्या शारीरिक पीडा, अंगावरचे मांस झडेस्तोवर उपवास, अशा अवस्थेत बुद्ध झाडाखाली समाधीसाठी बसले असताना झाडापलीकडे बसलेल्या बाप–लेकीचा संवाद त्यांना ऐकू आला. मुलगी एकतारीची तार नीट सुरात लावण्याचा प्रयत्न करत होती. तिला ते जमत नव्हते. कधी तार घट्ट बसून तुटायची, तर कधी सैल झाल्याने वाजत नव्हती. तार कशी बांधायची, हे समजून सांगताना बाप म्हणाला, 'योग्य सुरात वाजवायचं असेल, तर तारेचा ताण योग्य असायला हवा. जर तारेतून संगीत निर्माण व्हायला हवं असेल, तर ताण जास्त–कमी नाही, तर मध्यम हवा.' हा संवाद ऐकून बुद्धांच्या लक्षात आलं की, मन आणि शरीर यांचा तोल साधला गेला नाही, तर ज्ञानप्राप्ती होणार नाही. त्यांनी शरीराचे क्लेश थांबवले. उरूवेला प्रांताचा प्रवास करत करत ते निरंजना नदीच्या काठावर पोहचले. बोधी वृक्षाखाली पद्मासनात बसून समाधी लावताना निश्चय केला – 'काहीही झालं, तरी ज्ञानप्राप्तीशिवाय इथून उठायचं नाही.' बोधीवृक्षाच्या सावलीत बुद्धांनी सर्वप्रथम अभिसंबोधी प्राप्त केली. तोच 'प्रतीत्यसमुत्पादा' चा साक्षात्कार !

बुद्धकथांमधली ही कथा वेगवेगळ्या अंगाने आपणास माहीत असली, तरी एकूणच आपणा सर्वांना चरित्राच्या अंगाने बुद्ध जुजबी माहीत आहे, तर शिकवण किंवा तत्त्वज्ञानाच्या अंगाने अजिबात माहीत नाही, असं म्हटलं तर वावगं ठरू नये. खरं तर बुद्ध आणि त्यांचा धम्म (जीवन जगण्याची पद्धत) या मातीतला आहे, तो जगभर पसरलेला आहे, देशी व वैश्विक संशोधकांच्या अभ्यासाचा, चिंतनाचा विषय आहे. जितक्या वेळा आपण बुद्ध आणि त्याच्या तत्त्वज्ञानाला समजून घ्यायचा प्रयत्न करतो, तितक्या वेळा त्याच्या आकलनाच्या कक्षा विस्तारत जातात, रुंदावत जातात. जाणीव–नेणीवेच्या पातळीवर काही समजूनही पुन्हा नव्याने काही ना काही समोर येत राहते आणि बुद्ध पुन्हा तसेच आकलनाच्या पल्याड खुणावत राहतात.

'प्रतीत्यसमुत्पाद सिद्धान्त' हा बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा, त्याच्या शिकवणीचा मूळ गाभा आहे. हा सिद्धान्त वस्तू, घटना यांचे मूळ स्वरूप समजून घेण्याचं सम्यक सूत्र आहे. मिळालेल्या मनुष्य जन्माचे काय करायला हवे, त्याचा विनियोग कसा करायला हवा, यासाठीची बुद्धांची धारणा म्हणजे हा सिद्धान्त.

या पार्श्वभूमीवर कवी, कादंबरीकार, समीक्षक नितीन भरत वाघ यांनी प्रदीर्घ अभ्यास आणि चिंतन यांतून बुद्धाच्या या सिद्धान्ताचे विविध अंगाने विश्लेषण करण्याचा केलेला प्रयत्न म्हणजेच जवळपास साडेचारशे पानांचा 'प्रतीत्यसमुत्पाद सिद्धान्त' हा ग्रंथ होय. या ग्रंथात एकूण एकोणीस प्रकरणं आहेत. बुद्धधम्म चिकित्सेची चौकट, साधारण प्रतीत्यसमुत्पाद, लोकोत्तर प्रतीत्यसमुत्पाद, प्रतीत्यसमुत्पादाच्या परिप्रेक्ष्यातून बुद्ध तत्त्वज्ञान, अरिय रूपे, बारा कड्या, काळ–अवकाश संकल्पना, विज्ञान व बुद्धधम्म... ते बुद्धधम्म आणि त्रिपिटक असा विषयाचा विस्तृत कॅनव्हास आलेला आहे.

'या आकळलेल्या मुक्तीचं काय करायचं?' या आत्मनिवेदनापासूनच बुद्धांबरोबरचा प्रवास सुरू होतो. एकोणीस प्रकरणांतून बुद्धांबरोबरचा हा प्रवास खरंच आनंददायी आहे, तसाच शेवटच्या दहा पानांच्या संदर्भसूचीने दडपून जाणाराही. खरं तर हा तत्त्वज्ञान/वैचारिक विषयक ग्रंथ आहे. प्रतीत्यसमुत्पादाला बुद्धांनी अत्यंत गंभीर व समजण्यास कठीण असल्याचे वारंवार सांगितले आहे. या विषयावर लिहिणं म्हणजे आगीत हात घालणं आहे, असं लेखकानेच पुस्तकाविषयीच्या निवेदनात म्हटलंय. या पुस्तकावर एक वाचक म्हणून लिहिण्याचं धाडस केलं, ते मित्रवर्य नितीनच्या जवळपास अकरा वर्षांच्या अफाट परिश्रमाला सलाम म्हणून. हा ग्रंथ आऱ्हान बुकस्मिथस यांनी प्रकाशित केला आहे. त्याचं आकर्षक मुखपृष्ठ संतोष काळबांडे आणि गोपीनाथ पवार या जोडीनं केलं आहे.

माणसाला जगताना दुःख, क्लेष, यातना त्रासदायक होतात. बुद्धाची शिकवण मानवाला दुःखमुक्त करण्यासाठी आहे. मनुष्य जन्म अत्यंत मौल्यवान असल्यामुळे तो व्यर्थ न घालवता त्याचा उपयोग नीटनेटकेपणाने करायला हवा, हा बुद्धांच्या शिकवणीचा मुख्य उद्देश होता. आपल्या जगण्यात जे काही घडत असतं, त्याला निश्चित कारणं असतात. त्या कारणांचा शोध घेऊन, त्यांना बदलवून क्लेश, संकटं, दुःख दूर करता येतं; जगणं अर्थपूर्ण करता येतं. मानवी जीवन हे कोणत्याही प्रकारे दैवाधारित किंवा नियतीने ठरवल्याप्रमाणे नसतं; तर ते वैयक्तिक, मानसिक, सामाजिक व राजकीय अशा बाह्य घटकांवर अवलंबून असतं. या घटकांच्या एकत्रित समुच्चयाने ते निर्धारित व नियंत्रित होत असतं. हे घटक संस्कारित असतात, परिवर्तनीय असतात. त्यांना बदलून आयुष्याला अर्थपूर्ण आयाम देता येतो, हेच बुद्धांना शिकवायचं होतं.

मानवी समाजाला अधिक स्वावलंबी, स्वतंत्र, मुक्त व आनंदी बनवण्यासाठी बुद्धांनी धम्म दिला. समतेसाठी, प्रज्ञेसाठी, करुणेसाठी बुद्धांनी धम्म सांगितला. साध्या सूत्रात कार्यप्रणाली, व्यवस्था दिली, क्षणांचं अमर्याद महत्त्व विशद केलं. एक ध्येय ठरवून समाजाच्या उपयोगी पडेल, अशी कर्मं करायला बुद्धांनी शिकवलं. बुद्ध समजून घेताना, त्या काळातील परिप्रेक्ष्यातून पाहणं नितान्त आवश्यक ठरतं. त्या काळाचं प्रतिपादन करताना लेखक दोन स्वतंत्र सभ्यतांचा उल्लेख करतो – श्रमण आणि वैदिक ब्राह्मणी. लेखकाचा असा दावा आहे की, त्या काळात जातिव्यवस्थाच अस्तित्वात नव्हती आणि म्हणूनच बुद्धांनी जातिव्यवस्थेच्या विरोधात आवाज उठवायचा प्रश्न निर्माण झाला नाही. बुद्धांनी आत्मवाद, नित्यता, तसेच निसर्गवादाची निरर्थकता दाखवून दिली आणि माणसाच्या जगण्याला निसर्गातील विज्ञानाशी जोडून दिले. माणूस अधिकाधिक वास्तव, भैतिकवादी जगेल अशी व्यवस्था निर्माण केली. जगातील प्रत्येक वस्तू, घटना यांच्या अस्तित्वाचे मूळ शोधून, कार्यकारणभाव, परस्परावलंब सूत्रबद्ध स्वरूपात चिकित्सापद्धती म्हणून विकसित केली. माणसाचं जगणं दुःखाने वेढलेलं आहे. ते दूर करणं व माणसाला उत्तमरित्या जगता यावं यासाठी, त्याला तत्क्षणी दुःखमुक्त करण्याची आवश्यकता असल्याचं बुद्ध जाणून होते.

'प्रतीत्यसमुत्पाद' हा बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आणि मूळ आधार आहे. या तत्त्वज्ञानाला स्वत: बुद्धांनी 'विसुद्धीमाग्ग' मध्ये (१७–२१ या श्लोकात) सत्य म्हणजेच निर्वाण, त्याचबरोबर पुरुष, पुनर्जन्म व प्रतीत्यसमुत्पाद हे चार धर्मविषय अत्यंत गंभीर व समजण्यास कठीण असल्याचं सांगितलेलं आहे. प्रतीत्यसमुत्पादाच्या परिप्रेक्ष्यात बुद्ध तत्त्वज्ञानाची 'साधारण प्रतीत्य समुत्पाद' व 'लोकोत्तर प्रतीत्यसमुत्पाद' या दोन भागांत विभागणी होते.

बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचा आधार घेताना असं लक्षात येतं की, ज्ञानप्राप्तीच्या अनुभवातली चार अरिय सत्ये आणि प्रतीत्यसमुत्पाद यांच्यात घनिष्ट संबंध आणि कारणतेचे तत्त्व–नियम, कृती आणि परिणाम समान आहे. ही चार अरिय सत्ये दोन भागांत विभागली गेलेली आहेत. पहिल्या भागात दुःख आणि दुःखाचे कारण, तर दुसऱ्या भागात दुःखाचा निरोध आणि दुःख–निरोधाचा मार्ग यांचा समावेश आहे.

आणि या दोन्ही भागांत कारण आणि परिणामाच्या नियमांचा संबंध आहे. प्रतीत्यसमुत्पादात बुद्ध कारणात्मक प्रक्रियेचे सोदाहरण सखोल विश्लेषण करतात. उदा. दिव्यात जळणारी ज्योत दिव्याच्या तेल आणि वातीवर आधारलेली असते. यांतला एक जरी भाग नसेल, तरी ज्योत जळायची थांबते. बुद्धांचे दृष्टान्त नित्यनैमित्तिक उदाहरणांवर आधारित आहेत. कोणत्याही कारणांची माहिती किंवा स्पष्टीकरण न देता, म्हणजे विश्वाची उत्पत्ती, उत्क्रांती या विषयीच्या चर्चेत वेळ न घालवता थेट 'दुःख जाणून घेणे' आणि 'दुःखापासून मुक्ती मिळवणे' यांतल्या संबंधाची शिकवण प्रतीत्यसमुत्पाद देतो.

ज्या प्रश्नांच्या उत्तरांचा मानवी दुःख दूर करण्यास उपयोग होत नाही, अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यात किंवा सांगण्यात बुद्धांना अजिबात रस नाही. त्यांना 'आत्ता आणि हा क्षण' यांतले दुःख दूर करणे गरजेचे व अत्यावश्यक वाटतं. म्हणूनच त्यावर लक्ष केंद्रित करण्याचा मुख्य उद्देश लक्षात घेणं महत्त्वाचं आहे.

प्रतीत्य समुत्पादाच्या नियमात अविद्या, संस्कार, विज्ञान, नाम–रूप, षडायतन (सहा इंद्रिये), स्पर्श, वेदना, तृष्णा, उपादान, भव, जाति व जरा–मरण या बारा कड्या आहेत. त्या समजून घेण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग, तीन काळाच्या क्रमानुसार. यात अविद्या, संस्कार पूर्वायुष्यात, विज्ञान, नाम–रूप, षडायतन, स्पर्श, वेदना, तृष्णा, उपादान, भव वर्तमान जगण्याशी संबंधित आहेत. यामध्येच या जन्मातील आयुष्याच्या उत्क्रांतीची प्रक्रिया समाविष्ट आहे. जरा–मरण भविष्यातील दुःखाचं प्रतिनिधित्व करतात. याच बारा कड्यांच्या निदानाला – जे एकाच जन्मातल्या क्लेश, कर्म आणि दुःख या तीन गटांत विभागलेलं आहे – 'वर्तुळाकार चक्र' म्हणतात. क्लेषाच्या गटातल्या अविद्या, सतृष्णा व आसक्ती यांत अविद्या मूलभूत आधार होते. जिच्यामुळे व्यक्ती अस्तित्व, इंद्रियोपभोग व अनासक्तीची तृष्णा बाळगतो, निरनिराळ्या आसक्तींना चिकटून राहतो; इंद्रियानुभव, कामोपभोग व आत्म्या यांसारख्या कल्पनांना चिकटून राहतो.

प्रतीत्य समुत्पाद मध्यममार्गाची अभिव्यक्ती आहे, असं निरीक्षण नोंदवताना लेखक म्हणतो की, कोणतीही टोकाची गोष्ट टाळणे, म्हणजे मध्यममार्ग. यामध्ये कामोपभोगात रत राहणे, कठोर दमन याबरोबरच अनंतवाद, शाश्वतवाद (eternalism), त्याचबरोबर उच्छेदवाद यांसारखी टोके टाळणे अपेक्षित आहे. 'मध्यममार्ग' हा संयम आणि संतुलन सूचित करणारा शब्द. या ठिकाणी मनुष्यजन्माचा अर्थ आहे – मनुष्यत्वाला अर्थ देणे. मध्यममार्गाच्या आचरणाने जगण्यात आनंद व शांतता प्राप्त करता येते. वाघीण ज्याप्रमाणे आपल्या पिल्लांची काळजी घेते, त्यांना पकडताना संयम आणि संतुलन ठेवते, त्याप्रमाणे बुद्ध

आपल्या विचारांची हळूवार मांडणी करतात, असं सांगताना भौतिकी आणि आधुनिक विज्ञानाच्या नियमांच्या माध्यमातून साधला जाणारा निसर्गाचा समतोल हा एक प्रकारचा मध्यममार्गच असल्याचं ते सूचित करतात.

'ये धम्मा हेतुप्पभवा हेतू तेसं तथागतो आहे I तेसं चयो निरोधो एवंवादी महासमणो' म्हणजे बुद्ध म्हणतात, धंम्म तोच असतो, जो प्रतीत्य समुत्पन्न असतो. या ठिकाणी 'धंम्म' म्हणताना 'नियम' किंवा 'मार्ग' अपेक्षित आहे. प्रतीत्यसमुत्पाद धंम्म तथात व सारभूत आहे; बुद्धांचा समस्त उपदेश व दर्शन यांचा तो पाया आहे. 'य: प्रतीत्यसमुत्पाद पश्यति स धंम्म पश्यति। य: धंम्म पश्यति, स बुध्द पश्यति।' या 'मज्झिमनिकाय' मधील सूत्रात प्रतीत्यसमुत्पादाचं महत्त्व आलेलं आहे.

घटना आणि घटितं यांच्या संदर्भात बुद्धांचा विचार खूप सखोल आहे. ते सांगतात की, केवळ एकच हेतू वा प्रत्यय यांतून पदार्थाची निर्मिती होत नाही. कोणतीही एक गोष्ट एखाद्या वस्तूच्या वा घटकाच्या निर्मितीला कारणीभूत असत नाही. त्यामागे कारणं असतात; असू शकतात. जग आणि जगातील पदार्थ आपापले हेतू व प्रत्यय यांवर अवलंबून असतात. कारण आणि परिणाम यांचे स्वरूप म्हणजे निर्मिती. जगात काहीच नित्य वा शाश्वत नाही. संसाराचे मूळ अविद्या आहे, ज्याच्यामुळे व्यक्ती कर्म करण्यास प्रवृत्त होतो, त्या कर्माचे फळ प्राप्त करतो वा भोगतो. हे सांगताना बुद्ध म्हणतात की, कर्म करणारा आणि फळ भोगणारा पाच स्कंदांनी बनलेला असतो; स्कंदाद्वारेच प्रज्ञा प्राप्त करत असतो.

प्रतीत्यसमुत्पादात 'आत्मा' आणि 'पुनर्जन्म' या संकल्पनांना स्थान नाही, किंबहुना 'अनात्मता' हाच बुद्धविचाराचा पाया आहे. बारा कड्यांमध्ये अनुलोम (संसार प्रवृतीची व्यवस्था) आणि प्रतिलोम (संसार निवृत्तीची व्यवस्था) या द्विविध प्रक्रिया आहेत. तथागतांनी म्हटलं आहे, 'जोपर्यंत व्यवहारात अविद्या व अज्ञान असेल, तर मी सांगतो, दु:खाचा नाश केला जाऊ शकत नाही'.

'व्यवहार आणि परमार्थ' प्रतीत्यसमुत्पादाची नीती आहे, ज्यावर संपूर्ण जीव–जगत परिचालित आहे. आनंदला दिलेल्या एका उत्तरात बुद्ध म्हणतात की, प्रतीत्यसमुत्पादात कुशलता प्राप्त केल्याशिवाय कोणत्याही भिख्खूला संबुद्ध म्हणता येणार नाही.

प्रतीत्यसमुत्पादात एकीकडे जीव–जगतची व्याख्या आहे, तर दुसरीकडे विश्लेषणाद्वारे जीव–जगतच्या प्रपंचातून मुक्त होण्याचा मार्गदेखील आहे. यातूनच विपरीत–विकारयुक्त दृष्टीचा नाश होऊन सम्यक दृष्टी प्राप्त होते, मुक्तीचा मार्ग मोकळा होतो. बुद्धांना झालेल्या प्रतीत्य समुत्पादाच्या साक्षात्काराकडे लेखक 'एक अभूतपूर्व घटना' म्हणून पाहतो. ज्या नागार्जुनाने आपल्या बौद्धदर्शनाची मांडणी प्रतीत्यसमुत्पादावर करून विचारजगताला नवी दृष्टी दिली असं मानलं जातं, त्याच्या मते प्रतीत्यसमुत्पाद कार्यकारण संबंधातल्या मिथ्या, गैरसमजुतीयुक्त धारणांचे खंडनमंडण करतो, प्रपंचातील उपशांत, शिवलक्षण व यथाभूतांचे प्रकटीकरण करतो.

सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे बुद्धांचं तत्त्वज्ञान गहन, अथांग आहे. सातिमोक्खशी त्यांच्या झालेल्या संवादातून निघणारे अर्थ एखाद्या कॅलिडोस्कोपसारखे विविध रूप व रंग यांनी दिपवणारे आहेत. विज्ञान विज्ञानमात्र आहे; जाणीव जाणीवमात्र आहे, ते कारणोद्भव म्हणून वेगवेगळ्या संज्ञा–जाणीवा निर्माण करणारं आहे. बुद्धांनी विज्ञानाला परिशुद्ध, उज्वल व सम्यक दृष्टी म्हटलं असलं, तरी 'ते अनित्य आहे व त्याचा आग्रह, आसक्ती धरू नका' असं सांगायला ते विसरत नाहीत.

प्रतीत्यसमुत्पाद एक होडी आहे. त्याचा वापर संसारातील दु:खे पार करून जाण्यासाठी करावा, असं ते सांगतात. प्रतीत्यसमुत्पादामागे बुद्धांची अनात्मता, अनित्यता आणि दु:खाची दृष्टी आहे. जे काही घडतं, ते कोणत्यातरी कारणांमुळे घडतं, असं सांगताना त्याचा लोप–निवारण करता येणं शक्य आहे, असं म्हणून ते साधक व सर्वसामान्य अशा दोन्ही घटकांना आश्वस्तही करतात.

बुद्ध सांगतात की, दु:खाला कारणीभूत असणारं सर्वांत महत्त्वाचं तत्त्व म्हणजे माणसाची तृष्णा आहे. या तृष्णेमुळेच अनात्मता, आत्मा आणि अनासक्ती त्याचप्रमाणे ते परस्परात एक–दुसऱ्याच्या अस्तित्वाचं कारण आहे. हे मनुष्य समजू शकत नाही. प्रतीत्यसमुत्पादाच्या माध्यमातून बुद्ध भूतकाळातील सर्व परिणामांची, त्यांच्या अस्तित्वाची मीमांसाच करायला सांगतात.

याचाच अर्थ असा की, आत्मा आणि नित्यता यांमुळे वस्तूचे नित्य अस्तित्व प्रस्थापित होते – भूतकाळ, भविष्यकाळ, वर्तमानकाळ, अध्यात्मिक वा भौतिक, स्थूल किंवा सूक्ष्म, हीन वा श्रेष्ठ, दूर किंवा जवळ यांतूनच आपली तृष्णा विस्तृत होत जाते.

प्रतीत्यसमुत्पादानुसार जगातील प्रत्येक घटना 'कारण' आणि 'परिणाम' यांच्या साखळीतून निर्माण झालेली असते. कारण आणि परिणाम ही सातत्याने सुरू असणारी प्रक्रिया आहे. बुद्धाच्या एका सूत्रानुसार, कुठल्याही गोष्टींच्या उगमापर्यंत जाता येते, एखाद्या गोष्टीतून कशाची निर्मिती झाली, याचा शोध घेता येतो.

मात्र एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, प्रतीत्यसमुत्पाद कारणांचा एकदम शोध घेत नाही वा त्याच्या मुळाशी जात नाही. कारण त्यांच्या मते मूळ कारणांचा शोध घेणे म्हणजे ज्ञानाच्या विकासाचा संकोच करणे आहे.

बुद्ध म्हणतात, 'जीवन–मृत्यू चक्राचा आरंभ कल्पनातीत आहे. जीवमात्रांच्या अस्तित्वाची कोणतीही प्रारंभिक सुरुवात सांगणे शक्य नाही. जे जीव अविद्येने, अज्ञानाने वेढलेले आहेत, तृष्णेच्या सापळ्यात अडकलेले आहेत, ते जन्ममृत्यूच्या वर्तुळात गरगर फिरत राहतात.' बुद्धांच्या समोर सर्वसामान्य माणूस होता आणि म्हणून त्याला समजेल, रुचेल अशा भाषेत आणि अशी उदाहरणे देत ते तत्त्वज्ञान सांगतात. संबोधी प्राप्त झाल्यावर त्यांनी सर्वप्रथम केलेला उपदेश हा संसारातील दुःख व दुःखमुक्तीचा मार्ग सांगणारा मध्यममार्गच होता.

बुद्धांच्या तत्वज्ञानाची उकल करताना लेखक प्रतीत्यसमुत्पादाचा तपशील अतिशय सोप्या व सहज समजेल अशा भाषेत सांगतात, तर कधी त्याला पाश्चात्त्य विचारवंतांशी, आधुनिक काळातल्या उदाहरणांशी तुलनात्मक पद्धतीने जोडतात. ते प्रतीत्यसमुत्पाद ॲरिस्टॉटलच्या किंवा आधुनिक पाश्चात्त्य तत्त्वज्ञांपेक्षा वेगळा मानतात, याचं कारण त्यांनी 'कारण' आणि 'परिणाम' या दोन भिन्न घटना मानल्या आहेत, तर प्रतीत्यसमुत्पाद या दोन्ही घटना भिन्न मानत नाहीत. जगातील कोणतीही गोष्ट वा घटना एकल अस्तित्वात येत नसते आणि म्हणून कार्यकारणतेची प्रक्रिया ही न थांबणारी साखळी आहे. यासाठी लेखक कुंभार, माती, चाक, पाणी या घटकांचा आणि माठ बनवण्याच्या एकमेकाशी निगडीत असलेल्या प्रक्रियेचा दाखला दिला. कोणत्याही घटनेचे सर्वात शास्त्रशुद्ध, वैज्ञानिक व तर्कयुक्त स्पष्टीकरण केवळ प्रतीत्यसमुत्पाद सिद्धान्ताद्वारेच मिळू शकते, असा दावा करतात. 'कारण' आणि 'परिस्थिती' यांतून दुःख अस्तित्वात येते, हे दाखवून देण्यासाठी बुद्धांनी प्रतीत्यसमुत्पादाची शिकवण दिली. केवळ मूळ कारण जाणून घेऊनच दुःखाचा लोप करता येणे शक्य असते.

प्रतीत्यसमुत्पादात बुद्धांनी प्राधान्याने मृत्यूचा विचार केला. याचाच अर्थ, जरा (म्हातारपण) आणि माणसाला होणारे क्लेश, त्याचप्रमाणे मृत्यू हे त्यांच्या सखोल चिंतनाचा भाग होते. बुद्ध म्हणतात 'उत्पत्ती, स्थिती व लय ही अंतिम वास्तवाची वैशिष्ट्ये आहेत. उत्पत्तीनंतर स्थिती व लय येतात. जन्म म्हणजेच उत्पत्ती, अस्तित्वात असणे, जरा आणि लय म्हणजे मृत्यू. जरा–मरण अटळपणे पुनर्जन्माच्या मागे जातात. त्यांच्यासोबत क्लेश, परीवेदना (शोक), दुःख, दोमानस (अतिदुःख) आणि उपायास (निराशा) ही पाच प्रकारची दुःखे उद्भवतात. ते जाति (पुनर्जन्म) भवावर (becoming) परिस्थितीनुसार व परिस्थिती नसतांनाही उद्भवतात. भव दोन प्रकारे अस्तित्वात येतात – कर्म प्रक्रिया आणि पुनर्जन्म प्रक्रिया.

बुद्धांनी दुःखे आयडेंटीफाय केली, हे खरं, पण त्यांनी घेतलेला दुःखाच्या मूळ कारणाचा शोध, हे दुसरं अरिय सत्य. वास्तविक, या कारणाच्या स्पष्टीकरणासाठीच प्रतीत्यसमुत्पादाची निर्मिती झाली. त्याच्या निवारणासाठी बुद्धांनी 'अरिय अष्टांगिक मार्गा' चा उपाय सांगितला. बुद्ध वारंवार सांगतात, 'सगळ्या दुःखाला अविद्या हीच कारणीभूत असते आणि अविद्येच्या नाशानेच दुःखाची साखळी खंडित करता येते.' दुःखमुक्तीचा मार्ग म्हणून प्रतिलोम व अनुलोम क्रम सांगितला, संस्कार म्हणजे पुनर्जन्मामुळे निर्माण होणार्या चेतना वा कर्मनिर्मिती. त्याचे तीन प्रकार सांगितले, विश्व नियमही कथन केले.

बुद्धांनी प्रतीत्यसमुत्पादाचे दोन प्रकार सांगितले आहेत. भौतिक (लौकिक किंवा साधारण) आणि मानसिक (लोकोत्तर किंवा असाधारण). पहिल्या भागात म्हणजे साधारणमध्ये अविद्येमुळे होणाऱ्या जन्माच्या अवस्था, तर लोकोत्तरमध्ये जन्म–मरण ते (दुःखाचा) पुनर्जन्म. या ठिकाणी बुद्धांची 'पुनर्जन्म' ही संकल्पना नीट समजून घेण्याची आवश्यकता आहे. पुनर्जन्म म्हणजे दुःखाचा आणि माणसांच्या तृष्णांचा पुनर्जन्म असं समजायचं आहे. दुःखाची निर्मिती तृष्णेमुळे होत असते, तर तृष्णा अविद्येमुळे निर्माण होते. जन्म–मृत्यू–पुनर्जन्म या चक्राला 'संसार' असे म्हटले आहे. 'या सांसारिक चक्रातून मुक्ती' हा बुद्धाच्या शिकवण्याचा, उपदेशाचा मुख्य हेतू आहे. लोकोत्तर प्रतीत्यसमुत्पादात संसारातून व त्यातील सर्व दुःखांपासून मुक्तीचा विचार दिलेला आहे. निदान संयुक्तातील उपानिससुक्तात लोकोत्तर प्रतीत्य समुत्पादाविषयी सांगितले आहे. यात विकारांचा नाश करण्याचे ज्ञान व मार्ग या दोन्ही गोष्टी विशद केल्या आहेत.

बुद्धांनी कठोर परिश्रम व तपश्चर्या यांद्वारे मानवी जगण्याचे मूळ आणि वास्तव प्रतीत्य समुत्पादाद्वारे जाणून घेतले; संबोधी प्राप्त केली. सर्वात प्रथम त्यांना चार अरिय सत्याचे ज्ञान झाले. बुद्ध आणि त्यांचा धम्म जाणण्यासाठी प्रत्येकाला अरिय सत्याचं ज्ञान असणं आवश्यक आहे. अरिय सत्यात मानसशास्त्रीय विचार आहे.

'प्रतीत्यसमुत्पाद' बुद्धाच्या तत्वज्ञानाचा गाभा आहे. बुद्धांचं अरिय तत्त्व असो, अनुलोम–प्रतिलाम असो वा अनात्मता, बुद्ध कायम तुकारामासारखा मानवी पातळीवर रागलोभासाहित आपलासा वाटणारा आहे. वयाच्या ८४ व्या वर्षी मनाने, शरीराने भौतिक जगापासून तुटत चाललेले असतानाही बुद्धांनी आनंदला, 'कोणालाही आश्रयदाता बनवू नकोस, धम्माला तुझा आधार बनव, धम्माखेरीज तुझा कोणी आश्रयदाता असणार नाही.' अशी शिकवण देणं, यात पित्याचं ममत्व आहे. दागिने घेऊन पोबारा केलेल्या गणिकेच्या शोधात वेळ घालवणाऱ्या तरुणांना ते विचारतात, 'तुमच्यासाठी काय योग्य आहे? स्त्रीचा शोध? की आत्मशोध?' हे त्यांचं विचारणं मानवी पातळीवरचं वाटून बुद्ध आपल्यातलेच एक वाटतात.

बुद्ध कोणत्याही प्रकारच्या अज्ञानाला, कमकुवतपणाला, भीतीला आणि वासनांना थारा देत नाहीत. देव, आत्मा या संकल्पना त्यांच्या धम्म संकल्पनेत कुठेच बसत नाहीत. परंतु समाजात देव, आत्मा आदी संकल्पना लोकविचारात इतक्या खोलवर रुजल्या आहेत की, या संकल्पनांच्या विरोधात ते काहीही ऐकायला तयार नसतात. बुद्ध जाणून होते की, 'आपण जे सांगतोय, ते प्रवाहाच्या विरुद्ध आहे. सखोल असलं, तरी दिसायला कठीण समजायला कठीण. जे वासनेने, तृष्णेने लिप्त आहेत, अंधाराच्या अज्ञानाने वेढले गेलेले आहेत, ते सत्य, वास्तव, ज्ञान पाहू शकणार नाहीत; समजू शकणार नाहीत.'

बुद्धांना वाटतं, 'हे ज्ञान जगाला थेट देणे योग्य होणार नाही' आणि ते म्हणतात : 'किच्छेन मे अधिगतं, हलं दानि पकसितुं। रागदोसपरेतेहि, नायं धम्मोसुसम्बुधो.' त्यांना ठाऊक होतं की, प्रवाहाच्या विरुद्ध पोहणारे, निपुण, गंभीर, जाणण्यास कठीण, आसक्तीत मग्न लोक, अविद्येच्या अंधकारात रूतून बसलेले हे समजू शकत नाही. दीघनिकायमध्ये ते म्हणतात, 'हे ब्रह्मे, अमरत्वाचे द्वार त्यांच्यासाठी उघडले गेलेले आहे, जे श्रद्धेने ऐकतील.' अध्यात्मिक व बौद्धिक विकासाच्या स्तरावर ज्ञान पूर्ण समजू शकणारे, काही निम्मे समजू शकणारे तर काही प्रयत्नपूर्वक समजू शकणार्यांसाठी बुद्धाने ज्ञान सांगण्याचं ठरवलं. हे ज्ञान सोप्यात सोपं करून कसं सांगता यावं, यासाठी त्यांनी अनेक मार्गांचा वापर केला. त्यातलाच एक आसक्तीचे पाच घटक असलेला 'पंचस्कंध.'

लेखक बुद्धाच्या तत्त्वज्ञानाला आधुनिक विज्ञानातील क्वांटम थिअरीशी जोडतात. त्यानुसार कोणत्याही वस्तू, घटना भौतिक घटकांनी बनलेल्या नसतात. त्या सतत प्रवाहित असणाऱ्या ऊर्जेच्या प्रवाहांनी बनलेल्या असतात. सर्व आयतन, संध, धातू यांच्यात सहसंबंध घडवून आणून त्यांच्यात परस्परसंबंध, समतोल घडवून आणणारी ऊर्जा म्हणजेच भौतिक ऊर्जा. कुणी याला 'आत्मा' म्हणतात. आत्मा केवळ भौतिक ऊर्जा आहे. या ऊर्जेच्या प्रवहनासाठी शरीर हे माध्यम आहे. या समन्वयी ऊर्जेला वाहून नेण्याची, धारण करण्याची शरीराची क्षमता संपल्यामुळे ती बाहेर पडू शकत नाही. ज्याला आपण मेला असं म्हणतो. ही बदलणारी अवस्था म्हणजे शून्यावस्था. सुत्तपिटकात बुद्ध अनात्मता समजावून सांगतात, त्याप्रमाणे 'मज्झिमनिकाय', 'अंगुत्तरनिकाय', 'संयुक्तनिकाय', 'उपानिससुक्त', 'विसुद्धीमाग्ग' आदींमधूनही धम्माची विविध तत्त्वं विशद करतात. 'माझ्यावर विश्वास ठेवू नका. माझे शब्द अंतिम नाहीत. आपणच आपले मार्गदर्शक व्हा; पथदर्शक व्हा.' असा उपदेश ते लोकांना करतात.

बुद्धांचं तत्त्वज्ञान लेखकाने सोप्या, सहज समजेल अशा भाषेत आपल्यासमोर ठेवलं आहे, हे जरी खरं असलं, तरी जगण्याला आधार देणाऱ्या कोणत्याही माणसाच्या उपदेशावर जर आपल्याला पुढील आयुष्य काढायचं असेल, तर ती व्यक्ती आधी माणूस म्हणून कशी आहे? कुठून आली? कशी जगली? जगताना तिने किती परिश्रम घेतले? या व्यक्तीचा इतर माणसांशी व्यवहार कसा होता? या व्यक्तीचं स्वतःच्या जगण्याचं तत्त्वज्ञान काय आहे? हे समजून घेणं आवश्यक असतं. म्हणून केवळ अनुयायांनाच नाही, तर ज्यांना ज्यांना बुद्ध समजून घ्यायचा असेल, त्यांनी त्यांनी प्रतीत्यसमुत्पाद वाचणं, समजून–जाणून घेणं आवश्यक आहे.

लेखकाने खूप माहिती जिज्ञासूंसाठी साध्या–सोप्या भाषेत समोर ठेवलेली आहे. ते तेवढ्यावरच थांबलेले नाहीत, तर अध्यात्म, धंम्मा (जीवन जगण्याची पद्धत), तत्त्वज्ञान, दर्शन हे सर्व एका बाजूला ठेवून ते 'बुद्ध हे मानवी सभ्यतेच्या इतिहासातले क्वांटम लीप आहे.' असं सांगतात. त्याला आधुनिक विज्ञानाशी, भौतिकीशी जोडून घेतात, हे महत्त्वाचं ! बुद्धांची 'शून्य' संकल्पना विशद करताना ते प्रतीत्यसमुत्पादातील काळ–अवकाश संकल्पनाही सांगतात, ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवा' चं आणि नागार्जुनाच्या 'मूलमध्यमकालिके' चं तौलनिक विश्लेषण करतात; साम्य सांगतात.

लेखक म्हणतो की, 'अमृतानुभव' हे नागार्जुनांच्या द्वैती तत्त्वज्ञानाचे नवीन आकलन आहे; अर्थनिर्णयन आहे. ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात पूर्वपक्ष व उत्तरपक्ष अशी मांडणी करताना पूर्वपक्षात शंकराचा अद्वैती सिद्धान्त मांडला. म्हणजे शंकराचार्यांचा मायावाद निवृत्तीनाथांनी मांडला आणि 'मोडोनि मायाकुंजरू' म्हणजे तो निरर्थक कसा आहे, हे दाखवतांना त्याला खोडून काढण्यासाठी उत्तर पक्षाची मांडणी केली. अशी मांडणी करताना प्रत्यक्ष प्रमाणाद्वारे चाचण्या, पडताळण्या आणि मग निष्कर्ष अशी शास्त्रीय पद्धत अवलंबतात. एखादी गोष्ट कशी अस्तित्वात नाही, हे सिद्ध करत करत ती कशी अस्तित्वात आहे, हे दाखवून देण्याची विलक्षण हातोटी ज्ञानेश्वरांनी वापरलेली आहे. अविद्या आणि अज्ञान कसे अस्तित्वात नाही, हे सांगता सांगता अविद्या व अज्ञान यांचं सखोल चिंतन ते मांडतात. त्यातूनच अविद्या व अज्ञान दूर करण्यासाठी अविद्या काय आहे, अज्ञान म्हणजे काय हे समजून घ्यावं लागतं.'

शंकराचार्यांचा मायावाद आणि नागार्जुनांचा शून्यवाद यावर विस्तृत व तुलनात्मक विवेचन लेखकाने केलं आहे. शून्यवाद आणि मायावाद या संपूर्ण विचारधारेत मुख्य फरक फक्त हेतूंचा आहे, असं ते म्हणतात. बौद्धांनी आपले तत्त्वज्ञान समानता निर्माण करण्यासाठी वापरले, तर वेदान्त तत्त्वज्ञान वर्णवर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी वापरले गेले किंवा ज्ञानेश्वर काश्मिरी शैव मतानुयायी होते, आणि तो शैववाद म्हणजे पूर्वीचा बौद्धांचा विज्ञानवाद किंवा यातल्या वादात पडणं हा या लेखाचा उद्देश नसला तरी लेखक यातून ज्ञानेश्वरांचे बुद्धाशी थेट नातं सूचित करतात. त्यांचं बुद्ध आणि धम्माशी जितकं जिव्हाळ्याचं नातं आहे, तितकंच ज्ञानेश्वरांशी आतड्याचं नातं असावं, असं वाटत राहतं.

याच प्रेमातून ज्ञानेश्वरांच्या लेखनाचं, साहित्याचं, त्यांच्या 'अमृतानुभवा' चं निरुपण भौतिकी व क्वांटम भौतिकीच्या अंगाने होण्याची आवश्यकता प्रतिपादन करतात. लेखक बुद्धधम्म, नागार्जुन, क्वांटम भौतिकी आणि प्रतीत्यसमुत्पाद यांचा केवळ एकमेकांशी संबंध प्रस्थापित करत नाही, तर ज्या संकल्पना आज क्वांटम भौतिकीत व कॉग्निटीव्ह मानसशास्त्रात 'आधुनिक' म्हणून मांडल्या जात आहेत, त्याहून अधिक विकसित संकल्पना नागार्जुन आणि एकूण बौद्ध तत्त्ववेत्यांनी सिद्ध केल्याचा दावा लेखकाने केलेला आहे.

मूलमध्यमकारिकातील प्रत्यय परीक्षा, संस्कार परीक्षा, स्कंध परीक्षा, धातू परीक्षा, स्वभाव परीक्षा यांतल्या निवडक कारिकांचे अनुवाद लेखकाने उदाहरणादाखल दिले आहेत. संपूर्ण ग्रंथामध्ये लेखकाने बुद्ध आणि त्यांच्या धम्माला विविध अंगांनी आइनस्टाईन, न्यूटन, श्रोडिंजर, गॅलिलियो अशा अनेक वैज्ञानिकांचे आधार देत, त्यांच्या सूत्रांनी सिद्ध केलेल्या कसोट्यांवर घासून घेत, प्रतीत्यसमुत्पाद व आधुनिक भौतिक विज्ञान या दोघांमधील तुलनात्मक वास्तव आणि आकलन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

काही वर्षांपूर्वी 'शून्यता : काळ आणि अवकाश संकल्पना' या विषयावर नितीन वाघ यांचा महत्त्वपूर्ण लेख एका अंकात प्रसिद्ध झाला होता. यात त्यांनी 'काळ' आणि 'अवकाश' या दोन्ही भौतिकी संज्ञा वास्तवाशी कशा जोडल्या गेल्यात, क्लिष्ट आणि जटील असणारं आणि मानवी आकलनाच्या पलीकडे असणारं वास्तव म्हणजे नेमकं आहे काय; स्वच्छ, इंद्रियगम्य वास्तव हे आभासी किंवा भ्रम कसं असू शकतं; सत्य, वास्तव सारं काही समोर दिसत असताना यातलं भासवी कोणतं आणि खरोखरीचं कोणतं, वास्तवाचा शोध घेण्याच्या पद्धती आणि व्यवस्था आहेत का? संकेत, प्रतीकं, चिन्ह यांनी होणारं आकलन म्हणजे वास्तव. वास्तवाच्या स्वरूपाच्या आपल्या मनातल्या धारणेलाच आपण माया (मोह) म्हणतो तोच शंकराचार्यांचा मायावाद (मोहवाद) आणि नागार्जुनाचा शून्यवाद होय. सत्य, वास्वव, प्रत्यक्ष प्रमाण, माणसाची विश्वरूप समजून घेण्याच्या आकलनाची मर्यादा दाखवणं हे कार्य मायावाद (मोहवाद) करत असला तरी जगणं पराधीन आहे, असं म्हणण्यात मोहजालात गुरफटणं आहे.

या ठिकाणी लेखक सांगू पाहतो आहे की, भौतिकी विज्ञान एका बाजूला विश्वाचे नियम मांडत असताना मायावादामुळे (मोहवादामुळे) सामान्य माणूस या नियमांपासून दूर जातो आहे. जगण्यासाठी वास्तवाचं स्वरूप, भान असणं माणसाला आणि किमान कलावंतासाठी आवश्यक असतं. कारण कोणताही कलावंत आपल्या कलेतून वास्तव उजागर करत असतो. My human faces are truer than real हा आत्मविश्वास देणारं विश्वाचं स्वरूप, वास्तव समजून घेण्यासाठी काळ–अवकाश काय आहे, त्यात आपलं स्थान कुठे आहे याची किमान कल्पना वास्तव समजून घेण्यासाठी आवश्यक आहे.

या संपूर्ण प्रकरणात लेखक काळ आणि अवकाश याचा तपशिलात जाऊन शोध घेण्याचा प्रयत्न करतो. क्वांटम थिअरीनुसार, 'वर्तमानकाळच नाही' असं सिद्ध होणार असेल, तर आपण जगतो तो काळ कोणता? प्रत्येकाचा भूत, भविष्य, वर्तमान वेगळा असतो. मग समकाल कुणाचा? असे अनेक प्रश्न उपस्थित करतो. मितीची संकल्पना मांडतो. सापेक्षताच पाचवी मिती कशी आहे आणि प्रत्येक व्यक्ती एक स्वतंत्र मिती कशी असते, याचं प्रतिपादन करतो.

या ठिकाणी काळ आणि अवकाश या संकल्पनेचा नुसता मागोवाच नाही, तर तिचा धागा नागार्जुनाच्या मूलमध्यमकारिकेपर्यंत तो नेतो. तो सांगतो की, काळ अनंत व शाश्वत नाही; मर्यादित आहे; क्षय होणारा आहे. काळाविषयीचं प्रदीर्घ चिंतन लेखकाने केलंय, ते कण स्वरूपापर्यंत. मग अवधी म्हणजे काय? मितीय काळ म्हणजे काय? आपण काळात जगतो की काळ आपल्यात जगतो? काळ नेमका कसा असतो? तो कसा काम करतो? अशा प्रश्नांमध्ये काळ हा प्रत्येक प्रतलांचं अनेक गुंतागुंतीच्या संरचनांचा समुच्चय असतो. 'काळ' हा अवकाशातल्या प्रत्येक बिंदूसाठी स्वतंत्र, वेगळा असतो. काळाच्या महाजाळात प्रत्येक घटनेची वेगळी वेळ असते, त्या वेळेलाच ती घटना घडते. घटना व काळ परस्परपूरक व सापेक्ष आहेत.

विश्व हे घटना–कारण–परिणाम यांच्या कार्यकारणभावाच्या काम करत असतं. कारण आणि परिणाम यांची निर्मिती म्हणजे विश्वात घडणारी कोणतीही घटना. कारण आणि परिणाम यांशिवाय घटिते शक्य नसतात. कार्यकारणाशिवाय परिणाम शक्य नसतो. हेच बुद्धाचं प्रतीत्य समुत्पन्नचक्र. बुद्ध आणि त्यांच्या धम्माच्या अंगाने लेखक चर्चा करीत असला, तरी गीता, ज्ञानेश्वर इथपासून आधुनिक विज्ञानाचा आधार लेखक आपल्या प्रतिपादनात घेतो.' 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहन्ति पावक:' हा गीतेतला श्लोक थर्मोडायनामिक्सचा, ऊर्जेचा नियम आहे' असं लेखक सांगतो.

शेवटी लेखक म्हणतो की, 'आपली काळजाणीव स्मृतींशी जोडलेली असते. प्रत्येक अस्तित्व हा एक इतिहास असतो. काळाची जाणीव, त्यात घडणाऱ्या घटना मानसिक संरचनेच्या मध्यभागी असतात. हाच आपल्यासाठी काळाचा प्रवाह असतो. वास्तवाची निर्मिती केवळ स्मृतीतून होत असते. स्मृती म्हणजे मागोवांचा समुच्चय. स्मृतीमुळे काळाचं आणि अस्तित्वाचं भान माणसाला होत असतं. स्मृती आणि वेदना मानवी अस्तित्वाचे स्रोत असतात. काळ हा स्मृती असतो तसेच दु:ख आणि वेदनाही.' हाच विचार बुद्धांनी मांडला. ज्या ज्या गोष्टीला आरंभ आहे, त्यांना अंतही आहे.

'काळ अनंत आहे' ते 'काळ अस्तित्वातच नाही' एवढ्या मोठ्या कॅनव्हॉसवर लेखक जे सांगू पाहत आहे, ते बुद्ध आणि त्यांच्या धम्माच्या परिप्रेक्ष्यात असलं, तरी व्यापक अर्थाने ते मानवतेच्या विशाल परिप्रेक्ष्यातलं आहे. धर्मजाणिवा, धारणा बाजूला ठेवून प्रत्येकाने अस्तित्वाच्या अनेक शक्यतांचा शोध घेण्यासाठी विश्वाचे नियम समजून घेणं आवश्यक आहे.

बुद्ध म्हणतात, 'काळ हा दुःख आहे' या वास्तवाचं भान येणं, या अरिय वास्तवाला सामोरं जाणं, दुःखमुक्तीचा मार्ग प्रत्येकाने शोधणं हेच माणूस असण्याचं सार आहे. अंतिमतः प्रत्येक व्यक्तीला एक काळ, एक वास्तव, एक वर्तमान हे घटक मिळालेले आहेत. आपल्याला मिळालेल्या काळाचं, वास्तवाचं आणि वर्तमानाचं तो काय करतो, हे त्याच्या जगण्याचं मुख्य आणि मूलभूत तत्त्व असतं.

कोणतंही दर्शन किंवा तत्त्वज्ञान हा मुळातच किचकट विषय असतो. त्यातल्या संदर्भांना पुष्टी मिळावी म्हणून पूर्वसूरींच्या पुस्तकांचा, संशोधनाचा संदर्भ असणे अनिवार्य असते. या ग्रंथातही लेखकाने असंख्य इंग्रजी संदर्भांबरोबरच जवळपास ३६ मराठी व १४ हिंदी संदर्भग्रंथांची नावे दिलेली आहेत. पुस्तकात उल्लेखिलेले तपशील, ग्रंथातील नेमका संदर्भ यांचे उल्लेख फूटनोटमध्येच असल्यावर त्या जुळणीचा वाचक, अभ्यासक व संशोधकांना तुलनात्मक फायदा झाला असता. असं असलं, तरी ही प्रदीर्घ सूची लेखकाने या कामासाठी घेतलेल्या परिश्रमाचं, व्यासंगाचं निदर्शक आहे.

नितीन भरत वाघ यांनी अफाट मेहनतीने, विश्लेषणात्मकतेने व अभ्यासपूर्णतेने बुद्ध आणि त्यांचा धम्म याची उकल करता करता धम्माला विज्ञानाशी, क्वांटम थिअरीशी, आइनस्टाईन आदी वैज्ञानिकांच्या संशोधन व निरिक्षण यांच्याशी जोडून बुद्धांना आधुनिक वैज्ञानिकतेच्या अगदी निकट आणलंय.

आइनस्टाईन म्हणालाच आहे – "The religion of the future will be cosmic religion. It should transcend a personal God and avoid dogmas and theology." महत्त्वाचं आहे तो आइनस्टाईन विश्वास म्हणतो – "If there is any religion that would cope with modern scientific needs, it would be Buddhism."

'प्रतीत्यसमुत्पाद सिद्धांत' – नितिन भरत वाघ. आव्हान बुकस्मिथस्, नाशिक, मूल्य – १०० रुपये.

– राजीव जोशी.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 #दोष आज के #अंधभक्त नासमझों का नहीं बल्कि सारा दोष उसके आका धूर्त #मदारी का है। 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

ये लोगोंने विकिपीडिया से लेकर NCERT की सभी पुस्तकों पर मिथ्यापूर्ण बातों का समावेश कर दिया है।

उसी कड़ी का उदाहरण है कि कलम कसाइयों ने मध्य प्रदेश में स्थापित #गरुड़ स्तम्भ पर #विष्णु और #वैष्णव सम्प्रदाय लिखा हुआ बता रहा है।


क्या वाकई में वहां कुछ ऐसी बात लिखी है?

#विदिशा में राजनयिक उद्देश्य से यवन #राजदूत (हेलिडोरियस) आया था। जिसने अपनी वार्तालाप को कलमबंद करने हेतु, #विदिशा राज का राजकीय चिन्ह #गरुड़_स्तम्भ स्थापित करते हुए वार्तालाप को अंकित किया था। (ध्यान दें कि #शुंग वंश का राजकीय चिन्ह #गरुड़ था)

अब भारत का तथाक्थित विद्वान लेखक द्वारा शैक्षिणिक पुस्तक में जो दावा किया जाता है, वह कितना बड़ा गपोड़ लीला है, आइए उसको देखतें हैं।

#स्तम्भ_लेख की लिखावट बाह्मी लिपि (धम्म लिपि) में है,

जो इस प्रकार है – [illegible]



#पठनीय स्वरूप में लिप्यन्तरण :–

#देव देवस वासु देवस गरूढ़ ध्वजे अयं करितो इअ हेलिरुदेरेण भाग वतेन दियस पूत्रेन #तख्खसिलाकेन योनदतेन अगतेन महाराजस अंतलि कितस रुपंता संकासं रञो कासी पुत्रस भागभदरस त्रातारस वसेन च त दसेन राजेन वधमानस।

#नोट :– #तख्खसिला का संस्कृत शब्द #तक्षशिला होता है। यानी विदेसी शासक का संस्कृत से कोई संबंध नही है।

#हिंदी_अनुवाद– देवों के देव, जग के देव (यहां ध्यान दें कि सम्यक संस्कृति में #अरहत को #देव और #देवों के #देव को भगवान #बुद्ध कहा जाता है। देखें बुद्ध #वंदना– सत्था #देवमनुस्सानं बुद्धो भगवा'ति।) का यह गरुड़ ध्वज का स्थापना तक्षशिला निवासी दिय के पुत्र और महाराजा अंतलिकित (एन्टीऑलकिड्स) के राजदूत ने किया था। ये विदिशा में काशी पुत्र भागभद्र के समीप चौहदवें वर्ष के राज्यकाल में विदिशा आए थे।

अब तो आप लोग समझ गए।

#नासमझ अंधभक्तों पर #दया करें और धूर्त #मदारी को खोजकर #नंगा करें।

खेल में #बंदर स्वयं से नहीं #नाचता, बल्कि #मदारी उसे अपने धुन पर #नचाता है।

Rajeev Patel



☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 आठ विजयी ठिकाणे 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

अट्ठ अभिभायतनानि

_आठ विजयी ठिकाणे_

_!! ओम मणी पद्मे हूँ !!_

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

"अट्ठ खो इमानि, आनन्द, अभिभायतनानि I कतमानि अट्ठ ?

_"आनंद ! विजयी होण्याची आठ स्थळे आहेत, आठ ठिकाणे आहेत. ती आठ कोणती ?"_

अज्झत्तं रूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति परित्तानि सुवण्णदुब्बण्णानि। 'तानि अभिभुय्य जानामि पस्सामी 'ति एवंसञ्ञी होति I इदं पठमं अभिभायतनं।

१ आपल्या स्वतःला आतून एकटा समजणारा व बाहेरून जे आकर्षित करणार आहे त्याला काही ही किंमत न देता त्यावर विजय मिळविणारे त्याला मी एक नाव दिले ते म्हणजे (अभिक्षू-आयतन) बाहेरील वाईटावर विजय संपादन करण्याचे पहिले ठिकाण."

"अज्झत्तं रूपञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति अप्पमाणानि सुवण्णदुब्बण्णानि। 'तानि अभिभुय्य जानामि पस्सामी 'ति एवंञ्ञी होति I इदं दुतियं अभिभायतनं I

२. "आपल्या स्वतःला आतून आकारहिन निराकार समजून जी बाहेर अनेक वाईट रूपे आहेत त्यावर विजय मिळविण्याचे हे दुसरे ठिकाण आहे."

"अज्झत्तं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति परित्तानि सुवण्णदुब्बण्णानि। 'तानि अभिभुय्य जानामि पस्सामी 'ति एवंसञ्ञी होति I इदं ततियं अभिभायतनं I

३. "आपल्या स्वतःला आतून आकारहीन आहोत याचे स्मरण ठेवून बाहेरील पापमयी रूपावर मग ते कुरूप अथवा सोन्यासारखे चमकणारे असो, त्यावर विजय, हे विजयाचे, तिसरे ठिकाण होय हे तिसरे अभिक्षु-आयतन आहे."

"अज्झत्तं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति अप्पमाणानि सुबण्णदुब्बण्णानि। 'तानि अभिभुय्य जानामि पस्सामी 'ति एवंसञ्ञी होति I इदं चतुत्यं अभिभायतनं I

४. "आपल्या आत ज्याला नाव देता येणार नाही असे 'नाम' आहे, हे ओळखून जो बाहेरील नामावर मग ते कितीही कीर्तीमान असो, ते वाईट आहे असे ओळखून त्यावर जो विजय मिळवितो, ती विजयाची चौथी जागा आहे."

"अज्झत्तं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति नीलानि नीलवण्णानि नीलनिदस्सनानि नीलनिभासानि I सेय्यथापि नाम उमापुप्फं नीलं नीलवण्णं नौलनिदस्सनं नीलनिभासं। सेय्यथा वा पन तं वत्थं बाराणसेय्यकं उभतोभागविमष्टुं नीलं नीलवण्णं नीलनिदस्सनं नीलनिभासं I एवमेव अज्झतं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति नीलानि नीलवण्णानि नीलनिदस्सनानि नीलनिभासानि I 'तानि अभिभुय्य जानामि पस्सामी'ति एवंसञ्ञी होति I इदं पञ्चमं अभिभायतनं I

५. "आपल्या आतील रूपाला कोणतेही नाव न देता. बाहेरील जसे निळे, निळ्या रंगाचे, निळे दिसणारे, निळयाचा भास करणारे, निळ्या रूपाचे आळशीचे फूल हे केवळ आभास निर्माण करणारे आहे, असे समजून त्यावर विजयाचा पांचवा स्तंभ आहे."

"अज्झत्तं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति पीतानि पीतवण्णानि पीतनिदस्सनानि पीतनिभासानि । सेय्यथापि नाम कणिकारपुप्फं पीतं पीतवण्णं पीतनिदस्सनं पीतनिभासं। सेय्यथा वा पन तं वत्थं बाराणसेय्यक उभतोभागविमट्ठं पीतं पीतवण्णं पीतनिदस्सनं पीतनिभासं । एवमेव अज्दात्तं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति पीतानि पीतवण्णानि पीतनिदस्सनानि पीतनिभासानि । 'तानि अभिभुय्य जानामि पस्सामी 'ति एवंसञ्ञी होति । इदं छट्ट अभिभायतनं ।

६. "आपल्या शरिराच्या आत कोणतेही रूप नाही हे जाणून बाहेरप्रमाणे जे कन्हेरीचे फूल पिवळे आहे, जो पिवळा रंग आहे, जे पिवळे दिसते, पिवळा भास होतो, त्या होणाऱ्या भासाला जो नाहीसे करतो, तो सहावा विजय होय."

"अज्झत्तं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति लोहितकानि लोहितकवण्णानि लोहितकनिदस्सनानि लोहितकनिभासानि । सेय्यथापि नाम बन्धुजीवकपुप्फ लोहितकं लोहितकवण्णं लोहितकनिदस्सनं लोहितकनिभाप्स। सेय्यथा वा पन तं वत्थं बाराणसेय्यकं उभतोभागविमट्ठं लोहितकं लोहितकवण्णं लोहितकनिदस्सनं लोहितकनिभासं । एवमेव अज्झत्तं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति लोहितकानि लोहितकवण्णानि लोहितकनिदस्सनानि लोहितकनिभासानि। 'तानि अभिभुय्य जानामि पस्सामी'ति एवंसञ्ञी होति। इदं सत्तमं अभिभायतनं ।

*_७. "आपल्या शरीरात नामरूप असे काही असत नाही, हे जो जाणून बाहेर लाल रंग पाहतो, जो लाल दिसतो, जे लाल झुडपावर लाल फूल दिसते आहे या भावनांना जो दाबून जो त्यावर विजय मिळवितो, तो बाईटावर, बाईट भावनेवर विजय मिळवितो, तो सातवा विजय आहे."_"

"अज्झत्तं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति ओदातानि ओदातवण्णानि ओदातनिदस्सनानि ओदातनिभासानि । सेय्यथापि नाम ओसधितारका ओदाता ओदातवण्णा ओदातनिदस्सना ओदातनिभासा। सेव्यथा वा पन तं वत्थं बाराणसेय्यक उभतोभागनिमष्ठं ओदातं ओदातवण्णं ओदातनिट्स्सनं ओदातनिभासं। एवमेव अज्झत्तं अरूपसञ्ञी एको बहिद्धा रूपानि पस्सति ओदातानि ओदातवण्णानि ओदातनिदम्सनानि ओदातनिभासानि । तानि अभिभुच्य जानामि पस्सामी ति एवंसञ्ञी होति । इदं अनुम अभिभायतनं । इमानि खो, आनन्द, अरु अभिभायतनानि ।

८. "ज्याने आतल्या नामस्वरूपाला आत काही ही नाही हे ओळखून बाहेर शुक्रताऱ्याप्रमाणे दिसणारे, सफेद भासणारे, सफेद असेल, आत तसेच बाहेर काही नसतेच असे जो समजतो, तो त्याने वाईट भावनेवर मिळविलेला आठवा विजय आहे."

_मंगल होवो! कल्याण होवो ! भले होवो !_

_!! ओम मणी पद्मे हूँ !!_ ॐ मणि पद्मे हूँ

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

संकलन – महेश कांबळे *_दिनांक :- २४/११/२०२३_*

_संदर्भ :–_ *_१) महापरिनिब्बानसुत्त (मराठी अनुवादासह – संपादक आयु अरविंद भंडारे)_*

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 ऐतिहासिक बौद्धांची महामंगल पर्यटन स्थळे 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

महापरिनिर्वाण सुत्रामध्ये तथागत बुद्ध आनंदास म्हणतात की, "आनंद श्रद्धाळू, शिलसंपन्न पुरुष व महिलांसाठी चार स्थाने दर्शनीय व वैराग्यपद आहे.

१) जेथे बोधिसत्व जन्माला आले. २) जेथे तथागताने सम्यक संबोधिस प्राप्त केले. ३) जेथे तथागताने धम्मचक्र प्रवर्तन केले. ४) जेथे तथागताचे महापरिनिर्वाण झाले.

१) कपीलवस्तु :– हे स्थळ उत्तरप्रदेशात असून गोरखपूर पासून ९० किमी अंतरावर आहे आणि सिद्धार्थनगर पासून १२ किमी अंतरावर आहे. तसेच सोनौली बॉर्डर पासून ६५ किमी अंतरावर आहे. सध्या या ठिकाणाला पिपरवाहा या नावाने तेथील स्थानीक लोक संबोधतात. कपीलवस्तु ही प्राचीन शाक्यवंशाची राजधानी होती. सिद्धार्थ गौतम बुद्धांचे वडील शृद्धोधन शाक्य येथील राजे होते. सिद्धार्थ गौतम यांच्या बालपणीच्या आठवणीचे स्थान कपीलवस्तु आहे. हे स्थान भारत

नेपाळ सीमेवर लुंबीनी पासुन २४ किलोमीटर दूर दक्षिण–पश्चिमेस आहे. येथे आपणास बुद्धकालीन ऐतिहासिक वास्तूंचे भग्न अवशेष पाहायला मिळतात. या भग्न अवशेषांमुळे आपल्याला सिद्धार्थ गौतमाच्या प्राथमिक बाल जीवनाची माहिती मिळते.

२) लुंबीनी :– लुंबीनी हे भगवान बुद्धाचे जन्मस्थळ नेपाळच्या तराईमध्ये आहे. सोनौली बॉर्डर पासून २२ किमी अंतरावर नेपाळ देशाच्या हद्दीत आहे. येथे जाण्याचा मार्ग उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील नैनिताल रेल्वे स्टेशनपासून आहे. याचे वर्तमान नाव 'रुम्मीनदेई' आहे. इ.स. १९९७ साली लुंबिनीला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थान ह्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले. राणी महामाया गर्भवती असताना पालखीमधे बसुन देवदह जाण्यासाठी निघाली होती तेव्हा देवदह जाण्यासाठी लुंबीनी वनातुन जावे लागत होते. त्यावेळी लुंबीनी वनामधे शाल वृक्षाचे उद्यानवन होते. माता महामायेचे शालवृक्षाच्या उद्यानवनामधे आगमन झाले तेव्हा फळं आणि फुलांनी बहरलेल्या वृक्षांना पाहुन राणी महामाया प्रसन्न झाली, त्या मनमोहक वातावरणाने राणी महामाया अत्यंत प्रभावित झाली. पालखीतुन उतरुन राणी महामाया एका शाल वृक्षाजवळ गेली व एका फांदीला पकडले, तेव्हा अचानक राणी महामायेस प्रसव वेदना व्हायला सुरुवात झाली, व ५६३ इ. पुर्व वैशाखी पोर्णीमेला अतिशय प्रसन्न व निसर्गरम्य वातावरणात सिद्धार्थ गौतमाचा जन्म झाला. याठिकाणी तथागत बुद्धांच्या स्मरणार्थ सम्राट अशोक यांनी 'अशोक स्तंभ' निर्माण केला होता. यावर सम्राट अशोकाचा अभिलेख 'इथे बुद्धाचा जन्म झाला...' लिहलेला आहे. याठिकाणी उत्खननात सापडलेल्या विटांचे प्राचीन स्तुप असुन बाजुला आधुनिक ‘रुम्मीनदेई विहार' आहे. याच ठिकाणी विहाराच्या दक्षिणेस प्राचीन तलाव आहे जेथे एके काळी बोधिसत्वाचा जन्म झाल्यावर माता महामायाने स्नान केले होते.

३) बुद्धगया :– बुद्धगया हे स्थळ बिहार राज्यामध्ये आहे. गया रेल्वे स्टेशनपासून हे स्थळ १८ किमी अंतरावर आहे. फागुन नदीच्या किनार्यावर हे बौद्ध जगतातील बुद्धांचे सर्वाधिक श्रद्धास्थान वसलेले आहे. ज्या वज्रासनावर बसून बोधिसत्व सिद्धार्थ गौतमाने सम्यक समाधी लावली ते वज्रासन येथे आहे. ज्या पिंपळाच्या झाडाखाली सिद्धार्थाने वज्रासनावर बसून सम्यक संबोधि प्राप्त केली, तो बोधिवृक्ष येथे आहे. बुद्धत्व प्राप्त झाल्यानंतर सात आठवडे भगवान बुद्ध वेगवेगळ्या जागी बसून त्यांना प्राप्त झालेल्या ज्ञानाचा अनुभव घेत राहिले, त्याचीही स्मारके या ठिकाणी आहेत. येथे १६० फुट उंचीचे महाबोधी विहार आहे. या विहारातील भगवान बुद्धांची मूर्ती भूमिस्पर्ष मुद्रेतील आहे. महाबोधी विहाराच्या पाठीमागे चंक्रमण चैत्य, अभिलोष लोचन, रतनगड, अज्रपाल, निग्रोध वृक्ष, राजायतन व मुचलिंद तलाव हि सात प्रमुख ठिकाणे आहेत. बुद्धगयेत तिबेट, ब्रह्मदेश, शियाचीन, व्हिएतनाम, बांगलादेश, जपान, थायलंड, चीन, सिलोन इत्यादी देशांची बुद्ध विहारे आहेत. बिहार ची राजधानी पटनाच्या दक्षिण–पुर्वेस १०१ किमी. अंतरावर स्थित आहे. बोधगया जिल्ह्यातील छोटे शहर आहे. बुद्धागया जवळील फाल्गु नदीच्या सहाय्यक उपनदीस 'निरंजना नदी' म्हणतात. याच नदीच्या काठावर भगवान बुद्धानी कठोर तप केले होते. या नदीचा उगम हजारीबाग जिल्ह्यात सिमेरीया जवळ आहे. प्राचीन भारतातील मुलनिवासी नागवंशिय लोक या नदीकाठी वसलेले होते. याच नदीकाठी सुजाताने बोधिसत्वाला पिण्यासाठी वाटीभर दुध व खीर दीली होती. या ठिकाणी एके काळी सुजाता स्तुप होता. येथे उत्खननात काही अवशेष मिळाले आहेत त्यावर 'देवपालराजस्स सुजातागृह' असा लेख आहे, याचाच अर्थ सुजाताच्या स्मरणार्थ बनविलेला स्तुप हा राजा देवपाल यांच्या शासन काळातील असावा. सुजाता कुटी पासुन काही अंतरावर नदी किनारी छोटा बुद्ध विहार आहे या ठिकाणी सिद्धार्थ गौतमाने वाटी नदीमध्ये प्रवाहित करून भावी बुद्धत्वाची परीक्षा घेतली होती. उरूवेला येथुन निरंजना नदीच्या काठावर आल्यावर सिद्धार्थ गौतम पिंपळाच्या झाडाखाली पद्मासन लाऊन बसले. याच दरम्यान शरीर व चित्ताच्या ध्यानाची भावना केल्याने सिद्धार्थ गौतमास जन्म व मृत्यूच्या पलीकडील सत्याचा साक्षात्कार झाला. सिद्धार्थ गौतमाने जाणुन घेतले की समस्त संसार दुःखी का आहे. आज्ञानाचे कारण काय आहे. लोभ, तृष्णा व अंहकारामुळे काय नुकसान होत आहे. दुःखाच निवारण कसं करायचं. या सर्वांना तथागताने 'चार आर्यसत्य' असे नाव दिले. सम्यक संबोधि प्राप्त केल्यानंतर भगवान बुद्धांनी संपुर्ण पहिला आठवडा बोधिवृक्षाखाली समाधी अवस्थेत व्यतीत केला. हा बोधिवृक्ष बोधगया महाविहाराच्या पश्चिमेस आहे. या बोधिवृक्षाची एक शाखा श्रीलंकेच्या 'अनुराधापुर' मधे आहे. बोधिवृक्ष व महाविहार यांच्या मधे भगवान बुद्धाचे साधना स्थळ 'वज्रासन' आहे. चीनी बौद्ध यात्री '#युवान_शुवांग' म्हणतात की भगवान बुद्धाचे साधना स्थळ 'वज्रासन' समस्त विश्वाच्या मध्यम भागात स्थित आहे. दुसरा आठवडा भगवान बुद्धांनी समाधी अवस्थेत व्यतीत केला. याच ठिकाणी 'अनिमेष लोचन स्तुप' बनवला गेला आहे. कारण याच आठवड्यात भगवान बुद्ध बोधिवृक्षा विषयी परोपकारी भावना व्यक्त करत बोधिवृक्षाला एकटक बघत राहिले होते. तथागताने तिसरा आठवडा चंक्रमण करत व्यतीत केला.
महाविहाराजवळ या घटनेच्या स्मरणार्थ 'चंक्रमण स्थळाचा चबुतरा' बनवण्यात आला आहे. हा चंक्रमण चबुतरा ५३ फुट लांब, ३ फुट ६ इंच रूंद व ३ फुट उंच आहे. भगवान बुद्धाच्या पाऊलांचे ठसे प्रदर्शित करण्यासाठी त्यावर कमळाचे फुल बनवले गेले आहेत. चौथा आठवडा भगवान बुद्धांनी 'रतनगृह' येथे ध्यानमग्न अवस्थेत व्यतीत केला. पाचवा आठवडा भगवान बुद्धांनी 'आजपाल निग्रोध' झाडाखाली समाधी अवस्थेत व्यतीत केला. सहावा आठवडा भगवान बुद्धांनी 'मुचिलींद' तळ्याजवळ मुचिलींद वृक्षाच्या सावलीत व्यतीत केला. सातवा व अंतिम आठवडा भगवान बुद्धांनी 'राजायतन' वृक्षाखाली समाधीस्त अवस्थेत व्यतीत केला. आज आपण जो वृक्ष बघतो, तो ६० वर्षापुर्वी 'बरमा' येथुन आणलेला वृक्ष आहे. याच ठिकाणी उत्कल म्हणजेच उडीसा येथील व्यापारी बंधू तपस्सु व भल्लीक यांना भगवान बुद्धानी बुद्ध व धम्माची शरण दिली होती. तपस्सु व भल्लीक दोघेही व्यापारी बंधू तथागताचे पहिले उपासक शिष्य बनले होते.

४) सारनाथ :– हे स्थळ उत्तर प्रदेशामध्ये असून ते वाराणसीपासून ८ किमी अंतरावर आहे. सारनाथ या पवित्र स्थळी, सध्या सारनाथ रेल्वे स्टेशन आहे. बुद्धत्व प्राप्तीनंतर भगवान बुद्धानी प्रथम उपदेश सारनाथ येथील मृगदाय वनामधे पंचवर्गीय भिक्षुंना दिला. यामध्ये चार आर्य सत्य, मध्यम मार्ग व जीवनातील

कोणत्याही अतीरेकापासुन दुर राहणे व दुःखाला जाणून घेण्याचा उपदेश दिला. या प्रथम उपदेशास 'धम्मचक्र प्रवर्तन' असे म्हणतात. यानंतर तथागत बुद्धानी 'मृगदाय' वनामधील मुलगंध कुटीमधे निवास केला. मुलगंध कुटीच्या पश्चिमेस सम्राट अशोक कालीन अशोक स्तंभ आहे, यावर तीन अभिलेख कोरलेले आहेत. सारनाथ मधे धम्म चक्र प्रवर्तन केल्यानंतर वाराणसी मधील अनेक लोक संघामधे दिक्षीत झाले. वाराणसी मधील काश्यप बंधुनी बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार केला. वाराणसी मधे ज्या ज्या ठिकाणी भगवान बुद्धांनी उपदेश दिले त्या सर्व ठिकाणी बौद्ध स्मारक बनविले गेले होते.

५) राजगृह :– हे स्थळ बिहार राज्यात असून नालंदा जिल्ह्यात आहे. बुद्धगयेपासून हे ठिकाण ९० किमी अंतरावर आहे. पटनापासुन जवळ जवळ १०० किलोमीटर दूर असलेल्या बौद्ध तीर्थक्षेत्रास राजगीर म्हणतात. राजगृह म्हणजे राजाचे घर. प्राचीन काळातील १६ भारतीय जनपदापैकी राजगीर एक होते, त्यास त्यावेळी 'राजगृह' म्हटले जायचे. या ठिकाणी मगध वंशाचे शक्तिशाली राजे बिंबीसार यांचे शासन होते. राजा बिंबीसार यांनी आपले आवडते उद्यान 'वेळुवन विहार' भगवान बुद्धास दान दिले होते. याच ठिकाणी भंते दब्बमलपुत्त अरहंत झाले होते, महाराणी खेमा भिक्षुनी झाली होती. भगवान बुद्धाचा चुलत भाऊ देवदत्त याने भगवान बुद्धावर केलेल्या प्राणघातक हल्ल्याचे स्थान देखील राजगीर हेच आहे. ग्रुध्दकुट पर्वतावरुन मोठा दगड देवदत्ताने भगवान बुद्धांच्या अंगावर ढकलून दिला होता पण तो दगड तथागताच्या पायाच्या बोटाला किरकोळ नुकसान करुन दुर जाउन पडला होता. देवदत्ताने चुगली करून आजातशत्रुच्या मनात भगवान बुद्ध व वडील बिंबीसार यांविषयी द्वेष निर्माण केला. राजा बिंबीसार यांचा मुलगा आजातशत्रु यांने पीता बिंबीसार यांची हत्या केली. त्यानंतर आजातशत्रुचा मुलगा उदयने आजातशत्रुची हत्या केली, यानंतर उदयचा मुलगा महामुंडने उदयची हत्या केली. पितृहत्येचे पापं याच जन्मात सर्वांना भोगले. लिच्छवींनी जेव्हा दुष्काळ निवारणासाठी तथागतास वैशाली मधे बोलवले तेव्हा भगवान बुद्धांना त्रास होऊ नये म्हणून राजगृह ते गंगातट पर्यंत रस्ता राजा बिंबीसार यांनी बनवला होता, आज या मार्गास 'राजा बिंबीसार मार्ग' म्हणतात. येथेच ते कारागृह आहे ज्यामधे राजा बिंबीसार यांना आजातशत्रुने कैद केले होते. भगवान बुद्धाचे चुलत भाऊ देवदत्त यांस भिक्षु बनताना बुद्धासारखी प्रतिष्ठा मिळवण्याची खुप लालसा होती. आपल्या महत्वाकांक्षामधे असफल झाल्यावर त्याच्या मनामध्ये घृणा व तिरस्काराने जन्म घेतला. त्यामुळे देवदत्त भगवान बुद्धाच्या विरोधात क्रूर कारवाया करत राहिला. राजगीर मधील नवीन स्थानास 'नवीन राजगीर' म्हणतात. चीनी बौद्ध यात्री '#फा_हियान' यांच्या नुसार नवीन राजगीरची निर्मिती राजा आजातशत्रु यांनी केली होती. वर्तमान काळात याचे भग्न अवशेष पाहावयास मिळतात. सरस्वती नदीच्या पलीकडे सम्राट अशोक यांनी पश्चिमेस स्तुप बनविला होता. पश्चिमेस ३ मीटर खोदकाम केल्यानंतर येथे मौर्य शैलीच्या वीटा व लघुस्तुप सापडले आहेत. वैभार पहाडीच्या पुर्वेस उतारावर जी गुहा आहे तीला '#पिपलगुहा' म्हणतात. भगवान बुद्धाचे प्रमुख शिष्य भंते 'महाकाश्यप' येथेच निवास करत होते, जे प्रथम बौद्ध संगितीचे अध्यक्ष होते. या ठिकाणी '#सप्तकर्णी' गुहेमधे 'प्रथम धम्म संगिती' झाली होती. ग्रुध्दकुट पर्वताजवळील छटागीरी पर्वतासमीप '#जीवक_आम्रवन_विहार' आपणास बघावयास मिळतो. हे आम्रवन राजवैद्य जीवक यांनी तथागत बुद्धास दान दिले होते. भगवान बुद्ध यांच्या प्रती आपली असीम श्रद्धा व्यक्त करण्यासाठी राजगीरच्या पहाडीवर जपानद्वारा निर्मित भव्य '#शांती_स्तुप' आहे. वैभार पर्वताच्या दक्षिणेतील गुहांना 'सोनभंडार गुहा' म्हणतात, या ठिकाणी मगध राज्याचा स्वर्ण व राजकोश सुरक्षित ठेवला जात होता. मुख्य मार्गांपासून दक्षिणेस १ किमी दुर विटांचे प्राचीन भवन आहे यास '#मणीहार_मठ' असे म्हणतात. मणीहार मठ हे बुद्ध कालीन भिक्षु निवास स्थान होते. ही जागा नागवंशिय लोकांसाठी पूजनीय होती. याच ठिकाणी उत्खनन होऊन अनेक शिल्प व नागप्रतिमा मिळाल्या आहेत.

६) श्रावस्ती :– हे स्थळ उत्तर प्रदेशात असून गोरखपूर पासून २०० किमी अंतरावर आहे. तसेच गौंडा स्टेशनपासून २५ किमी अंतरावर आहे. प्राचीन भारतातील श्रावस्ती नगरास आज 'सहेत महेत' म्हटले जाते. हे उत्तर परदेशातील गुडा व बेहराईक या जिल्ह्यांच्या मध्यभागी स्थित आहे. सहेत मधे प्रसिद्ध प्राचीन 'जेतवन बौद्ध विहार' आहे. जेतवन विहार अनाथपिंडक श्रेष्ठी यांनी भगवान बुद्धास भेट दिला होता. जेतवन विहाराची जागा अनाथपिंडक श्रेष्ठी यांनी 'राजकुमार जेत' यांचे कडुन असंख्य स्वर्ण मुद्रा देऊन विकत घेतली होती. जेतवन विहाराच्या आंगणात एक स्तुप व विहीर आहे. प्राचीन काळातील भिक्षुसंघासाठी २१ कक्ष आहेत. या ठिकाणी भगवान बुद्ध व भावी बुद्ध 'मैत्रेय' यांची रेखीव प्रतीमा आहे. जेतवन विहाराच्या उत्तरेस प्राचीन काळात निर्मित ८ स्तुपांचे अवशेष पहावयास मिळतात. येथे मिगार माता विशाखाने बांधलेला व भिक्खू संघाला दान दिलेला पुर्वाराम विहार आहे. येहते मुलगंध कुटी विहार आहे. तसेच अंगुलीमालाची गुंफा आहे. येथे जपान सरकारच्या मदतीने, भारत सरकार उत्खनन करीत आहे. येथे थायलंड, चीन व ब्रह्मदेशाची बुद्ध विहारे असून त्यांच्या धर्मशाळा मुक्कामाच्या दृष्टीने सोयीस्कर आहेत.

७) संकिस्सा :– उत्तर परदेशातील फरुखाबाद जिल्ह्यातील छोटेसे गाव हे 'संकिस्सा' नावाने ओळखले जाते. बुद्ध काळात या गावास 'सांकस्य' म्हणत असत. सम्राट अशोक यांनी भगवान बुद्धाच्या स्मरणार्थ या ठिकाणी स्मारक बनविले होते. याच ठिकाणी चीनी बौद्ध यात्री '#फा_हियान' यांनी अनेक बौद्ध स्तुप व विहार पाहिले होते. संकिस्सा येथे उत्खननात सापडलेल्या अनेक शिल्प साहित्य वस्तू लखनऊ व कलकत्ता येथील राज्य संग्रहात सुरक्षित ठेवल्या गेल्या आहे.

८) कौशांबी :– भगवान बुद्धाच्या जीवन काळात महत्वपूर्ण नगरांपैकी कौशांबी एक नगरी होती. कौशांबी वत्स राज्याची राजधानी सुद्धा होती. कौशांबी मधे भगवान बुद्धाचे अनेक वेळा आगमन झाले. याच ठिकाणी कुकुटाराम व पावारीकाराम आदी प्रसिद्ध विहार होते. प्रियदर्शी राजा सम्राट अशोक यांनी कौशांबी या ठिकाणी शिलालेख व अभिलेख कोरलेले आहेत.

९) वैशाली :– हे स्थळ बिहार राज्यात असून मुजफ्फरपूर जिल्ह्यात आहे. सध्या या ठिकाणाला बसाठ नावाने ओळखतात. हे ठिकाण पाटना पासुन्ब ६० किमी अंतरावर आहे. वैशाली या नगरीत बुद्ध धम्माशी संबंधित अनेक ऐतिहासिक स्तुपांचे भग्न अवशेष वर्तमान बसाढ नामक ठिकाणाजवळ अस्तित्वात आहे, जे स्थान मुजफ्फरपुर पासुन २० मधील दुर दक्षिण-पश्चिमेस आहे. वैशाली सिद्धार्थ गौतम बुद्ध कालीन लिच्छवी गणराज्याची राजधानी होती. वैशाली आठ जनपदांचे अर्थात अट्ठकुल चे संयुक्त वज्जीगण संघाची राजधानी होती. वैशाली नगरीस जगातील प्रथम लोकशाही असलेली राजधानी असल्याचा सन्मान व गौरव मिळाला आहे. वैशालीच्या कुटागार शाळेत भगवान बुद्धांनी अनेक महत्त्वाचे उपदेश दिले आहेत. भगवान बुद्ध वैशाली मधील बहुपुत्रचैत्य, चापालचैत्य व महावन कुटागार शाळेत नेहमी राहत असतं. वैशाली मधे दुष्काळ पडला असताना भगवान गौतम बुद्धांनी रतन सुत्राचे पठन करून भिषण परिस्थिती मधे सुधारणा घडवून आणली होती. वैशाली मधेच बौद्ध भिक्षुनी संघाची स्थापना झाली होती. वैशाली मधे ८ फुट उंच व जवळ जवळ दीड किलोमीटर क्षेत्रातील परिसरामधील टेकडीस 'राजा विशाल गढ' यांची टेकडी म्हणतात. याच ठिकाणी वज्जीगण राज्य संघाचे सभागृह होते. याठिकाणी ७७० सभासद एकत्र येऊन राज्य प्रशासन संदर्भात चर्चा करत असत. टेकडीपासुन जवळजवळ ३.५, किमी दुरवर उत्तर–पश्चिमेस देवांना प्रिय असलेला प्रियदर्शी राजा सम्राट अशोक यांनी बनविलेला अशोक स्तंभ आहे. या स्तंभावर एकमुखी सिंहाची प्रतिमा विराजमान आहे. अशोक स्तंभाच्या दक्षिणेस प्राचीन तलाव आहे, जो आजकाल रामकुंड नावाने प्रसिद्ध आहे. या तलावाच्या काठी राजा सम्राट अशोक यांनी बुद्धधम्मावर प्रभावित होऊन बौद्ध स्तुप व स्तंभ बनविला आहे. राजा विशाल गढ या टेकडी पासुन हा स्तुप २.५ किमी च्या अंतरावर आहे. या स्तुपांचा व्यास त्यावेळी २५ फुट होता, या स्तुपास प्राचीन काळी '#लिच्छवी_स्तुप' असे म्हटले जात होते. भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या १०० वर्षानंतर भदंत सब्बकामी यांच्या अध्यक्षतेखाली वैशाली मधेच इसवी सन पुर्व ३८३ मधे द्वितीय धम्म संगिती झाली होती. प्रसिद्ध नर्तकी आम्रपालीचे निवासस्थान देखील वैशाली नगरीच हीती. आम्रपालीने तथागतास व भिक्षुसंघास ३५ व्या वर्षावासादरम्यान भोजन दानासाठी आमंत्रित केले होते. वैशालीमधील अरहंत थेरी विमला ही दुषित जीवनाचा त्याग करून बुद्ध धम्म व संघास शरण आली होती. वैशाली मधील महावन कुटागार शाळेत भगवान बुद्धांनी घोषणा केली होती की आजपासून ठीक तीन महिन्यांनी बुद्ध महापरिनिर्वाणास प्राप्त होतील.

१०) कुशीनगर :– हे स्थळ उत्तरप्रदेशात असून गोरखपूर रेल्वे स्टेशनपासून ५० किमी अंतरावर आहे. उत्तर प्रदेश मधील देवरीया जिल्ह्यातील कसीया नामक छोट्या गावापासून जवळपास ३ × ५ किमी. दुरवर कुशीनगर आहे. याच ठिकाणी भगवान बुद्धाचे महापरिनिर्वाण झाले होते. भगवान बुद्ध हिरण्यवती नदीच्या पलीकडील तीरावर कुशीनाराच्या मल्लांच्या शालवनात यमक शाल वृक्षांच्या मधे ठेवलेल्या मंचकावर उत्तरेकडे डोके ठेवून, उजव्या कुशीवर पायावर पाय ठेवून, स्मृती संप्रजन्य राहुन, सिंहशय्या करुन झोपले होते. यानंतर भगवान बुद्धानी प्रथम ते चतुर्थ ध्यानाला प्राप्त करून आकाशन्यायतन, विज्ञानन्यायतन, अकिंचन्यायतन, व नैवसंज्ञायतन निरोध समाधीस प्राप्त करून तथागत बुद्ध महापरिनिर्वाणास प्राप्त झाले. भगवान बुद्धाच्या अस्तीधातु व भस्म यांना ८ हिस्स्यांमधे विभाजित करण्यात आले. मगधचा राजा आजातशत्रु, अल्लकप्पाचे वज्जी, राजगृह राज्याचे शाक्य, वैशाली राज्याचे लिच्छवी, कपीलवस्तु येथील शाक्य, रामग्रामचे कोलीय, वेठ–द्वीपचे ब्राह्मण, पावानगरीचे व कुशीनाराचे मल्ल यांनी भगवान बुद्धाच्या अस्तीं व भस्म यांवर स्तुप व विहार बांधले. कुशीनगर मधे 'महापरिनिर्वाण स्मारक स्तुप' बनविला गेला जो आजही बघावयास मिळतो. यामध्ये भगवान बुद्धाची महापरिनिर्वाण अवस्थेत सिंहशय्या करुन झोपलेली ६ × १ मीटरची मुर्ती आहे. दक्षिणेस सातव्या शतकात निर्मित छोटे छोटे स्तुप आहेत. महापरिनिर्वाण स्तुप पासुन दक्षिणेस थोड्या अंतरावर भगवान बुद्धाची विशाल मुर्ती असलेले 'माथाकुवर' स्मारक आहे. माथाकुवरचा शोध अलेक्झांडर कनिंगहम यांनी लावला होता, त्यावेळी स्थानिक लोक यास माथाकुवर असे म्हणत असत. जनरल कनिंगहम यांच्या मते माथाकुवरचा अर्थ मृत किंवा मयत राजकुमार असा होतो. माथाकुवर स्मारकापासुन १.५ किमी. अंतरावर टेकडीप्रमाणे प्राचीन स्तुप आहे. या स्तुपाचा व्यास ३७ मीटर आहे. याच ठिकाणी भगवान बुद्धाचा चंदनाच्या चितेवर अंत्यविधी करण्यात आला होता, या स्तुपास '#रामाभार_स्तुप' असे म्हणतात. याच ठिकाणी भगवान बुद्धाच्या काळात 'मुकुट बंधन विहार' होता.

११) औरंगाबाद :– *या राज्यात औरंगाबद येथील अजिंठा लेणीवर विश्वविख्यात तीस प्राचीन बौद्ध गुंफाचा समूह आहे, अजिंठा बरोबरच एलोरा (वेरूळ) स्थळ युनेस्कोद्वारा मान्यताप्राप्त आहे, एलोरा (वेरूळ) येथे १३ बौद्ध कालीन गुंफा आहेत, याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या प्रचारासाठी दिनांक १९ जून १९५० रोजी.. स्थापन केलेले मिलिंद महाविद्यालय आणि नागसेन वन प्रसिद्ध आहे.

१२) कार्ला :– *पुणे जिल्ह्यातील या लेणीमध्ये बौद्ध गुंफा असून भारतातील सर्वात मोठे चैत्यगृह आहे. कार्ले लेणी हा १६ बौद्ध लेण्यांचा गट असून त्यातील एक चैत्यगृह व इतर विहार आहेत. ही लेणी प्राचीन काळी 'वलुरक' नावाने ओळखली जात असे. बुद्धांच्या जीवनावर आधारलेल्या या दगडी गुंफा पुणे जिल्ह्यात मळवलीपासून (लोणावळा) ४–५ कि.मी. अंतरावर आहे. ६ किलोमीटर अंतरावर लोणावळ्यानजीक आहेत. येथील चैत्यगृहाचे स्थापत्य शिल्पे सुंदर आहेत. कार्ले गुंफा ह्या बोरघाटात स्थित आहेत. बोरघाट सातवाहन कालीन प्राचीन बंदरे कल्याण आणि सोपारा या ठिकाणांहून तेर या प्राचीन ठिकाणास जाण्याच्या मार्गावर आहे. इ. स. पू. १ ले शतक ते इ.स. ५ वे शतक या काळात ही लेणी खोदली गेलेली आहे. भारत सरकारने या लेणीला दिनांक २६ मे, इ.स. १९०९ रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. [१] कार्ला गुंफांमध्ये कदाचित सर्वात जास्त मोठ्या संख्येने चैत्य सभागृह आहेत.

१३) नागपूर :– *हे ऐतिहासिक शहर असून महाराष्ट्राची उपराजधानी आहे, येथील दीक्षा भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ आक्टो १९५६ रोजी अशोकाविजया दशमीच्या दिनी, महास्थविर भन्ते चंद्रमणी यांचेकडून प्रथम स्वतः बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि नंतर आपल्या लाखो अनुयायांना दीक्षा दिली, येथील भव्य दीक्षाभूमी दर्सनीय आहे, नागपूर हे शहर दीक्षाभूमी म्हणून ओळखले जाते.

१४) राजगृह (मुंबई) :– *हे ठिकाण महाराष्ट्रातील मुंबई शहरात आहे. दादर पूर्व रेल्वे स्टेशनपासून १ किमी अंतरावर हिंदू कॉलनीमध्ये आहे. राजगृहात बाबासाहेबांचे भव्य ग्रंथालय आहे. येथेच माता रमाई यांचे दि. २७/०५/१९३५ तसेच भय्यासाहेबांचे १९/०९/१९७७ रोजी याच राजगृहात दुःखद निधन झाले. सध्या या राजगृहात बाबासाहेबांचे वंशज राहत आहेत.

१५) आंबेडकर भवन :– हे ठिकाण महाराष्ट्रातील मुंबई शहरात आहे. दादर पूर्व रेल्वे स्टेशनपासून अर्ध्या किमी अंतरावर आहे. बाबासाहेबांनी स्वतःच्या पैशांनी गोकुळदास पास्ता रोडवर जमीन विकत घेतली, तेथे भारत भूषण प्रिंटींग प्रेस सुरु केली. बाजूला त्यांनीच स्थापन केलेल्या शेड्युल्ड कास्ट इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या माध्यमातून भव्य इमारत बांधण्यात आली. त्या इमारतीला डॉ. आंबेडकर भवन असे म्हणतात. बाबासाहेबांच्या अनेक बैठका इथे झाल्या. भय्यासाहेबांनी याच प्रेसमधून बाबासाहेबांचे अनेक ग्रंथ प्रकाशित केले. बाबासाहेबांनीच या प्रेसचे नामांतर “बुद्ध भूषण प्रिंटींग प्रेस” असे केले. याच प्रेसमधून जनता व प्रबुद्ध भारत या पाक्षिकांचे प्रकाशन होत असे. डॉ आंबेडकर भवनमध्येभारतीय बौद्ध महासभा, भारिप बहुजन महासंघ, रिपब्लिकन सेना व समतां सैनिक दलाचे कार्यालय असून इथे सतत धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय चळवळीचे कार्यक्रम राबविले जातात. डॉ आंबडेकर भवन हे आंबेडकरी चळवळीचे केंद्र आहे म्हणून देशातला आंबेडकरी चळवळीचा प्रत्येक कार्यकर्ता येथे आवर्जून भेट देतो.

१६) सिद्धार्थ कॉलेज :– हे ठिकाण मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपासून अर्धा किमी अंतरावर, हुतात्मा चौकात, फोर्ट येथे आहे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना बाबासाहेबांनी केली. या शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांनी फोर्ट भागातील आंनद भवन हि इमारत विकत घेतली त्या इमारतीत कला, वाणिज्य, विज्ञान, कायदा इत्यादी विविध अभ्यास क्रमांसाठी सिद्धार्थ कॉलेज सुरु केले. पाठीमागे दुसरी इमारत घेऊन तिचे नाव बुद्धभवन ठेवले. वडाळ्याला विस्तीर्ण जागा घेऊन भव्य असे डॉ आंबडेकर कॉलेज काढले. तिथे विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह काढले. हि सर्व कॉलेजेस आजही विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कुशल कर्म करीत आहेत.

१७) नालासोपारा :– हे ठिकाण महाराष्ट्रतील ठाणे जिल्ह्यात येते. या ठिकाणी जाण्यासाठी चर्चगेट ते विरार लोकल ट्रेनने जावे लागते. विरारच्या आधीचे स्टेशन नालासोपारा आहे. येथील प्राचीन बुद्ध विहार, भग्न अवस्थेत आहे. भगवान बुद्धांच्या काळात या नगरीला सुप्पारक नगरी असे म्हणत असत. हि नगरी बुद्धकालीन जंबूद्विपातील भव्य व्यापारी बंदर होते.

१८) कान्हेरी गुंफा :– हे ठिकाण महाराष्ट्रातील मुंबई शहरात आहे. येथे जाण्यासाठी पश्चिम रेल्वेच्या चर्चगेट ते विरार किंवा बोरीवली लोकलने बोरिवलीला उतरावे लागते. तेथे ९ किमी अंतरावर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान जवळ कान्हेरी गुंफा आहेत. त्या फार प्राचीन काळाच्या बौद्ध गुंफा, स्तूप असून सध्या ते शिल्प, मुर्त्या, लेणी झिजण्यात येत आहेत. हि ऐतिहासिक वास्तुशिल्पांचे जतन करण्यासाठी सर्व बौद्धांनी वेळोवेळी पर्यटन काढून येथे भेट दिली पाहिजे.

१९) चवदार तळे–महाड :– हे ठिकाण महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात आहे. मुंबई पासून हे ठिकाण १५० किमी अंतरावा आहे. या ठिकाणी चवदार तळे आहे. भव्य क्रांतीस्तंभ उभारलेला आहे. येथे शासनाने भव्य असे ‘आंबडेकर भवन’ निर्माण केले आहे. येथे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दि, २० मार्च १९२७ रोजी येथील चवदार ताळ्यावर सत्याग्रह केला, तेंव्हापासून या ठिकाणाला ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेले आहे, याच ठिकाणी बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन केले.

२०) नाशिक :– *येथे सातवाहन राजाच्या काळातील त्रिरेशमी बुद्धलेणी प्रसिद्ध आहेत, या शिवाय जिल्ह्यातील त्रिंगलवाडी येथेही बुद्धलेणी आहेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथे १९३० साली काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह केलेला आहे.

२१) पुणे :– *या जिल्ह्यातील देहूरोड या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. २५ डिसेंबर १९५४ रोजी भारतात पहिल्या बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना केली व महाबोधी विहाराचे उदघाटन करून त्यांनी येथूनच धम्मक्रांतीला सुरवात केली, पुणे शहरात सिम्बॉयसिस महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक असून येथे डॉ.माईसाहेब आंबेडकरांनी त्यांच्या दैनंदिन वापरातील बऱ्याचशा चिजवस्तूंचे जतन करून ठेवले आहे, हा अनमोल ठेवा सर्वाना बघण्यासाठी प्रदर्शित करून ठेवण्यात आलेला आहे, तळेगाव दाभाडे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवास्थान (बंगला) आहे.

२२) भिमा–कोरेगांव :– *हे ठिकाण महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात आहे. पुणे येथे पेशव्यांच्या सैन्याला नमवून विजयश्री प्राप्त करणाऱ्या १११ च्या *महार बटालियन* मधील शूर वीरांच्या स्मरणार्थ येथे भव्य क्रांतिस्तंभ उभारण्यात आलेला आहे, युगप्रवर्तक डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिवर्षी १ जानेवारी रोजी या

विजयी क्रांतिस्तंभाला मांवनदना देण्यासाठी येथे येत असत, आणि चिंतन करून प्रेरणा घेत असत, म्हणूनच या ठिकाणी दरवर्षी १ जानेवारीस भिमा-कोरेगाव येथील क्रांतिस्तंभास मानवंदना देण्यासाठी धम्मबांधव मोठ्या संख्येने येत असतात.

२३) येवला :– *येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी धर्मांतराची घोषणा केली, तेंव्हापासून हे ठिकाण मुक्तीभूमी म्हणून ओळखले जाते. हे ठिकाण महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यात आहे मुक्तीभूमी हे स्थळ येवला स्टेशनपासून अर्धा किमी अंतरावर आहे. तसेच हे ठिकाण नाशिक रोड स्टेशनपासून २७ किमी अंतरावर आहे. येथे भव्य क्रांतीस्तंभ उभारला असून दरवर्षी १३ ऑक्टोबरला भीम अनुयायी मानवंदना देण्यासाठी येत असतात.

२४) सेवाग्राम :– *वर्धा जिल्ह्यातील या ठिकाणी विश्वशांती स्तूप आहे.

२५) तक्षशीला :– *प्राचीन भारतातील एक प्रसिद्ध विद्यापीठ. तक्षशिला ही नगरी प्राचीन गांधार देशाची राजधानी होती. पूर्वी भारतात असलेले हे ठिकाण सध्या पाकिस्तानात रावळपिंडीपासून वायव्येस सु. ३५ किमी. अंतरावर आधुनिक सराईकल या रेल्वे स्थानकाजवळ आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाचे प्रमुख संचालक सर जॉन मार्शल यांनी या भागात उत्खनन केले, परंतु प्राचीन विद्यापीठाचे असे फारसे अवशेष तेथे सापडले नाहीत. तक्षशिला नगरी व विद्यापीठ यांचे उल्लेख रामायण, महाभारत आणि जातकांत आढळतात. काही ग्रीक व चिनी परदेशी प्रवाशांनीही आपल्या प्रवासवृत्तांतात या विद्यापीठाचा उल्लेख केला आहे. कैकेयीपुत्र भरताने तक्षशिला नगर वसविले व त्याला तक्ष या आपल्या मुलाचे नाव दिले, असे मानले जाते. इ. स. पू. आठव्या शतकापासून इ. स. चौथ्या शतकापर्यंत सु. १,२०० वर्षे हे विद्यापीठ अस्तित्वात होते. या कालखंडात त्या प्रदेशावर ग्रीक, इराणी, मौर्य, इंडो–बॅक्ट्रियन, सिथियन, कुशाण वगैरे अनेक राज्यकर्त्यांच्या राजकारणाचा, संस्कृतींचा आणि भाषांचा प्रभाव पडला व त्याचा परिणाम विद्यापीठातील भाषा आणि अभ्यासक्रम यांवरही झाला. इ. स. पाचव्या शतकात हूणांनी तक्षशिलेचा पूर्ण विध्वंस केला व तेव्हापासून हे विद्यापीठ बंद पडले. तक्षशिला विद्यापीठाची रचना ही आधुनिक विद्यापीठांप्रमाणे नव्हती. तेथे अनेक विद्यार्थी उच्च अध्ययनाकरिता भारतातील कोनाकोपऱ्यांतून व आशिया–यूरोपमधील देशांतूनही येत. प्रत्येक शिक्षक म्हणजे एक स्वतंत्र संस्थाच असे. त्याला त्याचे प्रौढ विद्यार्थी मदत करीत. एका शिक्षकाच्या हाताखाली सु. ५०० विद्यार्थी असत, असा उल्लेख जातकांत आहे. विद्यार्थ्यांच्या भोजन–निवासाची सोय विद्यापीठाच्या वसतिगृहात असे. सधन वर्गातील विद्यार्थी संपूर्ण शिक्षणाकरिता सामान्यतः एक हजार सुवर्णनाणी शुल्क म्हणून देत. निर्धन विद्यार्थी गुरूगृही राहून नेमलेली कामे दिवसा करीत आणि रात्री अध्ययन करीत. काही विद्यार्थी अध्ययन पूर्ण झाल्यानंतर पैसे मिळवून गुरुदक्षिणा देत. प्रवेशपरीक्षेनंतर १६–१७ वर्षे वयाचे विद्यार्थी घेतले जात. शिक्षणाचा कालावधी सामान्यपणे ७–८ वर्षांचा असे. इ. स. पू. सहाव्या शतकात या ठिकाणी बनारस, राजगृह, मिथीला, उज्जयिनी इ. नगरांतून व कुरू, कोसल इ. राज्यांतून विद्यार्थी येत. कोसलचा प्रसेनजीत राजा व जीवक राजपुत्र (बिंबीसारचा अनौरस पुत्र) यांनी येथेच शिक्षण घेतले. पाणिनी व कौटिल्य यांनीही येथेच विद्यार्जन केले, असे मानले जाते. अध्यापकांच्या श्रेणीत धौम्य ऋषी, आयुर्वेदाचार्य जीवक इत्यादींचे उल्लेख येतात. तक्षशिलेत फक्त उच्च शिक्षणाची व्यवस्था होती. सखोल अभ्यासावर भर दिला जाई. वैद्यक, धनुर्विद्या, वेदत्रयी, व्याकरण, तत्त्वज्ञान, वास्तुशास्त्र इ. प्रमुख विषय शिकविले जात. याशिवाय शल्यक्रिया, युद्धतंत्र, ज्योतिष, कृषिविज्ञान, फलज्योतिष, वाणिज्य, सांख्यिकी, विज्ञान, लेखाशास्त्र, संगीत, नृत्य, चित्रकला असे विषयही शिकविले जात. विद्यापीठात विद्यार्थ्यांना धर्मजातिकुलनिरपेक्ष प्रवेश असे. हजार–बाराशे वर्षांच्या कालखंडात ज्या ज्या राजवटींनी तक्षशिलेवर आधिराज्य केले, त्यांचा तेथील अभ्यासक्रमावर व भाषेवरही कमीअधिक परिणाम झाला. इराणी व ग्रीक संस्कृतींचे अनेक इतर विषय व संकल्पना शिक्षणक्रमात समाविष्ट झाल्या. ब्राम्ही लिपीऐवजी खरोष्ठी लिपीचा वापर अधिक होऊ लागला. ग्रीक तत्त्वज्ञान व भाषा याचाही अभ्यासक्रमात समावेश झाला असावा, असे अपोलोनिअसच्या वृत्तांतावरून दिसते. हजार–बाराशे वर्षे अव्याहत शिक्षणकार्य करीत असलेले हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे एकमेव प्राचीन विद्यापीठ होते. तथापि इ. स. पाचव्या शतकात भारतात आलेला चिनी प्रवासी फाहियान याला तेथे शैक्षणिक दृष्ट्या काहीच महत्त्वाचे दिसले नाही, असे त्याच्या प्रवासवृत्तांतावरून दिसते.

२६) वलभी विद्यापीठ :– गुजरात राज्याच्या भावनगर जिल्ह्यातील वलभी येथील एक प्राचीन विद्यापीठ. हे विद्यापीठ इ. स. सातव्या शतकात स्थापन झाले. विद्यापीठाची स्थापना व संवर्धन यांचे श्रेय मैत्रक राजांना (४६५–७७५) दिले जाते. ‘विद्येचे माहेरघर व आंतरराष्ट्रीय व्यापारबंदर’ असा वलभीचा नावलौकिक असल्याचा उल्लेख काश्मीरी पंडित सोमदेव याच्या कथासरित्सागरात व मैत्रककालीन ताम्रपटांत आढळतो. वलभी विद्यापीठात बौद्ध, जैन इ. धर्मांचे अध्यापन होत असे. पूर्व भारतातील नालंदा विद्यापीठाशी याचे साम्य असून त्या काळी त्याची कीर्ती दूरवर पसरली होती. जैन व बौद्ध आचार्यांनी येथे धर्मप्रसारार्थ विहार बांधले. त्या काळी जैन धर्मग्रंथ लिपिबद्ध नव्हते. जैन आचार्यांनी धर्मप्रसारार्थ त्यांचे सिद्धांत लिपिबद्ध केले. वलमी येथील जैन धर्मपरिषदेत (सु. ४५४) त्यांस मान्यताही लाभली (सु. ८४ ग्रंथ). ग्रामीण उत्पन्नातून अर्थसाहाय्य व विद्यापीठास लाभलेला राजाश्रय यांमुळे जैन धर्माचे शिक्षण उपलब्ध होऊ लागले. वलभी विद्यापीठात पाठनिर्देश व व्यावसायिक शिक्षण ह्यांना अध्यापन पद्धतीत विशेष महत्त्व होते. यांपैकी पहिल्याचा प्राथमिक शिक्षणासाठी, तर दुसऱ्याचा उच्च शिक्षणासाठी उपयोग केला जाई. विविध विषयांचे प्रात्यक्षिकही करून दाखविण्यात येत असे. कला, अध्यात्मविद्या, तर्कशास्त्र, वैद्यक इ. विषयांना अध्यापनात स्थान असे. धर्मशास्त्राव्यतिरिक्त वेदांगे, इतिहास, तत्त्वज्ञान, ज्योतिर्विद्या, भूगोल, अंकगणित, धातुविज्ञान, नीतिशास्त्र, व्रत, चिकित्साशास्त्र इत्यादींचे अध्यापन केले जाई. प्राकृत व संस्कृत हे अध्यापनाचे माध्यम असे. हे शिक्षण मोफत दिले जाई. ह्यूएन्त्संग ह्या चिनी प्रवाशाने आपल्या प्रवासवृत्तात

नमूद केल्यानुसार वलभी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या १०० बौद्ध धर्मीय विहारांत सु. ६,००० अनुयायी अध्ययन करीत होते. येथील कलासंस्था व विहारस्थाने ही अध्यापनाची प्रसिद्ध केंद्रे होती. कलासंस्थांत प्रा थमिक, माध्यमिक शिक्षणासोबत उपयुक्त कला, सैनिक प्रशिक्षण बौद्धिक व शास्त्रीय अध्यापन केले जात असे. विहारांत विद्वान भिक्षू निवास करून ज्ञानदान करीत. नालंदा विद्यापीठात अध्ययन केलेले स्थिरमती व गुणमती हे वसुबंधूचे शिष्य तसेच मयूरशर्मा (३४०–७०) हा कदंब घराण्याचा संस्थापक येथे अध्यापनार्थ येऊन त्यांनी विहारांत निवास केल्याचा उल्लेख आहे. विहारांत श्रीमंत वा गरीब अशी तफावत केली जात नसे. समान संधीचा सर्वांना लाभ होई. विहारांतील विद्यार्थ्यांची साधी राहणी व उच्च विचारसरणी असून शांतता, शिस्त इ. सर्वसाधारण आचारनियम त्यांना पाळावे लागत. ग्रंथालयाचीही विहारांत सोय होती. ग्रंथखरेदी पहिला गुहसेन ह्या राजाने दिलेल्या अनुदानाच्या रकमेतून केली जाई. विहारांत अध्ययन पूर्ण केल्यावर विद्यार्थी राज दरबारी वर्णी लावून धर्मसिद्धांत, तत्वज्ञान यांवरील चर्चेद्वारे आपली योग्यता सिद्ध करीत व नंतर राजदरबारातील अधिकाऱ्याच्या नोकरीसाठी प्रयत्न करीत, असे इत्सिंग ह्या चिनी प्रवाशाने आपल्या प्रवासवृत्तात नमूद केलेले आढळते.

२७) विक्रमशिला विद्यापीठ :– बिहार राज्यातील एक प्राचीन बौद्ध विद्यापीठ. तिबेटी परंपरेनुसार मगधचा पालवंशी राजा धर्मपाल (कार. ७८०–८१५) याचा बौद्ध धर्माला राजाश्रय होता आणि त्याने विक्रमशिला विहाराची स्थापना केली. या विहाराला विक्रम नावाच्या यक्षाचे नाव देण्यात आले. या विहाराची पुढे प्रसिद्धी ‘विक्रमशिला विद्यापीठा’त परिणती झाली. धर्मपालाचे दुसरे नाव विक्रमशील असल्यामुळे या विद्यापीठाचे नाव विक्रमशीला ठेवण्यात आले. या विद्यापीठाच्या निश्चित स्थानाविषयी विद्वानांत मतभेद संभवतात. तथापि ते प्राचीन मगध देशात गंगेच्या काठी एका टेकडीवर, प्रामुख्याने भालपुरजवळ, पाथरघाट टेकडीवर, वसले होते, असे आता निश्चित झाले आहे. फणींद्रणाथ बोस यांच्या मते ते भागलपूर परगाण्यात एका टेकडीवर असावे. नंदलाल डे आणि प्राच्याविद्यापंडित अ. स. अळतेकर, अंग राज्याची राजधानी असलेल्या चंपनगराच्या पूर्वेला ३८ किमी. दूर असलेले पाथरघाटनामक स्थान म्हणजेच विक्रमशिला असावे, या मताचे आहेत. या ठिकाणाला १८९१ साली बुचानन याने प्रथम भेट दिली. सतीशचंद्र विद्याभूषण यांनी मात्र सुलतानगंज (मागलपूर जिल्हा) हे स्थान म्हणजेच विक्रमशीला हे निश्चित केले आहे. पाटणा विद्यापीठाच्या प्राचीन इतिहास व संस्कृती या विभागाने १९६० ते ६९ मध्ये बिहारमधील भागलपूर जिल्ह्यातील अँटिकच येथे उत्खनन केले. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्यानेही १९७२–७३ पासून येथे मोठ्या प्रमाणावर उत्खनन करून विक्रमशीला विद्यापीठाचे अवशेष शोधून काढले. तेथील भव्य मठ, पाषाणाच्या बुद्धप्रतिमा, मोहोरा, स्तूप आणि भव्य जलाशये त्या काळाची ग्वाही देतात. धर्मपाल राजाने महाविहार बांधून बौद्ध धर्माच्या ४ प्रमुख पंथांचे प्रत्येकी २७ असे एकशेआठ अध्यापक चार विभागांत नेमले आणि महाविहारास देणग्या दिल्या. नंतरच्या पाल राजांनीही विद्यापीठास उदारपणाने आर्थिक साहाय्य केले. इतर धनिकांनीही त्यास देणग्या दिल्या. महाविहारासभोवती तटबंदी असून चार दिशांना महाद्वारे होती. प्रत्येक प्रवेशद्वारावर एक प्रवेशपरिक्षागृह होते. राजा देवपाल याने (कार. ८१५–८५५) आणखी दोन प्रवेशपरिक्षागृहे बांधली. या प्रत्येक द्वारावर विद्वान पंडिताची नेमणूक केलेली होती. रत्नाकरशांती, वागीश्वरकीर्ती, भट्टारक नरोत्पल, प्रज्ञाकरमती, रत्नवज्र, ज्ञानश्रीमित्र हे यांपैकी काही विद्वान पंडित होते. हे सहा विहारांचे प्रमुख आचार्य होते. या आचार्यांपैकी काही विख्यात नैयायिक होते. विहाराच्या मध्यभागी महाबोधीची कलाकृती असलेले देवालय व अन्य १०८ देवालये होती. केंद्रस्थानी असलेल्या विहारास ‘विज्ञानगृह’ म्हणत. यांशिवाय येथे एक विशाल सभाभवन होते. त्यात एका वेळी आठ हजार व्यक्तींची बसण्याची सोय होती. प्रवेशद्वारात उजव्या बाजूस नालंदा विद्यापीठाचे प्रमुख आचार्य नागार्जुनाचे चित्र होते, तर डाव्या बाजूस याच विद्यापीठाचे प्रमुख ⇨अतीश दीपंकराचे चित्र होते. विद्यापीठाचे मुख्य प्रवेशद्वार बंद झाल्यावर येणाऱ्यांसाठी या प्रवेशद्वाराबाहेर एक धर्मशाळा होती. विद्यार्थ्यांची येथे विनामुल्य निवासभोजनाची व्यवस्था असे. विद्यापीठात परदेशांतून तसेच भारतातील विविध भागांतून अध्ययनासाठी विद्यार्थी येत. द्वारस्थ आचार्यांकडून परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतरच त्यांना प्रवेश मिळे. तिबेटी भिक्षू येथे अध्ययन करून संस्कृत ग्रंथांचा तिबेटी भाषेत अनुवाद करीत. विद्यापीठीय परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांस पंडीत, महापंडित इ. पदव्या राजदरबारात देण्यात येत व अशा पंडितांना 'राजपंडित' हे बिरूद मिळे. अशा प्रख्यात राजपंडितांमध्ये आचार्य रत्नकीर्ती, जेतारी, ज्ञानश्रीमित्र, अतीश दीपंकर, रत्नवज्र, वागीश्वरकीर्ती इत्यादींचा अंतर्भाव होता. येथील ग्रंथालय समृद्ध होते. बौद्ध धर्मातील विविध संप्रदाय, वेद, अध्यात्मविद्या, व्याकरण, न्यायशास्त्र इ. विषयांचे येथे अध्यापन होई. तंत्रमार्गाच्या अध्यापनावर, विशेषतः वज्रयान व सहजयान यांवर, येथे विशेषभर होता. कारण इ. स. दहाव्या-अकराव्या शतकांत तंत्रमार्ग आणि तांत्रिक साधना हे बौद्ध धर्माचे प्रमुख अंग बनले होते. शिवाय न्यायशास्त्रातही ते प्रावीण होते. विद्यापीठाचे प्रशासन महाधिपतींकडे असून त्यांच्या मदतीला सहा आचार्यांचे मंडळ असे. काही काळ नालंदा विद्यापीठाचा कारभारही या मंडळाच्या नियंत्रणाखाली होता. तेथील प्रशासन उत्कृष्ट होते. ह्यूएनत्संग (सु. ६०२–६६४) व इत्सिंग (सू. ६३४–७१३) ह्या चिनी प्रवाशांच्या वृत्तांतून या विद्यापीठाचे कार्य व प्रगती यांबाबत माहिती मिळते. खल्जी घराण्यातील महम्मद बिन बख्तियार याने बाराव्या शतकाच्या अखेरीस बिहारवर स्वाऱ्या केल्या, पाल राजा गोविंद याचा पराभव करून त्याची राजधानी ओदंतपुरी ही जिंकून घेतली. विक्रमशिला विहाराभोवतालच्या भिंती बख्तियारला किल्ल्याचा तट वाटल्यामुळे त्यांवर हल्ला करून त्याने संपूर्ण ग्रंथालय जाळले व तेथील ब्राह्मणांना व भिक्षूंना कंठस्नान घातले (११९२). तसेच त्याने विक्रमशिला आणि नालंदा या विद्यापीठांचा विध्वंस केला.

२८) रत्नागिरी :– *या जिल्ह्यातील तालुका मंडणगड मध्ये आलेले *"आंबवडे"* गाव हे मंडणगडपासून १८ किमी अंतरावर आहे. डॉ. बाबासाहेबांचे मूळ गाव आहे. रामजी मालोजी सकपाळ यांच्या या मुळगावी त्यांच्या अस्थीवर स्मारक बांधण्यात आले आहे. बाबांसाहेबांचे मुळगाव “स्फुर्तीभूमी" म्हणून सर्वजण ओळखतात.

२९) वणंद :– हे ठिकाण महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यात असून दापोली तालुक्यात आहे. दापोली पासून ६ किमी अंतरावर आहे. या गावी भिकू धोत्रे आणि रुक्मिणीबाई धोत्रे या उभयंताच्या पोटी माता रमाईचा जन्म झाला. *"वनंद"* येथे त्यागमुर्ती–रमाई यांचे भव्य स्मारक बांधण्यात आले आहे. ज्या बंदरावर रमाईचे आई–वडील तिच्या बालपणी काम करीत असत ते हरणे बंदर वणंद गावापासून ८ किमी अंतरावर आहे.

३०) महू (इंदोर) :– *हे नाव इंग्रजी आद्याक्षरे MHOW यांच्यावरून पडले. या आद्याक्षरांचा फुल फॉर्म "मिलिटरी हेडक्वार्टर ऑफ वारीयर्स" म्हणजे युद्ध करणाऱ्या सैनिकांचे मुख्यालय' असा अर्थ आहे. हे महुगाव मध्यप्रदेशातील इंदौर पासून २० किमी अंतरावर आहे. डॉ बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांचे वडील रामजी मालोजी सकपाळ हे इंग्रजांच्या सैन्यामध्ये सुभेदार या पदावर होते. त्यांची कंपनी १८९१ साली महू येथील मिलिटरी छावणीमध्ये वास्तव्यास होती. याच ठिकाणी माता भिमाईच्या पोटी १४ एप्रिल १८९१ रोजी *विश्वपीता – डॉ.बाबासाहेब आंबेडकर* यांचा जन्म झाला, म्हणून हे स्थळ आपल्यासाठी अत्यंत महत्त्वपुर्ण व पवित्र आहे. या ठिकाणाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मभूमी असे जगभर म्हणतात. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक बांधण्यात आले आहे. १४ एप्रिल रोजी दरवर्षी लाखो भीम अनुयायी या ठिकाणी आदरांजली अर्पण करण्यासाठी येतात. म्हणून या शहराचे व महू रेल्वे स्टेशनचे नामकरण सरकारच्या वतीने "डॉ आंबेडकर नगर" करण्यात आले आहे हे ठिकाण गंभीरा नदीच्या तीरावर आहे.

३१) मारहुत :– *सतना जिल्ह्यातील हे एक ऐतिहासिक ठिकाण असून येथे प्राचीन बौद्ध विहारांचे अवशेष आहेत.

३२) सांची :– हे ठिकाण मध्यप्रदेशातील भोपाळपासून ६० किमी अंतरावर आहे. येथे सांची रेल्वे स्टेशन आहे. सांची हे ठिकाण जिल्हा विदिशा या शहरापासून २२ किमी अंतरावर आहे. येथील भव्य स्तूप व अशोकस्तंभ प्रसिद्ध दर्शनीय आहेत, बौद्ध कालीन स्थापत्य कलेचे अनेक नमुने येथे पहावयास मिळतात, येथील एका स्तूपाचा व्यास १०० फुटाचा असून त्याच्या चारही बाजूला चार भव्य कमानी आहेत, या कामानींवर भगवान बुद्धांच्या जीवनातील अनेक प्रसंग कोरून ठेवलेले आहेत, याशिवाय येथे संघसेनापती सारीपुत्र आणि महामोगल्लायन यांच्या अस्थींवर चैत्यस्तुप बांधलेले आहेत, तसेच येथे अनेक लहानमोठे स्तूप आहेत.

३३) आलवी गोम्पा :– *हे स्थळ लेह जिल्ह्यात असून सुंदर शिल्पकला आणि अनोखी शिल्पकला यासाठी विख्यात आहे, लेह येथे विश्वशांती स्तूप असून प्राचीन बुद्ध मठ आहे.

३४) कारगिल :– *येथे दगडी चट्टानावर निर्मित भगवान बुद्धाची विशाल मूर्ती आहे, तसेच लडाख येथे सर्वात मोठा प्राचीन मठ आहे. या राज्यात त्रिलोकनाथ हे बौद्ध स्थळ आहे, तसेच हे ठिकाण दलाईलामा यांचे मुख्यालय असून येथे अनेक धर्मशाळा आहेत, लालूद जिल्ह्यातील ताबो येथे स्पिती नदीकाठी *प्राचीन बौद्ध धम्म स्थळ* आहे, येथील भिंतीवर बुद्धांची अलंकृत असलेली रंगीत चित्रे आहेत, व ही चित्रे अजंठा येथील चित्रांशी मिळती जुळती आहेत.

३५) नागार्जुन :– *(कोंडा म्हणजे पहाड) गुंटूर जिल्ह्यातील हे ठिकाण हैद्राबाद पासून १६० कि, मि, अंतरावर आहे, मच्छेला रेल्वे स्टेशनवर उतरून येथे जाता येते, सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने आचार्य नागार्जुन यांच्यासाठी पहाडामध्ये लेणी कोरलेली आहे, या ठिकाणी एकूण ३० बौद्ध लेणी असून येथील महाचैत्य व प्राचीन वस्तूंचे संग्रहालय प्रसिद्ध आहे.

३६) हैद्राबाद :– हे शहर आंध्र प्रदेशची राजधानी असून येथील हुसनेसागर जलाशयात भगवान बुद्धांची विशाल मूर्ती बसविण्यात आली आहे.

३७) नालंदा :– हे स्थळ बिहार राज्यातील राजगिरपासून १६ किमी अंतरावर आहे. सध्या ते भग्न अवस्थे पहावयास मिळते. इसवी सन ४१५ ते ४५५ या काळातील राज कुमार गुप्त यांनी नालंदा विद्यापीठाची स्थापना केली होती. नालंदा विद्यापीठात ६ गगनचुंबी इमारती होत्या. या विश्वविद्यापिठाला सम्राट हर्षवर्धनाने अफाट असे धन दान केले होते. यामध्ये १५१० अध्यापक शिकवत होते आणि १०,००० विद्यार्थी शिकत होते. नालंदा जवळील बडगावमध्ये सारीपुत्राचा जन्म झाला होता. या विश्वविद्यापिठामध्ये २ लाख पुस्तके होती. या विद्यापीठात प्रमुख आचार्य शीलभद्र, शांतीशील, कमलशील, दीपंकर आणि श्रीज्ञान अशा महान विद्वान व्यक्ती विद्यार्थ्यांना शिकवत असत. या विश्वविद्यापिठातून पंडित कमलशील आणि पद्म संभवने यांनी महायान पंथांचे बौद्ध ज्ञान तिबेटपर्यंत पोहचविले. त्यामुळे तिबेटमध्ये बौद्ध धर्म हा राष्ट्रीय धर्म झाला आहे. हे विद्यापीठ बख्तियार खिलजीने जाळले. ते सतत ६ महिने जळत होते. जगातील प्राचीन अशा नालंदा बौद्ध विश्वविद्यापिठाची भग्न अवशेष बडगाव या गावाजवळ आहेत. तेथे उत्खनन सुरु आहे. सध्या नालंदा नावाचे गावं नाही, मात्र नालंदा म्हणून जिल्हा आहे. विदेशी प्रवाशांनी येथील वर्णने जगभर पसरवली आहेत.

३८) चिंचोली :– नागपूर पासून ११ किमी अंतरावर काटोल रोडवर चिंचोली येथे दोर बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य वस्तुसंग्रहालय आहे. त्याला शांतीवन असे म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू सहकारी वामनराव गोडबोले यांनी संग्रहित केलेल्या व जतन केलेल्या ऐतिहासिक अशा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेक अनमोल वस्तू या संग्रहालयात पहावयास मिळतात. अनेक टाय, शर्त कोट, टाईपरायटर, बेल्ट, काठी इत्यादी वस्तू येथे पहावयास

मिळतात. वकिलांचा "ब्यंड" गळ्यातील पांढरी टाय, असे अनेक प्रेरणादायी वस्तूंचे संग्रहालय बघून अनेक अनुयायी उर्जा घेऊन या शांतीवनातून मोठ्या संख्येने रोज जातात.

३९) अजिंठा–वेरूळ :– हे ठिकाण महाराष्ट्र राज्यातील ओरंगाबाद जिल्ह्यात आहे. अजिंठा हे ठिकाण ओरंगाबाद पासून १२५ किमी अंतरावर आहे आणि वेरूळ हे ठिकाण ओरंगाबाद पासून ३० किमी अंतरावर आहे. या दोन्ही ठिकाणी जगप्रसिद्ध बौद्ध लेण्या आणि गुंफा आहेत, याठिकाणी भगवान बुद्धांचे जीवन चरित्र अनेक रंगात आणि शिल्पात कोरलेले आहे. देशभरातील तसेच जगभरातील पर्यटक मोठ्या संख्येने ह्या प्राचीन शिल्पकलाद्वारे भगवान बुद्धांचे जीवन चरित्र डोळ्यात साठवून घेण्यासाठी आवर्जून येत असतात.

४०) ओरंगाबाद :– डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे ठिकाण महाराष्ट्र राज्यात असून औरंगाबाद रेल्वे स्टेशन पासून ५ किमी अंतरावर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण प्रसाराचा एक भाग म्हणून मराठवाड्यातील या औरंगाबाद शहरात विस्तीर्ण अशा नागसेन वनांत विविध विषयांसाठी अनेक भव्य इमारती बांधून मिलिंद कॉलेज पीपल्स एज्युकेशन सोसायटी च्या वतीने सुरु केले. या महाविद्यालयातून राजा मिलिंदासारखे बुद्धिमान विद्यार्थी व नागसेन भंतेजी सारखे विद्वान विद्यार्थी घडावेत, अशी बाबासाहेबांची संकल्पना होती. त्यानुसार इथून हजारो विद्यार्थी देशाच्या कानाकोपऱ्यातून येऊन शिक्षण घेऊन जगभर पोहचले आहेत. त्यांच्या महान ज्ञानदानाचे मोल जाऊन मराठवाडा विद्यापीठाचे दोर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर करण्यात आले आहे. येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज, टेक्निकल कॉलेज असे अनेक विषयांचे विविध कॉलेज आहेत. येथे भव्य बुद्धिस्ट सेंटर आहे.

४१) चैत्यभूमी :– हे ठिकाण महाराष्ट्रातील मुंबई शहरात आहे. दादर पश्चिम रेल्वे स्टेशनपासून २ किमी अंतरावर असून ते अरबी समुद्राच्या किनार्यावर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचं महापरिनिर्वाण दिल्ली येथे झाले त्यांचा अंतिम संस्कार या ठिकाणी करण्यात आला. त्यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी जमलेल्या लाखो लोकांना बौद्ध धम्माची दीक्षा देण्यात आली. त्याच जागेवर भव्य स्तुपाची निर्मिती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र भय्यासाहेब यांनी केली. या चैत्यस्तुपात बाबासाहेबांची पवित्र अस्थी ठेवण्यात आल्या आहेत.

४२) देहुरोड :– देहूरोड (किंवा देहू रोड) हे पुण्याच्या वायव्येला असलेले पुणे स्टेशनपासून २७ किलोमीटर अंतरावरील लष्कराचे ठाणे आहे. या ठिकाणी २५ डिसेंबर इ. स. १९५४ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर करण्यापूर्वी पहिली बौद्ध मूर्ती वसवली. म्हणून या ठिकाणाची ओळख धम्मभूमी म्हणून आहे.

४३) बेडसे लेणी :– ह्या महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील बेडसे गावातील आहेत. पुणे-मुंबई महामार्गावरील कामशेतहून पवना धरणाकडे जातांना हे गाव लागते. भारत सरकारने या लेणीला दिनांक २६ मे, इ. स. १९०९ रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. सुमारे १५० मीटर लांबीच्या दगडात लेण्यांचा गट खोदला गेला आहे. येथे एक चैत्यगृह काही विहार, खोदीव स्तूप, आणि पाण्याची कुंडे आहेत. हे आद्य कोरीव काम इसवीसन पूर्व पहिल्या शतकातील आहे असे मानले जाते. या लेण्यांना मारकूड असे नाव प्राचीनकाळी होते असे येथील शिलालेखात कोरलेले दिसते.

ॐ मणि पद्मे हूँ

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 *गौतम बुद्धांच्या १० हस्त मुद्रांचा अर्थ समजून घ्या.* 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

'बुद्ध'... हे काही नाव नाही...ती तर ज्ञानाची उपाधी आहे... 'बुद्ध' या शब्दाचा अर्थ आहे 'आकाशाएवढा प्रचंड ज्ञानी' आणि ही उपाधी गौतम बुद्धांनी स्वप्रयत्नांनी मिळवली आहे. बौद्ध अनुयायी लोक शाक्यमूनी गौतम बुद्धांना वर्तमानातील सर्वश्रेष्ठ बुद्ध म्हणजेच 'संमासंबुद्ध' मानतात.

जगाच्या इतिहासातील महामानवांमध्ये तथागत बुद्ध हे सर्वश्रेष्ठ मानले जातात.

बुद्धांचे विविध मुद्रा, हस्त संकेत यासर्वांतून गौतम बुद्धांनी जीवनातील विविध घटकांना दर्शविले आहे...

१. धर्मचक्र मुद्रा :

या मुद्रेला “धर्म चक्र ज्ञान” म्हणजेच TEACHING OF THE WHEEL OF THE DHARMA याचे संकेत देणारे चिन्ह म्हणूनही ओळखले जाते. हे बुद्धांच्या जीवनातील सर्वात महत्वाच्या क्षणांपैकी एक आहे. त्यांनी या मुद्रेचे प्रदर्शन सर्वप्रथम ज्ञानप्राप्तीनंतर सारनाथ येथील त्यांच्या पहिल्या धर्मोपदेशात केले होते. या मुद्रेत दोन्ही हातांना छातीसमोर ठेवून डाव हाताचा पृष्ठभाग आतल्या बाजूने तर उजवा हाताचा पृष्ठभाग बाहेरील बाजूने ठेवण्यात येतो.

२. ध्यान मुद्रा :

या मुद्रेला समाधी किंवा योग्य मुद्रा म्हणून ओळखले जाते. ही मुद्रा “बुद्ध शाक्यमुनी”, “ज्ञानी बुद्ध अमिताभ” आणि “चिकित्सक बुद्ध” इत्यादी बौद्धांच्या गुणधर्मांना दर्शवते. या मुद्रेत उजवा हात डाव्या हातावर पूर्णपणे बोट उघडून मांडीवर ठेवण्यात येतो.

३. भूमिस्पर्श मुद्रा :

या मुद्रेला पृथ्वीला स्पर्श करणे (TOUCHING THE EARTH) असे देखील म्हणतात. जी बुद्धांची ज्ञान प्राप्तीला दर्शवते, कारण बुद्ध म्हणायचे की पृथ्वी त्यांच्या ज्ञानाची साक्षी आहे. या मुद्रेत उजवा हात उजव्या गुडघ्यावर ठेवून तळहात आतल्या बाजूला ठेऊन त्याला जमिनीच्या दिशेने नेण्यात येते.

४. वरद मुद्रा :

ही मुद्रा अर्पण, स्वागत, दान, दया आणि प्रामाणिकपणा यांना दर्शवते. या मुद्रेत डावा हात पूर्णपणे उघडून तळहात बाहेरील बाजूने असतो तर उजवा हात हा शरीरासोबत नैसर्गिकरित्या ठेवण्यात येतो.

५. करण मुद्रा :

ही मुद्रा वाईटापासून वाचविण्याचे सूचित करते. या मुद्रेत तर्जनी आणि करंगळीला वर उचलून इतर बोटांना मोडले जाते. ही कर्त्याला स्वास सोडून रोग अथवा नकारात्मक विचारांमधून बाहेर निघण्यास मदत करते.

६. वज्र मुद्रा :

ही मुद्रा पंचतत्त्व म्हणजेच वायू, जल, अग्नी, पृथ्वी आणि धातू यांना दर्शवते. या मुद्रेत उजव्या हाताची मुठी करून त्यात डाव्या हाताच्या तर्जनीला वरील दिशेने अश्या प्रकारे ठेवले जाते की उजव्या हाताची तर्जनी तिला स्पर्श करू शकेल.

७. वितर्क मुद्रा :

ही मुद्रा बुद्धांच्या शिक्षेचा प्रचार आणि परिचर्चेच प्रतीक आहे. या मुद्रेत अंगठा आणि तर्जनीच्या वरील भागाला जोडले जाते आणि इतर बोटांना सरळ ठेवले जाते.

८. अभय मुद्रा :

ही मुद्रा निर्भयता अथवा आशीर्वादाचे प्रतीक आहे, जी सुरक्षा, शांती, परोपकार आणि भय दूर करणे यांचं प्रतिनिधित्व करते. या मुद्रेत उजव्या हाताला खांद्यापर्यंत उचलून, बाहुला दुमडून हाताच्या बोटांना वर उचलले जाते.

९. उत्तरबोधी मुद्रा :

ही मुद्रा दिव्य सार्वभौमिक ऊर्जेसोबत स्वतःला जोडून सर्वोच्च आत्मज्ञानची प्राप्ती दर्शवते. या मुद्रेत दोन्ही हात हृदयाजवळ ठेवून दोन्ही हातांच्या तर्जनी एकमेकांना स्पर्श करत वरच्या दिशेने असतात तर इतर बोट ही आतल्या बाजूने मोडलेली असतात.

१०. अंजली मुद्रा :

याला “नमस्कार मुद्रा” किंवा ” हृदयांजली मुद्रा” देखील म्हणतात. जी अभिवादन, प्रार्थना आणि आराधना दर्शवते. या मुद्रेत दोन्ही हात हे पोटाच्या वर मोडलेल्या स्थितीत असतात, हातांचे तळहात हे एकमेकांना जोडलेले असून दोन्ही हातांची बोटे एकमेकांना स्पर्श करत असतात.

ॐ मणि पद्मे हूँ

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 माराच्या दहा सेना 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

ज्याप्रमाणे चांगल्या कामात सहाय्यक होण्याकरिता देवी–देवतांची कल्पना केली आहे, तशीच चांगल्या कामात विघ्न टाकणारा म्हणजे मार अशी कल्पना केली आहे. अर्थात मार म्हणजे मनुष्याच्या मनातील कलुषित विचारांची साकार मूर्ती होय. मार मनाची दुर्बलता, मनातील वाईट प्रवृत्ती ह्यांचेच दुसरे नाव होय. वास्तविक पाहता 'प्रेय' कि 'श्रेय', हा कलह सनातन आहे. एक मत असे कि, जे 'प्रेय (प्रिय)' आहे. इंद्रियांना जे प्रिय व चांगले वाटते, तेच 'श्रेय (कल्याणकारी)' आहे. दुसरे मत असे कि, सामाजिक दृष्टीने जे खरोखरच कल्याणकारी आहे, तेच आम्हाला प्रिय वाटायला पाहिजे.

"पधानसुत्त" माराच्या दहा सेनांचे वर्णन करते, ज्या बाधक आहेत, ध्यान साधनेत ध्यान लागू देत नाही.

१) माराची पहिली सेना : इंद्रियजन्य सुखाचा अनुभव घेण्याची आसक्ती.

२) माराची दुसरी सेना : एखाद्या शांत वातावरणात वनातील एकांत जागी समाधानाने राहण्याविषयी इच्छा नसणे.

३) माराची तिसरी सेना : .भूक

४) माराची चौथी सेना : विविध प्रकारच्या भोजनाची इच्छा.

५) माराची पाचवी सेना : स्त्यान व मुद्ध आहे (थिन आणि मिद्ध).

६) माराची सहावी सेना : एकटे न राहण्याची इच्छा आणि एकांतवासाची भीती वाटणे.

७) माराची सातवी सेना : विचिकित्सा आहे, संदेह आहे. जसे एखाद्याला या गोष्टीची शंका आहे कि, तो ध्यान भावनेमध्ये यशस्वी होईल अथवा नाही.

८) माराची आठवी सेना : जेव्हा ध्यान भावना सफल होऊ लागते तेव्हा व्यक्तीला गर्व येतो, त्यामध्ये उद्धटपण आणि आखडलेला येतो.

९) माराची नववी सेना : हे आचार्याविषयी आहे, असे आचार्य ज्यांना खूप लाभ–सत्कार मिळत आहे.

१०) माराची दहावी सेना : कोणा धर्माचे, खोट्या धर्माचे अनुसरण करणे, एका नव्या अजून विशेष धर्माला स्थापित करणे, यासाठी करणे कि, खूप दान – दक्षिणा मिळेल, एकाची प्रशंसा आणि दुसर्यांची निंदा करणे.

१) माराची पहिली सेना – इंद्रियजन्य सुखाचा अनुभव घेण्याची आसक्ती.

काही जन विपश्यना शिबिरात ध्यान साधना करण्यासाठी येतात परंतु निर्वाण प्राप्तीसाठी अजिबात येत नाहीत. ते अशा काही गुप्त हेतूंनी येतात कि जसे, "जर मी गुरुजींच्या, जवळचा झालो तर गुरुजींच्या ओळखीने, एखादवेळी मला नोकरीत बढती मिळेल, जे अंतकरणात लोभ घेऊन येतात ते आपल्या ध्यान साधनेत यशस्वी होणे शक्य नाही. लोभ मुळीच असता कामा नये. जेव्हा आपण विपश्यना विधी शिकण्यासाठी पार्थना केली तेव्हा आपण म्हणतो कि, "निर्वाणाचा साक्षात्कार करण्यासाठी मला विपश्यना विधी शिकवा. गुरुजी/आचार्य तुम्हाला चार आर्यसत्ये समजून घेण्यास शिकवतील, पण जर त्यात आपल्याला रस नसेल आणि त्यासाठी आपण पाहिजे तेवढा वेळ लावायचे ठरवीत असाल तर त्याला गुरुजी किंवा आचार्य काय करू शकतात?

२) माराची दुसरी सेना – एखाद्या शांत वातावरणात वनातील एकांत जागी समाधानाने राहण्याविषयी इच्छा नसणे.

जेव्हा एखाद्या शांत, एकांत स्थानी राहण्याविषयी अनिच्छा उद्भवते त्या माणसाला सोडून पळून जावेसे वाटते. कधी तो स्वतःहून जाऊ इच्छितो असे तो दुसर्यांना सांगतो किंवा कधी कधी अगदी गुपचूप जातो. आतमध्यल्या गडबड गोंधळामुळे, अशांतीमुळे तो शांत, एकांत जागी राहू इच्छित नाही. आतील अशांती आणि वादळ माराची दुसरी सेना आहे.

३) माराची तिसरी सेना – भूक.

जर एखाद्याची ध्यानात प्रगती होत असेल तर त्याला भूक लागत नाही, पण जर ध्यान व्यवस्थित होत नसेल तरच भूक लागते. आतमधले काहीतरी एखाद्याला क्षुधार्त करते. मग त्याला भूक आवरत नाही. एकदा का साधक ध्यानात स्थापित झाला, मग त्याला नंतर भूक लागत नाही. बरेच विपश्यना शिबिरार्थी शिबिरात येतात त्यातील काही खादाड असतात ते म्हणतात कि ते खाण्याशिवाय राहू शकत नाहीत. मग त्यांना खेळीमेळीने खुलवावे लागते, याचा परिणाम असा होतो कि दहा दिवसात ते कधीही भुकेलेले नसतात. काही शिबिरार्थी म्हणतात कि जर ते दोन दिवस जेवले नाहीत तर चक्कर येउन पडतील आणि ते असेही म्हणतात कि त्यांनी तसं करून पाहिले हि आहे म्हणून असे काही शिबिरार्थी जेवणाची परवानगी घेतात आणि त्यांना तशी परवानगी दिली जाते पण जेव्हा ते पहिल्या दिवशी ध्यान केल्यानंतर दुसर्या आणि तिसर्या दिवशी ध्यान केल्यानंतर ते अजिबात भुकेले नव्हते.

४) माराची चौथी सेना – विविध प्रकारच्या भोजनाची इच्छा.

जेव्हा आपण खूप चविष्ट, स्वादिष्ट भोजन करतो तेव्हा काय होते? अशा प्रकारचे चविष्ट भोजन करण्याची आपली इच्छा अजून वाढते. भोजनाचा स्वाद न जाणता भोजन करणे संभव आहे का? असे फक्त अर्हत करू शकतात. विपश्यना शिबिरात येण्याचा उद्देश क्लेशापासून सुटका मिळविणे नव्हते का? तृष्णेपासून सुटका मिळविणे नव्हते का? जेव्हा आपण डोळे बंद करून खाणे खातो तेव्हा काही दिसणार नाही, तेव्हा आपल्या मनात कोणत्या दृश्य वस्तूची इच्छा वा कामना होणार नाही? हीच गोष्ट ऐकण्याला लागू होते. विपश्यना शिबिरात टेप रेकॉर्डर नाही, रेडियो नाही, ज्यावर आपण गाणी वाजवत आहोत, आपल्याला जे ऐकायचे नाही, हीच गोष्ट गंधासाठी सुद्धा म्हटली जाऊ शकेल. शिबिरात कोणी आपल्या शरीरावर किंवा कपड्यावर अत्तर शिंपडलेले नाही, जेणेकरून सुगंधासाठी कोणता लोभ किंवा तृष्णा जागत नाही. शिबिराच्या ठिकाणी अशी कोणतीही वस्तू नाही जी आपल्या शरीरात सुखद संवेदना निर्माण करेल. जिव्हा हि तर आहे आणि ती कशी स्वाद चाखल्याशिवाय राहू शकते? हे तर तेव्हा शक्य आहे जेव्हा एकतर आपण खाणार नाही. अशा अवस्थेत आपल्या शारिरीक स्थितीसाठी डॉक्टरला आपल्याला ग्लुकोजचे इंजेक्शन द्यावे लागेल. स्वाद तर तेव्हा जाणवेल जेव्हा जिभेचा संपर्क भोजनाशी होईल. जर आपण स्वादिष्ट भोजन करणे कमी कराल तर त्याविषयीचा लोभ किंवा तृष्णा कमी होत जाईल.

आपण विपश्यना शिबिरात तृष्णेपासून सुटका मिळविण्यासाठी येत असतो, त्यासाठी तेथे असे वातावरण निर्माण केली जात नाही कि शिबिरार्थ्यांची तृष्णा वाढेल. प्रत्येक जन आपली तृष्णा वाढणार नाही याची काळजी घेतोय. आपण सर्व तृष्णेला डावलू इच्छितो, दूर करू इच्छितो. आपण सर्व एक तर तृष्णेला दूर करू किंवा स्वादिष्ट भोजन करून तिला वाढवूया. म्हणून शिबिरात संध्याकाळी जेवण दिले जात नाही. अशा प्रकारे विपश्यना शिबिरात तृष्णेला कमी करण्यात मदत केली जाते. हे सर्वांसाठी चांगले आहे, कारण कि, शिबिरात संध्याकाळी जेवण केल्यावर नक्कीच गुंगी येईल. आपण याशिवाय हि राहू शकतो. जर सकाळचा नाष्टा व दुपारचे जेवण व्यवस्थित घेतले तर आपल्या शरीराची गरज पूर्ण होईल.

५) माराची पाचवी सेना – स्त्यान व मृद्ध आहे (थिन आणि मिद्ध).

शिबिरात सहभागी झालेले काही विद्यार्थी बसल्या-बसल्या झोपी जाऊ शकता. साधारणतः बसल्या बसल्या घोरायला लागणारे लोक खूप नसतात. परंतु काही शिबिरार्थी असे असतात कि जे बसल्या बसल्या घोरायला लागतात आणि काही वेळाने जागे होतात. यालाच थिन मिद्ध म्हणतात. याला टाळता येत नाही. जेव्हा स्मृती आणि संप्रज्ञान खुप तीक्ष्ण होईल तेव्हा निर्वाणाचे शांत स्वरूप अनुभवावर उतरेल आणि तेव्हा कुशल आणि अकुशल मध्ये दंव्द चालेल तेव्हा त्याच्या प्रतिक्रियेमुळे उष्णता निर्माण होईल व तेव्हा मनुष्याला गुंगी येऊ लागते, झोप येऊ लागते.

जर आपल्याला कधी कधी गुंगी येऊ लागली तर जर जोराने श्वास घ्या कारण आपली समाधी तुटली आहे. हे आतून संस्काराचे उखडणे आहे, आपली समाधी भंग पावली आहे. कधी-कधी जेव्हा "अनित्य विद्या" बलवान होते तेव्हा आपण आपल्या शरीरावर होणार्या शारिरीक व मानसिक अनुभवाना बघू शकतो आणि आपले विपश्यना ज्ञान खूपच तीक्ष्ण आणि बलवान होते. तेव्हा कोठल्या दबलेल्या संस्काराचा मोठा प्रहर होतो आणि आपण अनित्यतेचे ज्ञान धाल्वून बसतो आणि पुन्हा आत्म विस्मृतींच्या स्थितीमध्ये येतो. जर असा प्रसंग अचानक घडला तर याचा साना करण्याचे दोन उपाय आहेत. एक उपाय तर हा आहे कि, आपल्या स्वतःला समाधी मध्ये स्थिर करणे म्हणजे आपण जी प्रतिक्रिया केली आहे ती निघून जाईल जेव्हा असे घडेल तेव्हा जावून झोपू नये. व्यावहारिक दृष्टीकोनातून हे महत्वाचे आहे कोणता आंधळेपणा तेव्हा येतो जेव्हा संस्कार वर येतात. तेव्हा दृढतापूर्वक आपल्याला अनित्यतेची भावना केली पाहिजे. नुसते अनित्य, अनित्य म्हणून उपयोग होणार नाही, हे म्हणणे दिखावटी नको, हे वस्तुतः संवेदनांच्या अनित्यतेच्या अनुभवाला जाणून केले पाहिजे. जर आपणा असे करू तर आपला विजय निश्चित आहे.

६) माराची सहावी सेना – एकटे न राहण्याची इच्छा आणि एकांतवासाची भीती वाटणे.

काही जण एका खोलीत सुद्धा राहू शकत नाहीत, त्यांना कोणी सोबत मिळेल म्हणून खोली बदलत राहतात. एकट्या खोलीत त्यांना भीती वाटते. ध्यान करताना काही जण खोलीत लाईट चालू ठेवण्याची परवानगी मागतात आणि त्यांना ती परवानगी दिली जाते. इतकेच नाहीतर काहीजणांची इच्छा असते कि, ध्यान करताना त्यांच्याजवळ कोणीतरी बसावे. एकटे राहण्याचे धाडस ते करू शकत नाहीत. त्यातील जेव्हा एकटे असायचे तेव्हा त्यातील काही जणांचे शरीर लाल होत असे. शिबीर समाप्त झाल्यावर त्यांना बरे वाटले. दुसर्या शिबिरात ते अंधाऱ्या शुन्यागारात बसू लागले. भीती वाटणे भीतीचा अनुभव होणे यात काही जण अव्वल असतात परंतु शिबिरात बसल्यानंतर त्यांची भीती आता उडून गेली.

७) माराची सातवी सेना – विचिकित्सा आहे, संदेह आहे. जसे एखाद्याला या गोष्टीची शंका आहे कि, तो ध्यान भावनेमध्ये यशस्वी होईल अथवा नाही.

शंका प्रत्येक व्यक्तीमध्ये आहे जी अशी चिंता करत राहते कि तिची साधना सफल होईल कि नाही? मुख्य गोष्ट हि आहे कि अकुशलाला दूर ठेवा, अनुशय क्लेशांना दूर ठेवा, त्यांना नष्ट करा हि मुख्य गोष्ट आहे.

८) माराची आठवी सेना – जेव्हा ध्यान भावना सफल होऊ लागते तेव्हा व्यक्तीला गर्व येतो, त्यामध्ये उद्धटपण आणि आखडलेला येतो.

जेव्हा ध्यानभावनेत प्रगती होते, तेव्हा व्यक्तीला आतमध्ये जाणवू लागते. मनोविकार कमी होतात, त्यांची शक्ती कमी होते आणि व्यक्ती विचार करू लागते कि कोण दुसरा इतके चांगले ध्यान करत नाहीये जितके कि करत आहे, का मी त्याची मदत करू नको?जेव्हा काही जण परिश्रम करण्याची, कठोर परिश्रम करण्याची गोष्ट सांगत असे तेव्हा त्यांच्या गोष्टीमध्ये दंभ होता, घमेंड होती, अहंकार होता कि मी ठीक प्रकारे विपश्यना करीत आहे व हे इतर तर ठीक करत नाही आहेत. जेव्हा क्रोधि व्यक्तीचा, ज्याच्या शरीरात खूप उष्णता आहे, संस्कार उखडतो, तर शरीरावर ती उष्णता फुटून बाहेर पडते. दुसऱ्या दिवशी तो ध्यान करू शकत नाही, त्याला कोणतीही संवेदना जाणवली नाही आणि त्याला गुरुजींकडे मार्गदर्शन घेण्यासाठी जावे लागते.

९) माराची नववी सेना – हे आचार्यांविषयी आहे, असे आचार्य ज्यांना खूप लाभ–सत्कार मिळत आहे.

मला खूप लाभ-सत्कार मिळाला, यामुळे माझ्यामध्ये घमंड येऊ देता कामा नये. तिला येण्यापासून थांबवले पाहिजे. एवढा सत्कार मिळाल्यावर कोणाला घमंड येणार नाही? मला स्वतःला सावधान ठेवले पाहिजे, माझी रक्षा केली पाहिजे.

१०) माराची दहावी सेना – कोणा धर्माचे, खोट्या धर्माचे अनुसरण करणे, एका नव्या अजून विशेष धर्माला स्थापित करणे, यासाठी करणे कि, खूप दान – दक्षिणा मिळेल, एकाची प्रशंसा आणि दुसर्यांची निंदा करणे.

काही आचार्यांना दान-दक्षिणेविषयी आसक्ती होते, ज्यामुळे त्यांच्याकडे अजून अधिक विद्यार्थी येतील, ते तेच शिकवतात जे विद्यार्थ्यांना आवडते. ते बुद्धांची शिकवण न देता खोटी शिकवण देतात कारण त्यांना दान-दक्षिणा, लाभ-सत्कार हवा असतो. ते सद्धर्माच्या गोष्टी करीत नाहीत, त्यानुसार साधना करीत नाहीत. काम करीत नाहीत. हीच माराची दहावी सेना आहे.

धर्म दुःखाला, शोकाला दूर करतो आणि सुख प्रदान करतो. हे सुख कोण देते? हि आपल्या आत जागलेली अनित्य विद्या आहे, जी सुख देते. आपल्याला विपश्यनेचा अभ्यास केला पाहिजे ज्याने अनित्य विद्येचे ज्ञान नेहमी होत राहील, अनित्येचे दर्शन प्रतिक्षण होत राहील. त्यासाठी चार तत्वांवर ध्यान केंद्रित करून अभ्यास करावा :-

१) शांत होऊन समाधीचा अभ्यास करताना शील भंग होऊ देता कामा नये.

२) खोटे बोलण्यापासून वाचले पाहिजे, कारण हे शील खूप लवकर तुटते.

३) मला दुसर्यापासून याचे भय नाही परंतु खोटे बोलून मी आपल्या शीलाचा आधार कमकुवत करतो, जेव्हा शील कमकुवत होते तेव्हा समाधी पण कमकुवत होते आणि प्रज्ञा सुद्धा कमकुवत होते.

४) खरे बोला, नियमित काम करा, अभ्यास करा, समाधीला दृढ करां आणि यावर लक्ष दया कि, आपल्या शरीरावर काय होत आहे.

असे केल्याने अनित्यतेची प्रकृती स्वाभाविक रूपाने प्रकट होईल. खूप तीव्र अनुभव, सतत कापत राहणे, अस्तावस्त होणे, जळत राहणे, शरीराचा विनाश होने हीच अनित्यतेची लक्षणे आहेत. जे नित्य बदलत आहे, परिवर्तीत होत आहे.

एकदा जेव्हा ध्यानाचा अभ्यास होतो आणि शिबिरार्थी विद्यार्थी सावधान होऊन विपश्यना ज्ञानाने बघू लागतो तेव्हा जितके अकुशल मनोविकार आहेत ते अधिक काळापर्यंत राहू शकत नाहीत. त्यांना बाहेर पडावेच लागेल आणि जेव्हा ते अकुशल मनोविकार निघून जातात तेव्हा व्यक्ती स्थिर होतो, संयमित होतो आणि चांगले जीवन जगण्यायोग्य होतो.

निर्वाणाच्या अंतिम अवस्थेपर्यंत पोहोचणे, जेथे सर्व संस्कार नष्ट होतात, ती खुप दूरची गोष्ट आहे, पण त्यासाठी त्याच्या प्राप्तीसाठी कष्ट, मेहनत करू इच्छित नाही आणि निर्वाणाची झळक ,मिळवू इच्छित नाही? निर्वाणाची अनुभूती मरणोपरांत नसून ती जिवंतपणी अनुभविण्याची गोष्ट आहे. आणि त्या अनुभूतीचा स्वाद चाखण्यासाठी देश विदेशातील शिबिरार्थी विद्यार्थी इतक्या दूर येतात. ह्या अभ्यासातून मिळण्यार्या सुख आणि शांतीचा अनुभव आपल्या परिचितांना, मित्रांना व्हावा म्हणून ते स्वःत हि येतात आणि त्यांना हि शिबिरात घेऊन येतात. हि महत्वपूर्ण गोष्ट आहे कि, धर्म रसाला चाखण्यासाठी आचार्यांची, गुरुजनांची आवश्यकता असते. परंतु अभ्यासकांना याचा स्वाद चाखायचा असेल तर त्यांना त्यासाठी मध्यम मार्गाने खूप मेहनत करावी लागते. या रसाला धर्म रस म्हणतात, जो सर्वात उत्तम आणि उदात्त रस आहे.

लेखाचा शेवट करताना बाबासाहेबांनी भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म यात सिद्धार्थ गौतमावर माराच्या सेनेने केलेला हल्ला आणि त्यावर सिद्धार्थ गौतमाने कसा विजय प्राप्त केला हे पाहणे खूप अगत्याचे होईल.:–

वाईट विचार आणि वाईट वासना ज्यांना पुराणांतरी माराची / कामाची मुले असे म्हणतात. ज्यांनी सिद्धार्थ गौतमाच्या मनावर आक्रमण केले होते, पण त्यावेळी सिद्धार्थ गौतमाने सगळे धैर्य एकवटून माराला म्हणाला ते खूप महत्वपूर्ण आहे – "माझ्या मनामध्ये श्रद्धा आहे, शौर्य आहे, आणि शहाणपण आहे, तुम्ही दुष्ट वासनांनी माझा पराभव कसा करू शकाल? नद्याचे प्रवाह देखील वार्यामुळे कोरडे पडतील. पण माझा निश्चय ढासळून टाकणे तुम्हाला शक्य नाही. जिवंत राहून पराभव पत्करण्यापेक्षा संग्रामात मरण पत्करणे मला अधिक श्रेयस्कर वाटते!" ह्या अश्या दृढ निश्चयामुळे सिद्धार्थ गौतमाने मनाची चलबिचल करणारे दुष्ट विचार मनातून पार काढून टाकले आणि मारावर विजय मिळविला आणि ज्ञान प्राप्ती करून घेण्याच्या आपल्या उद्देशावर ठाम राहून ज्ञान प्राप्ती केली, निर्वाण प्राप्त केले.

या निर्वाणाच्या रसाला चाखण्यासाठी आपल्या खूप मेहनत, परिश्रम घ्यावे लागणार आहे. ज्याप्रमाणे राजा सांसारिक सुखाचा आनंद घेतो, देव दिव्य सुखांचा अनुभव घेतात, त्याचप्रमाणे बुद्ध आणि अरहंत त्या धर्म रसाला चाखू शकतात, ज्याला त्यांनी प्राप्त केले आहे. आपल्याला सुद्धा त्यासाठी कठीण मेहनत, कष्ट करायचे आहेत जोपर्यंत आपण धर्म रस चाखणार नाही तोपर्यंत. त्यासाठी बुद्धांनी दिलेल्या मध्यम मार्गावर चालावे लागेल. बुद्धांचा मार्गच आपल्याला निर्णाण प्राप्ती कडे घेऊन जाणारा आहे. मनामध्ये असणारी श्रद्धा, शौर्य, आणि शहाणपण हे जे सिद्धार्थ गौतमाकडे होते त्याद्वारे त्यांनी मारावर विजय मिळवून भगवान बुद्ध झाले, तसेच आपण हि मनामध्ये श्रद्धा, शौर्य आणि शहाणपण जागृत करून दृढ निश्चयाने भगवान बुद्धांनी दिलेल्या या मार्गावर चालून आपण सर्व आपले आणि इतरांचे मंगल करू, सर्वांचे मंगल हो!

– महेश कांबळे, (मुंबई). १०/०७/२०२१.

संदर्भ : १) पधानसुत्त २) बौद्धधर्म – एक बुद्धिवादी अध्ययन ३) सयाजी उ बा खिन यांचे विपश्यना शिबिरातील प्रवचन ४) भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म.

_ॐ मणि पद्मे हूँ_

🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼

☸️☸️🦚🦚🦚💎 उपोसथ 💎🦚🦚🦚☸️☸️

____

*_उपोसथ_*

____

त्यावेळी इतर मताचे परिव्राजक चतुर्दशी पौर्णिमा आणि दोन्ही पक्षाच्या अष्टमीला एकत्रित होऊन धर्मोपदेश करीत असत. पुष्कळ लोक त्यांच्याकडे धर्मोपदेश ऐकण्यासाठी त्यांच्याजवळ जात असत. त्यामुळे लोकांची भावना त्या मतांच्या परीव्राजाकांप्रती वाढत असे. त्यामुळे ते श्रद्धेने तेथे जात असत आणि त्या परीव्राजकांना पण नवीन अनुयायी मिळत असत.

तेव्हा *महाराज सेनिय बिंबसाराच्या* मनात एक विचार आला कि, “भगवान बुद्धांच्या भिक्षूंनी पण तसं का करू नये? हा विचार भगवान बुद्धांजवळ सांगायला पाहिजे म्हणून दुसर्या दिवशी महाराज सेनिय बिंबिसार भगवान बुद्ध राजगृहाच्या गृधकुट पर्वतावर राहत होते तेथे जाऊन त्यांना अभिवादन करून एकीकडे बसला. एकीकडे बसल्यावर मगधराज सेनिय बिंबिसाराने तथागतांना सांगितले “भगवान, माझ्या मनात असा विचार आला कि, *राजगृहात इतर मताचे परिव्राजक वद्य चतुर्दशी, पौर्णिमा आणि दोन्ही पक्षाच्या अष्टमीला एकत्रित होऊन धर्मोपदेश करतात.* लोक त्यांच्याजवळ धर्म ऐकण्यासाठी जातात. त्यामुळे इतर मतांच्या परीव्राजकांप्रती लोकांची भावना श्रद्धामय होऊन त्यांच्याप्रती आकर्षण निर्माण होते आणि लोक त्यांचे अनुयायी होतात. *तर भगवान, मला असे वाटते कि, आपल्या श्रमनांनी पण वद्य चतुर्दशी, पौर्णिमा आणि दोन्ही पक्षाच्या अष्टमीला एकत्रित होऊन धम्माचा उपदेश लोकांना का देऊ नये? भगवान, चांगले होईल जर भिक्षू लोकांना जर वद्य चतुर्दशी, पौर्णिमा आणि दोन्ही पक्षाच्या अष्टमीला लोकांना एकत्रित करून धम्मोपदेश दिला तर.”*

तेव्हा तथागतांनी मगधराज सेनिय बिंबीसारास धार्मिक कथा सांगून समुत्तेजीत केले. महाराज बिंबीसार कथा ऐकून समुत्तेजीत होऊन आसनावरून उठले आणि भगवंताना त्रिवार अभिवादन करून प्रदक्षिणा घालून निघून गेले. *तथागतांनी त्याचवेळी भिक्षुंना संबोधित करून सांगितले “भिक्षुंनो, मी तुम्हाला अनुमती देतो कि, तुम्ही पण वद्य चतुर्दशी, पौर्णिमा आणि दोन्ही पक्षाच्या अष्टमीला सर्वांनी एकत्रित होऊन लोकांना धम्मोपदेश द्यावे.”*

____

महेश कांबळे *०१/०८/२०२१*

संदर्भ :– *उपोसथ क्खन्धक* *विनयपिटक*

____

वर्षावास – उपोसथ

वर्षावास म्हणजे काय व उपोसथ म्हणजे काय,उपोसथा मध्ये उपासकांनी काळात नेमकं काय केले पाहिजे.

२५६७ वर्षापूर्वी सिद्धार्थ गौतमाने परिव्रज्या घेतली होती त्यावेळी देशात फार मोठी बौद्धिक खळबळ माजली होती, त्यावेळी ब्राम्हण तत्व ज्ञानांखेरीज निरनिराळे बासष्ट पंथ अस्तित्वात होते त्यापैकी निदान सहा पंथ लक्षात घेण्यासारखे होते, बुद्धत्व प्राप्तीनंतर बुद्धाने इ. स.पूर्व ५२८ ला सारनाथ येथे प्रथम धम्मोपदेश दिला व त्यांचा पहिला वर्षावास तिथेच संपन्न झाला.

त्यानंतर पुढील चार महिन्यात जवळपास साठ जणांचा भिक्षुसंघ तयार झाला होता त्या भिक्षुसंघास बुद्धाने आदेश दिला होता; – *"चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकानुकंपाय, अत्थाय, हिताय सुखाय देवमनुस्सानं ।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदिकल्याणं मज्झेकल्याणं। परियोसान कल्याणं, सात्थ सब्यञजनं, केवल परीपुण्णं परिसुद्धं, ब्रम्हचरियं पकासेथ ॥ "

(मराठी अर्थ :– भिक्खूहो, बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, मानवांना कल्याणकारी, धम्मपदेश करण्यात तुम्ही प्रवृत्त व्हा. प्रारंभी कल्याणपद , मध्यंतरी कल्याणपद आणि शेवटीही कल्याणपद अशा या धम्ममार्गाचा लोकांना उपदेश करा.)

लोकांच्या हितासाठी, सुखासाठी,त्यांच्यावर अनुकंपा करण्यासाठी, देवलोकांच्या ज्ञानाजर्नसाठी सतत एका ठिकाणी न राहता न थांबता प्रवास करीत राहा, प्रवास करताना दोघांनी किंवा समूहाने प्रवास करू नये, एकट्यानेच प्रवास करावा.

बुद्धांच्या आदेशानंतर सर्व भिक्षूंनी काटेकोरपणे नियमांचे पालन करीत पुढील सात ते आठ महिने चारही दिशांना वर्षाच्या बाराही महिने पायी चारिका करीत गावोगावी धम्मोपदेश करीत होते. चारिका करीत असताना पावसाळ्यात अनेक भिक्षूंना लोक दोष देऊ लागले ह्या लोक समस्येचा त्रास होऊ लागल्यामुळे त्या समस्या त्यांनी तथागत बुध्दांना येऊन सांगितल्या....

समस्या अश्या होत्या की, त्याकाळी जे विविध पंथ किंवा वेगळ्या मताचे पंथ होते ते वर्षावास काळात एकाच ठिकाणी स्थायिक होऊन धर्मप्रचार करित असे,परंतु बौद्धभिक्षू हा पावसाळ्यात देखिल गावोगावी चारिका करित असे,म्हणून लोक त्यांना दोष देऊ लागले "ह्या श्रमनांना काही कळतं कि नाही, हे नव्यानेच उत्पन्न झालेल्या तृणावर(गवतावर) चालून निसर्गाचे अतोनात नुकसान करित आहेत,त्याचप्रमाणे अनेक पावसाळी जीवजंतू ह्या भिक्षूंच्या पायाखाली येऊन नष्ट होत आहेत."! ह्या दोषामुळे अनेक लोक भिक्षूंचा सन्मान करीत नव्हते व त्यांना महत्वही देत नव्हते...

दुसरे कारण असे आहे की,अनेक भिक्षूंकडे एकच चिवर असायचे व चारिका करीत असतांना ते पूर्णपणे भिजून जात असे,अनेक भिक्षु आजारी पडत असत,त्यांना नानाप्रकारच्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागे,अनेकांची उपासमार होत असत.

तथागतांनी भिक्षूंकडून ह्या समस्या ऐकून घेऊन याचा उपाय म्हणून पावसाळ्यात (आषाढी पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा) एका ठिकाणी तीन महिने वास्तव्य करण्याचा नियम भिक्षूसंघास घालून दिला.त्याला *वर्षावास* असे म्हणतात. तेव्हा (इ.स.पूर्व ५२७) पासून आतापर्यंत बौद्धधम्मात वर्षावास नियमित केला जातो..

वर्षावास म्हणजे काय?

वर्षा म्हणजे पाऊस व वास म्हणजे राहणे (पावसाळा या ऋतूत किमान तीन महिने (आषाढ ते अश्विन) चारिका न करता एका ठिकाणी वास्तव्य करणे होय.) सिद्धार्थ गौतमच्या ज्ञानप्राप्तीनंतर म्हणजेच इ.स.पूर्व ५२८ ते बुद्धांच्या महापरिनिर्वाण पर्यंत इ.स.पूर्व ४८३ जवळपास ४५ वर्ष बुद्धाने धम्माचा प्रचार प्रसार केला. त्या ४५ वर्षापैकी ४४ वर्ष त्यांनी वर्षावास केले.४४ वर्षावासांपैकी २४ वर्षावास श्रावस्ती या एका ठिकाणी केले,५ वर्षावास राजगृह येथे केले, वैशालीला दोन, चालीय पर्वत (बिहार) येथे तीन,राजगृहला दोन व उरलेल्या प्रत्येक ठिकाणी (ऋषीपतन,मंकुल पर्वत, सुंसुरमारगिरी,कोशम्बी,पारिलेयक,नालंदा, वैरंजा, आलवी) त्यांनी एक–एक वर्षावास केले आहेत, त्यापैकी सातवा वर्षावास याची नोंद मिळत नाही.परंतु इतिहासकारांचे असे मत आहे की बिहार मध्येच असलेले एक ठिकाण असेल त्याला त्रयस्त्रीश असे म्हणतात. अशाप्रकारे वर्षावासाची सुरवात झाली.

ज्यावेळी भिक्षुसंघ चारिका करत असे त्यावेळी वेगवेगळ्या पंथाचे श्रमण अमावस्या(चतुर्दशी),अष्टमी आणि पौर्णिमा या दिवशी धर्मचर्चा करित असे,व आलेल्या लोकांचे प्रश्न सोडवत असे त्यामुळे लोक त्यांच्याकडे आकर्षित होत असे.... त्या विविध पंथांच्या श्रमनाचे जे विरोधक होते किंवा ज्यांना त्या श्रमणांचे तत्त्व ज्ञान मान्य नव्हते,अश्या विद्वान व बुद्धिमान लोकांना काही पर्यायही नव्हते.. न मानणारे जे लोक होते त्यांना हवे त्यावेळी बौध्द भिक्षू कधीच भेटत नसे, बौद्ध भिक्षूंचा ठावठिकाणाही कोणाला माहीत नसायचा त्यामुळे विद्वान लोकांचा भ्रमनिरास होत असे, व मनाविरुद्ध शेवटी ती विद्वान मंडळी त्याच वेगवेगळ्या पंथाकडे आकर्षित होत असत व ह्या कारणांमुळे बौद्ध भिक्षूंच्या कडे पाहण्याचा लोकांचा दृष्टीकोण नकारात्मक होऊ लागला... ह्या सर्व घडणाऱ्या घटना व त्यातून निर्माण होणाऱ्या अडचणी मगधराज सेनानी बिंबिसार यांच्या चांगल्याप्रकारे लक्ष्यात आल्या.. मगधराज बिंबिसाराने ह्या समस्या तथागताच्या निदर्शनास आणून दिल्या. या समस्येवर उपाय म्हणून बुद्धाने *उपोसथ* हा नियम बनविला.

उपोसथ म्हणजे काय?

प्रत्येक महिन्याचे चार दिवस म्हणजे अमावस्या,प्रत्येक पक्षातील (कृष्णपक्ष व शुक्लपक्ष) अष्टमी, व पौर्णिमा या दिवशी चारिका करीत असलेल्या भिक्षूंनी एका ठिकाणी जमून आपल्या वरीष्ठ भिक्खु कडून पातीमोख्ख (प्रतिमोख्ख) करावे.म्हणजेच भिक्षूंनी धम्मचर्चा (धम्माच्या मुख्य गोष्टी प्रति चर्चा) करावी,महिन्यातील याच चार दिवसांना *उपोसथ दिन* असे संबोधण्यात येते. उपोसथ हे फक्त वर्षावास या काळातच करीत नाही तर वर्षाच्या बाराही महिने केल्या जाते, वर्षावास काळात फक्त चार दिवस न करता संपूर्ण तीन महिने म्हणजेच आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या काळात उपोसथ केल्या जाते..

वर्षावासाचे बौद्ध धम्मामध्ये अनन्य साधारण महत्व आहे.म्हणून धम्म ग्रहण करण्याचा हा काळ समजून प्रत्येक बौद्ध उपसकांनी अधिकाधिक लाभ घेतला पाहिजे...

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली आपणा सर्वांना बौद्धधम्माची दिक्षा दिली व त्यानंतर ५३ दिवसांत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. *बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला बौद्ध धम्म* त्यांना लोकांमध्ये प्रसारित करण्यास हवा तेव्हढा वेळ मिळाला नाही, त्यामुळेच आज बौद्धांमध्ये अनेक गोष्टींवर मतभेद आपणांस पाहण्यास मिळतो....

बाबासाहेबांनी "बुद्ध आणि त्यांचा धम्म" हा ग्रंथ लिहून ठेवून आजच्या बौद्धावर खरंच खूप मोठे उपकार केले आहेत. १९५६ पासून आजपर्यंत बौद्धांना व्यवस्थित बौद्ध संस्कार सांगणारा मार्गदाता कोणीच भेटला नाही. बाबासाहेबांनंतर भारतीय बौद्ध महासभा या संस्थेने बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार अविरतपणे चालू ठेवल्यामुळे, बौद्धचार्य शिबिर, श्रामणेर शिबिर, केंद्रीय शिक्षक शिबिर, बालसंस्कार शिबीर, महिला शिबीर असे किमान 21 शिबिर सातत्याने राबवत असल्याने किमान बौद्ध धम्म महाराष्ट्रत घरोघरी टिकून आहे.

सध्या सर्व बौद्धांमध्ये धम्माबद्दल वेगवेगळे गट व विचार आहे, त्यामुळेच येथे वैचारिक गोंधळ खूप आहे व म्हणून वर्षावास काळात उपोसथामध्ये उपासकांनी नेमके काय करावे याबद्दल अनेक संभ्रम आहेत. यावर योग्य चिंतन होणे गरजेचे आहे.

सध्या उपोसथ काळात अनेक उपासक भिक्षूप्रमाणे दिवसातून एकदाच जेवणे हा नियम पाळू लागले,हा नियम पाळताना उपोसथच्या ऐवजी चक्क "उपवास" पाळणे सुरू केलें, त्यातही इतका कट्टरपणा आला की बाराच्या आतच जेवण करणे, आज बारा वाजता जेवले तर सरळ दुसऱ्या दिवशी दुपारी बारा वाजता जेवणे, पण जर जेवण बाराच्या आत झाले नाही तर काही ठिकाणी वादविवाद होताना दिसतो, अनेकांना तर असे वाटते की जेवणाची वेळ चुकली तर खूप मोठी चूक झाली, किंवा एखादा उपवास चुकला तर फार मोठी हानी झाली अशी मानसिकता लोकांमध्ये रुजू झाली.

प्रत्येक बौद्ध उपासक आपआपल्या ज्ञानानुसार व माहितीनुसार उपोसथाचे पालन करू लागला. त्यामध्येही बुद्धाने भिक्षू व भिक्षूंनीसाठी दिलेले जे नियम आहे त्या नियमानुसार (खासकरून आहारासबंधी असलेले नियम) उपासक वागू लागले, पण ते ही आप-आपल्या सोयीनुसार...

उपोसथ काळात उपासकांनी उपोसथ केले पहिजे पण उपवास नव्हे, तर नेमकं काय केलं पाहिजे?

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित "बुद्ध आणि त्यांचा धम्म" याचे वाचन केले पाहिजे व इतरांनाही समजावून सांगितले पाहिजे.

२) प्रत्येक उपासकाने पंचशिलाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे, जमलं तर अष्टशीलाचे पालन केले तर अतिउत्तम.

३) किमान तीन महिने (आषाढ ते अश्विन) अरीय अष्टांगिक मार्गावर चालले पाहिजे, जेणेकरून आपल्याला त्याप्रमाणे वागण्याची हळूहळू सवय होते व आपण सन्मार्गावर आरूढ होतो.

४) या तीन महिन्याचा काळात उपासकाने धम्मश्रवण करणे, धम्मचर्चा करणे व धम्माचरण करणे आवश्यक आहे.

५) वर्षावासाच्या काळात भिक्षूंना भोजनदानास आमंत्रित करणे,सातत्याने जवळच्या विहारात जाणे आवश्यक आहे.

६) या काळात आपल्या आहारावर नियंत्रण ठेवणे, झोपेवर नियंत्रण ठेवणे व आळस नष्ट करणे आवश्यक आहे.

७) तृष्णा, कामवासना, राग,लोभ,द्वेष व मत्सर यावर नियंत्रण ठेवणे.

८) या काळात कायानुपश्यना, वेदनानुपश्यना व चेतनानुपश्यना जाणाव्यात.

९) या काळात आपल्या हातून कोणतेही अकुशल कर्म होऊ नये,याची दक्षता घेणे व जास्तीत जास्त कुशल कर्मे करावे.याची आपणांस सवय होऊन आजीवन आपल्याला त्याचा उपयोग होईल.

१०) घरातील लहान मुलामुलींना घेवून रोज सायंकाळी वंदना सुत्रपठण घ्यावे,जेणेकरून त्या बालकांवर बौद्ध संस्कृती रुजेल.

🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼 *_ॐ मणि पद्मे हूॅं_* 🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼

🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼

☸️☸️🦚🦚🦚💎 *_सात प्रकारचे चित्त_* 💎🦚🦚🦚☸️☸️

🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼

मनुष्यात वसणारे सात प्रकारचे चित्त पाहण्यात येतात ते असे –

१) सक्लेश म्हणजे चिकटलेले आहे असे. *२)* श्रोतापन्न व्यक्तीचे चित्त. *३)* सकृदागामी व्यक्तीचे चित्त. *४)* अनागामी व्यक्तीचे चित्त. *५)* अर्हत व्यक्तीचे चित्त. *६)* प्रत्येक बुद्धाचे चित्त. *७)* सम्यक संबुद्धाचे चित्त.

🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼🌼

*१) सक्लेश म्हणजे चिकटलेले आहे असे.

"लालसेच्या आहारी गेलेले (रागयुक्त), दुष्ट (द्वेशी), मोहात बुडालेले, क्लेशांच्या भोवऱ्यात सांपडलेले, तसेच शरीररचनेची व्यवस्था न पाहणारे, सदाचाराच्या नियमात गाफील असलेले, चित्त (मन) कृत्याची व प्रज्ञेची जाणीव नसलेले अशा लोकांचे चित्त (मन) अतिशय जड, विकृत आणि मंद असते. कारण की, त्यांच्या चित्ताला शिक्षण मिळालेले नसते, म्हणजे त्यावर सुसंस्कार जडलेले नसतात."

उदा. समजा एखादा वेळू त्यांच्या रांजीतून काढावयाचा असल्यास तो कधीही सहजपणे काढता येणारे नाही. हे काम अत्यंत युक्ती, प्रयुक्ती व हळूहळू करावे लागते. कारण अवाढव्य वाढलेला वेळू आपल्या अनंत व विशाल शाखा संपूर्ण रांजीत पसरविल्यामुळे त्याची परस्परात चांगलीच गुंतागुंत झालेली असते. अशारितीने फसलेला वेळू कापून काढणे अत्यंत कठीण आहे."

याच उदाहरणाप्रमाणे लालसेच्या आहारी गेलेले..... जे लोक असतात त्यांचे चित्त अतिशय जड, विकृत आणि मंद असते

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

२) श्रोतापन्न व्यक्तीचे चित्त

"ज्यांनी श्रोतापन्नपदाचा लाभ करून घेतला आहे, जे कधी वाईट मार्गाने जात नाहीत, ज्यांनी सत्य ओळखले आहे आणि ज्यांना भगवान बुद्धांच्या धर्माची जाणीव झाली आहे अशा लोकांचे चित्त, आत्मभाव, कर्मकांड आणि शंका या तीन भ्रममूलक विषयापासून एकदम मुक्त, हलके व गतिमान होत असते. तथापि वरच्या (आर्य मार्ग) विषयात त्याला विचार शक्तीच्या कार्यात अडचणी येतात. कारण त्याबाबत ते जड, विकृत आणि मंदच असते."

त्यांची कार्ये मंदगतीने चालतात कारण तीन विषयात चित्त एकदम परिपूर्ण झालेले असले तथापि बाकीच्या अवस्थांच्या बाबतीत चित्ताचे क्लेश (मळ) मात्र कायम असतात.

उदा. ज्याप्रमाणे वेळवांच्या रांजीतील वेळू कापून काढताना तीन पेरांपर्यंत शाखा तोडून साफ केल्यामुळे आणि बाकी वरच्या शाखा तशाच त्या रांजीत गुंतलेल्या अवस्थेत तोडून दिल्यामुळे वेळू ओढताना तीन पेरांपर्यंत पकडावयास किंवा ओढावयास कठीण जाणार नाही. परंतु बाकी वरचा भाग ओढून अशक्य व कठीणच होते. कारण खालचा भाग कापून साफ केला असला तरी वरचा भाग तसाच सोडून दिला आहे.

"याप्रमाणे ज्यांनी श्रोतापन्नपदाचा लाभ करून घेतला आहे..... अशा लोकांचे चित्त, आत्मभाव, कर्मकांड आणि शंका या तीन भ्रममूलक विषयापासून एकदम मुक्त, हलके व गतिमान होत असते. तरीपण वरच्या विषयाबाबतीत त्याला विचारशक्तीच्या कार्यात अडचणी येतात. कारण त्याबाबत ते जड, विकृत आणि मंदच असते. ते का म्हणून? तर, ह्या तीन भ्रममूलक बाबी दूर झाल्या असल्या तरी बाकीचे क्लेश अवशिष्ट असल्यामुळे असे घडते. दुसऱ्या प्रकारचे चित्त हे असे आहे."

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

३) सकृदागामी व्यक्तीचे चित्त

"लालसा, द्वेष आणि मोह हे केवळ मोहमात्र राहिले आहेत. अशा सकृदागामी व्यक्तीचे चित्त पाच अवस्थांत एकदम हलके व गतिमान असते. परंतु यापेक्षा उंच अवस्थांत जड, विकृत आणि मंद असते कारण जीवनातील खालच्या दर्जाच्या पाच अवस्थांपर्यंत चित्त परिशुद्ध झालेले असते तरी वरच्या अवस्थांत क्लेश अजून शिल्लकच आहेत, हे असे घडते."

उदा. ज्याप्रमाणे वेळवांच्या रांजीतील वेळू कापून काढत असता पाच पेरांपर्यंत एकदम गुंतलेल्या शाखा प्रशाखा साफ केल्यामुळे तिथपर्यंत ओढून काढावयास मुळीच कठीन जाणार नाही. परंतु वरच्या शाखा प्रशाखा अजून रांजीत परस्परांत गुंतून असल्यामुळे तो भाग ओढून काढण्यास बरीच अडचण जाते. कां की, वेळू खाली पाच पेरांपर्यंत साफ केलेला असला तरी उरलेला वरचा भाग साफ न करता असाच सोडून देण्यात आला आहे.

"याप्रमाणेच ज्यांनी सकृदागामी पदाचा लाभ करून घेतला आहे.. त्यांचे चित्त जीवनातील पाच कनिष्ठ अवस्थांपर्यंत एकदम दृतगतीने विचार कार्य करीत असते का की येथे ते हलके आणि गतिमान असते. तरीपण यापेक्षा वरच्या अवस्थांत जड आणि मंदच असते. हे तिसऱ्या प्रकारचे चित्त समजावे."

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

४) अनागामी व्यक्तीचे चित्त

"ज्यांनी अनागामी नावाची वरची अवस्था गाठली, त्यांचे पाच बंधन आपोआप गळून पडतात आणि जीवनाच्या दहा अवस्थांपर्यंत त्यांचे चित्त एकदम साफ झालेले असते. म्हणून येथपर्यंत विचारशक्ती सुलभतेने व तत्परतेने कार्य करीत असे. परंतु याहीपेक्षा वरच्या भूमीत चित्तास कार्ये करावयास बऱ्याच अडचणी येतात. कारण येथे चित्तजड आणि मंद असते, का की दहा स्थानांपर्यंत चित्त एकदम परिशुद्ध झाले असले तरीपण वरच्या अवस्थेत क्लेश (चित्त मळ) अजून अवशिष्ट असतात."

उदा. ज्याप्रमाणे वेळवांच्या रांजीतील वेळू कापून काढत असता दहा पेरांपर्यंत समस्त शाखा प्रशाखा तोडल्यामुळे तिथपर्यंत ओढून काढावयास मुळीच कठीन जाणार नाही. परंतु वरच्या शाखा प्रशाखा अजून रांजीत परस्परांत गुंतून असल्यामुळे तो भाग ओढून काढण्यास बरीच अडचण जाते. कां की, वेळू खाली दहा पेरांपर्यंत साफ केलेला असला तरी उरलेला वरचा भाग साफ न करता असाच सोडून देण्यात आला आहे.

"याप्रमाणेच अनागामी अवस्था प्राप्त करणाऱ्या व्यक्तीचे चैतसिक दहा स्थानांपर्यंत चित्त दृतगतीने कार्य करण्यास त्यास कठीण जात नाही, परंतु यापेक्षा वरच्या भूमीत अत्यंत कठीण व मंद गतीने कार्य करणे भाग पडते. का की, दहा स्थानापर्यंत चित्त एकदमच परिशुद्ध झालेले असले तरी बाकीच्या वरच्या अवस्थांत अजून क्लेश शिल्लक राहिलेले आहेत असे अनागामीपदाचा लाभ करणारे व्यक्ती पुनः मानवी जगात कधीही येत नाही."

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

५) अर्हतपद प्राप्त व्यक्तीचे चित्त

"ज्यांनी अर्हतपदाचा लाभ करून घेतला आहे. ज्यांचे चारही आश्रव तुटून पडले, ज्यांचे क्लेश-मळ सर्वस्वी नाहीसे झाले, चित्त निर्मळ व स्वच्छ झाले, ज्यांचे ब्रह्मचर्य जीवन सफल झाले, अडचणीचे ओझे उतरले, कार्यसिद्धी पूर्ण झाली. ज्यांना सत्यज्ञानाचा साक्षात्कार झाला, ज्यांचे समस्त भवबंधने नष्ट होऊन चित्त पुर्णतः विशुद्ध झाले. श्रावकांनी मानवी जीवनात करावयाच्या किंवा समजूत घ्यावयाच्या बाबतीत ज्यांच्या चित्ताने सफलता प्राप्त केली आहे म्हणजे यांत ते हलके व तत्पर आहे. परंतु प्रत्येक बुद्धाच्या भूमी संबंधाने ते अजूनही जड व मंदच असते. श्रावकाच्या भूमिकेत त्याचे चित्त एकदम परिशुद्ध झाले असते, तरी प्रत्येक बुद्धाच्या भूमिकेसंबंधाने अजून शुद्ध झालेले नाही."

"उदा. वेळवाची संपूर्ण रांज तोडून एकदम साफ केली असता त्यातील कोणताही वेळू सहजपणे ओढून काढता येतो. त्याप्रमाणे अर्हतपद प्राप्त केलेल्या व्यक्तीचे असते. श्रावकाने मानवी जीवनांत करावयाच्या किंवा समजून घ्यावयाच्या बाबतीत त्यांचे चित्त एकदम हलके व दृतगतीने कार्य करणारे असले तरी प्रत्येक बुद्धाच्या भूमिकेत जड व मंद गतीनेच त्याला कार्ये करावी लागतात.

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

*_६) प्रत्येक बुद्धाचे चित्त_*

"सहाव्या प्रकारचे चित्त पाचही चित्ताहून वेगळे असते ते म्हणजे *प्रत्येक बुद्ध.* ते स्वतःचा आधार स्वयंमच असतात, त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची आवश्यकता नसते, त्यांचा कोणी गुरू किंवा आचार्य नसतो, त्यांचे वास्तव्य गेंड्याच्या शिंगाप्रमाणे एकट्याचेच असते, ते आपल्या जीवनात एकदम निर्मळ व परिशुद्ध झालेले असतात, त्यांच्यात कसल्याही प्रकारचा दोष नसतो."

त्यांचे चित्त स्वतः संबंधाने अतिशय हलके व गतिमान असते. परंतु सम्यक संबुद्धांच्या क्षेत्राच्या बाबतीत जड आणि मंदच असते. कारण, जरी ते प्रत्येक बुद्धाच्या विषयी बिलकुल, परिशुद्ध व निर्मळ असले तरीपण सर्वज्ञ बुद्धाचे क्षेत्र विशाल आहे, ते स्वतः प्रज्ञावंत असून दुसऱ्यांना देखील प्रज्ञेच्या मार्गाने नेतात ते सर्वज्ञ बुद्ध होत.

असे तरी का व्हावे, तर प्रत्येक बुद्ध स्वतःच्या क्षेत्रामध्ये एकदम निष्कलंक असले तरी सम्यक संबुद्धाचे क्षेत्र इतके विस्तृत असते की सामान्य बुद्ध तेथे पोहचूच शकत नाही. त्यांच्या चित्ताच्या कार्य शक्तिला तोड नाही.

"समजा एखादा माणूस आपल्या परिसरातील लहान ओढे किंवा लहान नदी तो स्वतःच्या इच्छेनुसार कधीही पार करतो. मग ती दिवस असो की रात्र असो त्याला कशाचीही भीती वाटत नाही; परंतु अत्यंत खोल, विशाल, अथांग आणि ज्यांचा किनारा दृष्टीस पडत नाही असा महान समुद्र जर त्याने पाहिला तर त्यास काय वाटेल? तो भयभीत होईल आणि पलीकडे जाण्याची हिम्मत सुद्धा चुकूनही करणार नाही. असेच प्रत्येक बुद्धाचे. कारण आपल्या क्षेत्रातील नदीशी तो पूर्णपणे परिचित आहे. परंतु महान समुद्र विशाल आहे. हाच चित्ताचा सहावा प्रकार होय."

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

*_७) सम्यक संबुद्धाचे चित्त_*

"सातव्या प्रकारचे चित्त या सहाही चित्ताहून पुर्णतः वेगळे असते. ज्यांनी सम्यक संबुद्धत्व प्राप्त केले. त्यांना जगातील सर्वच प्रकारचे ज्ञान असते, अर्थात ते सर्वज्ञ असतात. त्यांना दहा प्रकारची शक्ती लाभली असते. म्हणूनच ते दशबल या नावाने संबोधिले जातात. चार प्रकारच्या विशेष ज्ञानावर त्यांचा आत्मविश्वास असतो. बुद्ध धर्माची १८ लक्षणे त्यांचे अंगी असतात. त्यांचे इंद्रिये पूर्णतः ताब्यात असतात. त्यांच्या आकलन शक्तींपासून काहीही लपून राहू शकत नाही. अर्थात त्यांचे ज्ञान सर्वत्रगामी असते. समस्त क्षेत्रांत त्यांचे चित्त तेजस्वी आणि द्रुतगामी असते. कारण की, ते सर्वच प्रकारे एकदम परिपूर्ण व परिशुद्ध झालेले असते."

*बुद्धत्व प्राप्त केलेल्या लोकांचे चित्त सर्वच विषयात अत्यंत तीक्ष्ण व द्रुतगती असते. कारण ते सर्व प्रकारे परिपूर्ण व परिशुद्ध झालेले असतात. हाच चित्ताचा सातवा प्रकार होय.*

हे जे सातव्या प्रकारचे सम्यक संबुद्धांचे चित्त आहे, ते बाकी सर्व चित्तांपेक्षा सर्वच प्रकारे श्रेष्ठ असते. ते आपल्या अपरिमित गुणांमध्ये हलके व शुद्ध असे असते. त्यांचे चित्त इतके हलके आणि शुद्ध असल्या कारणानेच भगवान सम्यक संबुध्द दोन्ही प्रकारच्या ऋद्धिशक्ती दाखवू शकतात. यावरूनच त्यांच्या चित्ताची शुद्धता व हलकेपणा दिसून येते. याशिवाय त्या ऋद्धिशक्तीचे दुसरे कोणते कारण दिसत नाही. या ऋद्धिशक्तींची सुद्धा भगवान बुद्धाच्या चित्ताशी तुलना केली तर त्याही अत्यल्प वाटतात. तरीपण भगवान बुद्धाची सर्वज्ञाता 'आवर्जन' प्रतिबद्ध (इच्छा करताच सिद्ध होणारी) अशी होती. ज्या गोष्टी जाणून घ्यावयाच्या आहेत त्या क्षणात चिंतन (ध्यान) करून भगवान बुद्ध जाणून घेत असत, यातच त्यांची सर्वज्ञता होती.

बुद्धाची सर्वज्ञता प्रतिबद्ध असते. ज्या गोष्टीस ते जाणून घेऊ इच्छितात, ध्यान करून तत्काळ ते जाणून घेतात. परंतु केवळ त्यांनी ध्यान केले म्हणून त्यांच्यापाशी ज्ञानाचा तुटवडा होता असे समजू नये.

*_समाप्त_*

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

संदर्भ: *मिलिन्द प्रश्न* *मेण्डक प्रश्न*

संकलन : महेश कांबळे

🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 *_ॐ मणि पद्मे हूँ_* 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼 🌼

☸ ☸ 🦚 🦚 🦚 💎 ।।बोधिवृक्ष।। 💎 🦚 🦚 🦚 ☸ ☸

– राजेश चन्द्रा –

एकबार एक प्रसंग पर सारिपुत्त ने भगवान बुद्ध के सम्मुख कहा – भगवान, आप के जैसा न आज तक कोई हुआ है, न कोई होगा !

यह सुन कर भगवान ने कहा – सारिपुत्त, क्या मुझसे पहले के सारे बुद्ध तुमने देखे हैं?

सहमते हुए सारिपुत्त ने कहा – नहीं भगवान !

'तो क्या तुमने सारे भावी बुद्धों को देखा है?'

सारिपुत्त ने पुनः सहमते हुए कहा – नहीं भगवान !

भगवान ने कहा – फिर सारिपुत्त तुमने सिंहनाद जैसी यह घोषणा कैसे कर दी?

भगवान घोषणा करते हैं : मुझसे पहले भी बुद्ध हुए हैं, मुझसे बाद भी बुद्ध होंगे !

बौद्धगण बुद्ध वन्दना के समय एक गाथा का संगायन करते हैं :

ये च बुद्धा अतीता च ये च बुद्धा अनागता।

पच्चुपन्ना च ये बुद्धा अहं वन्दामि सब्बदा।।

– अतीत में जितने बुद्ध हो गये, उनको, जो भावी बुद्ध होंगे, उनको और जो बुद्ध वर्तमान में हैं – अहं वन्दामि सब्बदा– हम उन सब बुद्धों की वन्दना करते हैं।

हमारे वर्तमान कल्प के बुद्ध गौतम बुद्ध हैं। यह बुद्धों की परम्परा रही है कि वे अपने से पूर्व के बुद्धों का स्मरण करते हैं, उनका आख्यान करते हैं तथा भावी बुद्ध की घोषणा करते हैं।

त्रिपिटक के खुद्दकनिकाय के 'बुद्धवंश' नामक ग्रंथ में भगवान अपने से पूर्व के बुद्धों का विस्तृत आख्यान करते हैं। वे पूर्व के बुद्धों के नाम–धाम, कुल–गोत्र, वंश, माता–पिता इत्यादि का सविस्तार वर्णन करते हैं। यह भी वर्णन करते हैं कि मुझे पीपल के पेड़ के नीचे बुद्धत्व की उपलब्धि हुई है ऐसे पूर्व के बुद्धों को अलग–अलग कल्पों में अलग–अलग वृक्षों के नीचे बुद्धत्व की उपलब्धि हुई है। इसलिए पूर्व कल्पों में बोधिवृक्ष भिन्न–भिन्न रहे हैं।

भगवान दीपंकर बुद्ध को कपित्थन अर्थात कैथ के वृक्ष के नीचे बुद्धत्व की उपलब्धि हुई, इसलिए उनके कल्प में कैथ का पेड बोधिवृक्ष था |

भगवान कौंडिण्य बुद्ध को शालकल्याणि वृक्ष के आश्रय से बुद्धत्व की उपलब्धि हुइ इसलिये वह कौंडिण्य भगवान के कल्प में शालकल्याणि वृक्ष बोधिवृक्ष था |

प्रथक–प्रथक कल्पों में भगवान मंगल, भगवान सुमन, भगवान रेवत, तथा भगवान शोभित बुद्ध को नागवृक्ष की छांव में बुद्धत्व की उपलपब्धि हुई, इस हेतु से उक्त चारों बुद्धों के काल में नागवृक्ष बोधिवृक्ष था |

भगवान अनोमदस्सी बुद्ध, प्रियदर्शी बुद्ध के काल में ककुध अर्थात अर्जुन का पेड बोधिवृक्ष था |

भगवान पद्म तथा भगवान नारद बुद्ध के समय महासोण का पेड बोधिवृक्ष था |

पद्मोत्तर बुद्ध के कल्प में सरल अर्थात चीड का पेड बोधिवृक्ष था |

भगवान पुष्य बुद्ध के युग में नीप अर्थात कदंब का पेड बोधिवृक्ष था |

भगवान सुजात बुद्ध के काल में वेणु अर्थात वंश का पेड बोधिवृक्ष था |

भगवान अत्थदस्सी बुद्ध के काल में चंपक का पेड बोधिवृक्ष था |

धंम्मदस्सी बुद्ध के कल्प में कुरवट अर्थात भटकटैया के पेड को बोधिवृक्ष कहते थे क्यों की वह भगवान को इस पेड की छांव में बुद्धत्व की उपलब्धि हुई हैं |

सिद्धार्थ बुद्ध के युग में कणिकार का पेड बोधिवृक्ष था |

भगवान तिष्य बुद्ध के युग में असंन अर्थात पीतशाल का पेड बोधिवृक्ष था |

भैय्यासाहेबांनी बाबासाहेबांची अनेक स्मारके उभारली. १ ले स्मारक त्यांनी मुंबई येथे बांधले. या डॉ. आंबेडकर सभागृहाचे भूमिपूजन दि. २–४–१९५८ ला व उद्घाटन २२–६–१९५८ ला झाले. मुंबई नागरिकांच्या वतीने कफ परेड येथे बाबासाहेबांचा पुतळा बसविण्याचे ठरले. भैय्यायासाहेबांनी आग्रह धरला की २६ जानेवारी १९६२ रोजीच पुतळ्याचे अनावरण झाले पाहिजे. म्हणून शेवटच्या क्षणी कमी पडत असलेली रक्कम महापौरांना दिली व ठरल्याप्रमाणे २६ जानेवारी १९६२ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल प्रकाश यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. चवदार तळे क्रांतीचे स्मारक म्हणून जेथे मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. त्या जागेवर अशोक स्तंभाच्या धर्तीवर क्रांतिस्तंभ उभारण्यासाठीही यशवंतरावांनी पुढाकार घेतला. चैत्यभूमीच्या रूपाने बाबासाहेबांचे स्मारक व्हावे म्हणून भारतीय बौद्ध महासभेने दि. २०–३–१९५७ रोजी BMS(?) कडे ४० बाय ४० ची जागा मागितली BMS ने ८ बाय ८ ची जागा मंजूर केली. परंतु मागणीपेक्षा एक इंचही कमी जागा घेणार नाही असा पवित्रा भैय्यासाहेबांनी घेतला. अखेर BMS improvement committee ने ४० बाय ४० ची जागा मान्य केली. जोपर्यंत शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन (शेकाफे) आणि भारतीय रिपब्लिकन पक्ष (RPI) हे एकसंघ होते तोपर्यंत या स्मारकांना गती येत होती. जनताही आपला पै पैसा देत होती. जनता स्टेट बँकेसमोर रांगा लावून पैसे भरत होती. स्टेट बँकेत भरणा करावा म्हणून भय्यासाहेब कुलाबा ते दहिसर व कल्याण पर्यंत फिरफिर फिरले १९६६ साली डॉ. बाबासाहेबांचा ७५ वा वाढदिवस येत असल्यामुळे हा जन्मदिवस 'अमृत महोत्सव' म्हणून भव्य प्रमाणात साजरा करण्याचे भय्यासाहेबांनी ठरविले. या अमृत महोत्सव प्रसंगी डॉ. बाबासाहेबांचे जीवन कार्याचे प्रतीक म्हणून एक 'भीमज्योत' महूहून मुंबईला आणण्याचे ठरविले. २७–३–१९६६ रोजी ही भीम–ज्योत भारताचे तत्कालीन मजूर मंत्री जगजीवनराम यांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार दादासाहेब गायकवाड होते. भीम–ज्योत महूहून इंदूर, भोपाळ, हुशंगाबाद, बैतूल, नागपूर, पुलगाव, औरंगाबाद, येवला, नाशिक, हरेगावनगर(?), संगमनेर, देहूरोड, पुणे, सातारा, वणी(?), पाचगणी, महाबळेश्वर, खेड, मंडणगड, दापोली, महाड, पेण, पनवेल, कल्याण, ठाणे, मुलुंड, राजगृहवरून दादरच्या चैत्यभूमीला आली. ह्या भीमज्योतीदरम्यान मिळालेल्या धम्मदानातून चैत्यभूमी स्मारक उभारण्यात आले.

- _*संदेश कार्य : धम्म कार्यसंपादन करा*_

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर भय्यासाहेब भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष झाले. ‘भारत बौद्धमय करीन’ हा बाबासाहेबांचा संकल्प उराशी घेऊन भय्यासाहेबांनी काम सुरु केले. त्यांनी धम्मदीक्षेचे अनेक कार्यक्रम घेतले, धम्म परिषदा भरविल्या, धम्म मेळावे सर्वत्र होत होते. प्रचार सर्वत्र जोरात सुरू केला भय्यासाहेब आमदार असतांना त्यांनी विधानपरिषदेत नवबौद्धांच्या हक्कांबद्दल हिरीरीने बाजू मांडली तसेच या नवीन बौद्धांच्या सवलतीविषयी ते पंतप्रधान मोरारजी देसाईंना भेटले होते. भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी श्रीलंका, थायलंड, म्यानमार, सारनाथ व दिल्ली येथे झालेल्या जागतिक बौद्ध परिषदांमध्ये भारतीय बौद्धांच्या समस्या मांडल्या. खेड्यापाड्यातील बौद्ध विहारांचे उद्घाटन केले. १९६८ साली मुंबई येथे धम्म परिषद भरविण्यात आली व प्रमुख पाहुणे म्हणून दलाई लामा यांना बोलविण्यात आले. ह्या धम्म परिषदेमध्ये अनेक महत्त्वाचे ठराव पारित करण्यात आले. त्यात संस्कार विषयक आचार संहिता सर्वानुमते मान्य करण्यात आली. ‘बौद्ध जीवन संस्कार पाठ’ या नावाचे पुस्तक तयार करण्यात आले. धम्म प्रसार कार्याचा एक भाग म्हणून १९६७ मध्ये ११ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी भय्यासाहेबांनी स्वतः श्रामणेरची दीक्षा घेतली व त्या काळावधीत ते चैत्यभूमीतच राहत होते. त्यांचे नाव ‘महापंडित काश्यप’ असे ठेवण्यात आले होते. १९५९ मध्ये महास्थविर संघरक्षित लंडनहून आले होते. त्यांनी भय्यासाहेबांची भेट घेतली होती. महापुरुषाच्या पोटी जन्म घेऊन स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी किती कठोर परिस्थितीचा सामना करावा लागतो याचा प्रत्यय भैय्यासाहेब आंबेडकरांना निश्चितच आला होता. नव्हे संपूर्ण आयुष्यात ते ओझे घेऊन जगावे लागले असावे. जगाने ज्या महानावाच्या क्रांतीचा, विचारांचा आणि बुद्धीचा गौरव केला ते महामानव व्यक्तिमत्त्वाच्या पडताळणीचा आधार बनत असेल. अश्या परिस्थितीत स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कसे उभारायचे याचे दडपण निश्चितच भैय्यासाहेबांना होते. मोठ्या वृक्षाखाली पालव्या कोमेजून जातात तशीच परिस्थिती भैय्यासाहेबांवर ओढवली असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारस म्हणून किती दडपणाचा सामना भैय्यासाहेबांना करावा लागला. याचा विचार करून भैय्यासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाकडे बघितले गेले नाही.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आदर्श व्यक्तिमत्त्व होते. सामाजिक जाणीवेने त्यांच्या व्यक्तिमत्त्वात निर्माण केलेला वैचारिक हिमालय सामाजिक विषमता आणि अन्यायावर तुटून पडताना सहजच त्यांच्या स्वभावात काही वैशिष्ट्ये निर्माण होत गेली. त्यांचा स्वभाव तापट होता. पण तितकाच तो मृदूही होता. निश्चितच बाबासाहेबांना आपल्या मुलाकडूनही काही अपेक्षा होत्या. त्या लादलेल्या नसल्या तरी व्यावहारिकतेच्या परिप्रेक्षात परीस्थितिजन्य बदलाच्या होत्या. या अपेक्षांच्या दडपणामुळे बाबासाहेबांच्या तापटपणाचा सामना भैय्यासाहेबांना करावा लागला असेल हे निश्चितच. त्यामुळे भैय्यासाहेबांच्या व्यक्तीमत्त्वावर त्याचाही प्रभाव जाणवायचा. भैय्यासाहेब कधीही प्रखर नव्हते. भैय्यासाहेबांचा स्वभाव शांत होता. शिवाय शारीरिक व्याधीमुळेसुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकला होता. संधिवाताचा सामना करतांना सोसावे लागलेले दुःख त्यांनी कधी सामाजिक जीवनात उतरू दिले नाही. परंतु काही समाजकंटकांनी त्यांच्या या आजाराचे भांडवल करून भैय्यासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

- हजारो शोषित–पिडीत–मागास वर्गाच्या उत्थानासाठी जगतांना बाबासाहेबांनी कधी मुलांच्या आजाराकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी समाजासाठी दिलेल्या या बलिदानाचे बळी त्यांची इतर मुलेही ठरली. भैय्यासाहेब हे बाबासाहेबांचे एकमेव वारस होते जे जगले. हे दडपण पेलून धरतांना भैय्यासाहेबांनी एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व निर्माण केले. कदाचित ते असामान्य नसेलही परंतु शांत, चिंतनशील, सहनशील, वैचारिक असे गुणवैशिष्ट्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वात निश्चितच होते. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पडतांना त्यांच्या शांत व्यक्तिमत्त्वाचा निश्चितच लाभ झाला. ज्यामुळे भारतीय बौद्ध महासभेचा त्यांच्या कार्यकाळात अनेक राज्यांमध्ये व्याप वाढू लागला. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर भैय्यासाहेब आंबेडकरांनी यासाठी कधी हट्ट धरला नाही. किंवा कुठलेही पद घेतले नाही. बाबासाहेबांचा राजकीय वारस म्हणून स्वतःला कधी समोर केले नाही. सदैव इतरांना पुढे करून त्यांना समर्थन देऊन स्वतः मात्र आयुष्यभर धम्माचे काम करीत राहिले. धम्म कार्यात स्वतःला वाहून घेतले. आजच्या आधुनिक पिढीला आणि जे स्वतःला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणवून घेतात त्यांच्यासाठी भैय्यासाहेबांचे व्यक्तिमत्व आदर्श ठरावे असेच होते.

- भैय्यासाहेबांनी राजकीय स्वार्थाचा त्याग केला. धम्मकार्य केले तरीही काहींनी त्यांना बदनाम करण्याचे सोडले नाही. आज भारतात बौद्धांची संख्या वाढलेली आहे. ती भैय्यासाहेबांनी केलेल्या प्रयत्नांचाच परिपाक आहे. १९६२ ला भैय्यासाहेबांचा ५० वा वाढदिवस साजरा केला गेला होता. तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ दादासाहेब गायकवाडांनी काढलेले गौरवोद्गार अतिशय बोलके आहे. दादासाहेब गायकवाड म्हणाले होते, ‘भैय्यासाहेब माझ्यासारख्या आंधळ्यांची काठी आहेत.’ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वारसत्व लाभलेले भैय्यासाहेब चळवळीत इतरांचे काठी बनले. चळवळीत इतरांना सहकार्य केले. चळवळीला दिशा देण्याचे काम केले. पण कधीही स्वतःचे नेतृत्व समाजावर लादले नाही. नेतृत्व संघर्षापासून सदैव स्वतःला अलिप्त ठेवले. भैय्यासाहेब हे दादासाहेब गायकवाडांच्या खांद्याला खांदा लावून सदैव त्यांच्या पाठीशी राहिले.

- भैय्यासाहेब आंबेडकर हे बाबासाहेबानंतरचे एकमेव नेते होते, जे समाजासाठी व धम्मकार्यासाठी जगले. ज्यांनी स्वतःचा स्वार्थ कधीच बघितला नाही. राजकीय लालसा कधी बाळगली नाही. सत्तेच्या मोहजाळातून अलिप्त राहिले. टीकाकारांना उत्तरे न देता शांत राहून अप्रत्यक्ष उत्तरे देत राहिले. कुणाच्याही विरुद्ध भूमिका न घेता, कुणावर टीका करीत न बसता भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून धम्माची जबाबदारी पार पाडत राहिले. भैय्यासाहेबांनी

स्वतःसोबत मीराताई आंबेडकरांनाही धम्मकार्यात वाहून घेतले. इतकेच नाही तर भैय्यासाहेबांनी त्यांच्या मुलांवर केलेल्या संस्काराचाच परिणाम म्हणून आजही त्यांची मुले बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर, भीमराव आंबेड्कर व आनंदराज आंबेडकर स्वतःच्या कर्तृत्वाने या समाजात स्वतःचे स्थान निर्माण करीत आहेत. पण कधीही त्यांनी बाबासाहेबांचे वारस म्हणून संपूर्ण समाजाचे आम्हीच नेते असा आव आणला नाही. हा भैय्यासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या मुलांवर केलेल्या संस्काराचाच परिणाम म्हणावा लागेल. भैय्यासाहेब हे समाजासाठी, आंबेडकरी चळवळीसाठी केलेले त्यागाचे प्रतीक आहेत.


बौद्धचार्याचे जनक, चैत्यभूमीचे शिल्पकार, सुर्यपूत्र यशवंत (भैय्यासाहेब) आंबेडकर यांच्या जयंतीदिनी १२ डिसेंबर विनम्र अभिवादन !!!

🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏🙏

🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵🏵

! जयभीम !   !! जयभारत !!   !!! नमोबुद्धाय !!!





☸☸🦚🦚🦚💎*#संविधान_जागर*💎🦚🦚🦚☸☸

#भारतीय_संविधान

भाग तीन-- मूलभूत हक्क

अनुछेद २० अपराधाबद्दलच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण--

१) जे कृत्य अपराध असल्याचा दोषारोप करण्यात आला असेल ते कृत्य एखाद्या व्यक्तीने करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याचा त्यामुळे भंग झाल्याखेरीज अशा कोणत्याही अपराधाबद्दल ती व्यक्ती दोषी ठरवली जाणार नाही तसेच तो अपराध करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याखाली जी शिक्षा करता आली असती त्यापेक्षा अधिक शिक्षेस ती पात्र ठरवली जाणार नाही.

२) एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा कोणत्याही व्यक्तीवर खटला चालवला जाणार नाही आणि तिला शिक्षा दिली जाणार नाही.

३) कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर स्वतःविरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती केली जाणार नाही.

#अनुच्छेद २१) जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण– कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित ठेवले जाणार नाही.

[२१ क. शिक्षणाचा हक्क–

राज्य सहा ते चौदा वर्ष वयाच्या सर्व बालकांसाठी, राज्यास कायद्याद्वारे निर्धारित करता येईल अशा रीतीने मोफत व सक्तीचे शिक्षणाची तरतूद करील.]

अनुच्छेद २२ विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धता यापासून संरक्षण–

१) अटक झालेल्या कोणत्याही व्यक्तीस अशा अटकेची कारणे, शक्य तितक्या लवकर तिला कळवल्याशिवाय, हवालातीत स्थानबद्ध करण्यात येणार नाही किंवा आपल्या पसंतीच्या विधीव्यवसायीचा विचार घेण्याचा व त्याच्याकरवी बचाव करण्याचा हक्क तिला नाकारला जाणार नाही.

२) जिला अटक केली आहे या हवालातीत स्थानबद्ध केले आहे अशा प्रत्येक व्यक्तीला, अटकेच्या ठिकाणापासून सर्वात जवळच्या दंडअधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासात आवश्यक असलेला अवधी वगळून अशा अटकेपासून चोवीस तासांच्या कालावधीत त्या दंडअधिकाऱ्यांपुढे हजर केले जाईल आणि अशा कोणत्याही व्यक्तीला दंडधिकाऱ्याने प्राधिकृत केल्याशिवाय उक्त कालावधीनंतर अधिक काळ हवालातील स्थानबद्ध करता करण्यात येणार नाही.

३) (क) जी व्यक्ती त्यावेळी शत्रूदेशीय असेल अशा कोणत्याही व्यक्तीला; किंवा (ख) ज्या व्यक्तीला प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली अटक केली आहे किंवा स्थानबद्ध केले आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, खंड (१) व (२) यामधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

४) प्रतिबंधक स्थानबद्धतेची करणारा कोणताही कायदा, (क) ज्या व्यक्ती उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश आहेत, किंवा न्यायाधीश झालेल्या असतील किंवा न्यायाधीश म्हणून नियुक्त केल्या जाण्यास पात्र आहेत, अशा व्यक्तींनी मिळून बनवलेल्या सल्लागार मंडळाने, उक्त तीन महिन्याच्या कालावधीत संपण्यापूर्वी त्यांच्या मते अशा स्थानबद्धतेला पुरसे कारण आहे, असा अहवाल दिलेला नसेल तर : परंतु असे की, या उपखंडातील कोणतीही गोष्ट खंड (७) च्या उप–खंड (ख) अन्वये संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे विहित केलेल्या कमाल कालावधीच्या पलीकडे कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध केले जाण्यास प्राधिकृत करणार नाही; किंवा (ख) अशा व्यक्तीला, खंड (७) च्या उप–खंड (क) व (ख) अन्वये संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीनुसार स्थानबद्ध केले नसेल तर, तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध केले जाण्यास प्राधिकृत करणार नाही.

(५) जेव्हा प्रतिबंध स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याअन्वये दिलेल्या आदेशानुसार कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल तेव्हा, आदेश देणारा प्राधिकारी, ज्या कारणावरून तो आदेश दिला गेला आहे ती कारणे, शक्य तितक्या लवकर, अशा व्यक्तीला कळवील आणि त्या आदेशाविरुद्ध आपले अभिवेदन करण्याची तिला लवकरात लवकर संधी देईल.

(६) खंड (५) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, त्या खंडात निद्रेष्ट केलेला असा कोणताही आदेश देणाऱ्या प्राधिकार्यास जी तथ्य प्रकट करणे सार्वजनिक हिताच्या विरोधी वाटेल ती तथ्य प्रकट करण्यास अशा प्राधिकऱ्यास भाग पाडण्यात येणार नाही.

(७) संसदेस –

(क) खंड (४) च्या उप–खंड (क) च्या तरतुदीनुसार सल्लागार मंडळाचे मत न घेता, प्रतिबंध स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्यान्वये तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी ज्या परिस्थितीत आणि प्रकरणाच्या ज्या वर्गात किंवा वर्गामध्ये, एखाद्या व्यक्तीस स्थानबद्ध करता येईल, ती परिस्थिती व प्रकरणाचा वर्ग किंवा प्रकरणाचे वर्ग;

(ख) प्रतिबंध स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही एका व अनेक वर्गातील प्रकरणी, कोणत्याही व्यक्तीस जितका काळ स्थानबद्ध करता येईल तो कमाल कालावधी; आणि (ग) खंड (४) च्या उपखंड (क) याखालील चौकशीत सल्लागार मंडळाने अनुसरवयाची, कार्यपद्धती कायद्याद्वारे विहित करता येईल.

#रिपब्लिकन बहुजन आघाडी

आंबेडकरी चळवळीचा बुलंद आवाज. *#किशोर मनोहर कांबळे*

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 स्तूप, स्तुपाचे प्रकार, व स्तुपाचे महत्व. 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

स्तुपाची निर्मिती :–

सुरुवातीला एकूण नऊ स्तुपाची निर्मिती करण्यात आली होती त्या पैकी आठ स्तूप हे बुद्धाच्या शरीर धातू वर आणि नववा स्तूप ज्या पात्राने अस्थी चे वाटप केले होते त्या पात्रावर निर्माण करण्यात आला. ते अश्या प्रकारे १. राजग्रह स्तूप, २. वैशाली स्तूप, ३. कपिलवस्तू स्तूप, ४. अलाकप्पा स्तूप, ५. रामग्रामा स्तूप, ६. पावा स्तूप, ७. कुशीनगर स्तूप, ८. वेथाडीपीपा स्तूप, ९. पिप्रहवा स्तूप.

म्हणजे स्तूपाची संकल्पना बुद्धांच्या अस्थीचे जतन करणे व संवर्धन करणे होय.

बुध्दाच्या जीवनात ज्या मुख्य पाच घटना घडल्या त्यावर पाच मुख्य स्तूप बांधण्यात आले.

१. बुध्दाचा जन्म : लुबिनी, २. गृहत्याग : कपिलवस्तु, ३. संबोधी : गया, ४. प्रथम धम्म चक्क प्रवर्तन : सारनाथ (The Turning of wheel of Dhamma)., ५. महापरीनिर्वाण : कुशीनारा

सम्राट अशोक राजाला सात स्तुपातील अस्थी मिळविन्यात यश आले, परंतु ८ व्या स्तुपातील अस्थी मिळवू शकले नाही तो म्हणजे रामाग्राम स्तूप. रामाग्रामच्या नाग लोकांनी सम्राट अशोक यांना अस्थी देण्यास नकार दिला होता इतकेच नाही तर जर जबरदस्ती करत असाल तर आम्ही युद्ध करू, परंतु सम्राट अशोक यांनी कलिंगच्या युद्धा नंतर परत कधीही युद्ध करणार नाही असा निच्चय केला होता, म्हणून अस्थी नाही मिळाल्या तरी चालेल पण युद्ध नक्को अशी सम्राट अशोक राजांनी भूमिका घेतली व उर्वरित ७ स्तूपा मधील अस्थी एकत्र करून त्याची विभागणी सोनेरी स्तूप सांची येथे करून त्यावर सम्राट अशोक राजाने ८४००० स्तुपाची निर्मिती केली.

स्तुपाचे प्रकार : स्तुपाचे एकूण चार प्रकार आहेत.

१. शारीरिक स्तूप :– बुद्धाच्या अस्थी धातू वर निर्माण करण्यात आलेल्या स्तुपाला शारीरिक स्तूप म्हणतात.

२. परिभोगीका स्तुप :– ऑब्जेक्ट स्तूप, बुध्दांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वापरलेल्या वस्तु व त्यावर निर्माण करण्यात आलेल्या स्तुपाला परिभोगिका स्तुप किंवा ऑब्जेक्ट (Object) स्तुप म्हणतात.

३. कॉममोमोरॅटिव्ह स्तुप, सिंबॉलिक स्तुप, किंवा उद्देशिका स्तुप :– बुध्दांच्या जीवनात ज्या–ज्या घटना घडल्या व जिथे–जिथे घडल्या. बुध्दांनी ज्या–ज्या ठिकाणी प्रवचन दिले किंवा धंम्मोपदेश दिला त्या ठिकाणावर जे स्तूप निर्माण केले त्याला सिंबॉलिक स्तुप किंवा उद्देशिका स्तुप म्हणतात.

४. वोटिव्ह (ईच्छा) स्तुप :– आपल्या दैनंदिन जीवनात जेव्हा आपण वरील स्तुपात जाऊ शकत नाही त्या करिता पूजेचे स्थान निर्माण केले जाते व त्यावर स्तुप निर्माण केल्या जाते त्याला वोटिव्ह स्तुप किंवा इच्छा स्तुप असे म्हणतात. असे स्तुप बहुधा केणीमधे निर्माण केले जाते.

स्तुपाची विभागणी :– स्तुप एकूण आठ (८) गटामधे विभागले आहेत.

१. जोथा :– जोथा म्हणजे स्तुपाचा पाया किंवा खालचा भाग ह्याला कधी–कधी तीन रिंग असतात. म्हणजे ही मानवाची प्राथमिक अवस्था आहे. बुद्ध म्हणतात की, मी सुद्धा तुमच्या सारखाच आई–वडिलांच्या पोटी जन्माला आलो.

२. मेधी :– हा जोथाच्या वरचा भाग उंच असतो. म्हणजे परिश्रमाणे सर्वसाधारण व्यक्ती इतर व्यक्तींपेक्षा श्रेष्ठ होऊ शकतो.

३. वेदिका :– मेधीच्या वरचा भाग त्याला वेदिका असे म्हणतात. म्हणजे चारिका करणे किंवा चालणे.

४. वेदिका पट्टी :– वेदिकेच्या वरचा भाग याला रेलिंग (कठडा) असतात. हा भाग चक्रमण करण्याकरिता उपयोगात येतो. म्हणजेच अत्यंत परिश्रम करणे.

५. अंड :– वेदिकेच्या वरचा भाग, हा गोलाकार असतो त्याला अंड असे म्हणतात. हा खूप खडतर प्रवास आहे, अतिशय कठीण आहे. दृढ निश्चय केला तरच हा प्रवास सफळ होतो.

६. हार्मिका :– हा अंडच्या वरच्या भागावर हार्मिका असतात. त्या एकावर एक असे पाच हार्मिका असतात. म्हणजे बुध्दांनी पाच अवस्था प्राप्त केल्या आहेत त्या पुढील प्रमाणे आहेत.

१. श्रोतापंन्ना :– ऐकण्याची क्षमता. २. सकृदागामी :– ग्रहण करण्याची क्षमता. ३. अनागामि :– योग्य मार्गदर्शन करण्याची क्षमता. ४. अर्हंत :– वरील तीन प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर अर्हंतपदापर्यंत पोहोचता येते. ५. बोधिसत्त्व :– वरील चार अवस्था पूर्ण केल्यानंतर सिद्धार्थ बोधिसत्त्व होतात. ६. यष्टी :– हा हार्मिकेच्या वरचा भाग की जो छत्रावलीला धरून (पकडुन) राहतो. यष्टीच्या साहाय्याने बुद्ध संम्यक संबुद्ध होण्याच्या मार्गावर आरूढ होत आहेत. ७. छत्रावली :– हा स्तुपाचा सर्वात उंच व शेवटचा भाग होय. वरील सर्व पद्धती पूर्ण केल्यानंतर सिद्धार्थ गौतम संम्यक संबुद्ध झाले म्हणजे बुद्ध झाले.

अशा प्रकारचा परिपूर्ण स्तुप आपणाला कार्ले बुद्ध लेणीवर बघायला मिळतो.

सध्या परिस्थितीत उपलब्ध असलेले भारतातील (जंबुद्विप) स्तुप :– पुढीलप्रमाणे आहेत.

१. सांची स्तुप :– सांची स्तुप हा मध्यप्रदेश मधे असून भोपाळ पासून २५ कि.मी. अंतरावर आहे. हा स्तुप सम्राट अशोक राजाने निर्माण केलेला आहे. त्याचे उत्खनन केले असता, तेथे बुद्धांचे शिष्य सारिपुत्त आणि महामोग्गलायंन यांच्या अस्थी मिळाल्या आहेत. १९८९ ला या स्तूपाला वर्ल्ड हेरिटेजचा दर्जा मिळाला आहे. याचा शोध जेव्हा मध्य प्रदेश मधून भीमा कोरेगावच्या युद्धाला मदत करण्याकरिता एक बटालियन निघाली होती. परंतु युद्धाचा शेवट दुसऱ्याच दिवसी झाल्यामुळे ते परत जात असता एके ठिकाणी थांबले व दुसऱ्या दिवशी एका टेकडीवर शिकारीला गेले असता तिथे त्यांना काही मानवनिर्मित भाग दिसून आला त्याचे उत्खनन केले असता सांची स्तुपाचा शोध लागला.

२. द ग्रेट स्तुपा ऑफ अमरावती :– हा स्तूप ई. स. पूर्व (३) तिसरे शतकात सम्राट अशोक राजाने निर्माण केला आहे. याचा बराच भाग नष्ट झाला आहे. त्याचे काही शिल्प आणि कला मद्रास musium (संग्रहालय) मधे सुरक्षित ठेवले आहेत. १७९७ मधे ब्रिटिश आरकियोलॉजिस्ट मेजर कोलोनेल मॅकेंझी (Mackenze) यांनी त्याचा शोध लावला व त्याचा आराखडा (प्लॅन) तयार केला.

३. धंम्मेक स्तुप :– हा स्तुप सारनाथ येथे असून सम्राट अशोक राजाने निर्माण केला आहे व मेजर जनरल सर अलेक्झांडर कनिंघम यांनी स्वतःचे रुपये खर्च करून १८३७ मधे उत्खनन केले व त्याचा शोध लावला. याच ठिकाणी बुध्दांनी आपल्या पाच (५) भिक्खुंना (पंचवर्गीय भिक्खुंना) प्रथम उपदेश दिला.

४. चौखंडी स्तुप :– हा स्तुप सम्राट अशोक राजाने निर्माण केला आहे. हा स्तूप चौरस असून त्याला आठ (८) बाजू आहेत. याच ठिकाणी जे पाच (५) मित्र होते ते बुद्धांना सोडून गेले होते. आठ (८) बाजू म्हणजे आर्य अष्टांगिक मार्गाचे प्रतिक आहे. हा स्तूप सारनाथ जवळ आहे.

५. बहरूत स्तुप :– बहरुत स्तुप हा सतना मध्यप्रदेश येथे आहे. हा स्तूप ई. स. पूर्व (३) तिसऱ्या शतकात सम्राट अशोक राजाने निर्माण केला. हा स्तूप सम्राट अशोकाने प्रथम निर्माण केला. हा स्तूप बराच नष्ट झाला असून त्याचे काही भाग कलकत्ता संग्रहालय येथे सुरक्षित ठेवले आहेत. या स्तुपाचे संवर्धन सम्राट शुंगने ई. स. पूर्व दुसऱ्या (२) शतकात केले. आता तिथे केवळ काही अवशेष शिल्लक आहेत. याचा शोध सर अलेक्झांडर कंनिंघमने १८७३ मधे लावला. येथे काम करण्याकरिता व शिल्प कलकत्ता संग्रहालयामधे ने आण करण्याकरिता इंग्रज सरकारने रेल्वे (रेल्वे सेवा) लाईन टाकली (सुरू) होती.

६. केसारिया बुद्ध स्तूप :– केसारिया स्तुप हा बिहार मधे आहे, याच ठिकाणी बुद्धांचे मह परिनिर्वाण झाले. हा स्तूप सम्राट अशोक राजाने ई. स. पूर्व तिसऱ्या (३) शतकात निर्माण केला. कोलोनेल मॅकेन्झी यांनी १८१४ मधे याचा शोध लावला परंतु सर अलेक्झांडर कंनिंघम यांनी १८६१–६२ मधे उत्खनन करून याच ठिकाणी बुद्धांचे महापरिनिर्वाण झाले ते सिद्ध केले.

७. देऊर कोठार बुद्ध स्तूप किंवा सोनारी स्तूप :– हा स्तूप मध्यप्रदेश मधे आहे. हा स्तूप सम्राट अशोक राजाने निर्माण केला आहे व याच ठिकाणी सम्राट अशोक यांनी (८४०००) चौर्यांशी हजार बुद्ध अस्थी धातूंची वाटणी केली होती.

८. महाबोधि महविहार किंवा महाबोधि स्तुप :– महाबोधी महाविहार याच ठिकाणी बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली. सम्राट अशोक राजाने प्रत्यक्ष तेथे हजर राहून या महविहाराची निर्मिती केली. याच ठिकाणी संयाम देशाचे तपस्सू आणि भल्लिक यांना बुध्दांनी केस धातू दान दिले. सर अलेक्झांडर कंनिंघम यांनी १८८८ ला भेट दिली व बुद्धांचे वज्रासन शोधून काढले.

९. भाविकोंडा बुद्ध स्तूप किंवा महा स्तूप :– हा स्तूप सम्राट अशोक राजाने निर्माण केला, या स्तूपाचे जेव्हा उत्खनन करण्यात आले तेव्हा बौंस, पॉट, मंजुषा, जेम्स व कॉइन्स मिळाले. हा स्तूप आंध्रप्रदेश मधे आहे.

१०. देवणी मोरी स्तूप :– हा स्तूप गुजरात मधे आहे. या ठिकाणी बुद्धांच्या अस्थी मिळाल्या व त्या महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठ येथे सुरक्षित ठेवल्या आहेत.

११. पवणी स्तुप :– हा स्तूप भंडारा जिल्ह्यात आहे. विदर्भात बौद्ध धंम्माचे एक महत्त्वाचे ठिकाण होते. तसेच याला व्यापारिक महत्त्व होते. तसेच ते दक्षिण भारत व उत्तर भारतला जोडण्याचे मध्यवर्ती ठिकाण होते. येथे सातवाहन सम्राट सातकर्णी यांचे नाणे येथे उत्खनन केले असता मिळाले. येथिल काही शिल्प राष्ट्रीय (नॅशनल) संग्रहालय दिल्ली व मुंबई येथे सुरक्षित ठेवले आहेत. अजून बरेच शिल्प इतस्थतः विखुरले आहे. स्तूपावर अतिक्रमण करून जगन्नाथ मंदिर निर्माण केले आहे.

स्तूपाची निर्मिती ई. स. पूर्व तिसरे (३) शतकात झाली त्याचा परिघ (डायमीटर) ३८.१० मीटर आहे. विदर्भातील नाग राजा मुच्चलिंद याला जेव्हा बुद्धांचे महापरिनिर्वाण झाल्याची बातमी समजली तेव्हा तो कुशिणाराला बुद्धांच्या अस्थी मिळविण्याकरिता निघाला, जेव्हां तो तिथे पोहोचला तेव्हा बुद्धांच्या अस्थींचे विभाजन झाले होते. ज्या ठिकाणी बुद्धांना अग्नी देण्यात आला त्या ठिकाणावर तो गेला व त्याने हाताने सर्व माती गोळा केली, त्यामधे त्याला दंत धातु अस्थी मिळाल्या व त्या दंत धातु अस्थीवर हा पवणी स्तुप निर्माण केला.

१२. सुलेमान टेकडी स्तुप :– हा स्तूप पवणी स्तूपापेक्षा मोठा आहे. त्याचा परिघ (डायमीटर) ४१.६ मीटर आहे व हा पवणी येथे आहे. यालाच चांड कापूर स्तुप असे सुद्धा म्हणतात.

१३. हरदोलाल टेकडी स्तूप :– हा स्तूप पवणी येथे आहे. याचे उत्खनन केले असता एक मोठे दगडी शिल्प मिळाले व ते नागपूरच्या संग्रहालयामधे सुरक्षित आहे. तसेच पवणीला एक किल्ला सुद्धा आहे.

१४. सोप्पारका स्तुप :– हा स्तूप नालासोपारा येथे आहे. एप्रिल १८८२ ला पंडित भगवाणदास ईद्राजी यांनी या स्टुपाचे उत्खनन केले असता स्टोन कास्केट, गोल्ड कास्केट, शिल्प तसेच आठ (८) बुद्धांच्या भिक्षापात्राचे तुकडे मिळाले व काही सोन्याची फुले मिळाले ते एसियाटिक सोसायटी ऑफ इंडिया मुंबई येथे सुरक्षित आहेत. तर सम्राट अशोकचा नऊवा (९) शिळालेख संग्रहालयामधे सुरक्षित आहे. सोपारा एक बौद्ध धंम्माचे व तसेच व्यापारी केंद्र होते, येथूनच सम्राट अशोक राजाने आपली मुलगी संघमित्रा हिला बोधगया येथील बोधिवृक्षाची (पिंपळ) फांदी सुवर्ण पात्रात स्वतःच्या हाताने देऊन सिलोनला (श्रीलंका) धंम्म प्रचाराकरिता रवाना केले.

१५. घारापुरी बुद्ध स्तूप :– दिनांक २० फेब्रुवारी, २०२२ या दिवसी महाराष्ट्रातील विविध ठिकाणावरून आलेले जवळपास १५० एकशे पन्नास लोकांनी घारापुरी मौर्य काळीन प्राचीन स्तुपाला भेट दिली व स्तुपाचे महत्त्व हे जाणून घेतले. प्रशांत माळी यांनी लेणी संवर्धन कसे आवश्यक आहे हे समजाऊन सांगितले. मुकेश जाधव यांनी आलेल्या लोकांचे आभार व्यक्त केले तर रविंद्र सावंत यांनी घारापुरी स्तुपाबद्दल विस्तृत माहिती दिली, राहुल जाधव यांनी सम्राट अशोक यांचे काढलेले सुंदर रेखांकन ABCPR ला भेट दिले तर पुणे येथून आलेले अनिल नन्नावरे यांनी बुद्ध स्तुपाची प्रतिकृती प्रशांत माळी यांना भेट दिली तसेच आम्ही भारतीयच्या संघमित्रा बारसाकडे यांनी चित्रीकरण केले. एलिफंटा केव्ह हे वर्ल्ड हेरिटेज आहे. परंतु याच ठिकाणी दोन–तीन २–३ की. मी. अंतरावर मौर्य काळीन स्तुप आहे. जेव्हा पोर्तुगिज लोक महाराष्ट्रात आले तेव्हा ते लोक लेणिंवर सराव करायचे. परंतु जेव्हा इंग्रज लोक आले त्यांनी मात्र भारतातील प्राचीन बौद्ध वारसा यांचा शोध लावला, या स्तुपाचे त्यांनी उत्खनन केले नाही, परंतु undisclosed बुद्धिस्ट मोण्युंमेंट म्हणून नोंद केली. हे ठिकाण अरबी समुद्रच्या किनाऱ्यावर आहे. येथून JNPT बंदर जवळ आहे यांचे उत्खनन होणे बाकी आहे.

१६. पुषागिरी बुद्ध स्तुप :– हे बुद्धिस्ट मॉनेस्ट्री आहे. ओडिसा मधे पुरी जिल्ह्यात आहे. बुद्ध धंम्माचे एक महत्त्वाचे केंद्र होते. त्याचप्रमाणे ललितगिरी, रत्नागिरी व उदयगिरी येथे मोठ्या प्रमाणात मॉनेस्ट्री होत्या ते सम्राट अशोक राजाने निर्माण केले होते.

चायनीज प्रवासी क्युअनझांग यांनी ६ व्या शतकात भेट दिली असता येथे मोठ्या प्रमाणात संघाराम होते अशी नोंद केली होती. १९९० ला उदयगिरीच्या लंगुडी हिलचे उत्खनन न केले असता पुष्प सभर गिरिया अशा प्रकारचा शिळालेख मिळाला होता म्हणून याला पुष्पगिरी हे नाव दिले गेले हे एक प्राचीन विद्यापीठ होते.

१७. कोल्हापूर स्तुप :– येथे प्राचीन मौर्य काळीन प्राचीन स्तूप होता. ई. स. पूर्व तिसरे (३) शतकात बौद्ध धंम्माचे एक महत्वपूर्ण ठिकाण होते. येथे १३५ वर्षांपूर्वी उत्खनन न केले असता बुद्धांच्या अस्थि मिळाल्या होत्या, त्या कुठे आहेत याचा शोध लागत नाही. तसेच मिरज हे सुद्धा बौद्ध धंम्माचे प्राचीन केंद्र होते.

१८. भोंन स्तुप :– हा मौर्य काळीन स्तुप असून बुलढाणा जिल्ह्यात शेगाव जवळ आहे. ई. स. पूर्व तिसऱ्या (३) शतकात हे ठिकाण बौद्ध धंम्माचे एक महत्त्वपूर्ण ठिकाण होते. येथे उत्खनन न केले असता सातवाहन काळीन ५ नाणे मिळाले. सध्या येथे स्तुपावर शेती करतात तर काही भागावर भोंन गावची वस्ती आहे.

१९. अंगुलीमाल स्तुप :– हा स्तूप मध्यप्रदेश मधे आहे. या स्तुपाचे उत्खनन १८६३ मधे करण्यात आले. याच ठिकाणी अंगुलीमाल आणि बुद्ध यांची भेट झाली व अंगुलीमाल यांना भिक्खु संघात समाविष्ट करण्यात आले.

२०. अनाथपिंडिक (सुदत्त) स्तुप श्रावस्ती :– हा स्तूप अनाथपिंडिक (सुदत्त) यांनी निर्माण केला. हा कॉममो मोरेटिव्ह स्तुप आहे. अनाथपिंडिकाने (सुदत्ताने) बुद्धांना व भिक्खु संघाला जेवणाचे निमंत्रण दिले होते ते याच ठिकाणी.

२१. महास्तुप नेला कोंडा पल्ली :–हा स्तूप खंम्मान जिल्हा, तेलंगणा येथे आहे. हे एक प्राचीन बुद्धिजमचे महत्वाचे ठिकाण होते. तसेच हे एक मंडळाचे मुख्यालय होते. येथे प्राचीन मानवनिर्मित लोक आहेत. तसेच येथे उत्खनन न केले असता १०० प्राचीन नाणे मिळाले. तसेच १९७६ ते १९८५ उत्खनन केले असता हा स्तुप ५४" फूट उंच आहे. ८४" फूट आतील परिघ (daimetre) व बाहेरील १३८" फूट आहे. येथेसुद्धा नाणे, एर्थान वेअर (earthan ware) मिळाले व ते विजयवाडा संग्रहालयामधे सुरक्षित आहेत. सम्राट सातवाहन यांनी या स्तुपाला अति भव्य बनविले.

२२. सिलिगुरि बुद्ध स्तुप :– वेस्ट बेंगॉल मधील हे एक अलीकडील मॉनेस्ट्री (earliest monestry) आहे. दलाई लामाने निर्माण केली आहे याची उंची १००" फूट आहे.

२३. अनेगुट्टी बुद्ध स्तुप :– हा स्तुप संन्नती स्तुपाच्या उत्तरेला २ की. मी. अंतरावर आहे. येथे मोठ्या प्रमाणात हत्तीचे शिल्प दान दिल्याची नोंद आहे व संन्नती स्तुपाच्या संरक्षणाकरिता निर्माण केला गेला आहे. हा स्तुप सम्राट सातवाहन यांनी निर्माण केला आहे.

२४. संन्नती महास्तुप :– कनगनाहल्ली स्तुप सम्राट अशोक राजाने निर्माण केला आहे. हा स्तुप गुलबर्गा, कर्नाटक येथे आहे. सम्राट अशोक यांनी पदभार स्विकारल्यानंतर १४ वर्षांनी भेट दिली व दुसरी भेट राज्यभिषेक झाल्यानंतर २० व्या वर्षी दिली व भव्य स्तुप बांधण्याच्या विषयी सूचना केली व त्यानंतर सम्राट सातवाहन यांनी तिथे शिल्पकला विकसित केली.

२५. अद्दुरू बुद्धिस्ट स्तुप :– हा स्तुप आंध्रप्रदेश येथे आहे. वानेतीया नदीच्या किनाऱ्यावर असून सम्राट अशोक यांची मुलगी संघमित्रा सिलोन (श्रीलंका) येथे जात असते वेळी याच ठिकाणी थांबली होती. येथे १९५३ ला उत्खनन केले असता धंम्मचक्र मिळाले त्याचा व्यास १७" फूट होता.

२६. अमरावती स्तुप :– महाचैत्य स्तुप हा आंध्रप्रदेश मधील सर्वात मोठा स्तूप आहे. याचा परिघ ५० मीटर व उंची २७ मीटर आहे. यातील काही भाग मद्रास संग्रहालय व ब्रिटिश संग्रहालय मध्ये ठेवले आहेत. याच ठिकाणी सम्राट अशोक यांनी भिक्खु महादेवा यांची नियुक्ती मनिषा मंडला म्हणून केली व त्यांच्यावर हिमालयात धंम्म प्रचार करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. या स्तुपाचे उत्खनन केल्यानंतर इथे रिलिक कास्केट, गोल्ड नेकलेस, अस्थि धातु आणि सुवर्ण फुले मिळाली ते मद्रास संग्रहालयामध्ये ठेवण्यात आलेत.

२७. कुरूक्षेत्र बुद्ध स्तुप :– करुक्षेत्र किंवा हरियाणा हे बौद्ध धंम्माचे प्राचीन केंद्र होते. सम्राट हर्षवर्धन यांच्या शासन काळामधे चिनी प्रवासी हुएन त्सांग यांनी आपल्या प्रवास वर्णन मधे या ठिकाणी बुद्ध स्तुप असल्याचे वर्णन केले आहे. हे स्तुप सम्राट अशोक राजाने निर्माण केले होते. हा स्तुप कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या परिसरात आहे. हा स्तूप लुप्त झाला होता परंतु स्थानिक बुद्ध अनुयायांनी यांचा पाठपुरावा केल्यामुळे ASI ने संवर्धनचे काम सुरू केले तसेच दुसरा बुद्ध स्तूप यमुनानगर येथे आहे.

२८. गिरियाक बुद्ध स्तुप :– हा स्तुप नालंदा प्राचीन विद्यापीठापासून २२ ते २५ की. मी. अंतरावर आहे. हा स्तुप सम्राट अशोक राजाने निर्माण केला आहे. हा स्तुप सिलेंड्रिकल असून त्याची उंची ३०" फूट आहे व चैत्य गिरी पर्वतावर आहे. इथेसुद्धा प्राचीन विद्यापीठ होते.

२९. सुजाता बुद्ध स्तुप :– हा स्तुप बौद्धगयाच्या जवळ आहे. फाल्गु नदीच्या तीरावर हा स्तुप आहे. याच ठिकाणी सुजाताने सिद्धार्थ गौतम यांना खीर दान दिली होती. हा स्तुप ई. स. पूर्व दुसऱ्या (२) शतकात सम्राट अशोक राजाने निर्माण केला आहे. ASI ने १९७३ – ७४ ला उत्खनन केले असता देवापाल राजघराण्याचा शिळालेख मिळाला (देवापाल राजस्य सुजाता ग्रीह). हा स्तुप कॉममो मोरेटिव्ह स्तुप आहे. सातव्या (७) शतकात जेंव्हा चायनीज प्रवासी हुएन त्सांग निरंजना नदी पार केल्यानंतर त्याने स्तुप, स्टोन कॉलम बघितल्याची नोंद आहे, तसेच या ठिकाणाला गंधहस्ती असे म्हंटले जात असे.

सिद्धार्थाने खीर प्राशन केल्यानंतर त्यांच्या शरीरात ऊर्जा निर्माण झाली व त्यांनी निष्कर्ष काढला की, जिवंत राहण्याकरिता मानवाला अंन्नाची आवश्यकता आहे.

३०. कनिष्क स्तुप :– हा स्तूप सम्राट कनिष्क यांनी निर्माण केला, यालाच शाहजी की ढेरी असे म्हंटले जाते, हे एक प्राचीन स्तुप असून जगातील सर्वात उंच स्तुप आहे. हा स्तुप ई. स. पूर्व पहिले (१) शतक ते ई. स. नंतर पहिले (१) शतक मधे निर्माण करण्यात आला. सुरुवातीला हा स्तुप लाकडी बनविण्यात आला व त्यावर precious स्टोन हे लावण्यात आले. एकूण (१३) तेरा (लेयर) कोट निर्माण करण्यात आले, सर्वात उंचीवर कॉपरचे छत्र बनविण्यात आले. येथे १९०८–

१९०९ ला ब्रिटिश ASI डेव्हिड ब्रेनार्डने उत्खनन केले असता बुद्धांच्या अस्थि धातु मिळाल्या व त्या बर्‍मा येथे सुरक्षित आहेत तर सम्राट कुशानच्या अस्थि पेशावरच्या संग्रहालयामध्ये सुरक्षित ठेवल्या आहेत. कुशान काळ हा गंधार शैली म्हणून प्रसिद्ध आहे. याच ठिकाणी चौथि (४) धंम्म संगिती ७८ AD ला कनिष्कच्या अध्यक्षतेखाली झाली होती व तेव्हा पासून ई. स. ची सुरुवात झाली, पूर्वीचे कनिष्कपूर व आत्ताचे काश्मीर.

३१. शिंगारदार स्तुप :– हा स्तुप तिसऱ्या (३) शतकात निर्माण केला असून स्वातं घाटीमधे ब्रिटिश ASI कर्नल डियने आणि एस. ए. स्टाईन यांनी १८८६–१९३० मधे शोधून काढला. राजा उत्तरसेन जेव्हा बुद्धांच्या अस्थि घेऊन जात असतांनी त्यांचा हत्ती इथे थांबला होता, हा स्तुप स्वातं राजाने निर्माण केला.

३२. एकशे आठ (१०८) स्तुपा ऑफ चायना :– ही १०८ बुद्ध स्तुपची गॅलरी हिल साईड on the west bank of yellow river at Ning xia, चिन येथे १०३८ ते १२२७ मधे वेस्टर्न झिया राजवंशने निर्माण केली आहे. पाश्चिमात्य देशामधे १०८ या क्रमांकाला खूप महत्त्व आहे. १०८ स्तुपाच्या समोर २ स्तुप होते ते १९५८ ला नष्ट झाले. १९८७ ला नूतनीकरण (reno vatin) केले असता बुद्धिस्ट सूत्र धंम्मलिपी मधे लिहिलेले आढळून आले, तसेच मातीचे स्तुप व त्यावरील झाकणे व त्यावर बुद्धांचे शिल्प व पॉटरी (potery) आढळून आले. हे स्तुप एकसारखे नसून लहान मोठे आहे तसेच त्याची प्रतिकृती रथासारखी आहे.

३३. बोरोबर स्तुप :– हा स्तुप जावा बेटावर इंडोनेशिया येथे आहे, हा स्तुप सातव्या (७) शतकात निर्माण केला. हा जगातील सर्वात मोठा बुद्धिस्ट स्तुप आहे. या स्तुपाला एकूण २६७२ पॅनल असून ५०४ बुद्ध मुर्ती आहेत. स्तुपाची रचना षटकोनी असून वरचा भाग त्रिकोणी आहे.

मुख्य गोलाकार घुमट मधे एकूण ७२ बुद्धांच्या मूर्ती आहेत. १८१४ मधे सर थॉमस स्टॅमफोर्ड रॅफल्सने शोध लावला. १९७५ ते १९८२ या काळामध्ये इंडोनेशियन सरकारने मोठ्या प्रमाणावर संवर्धन केले व त्याला वर्ल्ड हेरिटेज मधे समाविष्ट केले.

३४. रुंमिन देवी स्तुप :– हा स्तुप नेपाळ मधे आहे. याच ठिकाणी बुद्धांचा जन्म झाला, सम्राट अशोक राजाने रुंमिन देवी स्तुप निर्माण केला आहे. राज्याभिषेक झाल्यानंतर आठ (८) वर्षानी या ठिकाणाला भेट दिली व त्या गावचा कर माफ केला केवळ आठवा भाग देण्यात यावा अशा प्रकारचा शिळालेख लिहिण्यात आला.

३५. शांति स्तुप लेह जंम्मु आणि काश्मीर :– हा स्तूप १९८३ ते १९९१ या दरम्यान जापानी बौद्ध भिक्षु बुद्धांच्या २५०० व्या जयंती निमित्ताने व जगाला शांतिचा संदेश देण्याकरिता डोंगर दर्यामधे निर्माण केला.

३६. द्रो डुल (chorten) चोर्टेन स्तुप सिक्किम :– हा स्तूप तृलशिक (trulshik) रिंणपोचे आणि न्यिंगमाचे (Nyingma) प्रमुख टिबेटन बुद्धिजम यांनी १९४५ मधे निर्माण केला. इथे एकत्र ७०० भिक्खु किंवा उपासक बसू शकतात.

३७. क्लेमेंट टाऊन स्तुप डेहराडून :– याची उंची १८५" फूट आणि रुंदी १००" फूट आहे, येथे १०३" फूट उंची बुद्ध मूर्ती आहे. बद्धिस्ट आर्ट, म्युरल्स, आणि श्रीने (shrine) खोली (room) टिबेटियन पद्धतीचे आहे.

३८. गोसाराम (chorten) चोर्टेन स्तुप अरुणाचल प्रदेश :– हे इंपॉर्टन्ट बुद्धिस्ट सेंटर आहे. त्वांग पासून ९० की. मी. अंतरावर आहे. हा स्तूप १२ व्या शतकात मोंपा भिक्खु यांनी निर्माण केला.

३९. कल्याण स्तुप :– कल्याण पूर्वेला बिग बाजारच्या समोर जी टेकडी आहे तिथे पूर्वी प्राचीन बुद्ध स्तुप होता आजही त्याचे अवशेष बघायला मिळतात. परंतु आज यावर मज्जित आहे. कल्याण हे बुद्ध धंम्माचे तसेच व्यापाराचे प्रसिद्ध केंद्र होते, सम्राट सातवाहन यांच्या राजवटीत ते अत्यंत प्रगती पथावर होते. व्यापार जलद व्हावा म्हणून २५००" फूटचा डोंगर फोडून नाणेघाट निर्माण केला.

कान्हेरी लेणीमधे एकूण ७५ च्या वर शिळालेख आहेत त्याच्यापैकी १२ शिळालेख मधे कल्याण येथील रहिवासी यांनी धंम्मदान दिल्याची नोंद आहे.

४०. सम्राट अशोक स्तंभ :– हा स्तंभ मलबार हिल येथे आहे, तसेच येथे प्राचीन महाथेरोचा स्तुप होता आज त्याला म्हातारीचा बुट असे म्हणतात. ब्रिटिश सरकारचे पूर्वी हेड क्वार्टर परेल होते परंतु मुंबईला महापूर आल्यामुळे त्यांनी हेड क्वार्टर मलबार हिलला बदलले तेव्हा पासून इथे सरकारी व खाजगी बांधकाम निर्माण झालं.

४१. सलीहुंडम बुद्ध स्तुप :– सम्राट अशोक यांची संपूर्ण जंबुद्विपावर खरी सत्ता होती, त्यावेळी सम्राट अशोक यांनी राज्य कारभार व्यवस्थित चलविण्याकरिता वेगवेगळ्या प्रदेशावर महामंत्रीची नियुक्ती केली होती. त्यापैकी अप्रांतवर शिरी सातवाहन यांची नियुक्ती करण्यात आली. सम्राट अशोक

यांनी जे स्तुप निर्माण केले ते स्तुप भव्य दिव्य व संवर्धित करण्याचे काम सम्राट सातवाहन यांनी केले. सम्राट सातवाहन यांना दक्षिणा पथपती असे म्हणतात.

सलीहुंडम हा बुद्ध स्तुप श्रीककुलंम जिल्ह्यात असून आंध्र प्रदेश मधे आहे. हे एक दुसऱ्या–तिसऱ्या शतकातील प्राचीन बुद्धिस्ट मॉनेस्ट्री आहे. हे ठिकाण उंच पर्वतावर असून वस्सधारा नदीच्या किनाऱ्यावर आहे. याचे उत्खनन १९१९ मधे करण्यात आले.

४२. रामतिर्थम बुद्ध स्तुप :– हा समुद्र किनारी विझिनागरम येथे असून येथे तीन छोट्या–छोट्या टेकड्या आहेत, तसेच इथे बोधिकोंडा प्राचीन बुद्ध विहार हे देश विदेशातील लोकांचे आकर्षण आहे, याचे उत्खनन स्वातंत्र्य पूर्व काळात झाले. तसेच येथे बुद्धांचे ब्राँझ शिल्प मिळाले.

४३. धिंम्मापुरम स्तुप :– धिंम्मापुरम येथे दुसऱ्या–तिसऱ्या शतकात बुद्धिस्ट कृती फार मोठ्यां प्रमाणात होत्या. आता हा भाग विशाखापट्टणंमला जोडण्यात आला आहे. जेंव्हा भविकोंडा व पौरलकोंडा यांचे उत्खनन करण्यात आले, तेंव्हा हे ठिकाण प्रकाशात आले. हे एक प्राचीन बुद्धिस्ट मॉनेस्ट्री होती.

४४. बोज्जनकोंडा बुद्ध स्तुप :– हे ठिकाण विशाखापट्टणम जिल्ह्यात अनाकपल्ली येथे टेकडीवर आहे. याला संघाराम असेसुद्धा म्हणतात. याच्याच बाजूला लिंगालाकोंडा असून ते बौद्ध भिक्खुंचे प्रशिक्षण केंद्र होते.

४५. कोट्टरू बुद्ध स्तुप :– हे एक प्राचीन बुद्धिस्ट केंद्र होते, १ शतक बीसी ते २ शतक एडी पर्यंत बुद्धिस्ट मॉनेस्ट्री होती. हे ठिकाण सारदा नदीच्या किनाऱ्यावर असून त्याला धनाडीबल्लु असेसुद्धा म्हणतात.

४६. कोडावली बुद्ध स्तुप :– बौद्ध रमण हे सातवाहन काळामध्ये होऊन गेले व त्यांनीच या स्तुपाची निर्मिती केली. हे ठिकाण राजमुंद्री येथे असून काकिणाडा जिल्ह्यात आहे.

४७. गुंट्टापल्ली बुद्ध स्तुप :– गुंट्टापल्ली हे एक प्राचीन ग्रुप ऑफ बुद्धिस्ट monument असुन कमवरापुकोटा वेस्ट गोदावरी जिल्ह्यात आहे. इथे रॉक कट लेणी असून चैत्य विहार व मोठ्या प्रमाणावर स्तुप आहेत. तसेच लेणीला लाकडी रेप्लिका आहे.

४८. गुडीवाडा बुद्ध स्तुप :– गुड्डिवाडा बुद्ध स्तुप हे भोगापुराम मंडल, विझीनगरम जिल्ह्यात आहे. हे ठिकाण गोष्टणी नदीच्या किनाऱ्यावर आहे. हे ठिकाण पुरवलंकोंडा आणि थोटलाकोंडा बुद्धिस्ट बाजूच्या जवळ आहे.

४९. घंटाशाळा बुद्ध स्तुप :– घंटाशाळा हे ठिकाण कृष्णा जिल्ह्यात असून जेंव्हा इथे उत्खनन करण्यात आले तेंव्हा तिथे ४×३" फूटाचा पूर्ण कलश मिळाला व त्यामधे कमळाचे फूल व अस्थी धातु मिळाल्या.

५०. भट्टी प्रोलू बुद्ध स्तुप :– भट्टी प्रोलु बुद्ध स्तुप हे ठिकाण गुंटूर जिल्ह्यात आहे. १८७० मध्ये जेंव्हा याचे उत्खनन करण्यात आले तेंव्हा क्रिस्टल रीलिक कास्केट मधे बुद्धांच्या शारीरिक धातु मिळाल्या.

५१. जग्यायापेठा बुद्ध स्तुप :– जग्यायापेठा बुद्ध स्तुप हे कृष्णा जिल्ह्यात असून ई. स. पूर्वी दुसऱ्या शतकात निर्माण केला आहे.

५२. नागार्जुनकोंडा बुद्ध स्तुप :– नागार्जुनकोंडा हे एक ऐतिहासिक बुद्धिस्ट सेंटर आहे. हे ठिकाण नागार्जुन सागर जवळ आहे. महायाणाचे जनक तसेच ग्रीक मिलिंद राजा यांचा वादविवादामधे पराभव केला, तसेच हे सम्राट सातकर्णी यांच्या काळामध्ये होऊन गेला, बुद्धीजमचा प्रसार आणि प्रचार यांनी फार मोठ्या प्रमाणावर केला. तसेच सम्राट सातकर्णी, भंते नागार्जुन, आश्र्वघोष आणि बुद्धघोष ह्यांनी पृथ्वी व्यापून टाकली होती.

५३. नंदिकोंडा बुद्ध स्तुप :– नंदिकोंडा बुद्ध स्तुप हे कृष्णा जिल्ह्यात आहे. हे एक वैभवशाली बुद्धिस्ट संस्कृती व शैक्षणिक सेंटर होते. जेंव्हा इथे उत्खनन करण्यात आले तेंव्हा चैत्य हॉल, विहार, व स्तंभ मिळाले.

५४. देवांनी गुट्टा बुद्ध स्तुप :– हे ठिकाण आंध्रप्रदेशमधे आहे. देवांनी गुट्टा हे ठिकाण सहाव्या शतकात वज्रयाणाचे फार मोठे सेंटर होते व तसेच हे अंगकोरवाट कंबोडियाच्या बरोबरीचे ठिकाण होते.

५५. धुलिट्टा बुद्ध स्तुप :– हे ठिकाण पेडापल्ली जिल्हा, तेलंगणा येथे आहे. तसेच एक बुद्धिझम आणि बुद्धिस्ट सर्किटचे प्राचीन केंद्र आहे. या स्तूपाच्या बांधकाम ई. स. पूर्व दुसऱ्या शतकात झाले असून जेंव्हा उत्खनन करण्यात आले तिथे बुद्धिस्ट प्रतिक (चिन्ह) मुच्चलिंद नाग, पंच कॉइन्स, रोमन

राजाचे सिल्व्हर कॉइनस् आणि सम्राट सातवाहन यांचे २००० मिळाले तसेच अनेक शिल्प मिळाले आहेत. त्याशिवाय काचेचे चमकदार तुकडे, कंगवा, बांगड्या, चांदीचे आणि सोन्याचे दागिने मिळाले आहेत. According to Megasthanese Dhulikatta meana Mud fort, and the area more than 18 hecters and 6 Meters above plains. Dhulikatta is located in ancient highway trade route. येथे जेव्हा उत्खनन करण्यात आले तेंव्हा तिथे बुद्धांचे पायाचे ठसे, पिलर्स, धंम्मचक्र आढळून आले, परंतु बुद्धांची मूर्ती मात्र आढळून आली नाही. त्यावरून असे अनुमान काढण्यात आले की, हा स्तूप हिनयान काळामध्ये निर्माण करण्यात आला.

५६. पाशिगाव स्तुप :– मुख्य स्तुप हा एका टेकडीवर असून जागतियाल जिल्ह्यात तेलंगणा येथे आहे. हे एक बुद्धिस्ट मॉनेस्ट्री आहे. हा स्तूप सम्राट सातवाहनच्या अगोदरचा आहे. स्तुपाला विहार, गोलाकार चैत्यगृह व तसेच सेमी sircular चैत्यगृह आहे. हा स्तूप धुलिकट्टा, कोटिलिंगला आणि स्तंभंमपल्ली यांच्या जवळ आहे व यांचा उद्देश जेंव्हा मुख्य स्तुपाचे निर्माण कार्य चालू असतेवेळी त्यांच्या जवळच छोटे–छोटे स्तुप निर्माण केले जात असत. जसे की आजही एखादी मोठी साईट जेंव्हा निर्माण केली जाते त्यावेळी त्याच्या जवळच एखादे कार्यालय, अडगळीची खोली, व कामगारांना राहण्याकरिता तात्पुरता निवारा.

५७. कोटिलिंगला स्तुप :– हा स्तूप जागतियाल जिल्हा तेलंगणा येथे आहे. जेंव्हा येथे १९७८–८० आणि १९८३–८४ मधे उत्खनन करण्यात आले तेंव्हा विटा आणि मंडप पिलर आढळून आलेत. तसेच प्राचीन विटांचे बांधकाम करण्यात आले, तसेच हा भाग स्तुप कॉम्प्लेक्स म्हणून ओळखिला जातो.

५८. स्थंभमंपल्ली स्तुप :– हा स्तूप जागतियाल जिल्हा तेलंगणा येथे आहे, तसेच स्तुपाचे बांधकाम गोलाकार असून हा स्तूप स्थभमंपल्ली आणि पाशिगावच्या मधोमध आहे. या स्तुपाचे बांधकाम करतेवेळी विशेष काळजी घेण्यात आली. जमिनीपासून ८" फूट उंचीवर मजबूत पाया तयार करण्यात आला, कारण कदाचित येथे महापूर आला असेल म्हणून जमिनीपासून ८" फूट उंचीवर बांधकाम करण्यात आले. या स्तुपाचे काम Hemispherical म्हणजे अंडगोलाकार, तसेच मधोमध विटांवर स्वस्तिक चिन्ह कोरलेले आहे. येथे अनेक स्तंभ मिळाले म्हणून खंभापल्ली किंवा स्थंभमंपल्ली असे म्हणतात. जे स्तंभ मिळालेत ते चौकोनी, अष्टकोनी व ६ सहा मिटर लांब होते, नंतरच्या काळात ते स्तंभ स्थानिक लोकांनी घरे बांधण्याकरिता उपयोगात आणले.

५९. महास्तुप नेलाकोंडापल्ली :–हा स्तूप खमण जिल्हा तेलंगणा येथे आहे. हा स्तूप एका मोठ्या तलावाच्या बाजूला आहे, तसेच या स्तुपाचे बांधकाम कच्च्या आणि पक्क्या विटांचे करण्यात आले. हा दक्षिण भारतातील सर्वांत मोठा स्तुप आहे. या स्तुपाचा परिघ ५७.२ मिटर आणि उंची १९ मिटर आहे. परंतु सर्वेक्षणाच्या अंदाजानुसार (तपासणी) या स्तुपाची उंची ३३.३ मिटर होती असे अनुमान काढले आहे. सुंदर कलाकुसर केलेले लाईम स्टोन नंतर स्थानिक लोकांनी घरे बांधण्याकरिता वापरलीत. या स्तुपाच्या आधारासाठी ५ आयताकार सॉकेट सेल निर्माण करण्यात आले. या स्तुपाचा आकार हा वैशिष्ट्यपूर्ण म्हणजे धंम्मचक्र आकाराचा आहे व चार बाजूला चार वेदिका असून त्याला पाच ५ स्तंभ आहेत. हा स्तुप साऊथमधिल सर्वात मोठा आहे तसेच धंम्मचक्र हे सुद्धा सर्वात मोठ्ठे आहे. तसेच येथे बुद्धांची ब्रॉन्झची २" दोन फूटची मुर्ती मिळाली. तिसऱ्या चौथ्या शतकात ईश्वकुच्या काळामध्ये बुद्धिस्ट कलेचे सर्वांत मोठे केंद्र होते, त्यानंतर ते नागार्जुनकोंडा स्कूल ऑफ आर्ट म्हणून प्रसिद्ध आहे.

६०. मिर्झापेठ स्तुप :– हा स्तुप पेंडापल्ली जिल्हा तेलंगणा येथे आहे. जेव्हा या गावाचा एक रहिवासी अनुमंडला वेंकटेय्या १९९४ मध्ये जेंव्हा आपल्या घराजवळ विहीर खोदत असतेवेळी त्याला बुद्ध स्तुप आढळुन आला. त्यानंतर त्याचे उत्खनन केले असता त्या परिसरात एकूण ५० विविध प्रकारचे अवशेष मिळाले व ते करीमनगर संग्रहालयामध्ये ठेवले आहेत.

६१. सतधारा मुरेलखुर्द बुद्ध स्तुप :– हा स्तूप मध्यप्रदेशमधे सांची स्तुपाजवळच आहे. सहत्रधारा नदिकाठी असल्यामुळे या स्तुपाला सतधारा स्तुप असे म्हंटले जाते. सम्राट अशोक राजाने हा स्तुप निर्माण केला व त्यानंतर पुष्यमित्र शुंग याने या स्तुपाला अतिभव्य बनविले. १८५३ मधे अलेक्झांडर कंन्निंघम यांनी याचा शोध लावला. हा परिसर जवळपास ८०० एकरचा आहे व जवळपास लहानमोठे एकूण ५५ स्तुप होते तर काही monastry होत्या.

६२. बुद्ध स्तुप खुराई :– हा स्तूप सागर जिल्हा मध्यप्रदेश येथे आहे तसेच हा स्तूप प्राचीन ऊजज्जेन महामार्गावर निर्माण करण्यात आला आहे. इथे बुद्धांच्या अनेक मूर्ती मिळाल्यामुळे या स्तुपाला बुद्ध स्तुप असे म्हटले आहे. तसेच अनेक प्राचीन तुटलेली बुद्धांच्या अनेक मुर्त्या मिळाल्या आहेत. स्तुपाचे बांधकाम विटांचे केले होते, त्यानंतर पक्क्या विटा व दगडाचे बांधकाम केले आहे.

६३. बोधन बुद्ध स्तुप :– हा स्तूप राजापूर, जि. शिवपुरी मध्यप्रदेश येथे आहे. हे मध्यप्रदेश सरकारचे संरक्षित स्मारक आहे. या स्तुपाची निर्मिती सम्राट अशोक राजाने केली. या स्तुपाची रचना धंम्मिक स्तुप सारनाथसारखी आहे. येथील स्थानिक लोकांना वाटते की हा सर्वांत प्राचीन स्तुप आहे. याला स्थानिक

लोक कुटिया मठ असे म्हणतात. अलेक्झांडर कंनिंघमने या स्तुपाला भेट दिली आहे. परंतु याचे उत्खनन झाले नाही, स्थानिक लोकांचे असे अनुमान आहे की, या स्तुपामध्ये सम्राट अशोक राजाच्या अस्थी आहेत.

६४. तक्षशिला बुद्ध स्तुप :– हा स्तूप रावळपिंडी पाकिस्तान येथे आहे. याला सिटी ऑफ कट स्टोन किंवा तक्ष रॉक असेही म्हंटले जाते. हे एखत्त्वपूर्ण बुद्धिस्ट प्रशिक्षण केंद्र ई. स. पूर्व ५ वे शतक ते ई. स. नंतर २ रे शतक पर्यंत कार्यान्वित होते, तसेच हे जगातील प्रथम बुद्धिस्ट महाविद्यालय होते. सर अलेक्झांडर कंन्निंघमने १८६३–६४ ते १८७२–७३ याचे उत्खनन केले, येथे कॉपर कॉइन मिळाले, हा स्तुप जमिनीपासून १८००" फूट उंच आहे. चायनीज प्रवासी फायह्यानने याला ई. स. नंतर ४०० ला भेट दिली. इथे सोन्याचा हार व ११६ सोन्याचे एकसारखे beads आणि १३० प्लॅन गोल्ड डबल क्रेसेंट beads व त्याचप्रमाणे अस्थि व शिळालेख (In Yona year 201, Azes year 73 and Regnal year 27 of Apraca Kinng.) तसेच किंग (राजा) मिनादरचे कॉइन्स.

६५. धंम्मराजिका स्तुप :– धंम्मराजिका हा तक्षशिला स्तुपाच्या जवळ आहे. हा स्तूप सम्राट अशोक राजाने ई. स. तिसऱ्या (३) शतकात निर्माण केला, याचे उत्खनन केले असता इथे ३५५ प्राचीन नाणी मिळाली व तसेच अभय मुद्रामधील बोधिसत्त्वची मूर्ती मिळाली. तसेच इथे बुद्धांच्या अस्थि मिळाल्या हा स्तुप व्यापारी मार्ग ग्रँड ट्रंक मार्गावर असल्यामुळे बुद्धिस्ट केंद्राबरोबरच ते प्राचीन व्यापारी बंदर होते. सम्राट कनिष्कने या स्तुपाला भव्यदिव्य बनविले.

६६. ग्लेन ऑफ गिरी :– धंम्मराजिका स्तुपापासून साडेतीन ३.५ मैल आहे, हा स्तुप ई. स. पूर्व पाचव्या (५) शतकात निर्माण केला आहे. एक स्तुप १२० स्के. यार्ड (चौरस यार्ड) मधे आहे तर दुसरा ६२ स्कें. यार्ड (चौरस यार्ड) मधे आहे. एक कुशान काळीन तर दुसरा त्या नंतरचा आहे.

६७. कुणाल बुद्ध स्तुप :– कुणाल हा सम्राट अशोकयांचा मुलगा आहे. ह्युयन त्संग यांनी येथे भेट दिली त्यांना एकूण इथे ४ (चार) बुद्ध स्तुप दिसले. त्यापैकी पहिला स्तुप इलाप्त्रा नाग राजा, दुसरा मैत्रेय बुद्धा, तिसरा स्तुप हेड ऑफ कुणाल, आणि चौथा आईज (डोळे) ऑफ कुणाल यावर निर्माण केला आहे.

६८. तख्त ए बाही :– तख्त ए बाही यांचा उल्लेख चायनीज प्रवासी ह्यूयन त्संग यांनी केला आहे. एक प्राचीन बुद्ध स्तुप आर्थिक दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. हा खूप मोठा टापू अनेक प्रकारच्या प्राचीन इमारती व वेगवेगळ्या प्रकारचे स्तुप जमिनीपासून ५००" फूट उंचीवर आहे. मोठ्या स्तुपामध्ये विहार, सेल, आणि असेंब्ली हॉल (संसद भवन) तसेच संसद भवन विशिष्ट पद्धतीने सुशोभित केलेले असून बुद्धांच्या भव्य मूर्ती एका रेषेमध्ये आहेत.

६९. सेहर ई बहलोल :– हा स्तूप तख्त ए बाहीं प्रमाणे असून सम्राट कुशान यांनी निर्माण केला आहे. येथे उत्खनन केले असता तलवार, अनेक अवशेष व त्याच प्रमाणे बोधि सत्त्वांची साढे चार ४.५" फूट उंची मूर्ती मिळाली.

७०. मोहरा मुराडू :– हा स्तुप प्लास्टर केला असून जेव्हा उत्खनन केले असता खालपासून वरपर्यंत स्तुपामध्ये असंख्य बुद्धांच्या मूर्ती मिळाल्या. हा स्तूप ई. स. दुसरे (२) शतकात निर्माण केला आहे. इथे बुद्धांचे रंगित हस्तचीत्र असून, मोठे चेंबर, कोर्ट यार्ड, सर्वांत उंचीवर बुद्ध मूर्ती त्यावर छत्र व दोन्ही बाजूला छिद्र असून जणू काही बुद्धांना पुष्प माळा अर्पण करीत आहेत.

७१. जौलियान स्तुप :– हा स्तूप मॉनेस्ट्री स्तुप आहे, डबल स्टोरी बिल्डिंग आहे, स्तुपाच्या सभोवती भिंत आहे. स्तुपामध्ये मोठे कोर्ट, असेंब्ली हॉल, किचन, डायनिंग हॉल, स्टोर रूम तसेच अधिकारी वर्गा करिता अपार्टमेंट व बुद्ध भिक्खुंकरिता मेडिटेशन व प्रेयर हॉल तसेच भिक्खुंकरिता भिक्षापात्र व व्यापर्यांकरिता लक्सरी सेवा आहेत.

७२. सरई खोला बुद्ध स्तुप :– हा स्तूप तक्षशिला स्तुपाच्या जवळ आहे, हा स्तुप ई. स. पूर्व ४ थ्या शतकात निर्माण केला आहे. हा स्तुप इंड्स व्याली हडप्पा संस्कृतीच्या अगोदरचा आहे. हा स्तूप म्हणजे जगातील पहिली निर्वाणभुमी आहे. १९६८ ला या स्तुपाचे उत्खनन केले असता अनेक पिट आढळून आलेत व त्यामध्ये मानवी सांगाडे मिळाले व त्यासोबत मौल्यवान वस्तुसुद्धा मिळाल्या व तसेच एकावर एक असे अनेक थर आढळुन आले. पुरुष आणि महिला यांचेकरिता वेगवेगळ्या व्यवस्था करण्यात आल्या. तसेच प्रत्येक पिट व मानवी सांगाडे हे पूर्व पश्चिम दिशेलाच आढळून आले आणि आजही असेच होत आहे.

७३. आमलुक दारा स्तुप :– हा स्तुप स्वातं व्यालीमधे आहे. हा गंधार शैलीचा उत्तम नमुना आहे. सम्राट अशोक राजा यांनी ई. स. पूर्व तिसऱ्या (३) शतकात निर्माण केला. १९२६ ला औरेल स्टेन यांनी शोधून काढला. या स्तुपाचे फाँडेशन जमिनीपासून उंचावर असून चार (४) मिटर जाडीची प्लिंथ आहे. स्तुपाचे डोम ७ मिटर असून परिघ २१ मिटर या स्तुपामधे बुद्धांच्या अस्थि धातु मिळाल्या.

७४. बुटकरा बुद्ध स्तुप :– हा महत्त्वपूर्ण बुद्ध स्तुप मिंगोरा स्वातंघाटामधे आहे. ई. स. पूर्व २ र्या शतकात सम्राट अशोक राजांनी निर्माण केला आहे. हा स्तुप १९५६ मधे इटालियन आरकियोलोजिस्ट, Domenico Faccenna यांनी शोधून काढला. हा स्तुप ई. स. पूर्व ३ तिसऱ्या शतकात निर्माण केला असून ई. स. २ ऱ्या शतकानंतर वास्तुशास्त्रीय सजावट करण्यात आली म्हणून याला इंडो ग्रीक बुद्ध स्तुप म्हंटले जाते. बुद्धांच्या अस्थी धातुवर हा स्तूप निर्माण करण्यात आला. इथे एकूण ७००० पाषाण शिल्प, कॉइन (नाणे) व अनेक अवशेष मिळाले ते इटली तुरीन मधील संग्रहालयामधे सुरक्षित आहेत.

७५. गुंबत बुद्ध स्तुप :– हा स्तूप ई. स. पूर्व २ र्या शतकात सम्राट अशोक राजांनी निर्माण केला. याला Land of Fragrance सुगंधी प्रदेश किंवा सुवासिक प्रदेश असे म्हंटले जाते. प्राचीन पुरातत्व हस्तलिखितानुसार स्वातंघाटामधे एकूण १४०० बुद्ध स्तुप आणि मॉनेस्ट्री होत्या. स्वातंघाट ही प्राचीन सांस्कृतिकदृष्ट्या अती उच्च दर्जाचा होता. १९३० मधे औरेल स्टेन यांनी शोधून काढला. या स्तुपाचे अवशेष १५०० मिटर लांबी व १००० मिटर रुंदित पसरले आहेत. या ठिकाणी एकूण २० लहान स्तुप, विहार, हार्मिका, छत्र्या व बुद्ध मूर्ती आदळून आल्यात.

७६. कलावन बुद्ध स्तुप :– हा स्तुप तक्षशिला स्तुपाच्या जवळ आहे. कॉपर प्लेटवर धंम्म लिपीमधे शिळालेख मिळाला. ही सर्वात मोठी बुद्धिस्ट मॉनेस्ट्री होती.

७७. नेमोग्राम स्तुप :– हा स्तुप स्वातं नदीच्या किनाऱ्यावर आहे. १९६६ मधे उदयानो किंगडम यांनी शोधून काढला. इथे मुख्य तीन ३ स्तुप असून इतर ५६ लहान स्तुप आहेत. हा स्तुप कुशान काळीन असून ई. स. नंतर २–३ रे शतकात निर्माण केला आहे. इथे कॉइन (नाणे), प्रिसिसे precise स्टोन, आणि मोठ्या प्रमाणात शिल्प मिळालेत.

७८. शाई खान ढेरी :– ढेरी म्हणजे स्तुप, शाई खान ढेरी म्हणजे कमी उंचीची टेकडी. ई. स. पूर्व २ रे शतकात डागडूजी आणि नूतनीकरण करण्यात आले. ग्रीक – बॅक्टेरियन चा प्रभाव दिसून येतो. कुशान साम्राज्याची राजधानी होती. चारडसा, सिरकप, आणि तक्षशिलाच्या बरोबर याची रचानाकृती आहे.

७९. पुष्करवती :– पुष्करवती म्हणजे "कमळांचे शहर." पुष्करवती हे गांधारची राजधानी होती. अलेक्झांडर कंन्निंघम आणि जॉन मार्शल यांनी १८७० मधे याचा शोध लावला. इथे इस्ट ते वेसट असे स्ट्रेंच मिळाले.

८०. मेखासंदा :– मेखासंदा हे शहाबाझगडी येथे मंदिर होते. १८९५–९७ ला येथील कारामर पर्वतावर जेंव्हा उत्खनन करण्यात आले, परंतु १९०२ ला एक्सपर्ट (तरबेज) टीमला जपान, इराण, अफगाणिस्थान आणि पाकिस्तान येथे बरेच अवशेष प्राप्त झाले. आणि जेंव्हा १९६२–६७ आणि १९८९ ला (डिटेल्स सर्वे) सार्वत्रिक पाहणी केली असता एक मुख्य स्तुप आढळून आला व त्याचबरोब इतर चार ४ स्तुप आढळून आले. कोझी निकिशावं – इराण यांनी अस्थी व काही शिल्प शोधून काढले.

८१. थारेलि :– थारेलि जमालगडीच्या जवळ आहे. गडी म्हणजे स्तुप. गांधार शैलीचा प्रभाव दिसून येतो. अनेक बुद्ध शिल्प व स्तुप येथे आढळून आलेत. १९६३–७६ आणि १९७८ इराण, अफगाणिस्थान आणि पाकिस्तान यांनी (सर्वे) पाहणी केली असता उच्च प्रतीचे स्टोन व त्यावर उच्च प्रतीचे प्लास्टर केलेल्या भांड्यात अस्थी आढळून आल्या व त्याच बरोबर कॉइन (नाणे) सुद्धा आढळून आले. सम्राट कनिष्क, राजा हुविक्ष, आणि राजा वासुदेव यांच्या कारकिर्दीत कुशान साम्राज्य प्रगती पथावर होते.

८२. चानक ढेरी :– जेंव्हा १९५९–६७ मधे याचे उत्खनन करण्यात आले तेंव्हा अनेक इमारती आढळून आल्या. त्यांचा पाया (फौंडेशन) मोठ मोठ्या दगडांनी तयार करण्यात आला, हे ई. स. नंतर १ ले ते ३ रे शतकात निर्माण करण्यात आले.

८३. मोहोंजेदारो बुद्ध स्तुप :– हा स्तूप सिंध पाकिस्तान येथे आहे. या स्तुपाचा भव्य एरिया म्हणजे ५५० एकर मधे वसलेला आहे. हा स्तूप एक प्राचीन शहर आहे. या स्तुपाची प्लिंथ २०" फूट असून पोट माळासारखे सिस्टीम आहे. येथे बुद्धांच्या अनेक मुर्त्या आहेत. त्याची (साईज) आकार ७" फूट खोल तर ४ ते ६" फूट रुंद आहे व त्या दर्शनी भागात ठेवल्या आहेत. या स्तुपाचा वरचा भाग म्हणजे डोम गोलाकार असून तो नष्ट झाला आहे. याचे उत्खनन केले असता येथे अस्थी, कास्केट, व अनेक बुद्ध शिल्प आढळून आलेत.

८४. लारकांना बुद्ध स्तुप :– हा स्तूप सिंध प्रांत, पाकिस्तान येथे आहे. हा स्तूप सम्राट अशोकांच्या स्तंभासारखा उंच असून वर जाण्याकरिता पायऱ्या आहेत. याची उंची ८ मिटर असून पक्क्या विटांचे बांधकाम केले आहे.

८५. तुल मिर रुकन बुद्ध स्तुप :– हा स्तुप गोलाकार असून २० मीटर उंच असून याचा पाया २२ मीटरचा आहे. याची रचना चार ४ थरामधे करण्यात आली आहे. याच्या दर्शनी भागाचा प्रत्येक भाग हा अर्ध स्थंभाने अलंकारीत व सुशोभित केला आहे. टेराकोटामधे बुध्दांच्या जन्माचे शिल्प आहेत.

८६. पुरुषपुरा स्तुप :– पुरुषपुरा हा स्तुप अस्सल रेयुती कढफिसेस, कनेर्केस, कनिष्क, हुविक्ष, वासुदेव यांच्या काळातील आहे. १८९२ मधे अलेक्झांडर कंन्निंघम यांनी नाणे वासुदेव – १ चे अस्सल रेयुती यांचे घोषित केले.

चार्ल्स मॅसोन यांनी १८३२ मधे बामियानला भेट दिली. तेंव्हा त्यांना १०० पेक्षा जास्त बुद्धिस्ट साईट केवळ काबुल आणि जलालाबाद मधे दिसून आल्या तर ८ मॉनेस्ट्री व ५०० स्तुप अफगाणिस्थानमध्ये आढळून आल्या. जेव्हा उत्खनन केले असता १५००० पेक्षा जास्त बुद्ध शिल्प व ३०००० पेक्षा जास्त कॉइन्स (नाणे) त्यापैकी फारच थोडा भाग नॅशनल संग्रहालय काबुल व गुईमेंट संग्रहालय पॅरिस मधे ठेवण्यात आला.

८७. ईशापोला बुद्ध स्तुप :– ३१ मे १८२४ ला विलियम मुरक्रॉफ्ट सुपेरीतेंडेंट ऑफ ईस्ट इंडिया कंपनी आणि जॉर्ज ट्रेबेक जिओग्राफर geographer आणि ड्राफ्ट्समन यांनी जेंव्हा यार मोहोंमद खान पेशावरचे गव्हर्नर खैबर पास मधून अफगाणिस्थानमधे प्रवेश केला तेंव्हा त्यांना निरभ्र आकाशात डौलदार उंच स्तुप आढळून आला. याला ११० प्रदक्षिणा पथ असून त्याचा आकार ३३.५ मीटर असून त्याचा पाया १५.२४ मीटर आहे. हा स्तूप दोन २ भागात विभाजित करण्यात आला असून वरचा भाग प्लास्टर व शिल्पांनी अलंकृत केला गेला आहे.

८८. बामियान बुद्ध स्तुप :– २५ जून १८२४ ला जेंव्हा मुरक्राफ्ट आणि ट्रेबेक यांनी बामियानला भेट दिली. मे १८३३ ला अलेक्झांडर बर्न्स आणि डॉ. जेम्स गेरार्ड (Gerard) यांनी बामियानला भेट दिली असता दोन २ बुद्धांच्या भव्य मूर्ती आढळून आल्या त्यापैकी एक (१) ५५ मीटर व दुसरी (२) ३८ मीटर. मोठ्या मूर्तीचे दोन्ही पाय तोडलेले, चेहरा नष्ट केलेला आढळून आला त्याचबरोबर त्यांच्या बाजूला अनेक चित्र, प्लास्टर केलेले लाकडी पिन चित्रे, चांगले करण्याकरिता आढळून आलेत.

मे १८३३ मधे अलेक्झांडर बर्न्स आणि डॉ. जेम्स गेरार्ड यांनी या स्तुपाला भेट दिली आणि पहिल्यांदा ५५ मीटर आणि ३८ मीटर बुद्ध मूर्तीचे रेखांकन आणि माहिती तयार केली.

८९. दारुंता बुद्ध स्तुप :– चार्ल्स मॅसोन यांनी २३ मार्च १८३४ ला या स्तुपाला भेट दिली. ब्रिटिश अधिकारी फुसे यांनी एक्सप्लोजन करून दरवाजा उघडला असता तिथे अजून ११ स्तुप आढळून आलेत. त्यापैकी ६ मोठे व ४ लहान व एक लेणी आढळून आली. होनिंग बर्गर यांनी चौथ्या व सहाव्या लेणीमधून ३३ कॉपर कॉइन्स (नाणे) शोधून काढले. लेणी क्रमांक ८ मधून कजुला काढफिसेसचे ३० कॉपर कॉइन्स (नाणे) नईब यार मोहोंमद यांनी १६ कॉइन्स तर मुल्लाह अडीब यांनी ३१ कॉपर कॉइन्स (नाणे) शोधून काढले. चार्ल्स मेसोन यांनी ते कॉइन्स (नाणे) विकत घेण्याची तयारी केली परंतु त्यांना हे कॉइन्स (नाणे) हस्तगत करता आले नाही. त्यापैकी २६ कॉइन्स (नाणे) हे हर्कीलेस, ४ मुजरटिया, १ किंग ऊंडफेरीस.

१९९३ ला उत्खनन केले असता कजुला कडफिसेसचे १८ कॉपर कॉइन्स (नाणे) मिळाले.

९०. बेगराम बुद्ध स्तुप :– विंटर सिझन १८३३ मधे चार्ल्स मॅसोन यांनी या स्तुपाला भेट दिली व उत्खनन केले असता १८६५ कॉपर कॉइन्स (नाणे), तसेच सिल्वर कॉइन्स (नाणे), काही रिंग्स, सिग्नेट, आणि अस्थी शोधून काढल्या.

९१. तख्त ई शाह बुद्ध स्तुप :– हा स्तुप काबुलच्या जवळ असून १८४२ ला चार्ल्स मॅसोन यांनी भेट दिली होती. १५२६–३० बाबर मुघल सम्राट यांचा राजवाडा होता. तख्त ई शाह म्हणजे राजाचे सिंहासन व त्यांच्या बाजूलाच खाना संुघी म्हणजे लेणी आहेत. येथे कॉपरचा दिवा मिळाला तसेच मातीचे दिवे व लोखंडी दिव्यांचे अवशेष आढळून आले.

९२. खोल शाम आणि खोल मागामसत :–हा स्तूप तख्त ई शाहच्या पूर्वेला आहे. चार्ल्स मॅसोन यांनी १८४२ ला भेट दिली असता अनेक शिल्प आढळून आले.

९३. तेपे नारंग स्तुप :– या स्तुपाचे उत्खनन मॅसोन आणि गेरार्ड यांनी केले असता बुद्धांचे मातीचे डोके मिळाले त्याच प्रमाणे इतर दोन बुद्धांचे मातीचे मातीचे शिल्प व त्यावर शाक्यमुनी कोरलेले व त्यांच्या बाजूला पंख असलेले शिल्प आढळून आले. बुद्धांच्या ओठाला लाल रंग तर केसांना निळा रंग आढळून आला. त्याच प्रमाणे बुद्धांची ध्यानस्थ मूर्ती व राहुलची भेट यांचे शिल्पसुद्धा आढळून आले. अफगाण इन्स्टिट्युट ऑफ अर्चारोलॉजी (पैमन २००५,

२००६ आणि २०१३) मधे पाहणी (सर्वे) निरीक्षण केले असता बुद्धिस्ट साईट हळूहळू cemetery सेमीटरी होत गेल्या. इतकेच नाही तर त्यावर मातीचे थर चढविण्यात आले. तर काही स्तुपांचे उत्खनन करन्यात आले नाही. कारण त्यामधे मुस्लिम संतांची कबर (समाधि) निर्माण करण्यात आली.

९४. तेपे मारंजन स्तुप :– या ठिकाणी दोन कॉम्प्लेक्स आढळून आले. एका ठिकाणी किल्ला आणि मातीचे शिल्प ३६८ चांदीची नाणी व ११ सोन्याचे कप साईजच्या प्लेट कुशानो सासनमः मिळाल्या तर दुसऱ्या ठिकाणी २२.५० चौरस मीटरचा पाय स्तुप त्याच्या बाजूला इतर आठ ८ स्तुप या ठिकाणी ४ मेटलचे कॉइन्स (नाणे) मिळाले. त्याच प्रमाणे मुख्य स्तुपामध्ये चार ४ रीलिक्सचे कस्केट तर सात ७ कॉपर अलॉई कॉइन्स (नाणे) त्यावर एका बाजूला घोडा तर दुसऱ्या बाजूला राजा वासुदेव, राजा शिव आणि त्यांचा बैल असे शिल्प मिळाले. तसेच रोमन सोन्याचे नाणे मिळाले. काळावधी ई. स. पूर्व ४०–९० असा आहे व त्याच्याच बाजूला प्राचीन लेणी आढळून आली.

९५. शेवकि बुद्ध स्तुप :– हा स्तुप मिनार चकरीच्या खालच्या बाजूला असून शाह टोप म्हणजे एकूण ६ स्तुप मिळाले. ते चार्ल्स यांनी १८३५ ला उत्खनन केले. शेवकी – १ स्तुप हा सर्वांत मोठा व चांगल्यापैकी सुरक्षित होता, वरचा डोम लाईम प्लस्टरने तर पूर्वेला भाग सुंदर त्रीलोबल आर्चने सजविलेला. हॉनिंग बर्गर यांनी या स्तुपाचे उत्खनन १९३६ मधे केले व एकूण १२ दिवस चालले असता ८ चौरस फूट दगडांची सेल मिळाले. त्यामधे एकूण ६ रॉक ब्लॉक्स मिळाले व त्यामधे रिलीक्स मिळाल्या.

एक कास्केट त्यामधे पिवळे, काळे आणि करड्या रंगांचे दगड व रेलिकुअरी दोन २ भागांमधे आढळून आले. त्यापैकी पहिला वरचा भाग हा रिक्त असून खालच्या भागात गोल्ड फॉइल आणि त्याला गोल्ड वायरचे वेष्टन, फोलडेड गोल्ड वर्तुळाकार चकत्या, पिरॅमिड सारखे आकाराचे गोल्ड ऑर्नोमेंटस आणि ४ छोटे चेंडू, तूर्कोईस आणि गार्नेट हृदय आकार, manuscript वेल संरक्षित इन ड्राय गोल्डन रंग त्यावर खरोष्टी लिपी अंकित केलेली.

९६. मिनार चकरी स्तुप :– हा जो १९६५ च्या भूकंपामधे नष्ट झाला व त्याच प्रमाणे शेवकी २, शेवकी ३, शेवकी ७ नष्ट झाल्या. मिनार चकरी स्तुपाचे गेरार्ड यांनी उत्खनन केले असता टेराकोटाचे ५ दिवे मिळाले व ते रेशिनने पूर्णपणे भरलेले होते व काही मातीचे दिवे आढळून आले. हा स्तुप ३०" फूट उंच असून पूर्णपणे स्टोन सिमेंट ब्लॉक व लाईम प्लास्टर वापरून निर्माण केला आहे.

९७. कामारी बुद्ध स्तुप :– कामारी स्तुप हा शेवकी १ आणि शेवकी २ च्या विरुद्ध दिशेला आहे. या स्तुपाचे उत्खनन होनिन बर्गर यांनी केले तेंव्हा दक्षिणेला विहार आणि सेल आढळून आली. कामारी २ स्तुपाचे उत्खनन १८४१ मधे मॅसोन यांनी केले. या स्तुपाचा अंतर्गत भाग अष्टकोणि असून १६ मीटर उंच व त्याचा परीघ ११.५ मीटर आहे व स्तुपाचे डोम हे विटांचे आढळून आले व त्याचबरोबर कडफासिस यांचे गोल्ड कॉइन्स (नाणे) व रीलिक्स मिळाल्या. यावरून या स्तुपाचे निर्माण हे ई. स. पूर्व २ रे शतक असल्याचे अनुमान काढले. तसेच ई. स. नंतर ४ थ्या व ५ व्या शतकातील पॉटरी मिळाली.

तसेच ६ चौकोनी कट स्टोन मिळाले. त्यामधे उच्च दर्जाचे गडद लाल कपडे लपेटलेले ब्राँझ बेसिनचा परीघ २०.३ सेमी. त्यामधे मती आणि राख, व्हाईट रेशिन मटेरियल, पर्पल, निळे gem, गोलाकार सिल्व्हर कास्केट व त्यावर झाकण इत्यादी आढळून आले.

९८. सेह टोपान ३ बुद्ध स्तुप :– हा सहा ६ स्तुपांचा समूह असून १ आणि ४ चांगल्या परिस्थितीमधे होते. हॉनिंग बर्गर यांनी या स्तुपाचे उत्खनन केले असता या स्तुपाचा परिघ १.६५ मीटर व त्यामधे चौकोनी सेल आढळुन आली व त्यामधे १ दिवा व वातिकरिता छिद्र व त्यावर सिंहाचे डोके व त्याचबरोबर इतर प्राण्यांच्या डोक्याचे शिल्प काढलेले होते, तसेच दिव्यामधे रेसिन (Inflammable) आढळुन आले.

९९. गुलदारा बुद्ध स्तुप :– मॅसोन यांनी १८३५ मधे या स्तुपाचे उत्खनन केले असता स्तुपाबरोबर मॉनेस्ट्री आढळुन आली, तसेच एका अपार्टमेंटमधे अशेस, विमा कडफिसेस (Prince of Kanerki) a मेंबर्स ऑफ कनिष्क फॅमिलीचे सोन्याचे मेडल. हा स्तुप काबुल पासून पूर्वेला २२ की.मी. अंतरावर आहे. गुलदारा म्हणजे फुलांचा गुच्छ (Vale of Flowers) ha स्तुप एका टेकडीवर असून संपूर्ण टेकडी ही विविध रंगांच्या फुलांनी सजविलेली असल्यासारखे वाटते. इथे एका चेंबरमधे रिलीक्स, हाडे, व राख मिळाली तसेच सोन्याचे बटन, कुशानचे ६ मेडल (पदक), हुविस्काचे एक व वासुदेवचे एक असे एकूण ८ सोन्याचे मेडल (पदक) मिळाले. तसेच खरोष्ठी शिळालेख (महाराजस राजाधिराजस सरवलोगा ईश्वरासा माही स्वरासा थपिससा लालरसा ऑफ the great king of the किंग्स लॉर्ड ऑफ the world, great lord, vima kadphises.) व त्यांचे ८ सोन्याची नाणी मिळाली.

१००. कोटपूर बुद्ध स्तुप :– मॅसोन यांनी १८४१ ला उत्खनन केले असता हा स्तूप काबुल नदीवर असून एका रस्त्याच्या बाजूला १०० यार्डवर असून त्याच्या आसपास शेती करीत होते. या स्तुपाच्या आवारातून रेड नदि वाहत असल्यामुळे त्याचे २ दोन भाग पडले असल्याने नदीच्या पात्रात पॉटरी, कॉइन्स (नाणी), रिंग, आणि इतर रिलीक्स मिळाल्यात. हा स्तूप एकदम ठीकठाक असून याची उंची १६०" फूट आहे. आर्च स्टोन व लाईम (चुना) प्लास्टरने सुशोभित केलेले आहे. हॉनिंग बर्गर यांनी अजून २ स्तुप शोधुन काढले त्याची उंची ६०" फूट व ४०" फूट आहे.

१८३८ मधे जॅकेट (Jacquet) आणि हॉनिंग बर्गर यांनी उत्खनन केले असता मोठ–मोठे गोलाकार, अर्धगोलाकार बॉक्स व त्यावर झाकण आढळुन आले व त्यामधे सिल्व्हर रेलीक्युरी sign of strong oxidation height ३८ mm and D ५०.८ mm आढळुन आले. जेंव्हा ते उघडले असता ब्राऊन रंगाचे liquid केमिकल तसेच गडस ब्राऊन पार्टीकल मिळाले. तसेच उच्च दर्जाचे फॅब्रिक एकावर एक घडी केलेले त्यामधे बॉक्स व त्यामधे हाडे, ४०–५० छोटे सोन्याचे ज्वेल्स व सोन्याची दागिने, ६ सोन्याची पाने, क्रिस्टल सिलेंडर, २ ब्रॉंझ कॉइन्स (नाणे) व शिळालेख खरोष्ठीमधे ग्रीक देवता मुजत्रियाचा. तसेच कोटपुर–२ च्या स्तुपाची उंची १०८" फूट असून यामधे स्टोन बॉक्स व त्यामधे एक सिल्व्हर व दहा १० कॉपरचे तुकडे, गोल्डन ओर्णामेंट, स्मॉल गोल्डन जेम्स, दहा १० कॉपर कॉइन्स (नाणे), आणि सिल्व्हर कॉइन्स, दहा कॉपर कॉइन्स ग्रीक देवता हेरकुल्स आणि हर्मयेस inscribed in खरोष्ठी (Chief of Kushan, true of the Law). तसेच कोटपुर–३ चे उत्खनन हनिंग बर्गर यांनी केले. या स्तुपाचे बांधकाम सिमेंट प्लास्टर केले असून, हाडे आणि राख मिळाली.

१०१. पस्सानी (टोप्स ऑफ पसांनी) :– हा स्तूप कोटपुर स्तुपाच्या बरोबर paralel परेलेर साईडला आहे. पस्सानी १ या स्तुपाचे उत्खनन मॅसोन यांनी १८४१ मधे केले. यामधे पुढील वस्तु मिळाल्यात. १) Series of Slate Square, २) Lines of Cement and Mound. यांचा परिघ १०८" फूट आहे. जरी हा स्तुप डळमळीत झाला असला तरी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या स्तुपामधे लेणीसुद्धा आढळून आल्यात.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 *हजारो वर्षांपूर्वी राजस्थान होते बौद्धस्थान* Rajasthan was Buddhasthan before thousand years. 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

राजस्थान म्हटले की मोठे किल्ले, सुंदर नक्षीकाम केलेले राजवाडे, त्यांचे दरवाजे, सुंदर महल, गुलाबी जयपूर, माउंट अबू, पुष्कर क्षेत्र, जैसलमेरचे वाळवंट असे चित्र उभे राहते. पण हेच किल्ले आणि महल होण्यापूर्वी राजस्थानमध्ये एकेकाळी सम्राट अशोकाचे राज्यस्थान होते. आणि ९ व्या शतकापर्यंत बौद्धधम्म इथे बहरला होता, हे वाचून आश्चर्य वाटेल. बैरात विहार, झलावरची खोल्व्ही लेणी, दौसामधील भांदारेज (भद्रावती) आणि रामगाव (टोंक जिल्हा) अशी अनेक बौद्ध ठिकाणे बहरलेल्या धम्माची साक्ष देतात. मात्र स्वातंत्र्यानंतर इथल्या प्रत्येक राज्य सरकारने तसेच पुरातत्व खात्याने या बौद्ध स्थळांकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे.

जयपूर दिल्ली हायवेवर ५२ कि. मी. वर विराट नगर जवळील बीजक पहाडी या निसर्गरम्य पर्वतराजीत एक पुरातन चैत्यगृह आहे. हा सर कॅनिंगहॅम यांनी १८३६ मध्ये शोधला. काळाच्या ओघात त्या चैत्यगृहाचा फक्त गोल पाया राहिला आहे. पण त्यावरून त्याच्या भव्य आकाराची व उत्कृष्ट वास्तू संकल्पनेची कल्पना येते. येथील केंद्रीय भागाच्या स्तुपाभोवती एकूण २६ अष्टकोनी लाकडी स्तंभ होते. आत प्रदक्षिणासाठी मार्ग होता. आजूबाजूला भिक्खूंचे निवासस्थान होते.आता फक्त या वास्तूंचा पाया शिल्लक आहे. तसेच विविध आकारांच्या शिळा इथे विखुरलेल्या आहेत. अशोक राजाचे शिळालेखही या चैत्यगृहाजवळ आढळले. सन १८३७ मध्ये त्यावरील ब्राम्ही (धंम्म) लिपीचे वाचन जेम्स प्रिसेप यांनी केले. सद्यस्थितीत ते शिलालेख एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल, कलकत्ता येथे आहेत.


या शिलालेखात सम्राट अशोकराजा म्हणतात –

'मगध साम्राज्याचा प्रियदर्शी राजा संघाला वंदन करतो. बुद्ध, धम्म आणि संघ यावर माझी अत्यंत श्रद्धा आहे. बुद्धांनी जो मानवास उपदेश केला आहे तो यथार्थ केला आहे. त्या उपदेशाने अधिक काळ मानव जातीचे कल्याण व्हावे म्हणून मी सर्वांना सांगू इच्छितो की धंम्मामधील विनय सुत्त, मुनि गाथा व मुनि सुतातील उपदेशाचे पालन भिक्खू आणि भिक्खुंणी यांनी करावे व त्यानुसार मार्गक्रमणा करावी. त्याचप्रमाणे नगरातील सर्व पुरुष आणि स्त्रीयां यांनी देखील त्याचे पालन करावे. या उद्देशाने हा शिलालेख मी लिहित आहे'.

राजस्थानमध्ये हत्यागौड येथे ५ बौद्ध लेण्या सापडल्या आहेत. विनायक टेकडी येथील चैत्य अजिंठा लेण्यासारखे आहे. मात्र पुरातत्व खात्याला फक्त राजवाडे आणि महल दिसतात. बौद्ध पुरातन स्थळांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकेकाळी सम्राट अशोकाच्या आदेशांचे व बुद्ध उपदेशाचे पालन करणारा 'पालि' आडनावाचा पुढारलेला समाजही राजस्थान मध्येच आहे. एवढेच नव्हे तर 'पालि' नावाचा जिल्हा व शहर राजस्थानमध्ये आहे. बडगुजर समाज सुद्धा इथलाच. आज ते बुद्धिझम विसरले असले तरी इथल्या काही संशोधकांनी एकेकाळी राजस्थान हे बौध्दस्थान असल्याचे ठामपणे सांगितले आहे.

– संजय सावंत (नवी मुंबई).

❃❃❃





☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 स्तुप/लिंगम म्हणजे बौद्ध चिन्ह किंवा बुद्धांची मूर्ती. 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

शिव = कल्याण, लिंग = चिन्ह, शिव लिंग = कल्याणाचे प्रतिक (कोण प्रतिक आहे= भगवान बुद्ध), स्तूप = सु तुप, सु = सत्याची आठवण, तुप = बोला, वाचवा, ठेवा.

बौद्ध धंम्म सायबेरिया ते अंटार्कर्टिका आणि मेक्सिको ते रशियापर्यंत अस्तित्वात होता.

प्राचीन ब्रिटन आणि आयर्लंडमधे सम्राट अशोक यांचा धंम्म सांगणाऱ्या भिक्खुंना "द्रुइस" असे म्हंटले जात. आयर्लंड आणि अरेबियामधिल बौद्धाना "सबियन" असे म्हंटले जात होते.

आयर्लंडमधे सबियन बौद्धानी मोठे बौद्ध खांब बांधले होते, ज्याला "Towers of Ireland" मनोरा आयर्लंडचा असे म्हणतात.

सम्राट अशोक यांनी सर्वत्र स्तुप असलेले खांब बांधले होते.

सम्राट अशोक यांच्यामुळे प्रेरित होऊन आयर्लंडच्या बौद्धांनी "बुद्ध मनोरा" नावाचे विशाल खांब बांधले. लोक त्यांची पूजा करत नैतिकता पाळत होते आणि त्यांच्या समोर बौद्ध भिक्षूंना दान देत होते.

या बौद्ध खांब आणि त्यांच्यावर बांधलेल्या पुतळ्यांना प्राचीन बौद्ध लोकांनी "लिंग, लिंगो किंवा लिंगम" असे म्हंटले होते.

भारतीय बौद्ध धंम्म लिंगम किंवा फलसला बुद्धांचे प्रतिक म्हणून पुजतो. (म्हणजे सूर्य) पण अशा सन्मानासाठी कुठल्याही प्रकारे भडकविणारे मिसळ न घेता, खरं तर, कठोर नैतिक संहितेसाठी कटिबद्ध असायला हवे होते.

ओ' ब्रायनयांनी पुन्हा एकदा डोम टॉवर्सचा फोलिक निसर्गाचा उल्लेख केला आणि म्हणतात लिंग (फळ) उपासना हे सूर्याच्या पुजेशी "बुद्धांसोबत संबंधित आहे." बुद्धांना जगाचा प्रकाश असे म्हंटले जाते, म्हणजेच बुद्धांची उपासना सूर्याच्या रुपात केली जाते.

जेम्स बॉनविकने कॉव्हस्क बुईभ्द रिपोर्ट केले, बुद्धांची टेकडी टायरोनमधे आहे. दातांच्या परिला "बडा" असे नाव होते. बुद्ध, लाल हे परोपकाराचे प्रमुख होते. आयर्लंडमधिल दगडांवर आढळलेली बौद्ध चिन्हे. मेयो आणि रोस्कोमन कडे बुद्ध डोंगर आहेत.

लिंगपूजा ही भारतीयांमधिल लोकप्रिय स्तुप पूजा आहे. बुद्धांना सूर्य मानून स्तुप पूजा, लिंग म्हणजेच प्रतिक पूजा म्हणून करण्यात आली.

अर्घासह शिवलिंग नमुना स्तुप विशेषतः आंध्रप्रदेशमधिल सलिहुंडम आणि नागार्जुनकोंडा भागात आढळतात.



© brajdiscovery.org







☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 "काय आहे भिमाकोरेगावचा इतिहास?" 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️


पुण्यापासून २० किलोमीटर अंतरावर भीमा नदीच्या काठी असलेल्या कोरेगावात १ जानेवारी १८१८ रोजी ही लढाई झाली. या लढाईचे स्वरूप थोडे वेगळे होते. हे युद्ध जरी इंग्रज आणि पेशव्यांमध्ये झाले तरी यामध्ये इंग्रजांनी महार समाजातील सैन्याच्या बळावर पेशवाई विरुद्ध युद्ध पुकारले. महार समाजाचे लोक मोठ्या संख्येने इंग्रज सैन्यात भरती झाले ते इंग्रजांचे भारतात साम्राज्य पसरवण्यासाठी नव्हे, तर जाचक पेशवाई नष्ट करण्याचे त्यांचे ध्येय होते असे इतिहासकार म्हणतात. विशेष म्हणजे पेशव्यांच्या सैन्याची एकूण संख्या २८००० अठ्ठावीस हजारांपेक्षा जास्त होती तर इंग्रजांनी केवळ ५०० महार रेजीमेंटच्या सैन्याच्या मदतीने हे युद्ध पुकारले होते. तरीही महार रेजिमेंटने आपल्यापेक्षा संख्येने ४० पट अधिक असणाऱ्या पेशव्यांच्या पराभव केला. महार रेजिमेंटने पेशवाईच्या सैन्याचा धुव्वा उडवला. अवघ्या १६ तासांमध्ये पेशव्यांच्या सैन्यावर पराभव पत्करण्याची वेळ आली. त्यानंतर महार समाजातील सैनिकांनी अखेर १ जानेवारी १८१८ ला सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आपला विजय झाल्याची घोषणा करतानाच पेशव्यांच्या सैन्यावर कब्जा केला. भीमा कोरेगावच्या या लढाईत महार रेजिमेंटमने इंग्रजांना विजय मिळवून दिला.

महार अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या सैनिकांनी समतेच्या, न्यायाच्या या लढाईत प्राणांची आहुती दिली, त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आणि त्यांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून ब्रिटिशांनी भीमा नदीच्या तीरावर कोरेगावमध्ये एक भव्य क्रांतिस्तंभ उभारला. कोरेगावच्या लढाईत शौर्य गाजवून वीरमरण पत्करलेल्या सैनिकांची नावे स्तंभावरील भव्य अशा स्तंभावर कोरण्यात आली आहेत.

१ जानेवारी १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या क्रांतीस्तंभाला आपल्या सहकाऱ्यांसह भेट देऊन मानवंदना दिली. त्या वर्षीचा स्मृतिदिन साजरा केला होता. बाबासाहेब आंबेडकरांच्या या मानवंदने नंतर दरवर्षी १ जानेवारीला मोठ्या संख्येने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुयायी कोरेगावातील या विजयस्तंभाला भेट देत आदरांजली अर्पण करतात व शूर सैनिकांना मानवंदना देतात.

"आपणही जर कट्टर भीमसैनिक असाल तर जरूर भीमकोरेगाव पुणे येथे १ जानेवारीला मानवंदना देण्यासाठी नक्की या." ह्या ठिकाणी आपल्या पूर्वजांनी खरा इतिहास घडविला आहे.

!जयभीम !   !! जयभारत !! !!! नमोबुद्धाय !!!



☸ ☸ 🦚 🦚 🦚 💎 *बाबासाहेबांनी मनुस्मृती का जाळली? या पुस्तकात कोणते कायदे होते?* 💎 🦚 🦚 🦚 ☸ ☸

या देशातल्या काही घटकांना विषमतेचा पुरस्कार करणारी मनुस्मृती ही श्रेष्ठ वाटते, देशाच्या लोकशाहीवादी घटनेपेक्षा अधिक महत्वाची वाटते, हे उघड आहे. ती त्यांना तशी वाटते म्हणूनच या देशात विषमतेवर आधारित चातुर्वर्ण्य व्यवस्था शतकानुशतकं टिकुन राहिली. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे बाबासाहेबांनी "मनुस्मृति" या कलंकित पुस्तकाचे दहन केले व स्त्रिया आणि शुद्रांवर वर्षानुवर्षे लादलेली गुलामी नाकारण्याची वाट मोकळी करून दिली.

मनुस्मृति मधे नेमके काय होते ज्याने स्त्रि व शूद्रांना अमानविय वागणूक दिली?

१) नारी मग ती पुत्री, पत्नी, माता, किंवा कंन्या, युवा, वृद्धा कोणत्याही स्वरुपात असो ती कधीच स्वतंत्र राहायला नको. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–२ ते ६ पर्यंत.)

२) पति पत्नीचा केंव्हाही त्याग करू शकतो, तिला गहाण ठेवू शकतो, विकू शकतो, परंतु स्त्रिला या प्रकारचा कोणताही अधिकार नाही. कोणत्याही स्थितीमधे विवाहानंतर पत्नी सदैव पत्नीचं राहत असते. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–४५.)

३) संप्पत्ती आणि मिळकतीवर अधिकार किंवा दावा करण्याचा अधिकार नाही, शुद्रांच्या स्त्रियासुद्धा "दास" आहेत, स्त्रिला संप्पत्ती ठेवण्याचा अधिकार नाही, स्त्रिच्या संप्पत्तिचा मालक तिचा पति, पुत्र, किंवा पिता असेल. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–४१६.)

४) ढोर, गवार (अशिक्षित), शूद्र आणि नारी हे सर्व ताडन करण्यास योग्य आहेत. म्हणजे स्त्रियांना ढोरासारखे मारता येऊ शकते. (मनुस्मृति अध्याय–८ श्लोक–२९९.)

५) असत्य ज्याप्रकारे अपवित्र असते, त्याचप्रकारे स्त्रियांसुद्धा अपवित्र असतात. शिकायचा, शिकवायचा, वेद–मंत्र म्हणायचा व उपनयन करण्याचा स्त्रियांना अधिकार नाही. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–६६ आणि अध्याय–९ श्लोक–१८.)

६) स्त्रियां शेवटी नरकातच जाणाऱ्या असल्यामुळे त्यांना यज्ञकार्य किंवा दैनिक अग्निहोत्रसुद्धा करण्याचा अधिकार नाही. यामुळे म्हटल्या जाते – "नर्काचे द्वार." (मनुस्मृति अध्याय–११ श्लोक–३६ आणि ३७.)

७) यज्ञकार्य करणाऱ्या किंवा वेदमंत्र बोलणाऱ्या स्त्रियांच्या हातचे भोजन ब्राम्हणांनी वर्ज्य मानावे, स्त्रियांनी केलेले सर्व यज्ञकार्य अशुभ असल्याने देवांना स्विकार्य नाहीत. (मनुस्मृति अध्याय–४ श्लोक–२०५ आणि २०६.)

८) मनुस्मृति प्रमाणे, स्त्रि पुरुषांना मोहित करणारी असते. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–२१४.)

९) स्त्रि पुरुषांना दास बनवून पदभ्रष्ट करणारी असते. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–२१४.)

१०) स्त्रि एकांताचा दुरुपयोग करणारी असते. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–२१५.)

११) स्त्रि संभोगाप्रिया असते त्यासाठी ती वय किंवा कुरूपतासुद्धा बघत नसते. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–११४.)

१२) स्त्रि चंचल आणि ह्रदयहिन, पतिशी एकनिष्ठ न राहणारी असते. (मनुस्मृति अध्याय–२ श्लोक–११५.)

१३) स्त्रि केवळ शैय्या, आभूषण आणि वस्त्र यावरच प्रेम करणारी, वासनायुक्त, बेईमान, इर्षाखोर, दुराचारी असते. (मनुस्मृति अध्याय–९ श्लोक–१७.)

१४) सुखी संसारासाठी स्त्रियांसोबत कसे राहावे यासाठी हा मनु सांगतो – १. स्त्रियांनी जीवनभर आपल्या पतिच्या आज्ञेचे पालन करायला पाहिजे. (मनुस्मृति अध्याय–५ श्लोक–११५.)

२. पति दुराचारी असो, इतर स्त्रियांवर आसक्त असो, दुर्गुणांचे भांडार असो, नपुंसक असो, कसाही असला तरीही स्त्रिने पतिव्रता होऊन देवासारखी त्याची पूजाच करायला पाहिजे. (मनुस्मृति अध्याय–५ श्लोक–१५४.)

अशा या जुलुमी मनुस्मृतिला आग लावून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण भारतातील शोषित, पीडित शुद्रांवर आणि सर्व जाती जमातीमधील स्त्रियांवर अनंत उपकार केले आहेत. म्हणून हा खऱ्या अर्थाने "स्त्रि मुक्ति दिन" मानल्या जातो.



☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 *महाबोधी विहार आणि आर्किटेक्ट जे. डी. बेगलर* J. D. Beglar: Architect in Bodh Gaya's revival. 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️


बोधगया येथील महाबोधी विहारात १४ व्या शतकात सारिपुत्त नावाचे एक बौद्ध भिक्षू होते. परंतु ते नेपाळ येथे निघून गेल्यानंतर पुढे चारशे वर्षे बोधगयाचे नाव भारतीय नोंदीतून गडप झाले. सन १८११ मध्ये फ्रान्सिस हे ब्रिटिश अधिकारी तेथे आले असता महाबोधी विहाराची झालेली पडझड त्यांनी बघितली. त्यानंतर ७० वर्षांनी म्हणजे सन १८८० मध्ये बंगाल प्रांताचे गव्हर्नर लेफ्टनंट सर ॲशले एड्न यांनी जे. डी. बेगलर यांची बोधगया येथील विहाराच्या दुरुस्ती आणि पुनर्निर्माण कामासाठी नेमणूक केली. त्यांनी अलेक्झांडर कनिंगहम व मित्रा यांच्या सल्ल्याने महाबोधी विहाराचे दुरुस्तीचे काम नेटाने पार पाडले. म्हणून आज आपण जे महाबोधी विहाराचे दर्शन घेत आहोत त्याच्या पुनर्निर्माण कार्याचे श्रेय जे. डी. बेगलर यांच्याकडे जाते.

जे. डी. बेगलर यांनी काळजीपूर्वक उत्खनन करून सम्राट अशोककालीन मूळ विहाराचे आधारस्तंभ व कुंपण शोधून काढले. सर्वात विलक्षण म्हणजे सम्राट अशोक यांनी बोधीवृक्षाच्या पायथ्याशी ठेवलेले वज्रासन देखील त्यांना सापडले. आज वज्रासनाचा बराचसा भाग सुशोभीत आवरणाखाली झाकला गेला आहे. जुन्या आकाराच्या विटा परत घडवून त्यांनी प्रवेशद्वार आणि विहाराची दुरुस्त केली. तसेच बेगलर यांनी महाबोधी विहाराच्या आजूबाजूस उद्यान उभारले व परिसर सुशोभित केला. अलेक्झांडर कनिंगहम यांना अगोदर तेथे बुद्धांची काळ्या पाषाणाची क्षतिग्रस्त मूर्ती सापडली होती. ती आज तेथील संग्रहालयात आहे. तसेच त्यांनी तेथे बोधीवृक्षाची फांदी रुजविली. आज त्याचा डेरेदार वृक्ष झालेला आहे.

सदर दुरुस्ती कामाचे फोटो जोसेफ डेव्हिड बेगलर यांनी त्यावेळी काढले. सुदैवाने १४२ वर्षानंतर आज ते आपण पहात आहोत हे मोठे भाग्याचे आहे. या महाबोधी विहाराच्या प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूस वरती एक कोनशीला बसविली आहे. त्यामध्ये लिहिले आहे की, "This ancient temple of Mahabodhi, erected on the holy spot where Prince Sakya Sinha became the Buddha, was repaired by the British government under Sir Ashley Eden, Lieutenant-Governor of Bengal, Archaeological advisor to the government, Major General A Cunningham, Architect Joseph David Beglar 1880." भारताची मूळ संस्कृती शोधण्यात अलेक्झांडर कनिंगहम आणि जोसेफ डेव्हिड बेगलर यांचा वाटा निश्चितच मोलाचा आहे.

– संजय सावंत.

🔹🔸🔹🔸🔹🔸🔹🔸



☸ ☸ 🦚 🦚 🦚 💎 *नागपंचमी बौद्ध उत्सव,नागपंचमी का सच* 💎 🦚 🦚 🦚 ☸ ☸

नाग, पंच, शील और उनका उत्सव। नागा पंचमी तब से मनाई जाती नाग एक थे नाग लोग भारत के मूल निवासी हैं अर्थात इन्हे ब्राम्हणोद्वारा असुर कहा गया है। नागवंशी राजा वारियर्स में अनंत, बासुकी, शेष, पदम्, कवल, काकोटिक, अस्तर, शंखपाल, कालिया और पिंगल नागवीर प्रसिद्ध हैं। भारत में इनका ही

वर्चस्व था और ये नाग भगवान बुद्ध के अनुयाई और बौद्ध धंम्म के प्रचारक थे। उनके साम्राज्य भारत, यूनान, मिश्र, चीन, जापान आदि देशों में भी रहे हैं। नाग वंश के बौद्ध लोग सावन की पंचमी के दिन वार्षिक पंचायत करते थे। यह पंचायत मुखिया का चुनाव होना था। इस दिन लोग ना धोकर अपने आराध्य तथागत बुद्ध की वंदना करके सुबह ही गांव की संस्थाओं में एक साथ होते थे। इनका मित्र रहन–सहन समता, एकता, न्याय और भाईचारे पर आधारित थे। मुखिया और संघ नायक के चुनाव के दौरान लोहिया के योग्यता प्रदर्शन के लिए तलवारबाजी, घुड़सवारी, तीरंदाजी, मल्लयुद्ध आदि जैसी कई तरह की प्रतियोगिताएं हुई। वर्तमान में भी नाग पंचमी के दिन कुश्ती, दंगल हाथी, युद्ध कला से संबंधित दौड़, घुड़सवारी, रेसलर आदि वीरता, साहस, कौशल और शक्ति का चित्रण करने वाले खेल आयोजित किए जाते हैं।

इसलिए नाग पंचमी पर नागों का चयन किया गया जिस दिन वह अपने सेनापति, मुखिया और किसी श्रेष्ठ पद का चुनाव करते थे। वार्षिक बैठकें की गईं।

इस दिन नाग वंश के लिए केवल परंपरा और परंपरा और वीरता टोकन का ही नहीं था, बल्कि इस दिन की महत्वपूर्ण धार्मिक श्रद्धा और विरासत के दर्शन से और भी अधिक था क्योंकि इसी दिन आर्य राजा परीक्षित और सामाअजय द्वारा विभिन्न नागों को आग में जला कर मार डाला गया था। इससे आर्य और नागों में संघर्ष बढ़ गया। तभी से नागों को अनारक्षित करके उनके क्रोध को शांत करने के लिए उनके नाम की पूजा की गई। यह दिन उन्ही नागों का स्मृति दिवस है। नागवंश की स्त्रियां इसी दिन को नदी, तालाब के किनारे स्नान कर बोधवृक्ष, स्तूप, चैत्य, गुफा, विहार आदि बौद्ध प्रतीकों की पूजा करके सभी के लिय मंगल कामना करती थी |

डॉक्टर बाबासाहबने १४ अक्टूबर १९५६ को अशोक विजयदशमी के दिन १० लाख लोगोंने बौद्ध धंम्म की दीक्षा के लिए नागपुर को ही चुना क्योंकि प्राचीन काल में नागपुर में नागों की भूमि थी और संपूर्ण भारतवंशी नाग शासक बौद्ध धंम्म के अनुयायी थे।

नागपंचमी के बारे में यह भी जानें :–

शेषनाग का पूरा नाम शेषदात नाग था। उनके पूरे नाम की जानकारी हमें ब्रिटिश स्टिकर्स में सेट की गई है। शेषनाग ने विदिशा को राजधानी ११० ई. पू. में शेषनाग वंश की स्थापना थी। शेषनाग की मृत्यु २० वर्ष पूर्व शासन करने के बाद ९० ई. पू. में हुई. उसके बाद उनके पुत्र भोगिन राजा हुए, राजवंश शासन – काल ९० ई. पू. से ८० ई. पू. तक था. चंद्राशु (८०ई. पू. – ५०ई. पू.), तब धम्मवर्ममन (५० ई. पू. – ४० ई. पू.) और अंत में वांगर (४० ई. पू. – ३१ ई. पू.) नेशेषवंश की बागडोर स्म संभाली। शेषनाग की चौथी पीढ़ी में वंगर थे। इस प्रकार शेषनाग वंश के कुल पांच राजाओं ने कुल ८० पूर्वज तक शासन किया था। इन पांच नागा राजाओं के रूप में पंचमुखी नागों के स्वामी बुद्ध के रक्षक कन्हेरी की गुफाओं में दिखाए गए हैं। ३५० साल बाद की हैं पंचमुखी नाग वाली प्रतिमाएं। नागपंचमी में ये प्रसिद्ध पौराणिक कथाएं पांच महान माकेली नाग राजवंशी राजाओं की याद में मनाई गईं, जिन्होनें बुद्ध का संदेश भारत और भारत में प्रसारित किया गया था, उनके नाम थे "अनंत, वासुकि, तक्षक, कर्कोटक और पांचवारावत" नागपंचमी का ऐल संबंध "नाग" इन सांप से ना नाटक, नागा यह "टोटेम" पांच प्रदर्शनी नागा राजा से संबंधित है। उनके गणतांत्रिक (रिपब्लिकन) स्वरूप में कई स्वतंत्र राज्यों की उपस्थिति थी | अनंत यह सबसे बड़ा | जंम्मु – कश्मीर का अनंतनाग ये शहर अपनी यादों की दास्तां पेश करता है | उनके बाद दूसरे वासुकि नागराज ये कैलास मानसरोवर क्षेत्र के प्रमुख थे | तीसरा नागाराजा तक्षक, प्रोटोटाइप यादगिरी के रूप में पाकिस्तान में तक्षशिला है | चौथे नागाराजा करकोटक और गरीब ऐरावत (रावी नदी के पास) | इन पांचों नागराजाओं के गणतांत्रिक राज्य की सीमा एक और जुड़ी हुई थी | इस क्षेत्र के लोग इन पांच प्राकृतिक राजाओं की याद दिलाते हुए हर साल उत्सव आयोजित करते थे, वो नागपंचमी के नाम से जाने लगा | इसका शीर्षक उन राज्यों के अन्य प्रांतों के लोगों द्वारा किया गया है | ऐसे मनाया जाता है नागपंचमी का त्योहार पूरे देश में मनाया जाता है।

आर्यो ने अपने विक्टोराइल किरदार को नागराजा को सांप में बदल दिया। नागवंश के इस पुरामिथकीय सच को ऐतिहासिक अध्ययन की आवश्यकता है। सभी समाज अपनी सामाजिक विरासत को लेकर गौरवान्वित होते हैं। ऐतिहासिक शोध की व्यवस्था करना है। ताकि वे अपने गौरवपूर्ण इतिहास का संरक्षण कर सकें। हम इस दिशा में न सिर्फ बैकफुट पर हैं, बल्कि उधार के ऋषियों से स्वयं को महिमामंडित कर रहे हैं। ये हमारे लिए घातक है। नागपंचमी अब सांपों की पंचमी हो गई और नागवंशियों की पंचमी लुप्त हो गई। फिर भी आज भी हम लोग घर की दीवारों पर पांच नाग बनाना नहीं भूले | ये पांच नाग ही हमारे पूर्व के नागराजा हैं | धार्मिक परिसीमा से बाहर निकल कर नागपंचमी के त्यौहार का महत्व नागवंशियो को जानना चाहिए।

☸️☸️🦚🦚🦚💎 *तथागत गौतम बुद्धांचा संक्षिप्त जीवनपट* 💎🦚🦚🦚☸️☸️

१. पांजोबाचे नाव :– राजा जयसेन. २. पणजीचे नाव :– राणी जयंती. ३. आजोबांचे नाव :– राजा सिंहहनू. ४. आजीचे नाव :– राणी कच्चायना. ५. वडिलांचे नाव :– राजा शुद्धोधन. ६. आईचे नाव :– राणी महामाया. ७. मावशी (सावत्र आई) :– महाप्रजापती गौतमी. ८. आत्या :– अमिता, प्रतिमा. ९. आत्ये भाऊ :– देवदत्त. १०. सावत्र भाऊ :– नंद, रुपनंद. ११. चुलते :– धौतोधन, शुक्लोधन, अमितोधन. १२. गौतमांचे जन्म स्थळ :– लुंबिणी (नेपाळ). १३. गौतमांचे जन्मवर्ष :– ई. स. पूर्व

५६३ (वैशाख पौर्णिमा). १४. वंश :– शाक्य. १५. पत्नीचे नाव :– यशोधरा (गोपा). १६. यशोधराशी लग्न (विवाह) :– ई. स. पूर्व ५७४. १७. शाक्य संघाचे सभासद :– वयाच्या २६ व्या वर्षी. १८. मुलाचे नाव :– राहुल. १९. गौतमांचा गृहत्याग (महाभिमिषक्रमन) :– २९ व्या वर्षी. २०. संम्यक संबुद्ध :– ई. स. पूर्व ५२८. २१. महापरिनर्वाण (मृत्यू) :– ई. स. पूर्व ४८३.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 #बुद्धांकडे_चमत्कारिक_किव्वा_दैवी_दृष्टिकोनातून_बघू_नका 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

#बोधी_प्राप्त_झाल्यानंतरही_तथागत_मानवच

तथागत बुद्ध झाले, म्हणजे मानव राहिले नाहीत अथवा मानवापेक्षा काही तरी आणि कोणी तरी वेगळे झाले, असे म्हणता येत नाही. त्यांनी विकार जिंकले आणि त्या अर्थाने ते सर्वसामान्य माणसांपेक्षा उन्नत झाले, हे कितीही खरे असले, तरी या घटनेने त्यांचे निसर्गदत मानवत्व संपले, असे होत नाही. ते जन्मापासून गृहत्याग करेपर्यंत मानवच होते, ही बाब तर कोणालाच नाकारता येणार नाही, गृहत्यागानंतर बोधी प्राप्त होईपर्यंत अन्न वगैरे घेण्याच्या – न घेण्याच्या बाबतीत त्यांनी जे प्रयोग केले, ते त्या वेळी त्यांचे शरीर मानवी असल्याचेच स्पष्ट करतात. बोधी प्राप्त झाल्यानंतर परिनिब्बान प्राप्त होईपर्यंत ते मानवी शरीराने वावरले. याबाबतीतही कोणी शंका घेऊ शकत नाही. बोधिराजकुमार, पसेनदीची राणी मल्लिका इ. व्यक्ती आपल्या दूतांना त्यांच्याकडे पाठवितात, तेव्हा त्यांच्या प्रकृतीची चौकशी करायला सांगतात, त्यांना काही पीडा नाही ना हे विचारायला सांगतात, याचे कारण त्या काळातही त्यांचे शरीर मानवी होते, हेच आहे. हे सगळे अधिक स्पष्ट व्हावे म्हणून त्यांच्या आजारपण वगैरेंचे काही माहिती येथे घेणे उचित ठरेल.

#त्यांच्या_मानवी_शरीराला_निसर्गाच्या_मर्यादा.

तिपिटकाकडे पाहिले, तरी ते एक मनुष्य म्हणूनच आपल्यापुढे येतात. तथागत थकले आहेत, आजारी पडले आहेत, वृद्ध झाले आहेत इ. अर्थाचे बरेच निर्देश तिपिटकात आढळतात. हे निर्देश बोधी प्राप्त झाल्यानंतरच्या काळातील आहेत, हेही लक्षणीय आहे. आपण येथे त्यांचे थकणे, आजारी पडणे आणि वृद्ध होणे, या क्रमाने काही उदाहरणांचे विवेचन करू या.

#सर्वसामान्य_माणसांप्रमाणे_ते_कधीकधी_थकत_असत

एकदा ते नळकपान येथील पलाशवनात विहार करीत होते. एके दिवशी रात्री उशिरापर्यंत त्यांनी भिक्खूना धम्माचा उपदेश केला. तरीही भिक्खुसंघ शांत (अधिक ऐकण्यास उत्सुक) होता. तेव्हा ते सारिपुत्तांना म्हणाले, "सारिपुत्ता, भिक्खुसंघ आळस आणि तंद्रा यांनी रहित आहे. भिक्खूंशी धम्मसंवाद साधणे तुला आवडेल. माझी पाठ दुखत आहे. तर मी आडवा होतो." सारिपुत्तांनी त्यांच्या म्हणण्याला होकार दिला आणि भिक्खूंशी धम्मसंवाद साधला. एकदा ते कपिलवस्तूमध्ये गेले असता महानाम शाक्याने त्यांच्या मुक्कामाची व्यवस्था भरण्डुकालामाच्या आश्रमात केली. ते थकलेले असल्यामुळे तो त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी रात्री त्यांच्याजवळ थांबला नाही. ती रात्रसंपल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे येऊन त्याने त्यांना आपल्या मनातील शंका विचारल्या. ते आयुष्याच्या अखेरीस कुसीनारामध्ये गेले, तेव्हाही त्यांचे शरीर थकल्याचा निर्देश आला आहे. ते कुसीनारामध्ये मल्लांच्या सालवनात पोचल्यानंतर आनंदाना म्हणाले, "आनंदा, तू दोन सालवृक्षांच्या मधे उत्तरेकडे डोके करून माझ्यासाठी मंचक ठेव. मी थकलो आहे."

#त्यांचे_आजारपण

ते एकदा कपिलवस्तूमधील न्यग्रोधारामात विहार करीत होते. त्या वेळी ते नुकतेच आजारातून उठलेले होते. एके दिवशी महानाम शाक्य त्यांच्याकडे आला. संमोदन करून झाल्यावर' समाधी आधी की ज्ञान आधी' या अर्थाचा प्रश्न त्याने त्यांना विचारला. ते नुकतेच आजारातून उठले आहेत आणि महानाम त्यांना गंभीर प्रश्न विचारत आहे, हे ध्यानात घेऊन आयुष्मान आनंदांनी त्याच्या दंडाला धरून त्याला बाजूला नेले आणि स्वतःच त्याचे शंकासमाधान केले. त्यांचे आजारपण हे त्यांच्या मानवत्वाचे द्योतक आहे, हे तर या प्रसंगावरून कळतेच, पण आनंद तथागतांची किती काळजी घेत असत, हेही यावरून स्पष्ट होते. ते श्रावस्तीमध्ये असताना एकदा त्यांना वाताची पीडा झाली. त्या वेळी उपवाण हा त्यांच्या सेवेत उपस्थित होता. त्यांनी त्याला गरम पाणी आणण्यास सांगितले. तो देवहित ब्राह्मणाच्या घरासमोर जाऊन उभा राहिला. त्याने 'काय हवे' असे विचारल्यावर वातपीडा झालेल्या तथागतांसाठी गरम पाणी हवे असल्याचे त्याने सांगितले. मग त्या ब्राह्मणाने त्याला गरम पाणी आणि गुळाचा खडा दिला. त्याने परत येऊन त्यांना गरम पाण्याने स्नान घातले आणि थोड्या गरम पाण्यात गूळ मिसळून त्यांना ते पाणी प्यायला दिले. त्यामुळे त्यांना बरे वाटले. पुढे तो ब्राह्मण त्यांचा शरणागत उपासक बनला. एकदा ते राजगृहातील कलंदकनिवापात विहार करीत होते. त्या वेळी ते फार आजारी होते. एके दिवशी महाचुंद तेथे आले आणि अभिवादन करून बाजूला बसले. त्या वेळी तथागतांनी त्यांना

बोध्यंगांविषयी बोलायला सांगितले. मग महाचुंदांनी तथागतांच्या उपदेशानुसार सात बोध्यंगांचे स्वरूप स्पष्ट केले. ते ऐकून तथागत समाधानी झाले. ते त्या आजारातून उठले. त्यांचा आजार नाहीसा झाला.

#त्यांचे_वार्धक्यही_त्यांच्या_मनुष्यत्वाचे_द्योतक

त्यांच्या शरीरावर वार्धक्याचा परिणाम झाल्याची वर्णने देखील या संदर्भात महत्त्वाची आहेत. एकदा ते श्रावस्तीमध्ये असताना पूर्वारामात विहार करीत होते. संध्याकाळी ध्यानातून उठल्यानंतर पश्चिमेकडे पाठ करून ते पाठीवर ऊन्ह घेत होते. त्या वेळी आयुष्मान आनंद त्यांच्याजवळ गेले आणि त्यांचे शरीर चेपूलागले. ते त्यांना म्हणाले, "भन्ते, तथागतांचे शरीर आता पूर्वीसारखे सुंदर आणि मजबूत राहिलेले नाही. सर्व गात्रांवर सुरकुत्या पडल्या असून ती शिथिल झाली आहेत. शरीर पुढे झुकले आहे. डोळे, कान, नाक, जीभ आणि त्वचा ही सर्व इंद्रिये कमजोर झाली आहेत, हे दिसून येत आहे." आनंदांनी असे म्हटल्यानंतर तथागतांनी हा जराधम्म (वार्धक्याचा गुणधर्म) असल्याचे म्हटले. त्यानंतर त्यांनी हे सगळे जराधम्माने घडत असल्याचे अधिक विस्ताराने सांगून त्याचे वर्णन करणाऱ्या दोन गाथाही म्हटल्या. त्यांनी परिनिब्बानाच्या थोडे अगोदरही वार्धक्यामुळे आपली शारीरिक अवस्था कशी खालावलेली आहे ते आनंदांजवळ बोलून दाखविले होते. ते एकदा आनंदांना म्हणाले, "आनंदा, खरोखर मी आता जीर्ण, वृद्ध, म्हातारा झालो. माझी जीवनाची वाट चालून झाली. माझे वय झाले. माझे वय आता ऐंशी वर्षांचे आहे. आनंदा, एखादी जर्जर झालेली गाडी ज्याप्रमाणे डागडुजी करून कशीबशी चालते, त्याप्रमाणे तथागताचे शरीर डागडुजी करून चालले आहे, असे मला वाटते." त्यांच्या शारीरिक मर्यादांचे वा मनुष्यत्वाचे हे वर्णन त्यांना कमीपणा आणणारे नसून सर्वसामान्य माणसांना आपल्या मनुष्यत्वाचा विकास करण्याची प्रेरणा देणारे आहे.

बुद्ध कोणी परके नाही. कोणत्याही अर्थाने परके नाही. वैरी तर नाहीच नाही. खरे तर ते आपल्याच अंतः शक्तींचे साकार रूप आहेत आपल्याच सर्वस्वाचे अस्सल सार आहेत. आपण पूर्णपणे फुलल्यावर जसे दिसू, अगदी तंतोतंत तसे बुद्ध आहेत. किंबहुना, आपण त्याचे अविकसित पूर्वरूप आहोत आणि ते आपले विकसित उत्तररूप आहेत.

(सदरील लेखात संदर्भ हे आ. ह. साळुंखे सर ह्यांच्या लेखातून घेतले आहेत त्यामुळे यामध्ये कोणतेही बदल करू नये.)

संकलन – सौरभ भोसले. २६ ऑगस्ट २०२१.



☸️☸️🦚🦚🦚💎 *भीमाकोरेगाव* 💎🦚🦚🦚☸️☸️

१ जानेवारी १८१८ स्वातंत्र्याचे बंड का झाले?

छत्रपती शिवाजी महाराजांच्या हत्येच्या कटात जे ब्राम्हण मंत्री सामील होते त्या बारा (१२) ब्राम्हण मंत्र्यांना छत्रपती संभाजी महाराज यांनी हत्तीच्या पायी देवून ठार मारले आणि शिवाजी महाराजांच्या हत्येचा बदला घेतला. या गोष्टीमुळे ब्राम्हण वर्ग हादरून गेला व त्यांनी संभाजी महाराजांचा बदला घेण्याचा जणू विडाच उचलला असावा, असे षडयंत्र ब्राम्हण रचत गेले. याचाच एक भाग म्हणून *समर्थ रामदासांचाच पट्टशिष्य रंगनाथ स्वामी* याने षडयंत्र करून संभाजी महाराजांना औरंगजेबाला पकडुन देण्यात मदत केली.

औरंगजेबाने संभाजी महाराजांना मनेपासून पायापर्यंत त्यांच्या वाजनापेक्षा जास्त वजनाच्या साखळदंडात जखडून ठेवले आणि संभाजी महाराजांना औरंगजेबाने दोन (२) प्रश्न विचारले की, माझ्या सरदारांपैकी तुला कोण फितूर (फसविले) झाले आणि तुझा खजिना कुठे आहे? परंतु संभाजी महाराजांनी या दोन्ही प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत.

मग औरंगजेबाने संभाजी महाराजांना सोडून देण्याचे ठरविले. परंतु नंतर ब्राम्हण मंत्र्यांनी औरंगजेबाला सांगितले की, *"संभाजी आमच्या धर्माचा आहे, तेव्हा त्याला आमच्या हवाली (ताब्यात) करण्यात यावे."*

जवळजवळ सर्व प्रकारच्या मुघलांच्या – मुस्लिम सरदारांच्या दरबारात ३५% ब्राम्हणांची (RSS – आरएसएसचे पूर्वज) भागीदारी असते. औरंगजेबाने दरबारातील ब्राम्हणांचे ऐकून संभाजी महाराजांना ब्राम्हणांच्या ताब्यात दिले.

ब्राम्हण जातीने आपल्या जातभाईंच्या हत्येचा बदला घेऊन स्वराज्य बळकावयाचे होते आणि ब्राम्हणांसाठी हि शेवटची संधी होती व ब्राम्हण ती गमवू इच्छित नव्हते आणि जर का संभाजी महाराज सुटले असते तर ब्राम्हण जातीचा ते काळच (अंत) ठरले असते.

म्हणून ब्राम्हणांनी संभाजी महाराजांची हत्या मनुस्मृतिप्रमाणे शिक्षा देऊन केली. महाराजांचे डोळे काढले, त्यांची कातडी सोलली, हातांची बोटे छाटली, कानात शिश ओतलं, जिभ छाटली आणि शरीराचे तुकडे तुकडे करून भिमा नदीच्या पात्रात टाकले. नंतर ब्राम्हणांनी फर्मान (निर्देश) काढले की, *"जर संभाजी महाराजांच्या शरीराचे तुकडे कुणी गोळा केले तर त्याचेही हेच हाल केले जातील."*

वढु बुद्रुक गावातील कुणीही पुढे यायला तयार होईना. गावचे मातबर, सरंजामी गडी शांत झाले. *परंतु ही गोष्ट नदीवर धुणं धुत असलेल्या जरी परटिनीला कळली. ती गावभर फिरली. पाटील, देशमुख यांच्याकडे गेली आणि सांगितले की संभाजी महाराजांच्या प्रेताचे तुकडे नदीत फेकले आहेत, त्यांचा अंत्यसंस्कार करायचा आहे.* परंतु गावातला एकही माणूस पुढे येईना.

अशा वेळी त्याच गावातील एक गोविंद महार पुढे आला. त्याने आपल्या भावकितल्या पन्नास (५०) लोकांना जमा केले आणि शिंप्याकडून ते सर्व तुकडे शिवून (टाचून) घेतले व स्वतःच्या शेतात संभाजी महाराजांचा अंत्यसंस्कार केला.

पुढे पेशव्यांनी या लोकांना देहदंडाची शिक्षा दिली आणि पेशव्यांनी महार जातीला दिवसा गावातून फिरण्यावर बंदी घातली आणि गळ्यात मडके व कमरेला झाडू लावण्याचा नियम बनविला. अशा प्रकारे महार जातीवर गुलामगिरी वाढली, अंन्याय वाढला. तो इतका वाढला की, या व्यवस्थेत जगणे मुश्कील वाटू लागले.

अशावेळी इंग्रज भारतात साम्राज्य विस्तार करू इच्छित होते. परंतु इंग्रजांना ते शक्य होत नव्हते. पेशवाई विरोधात इंग्रजांनी युद्ध करण्याचा निर्णय घेतला. अशावेळी *शिदनाक महार* पेशव्यांकडे गेला आणि म्हणाला, *आम्ही तुमच्या बाजूने लढू परंतु आपण आम्हाला त्या बदल्यात काय द्याल?* पेशव्यांनी शिदनाकला सांगितले की, *तुम्हाला आणि तुमच्या समाजाला इथली टीचभर जागासुद्धा मिळणार नाही.* *शिदनाकची* एकच मागणी होती, *आमच्या गळ्यातील मडके आणि कमरेचे झाडू काढली जावी.* परंतु पेशव्यांनी ही मागणी नामंजूर केली आणि *शिदनाकने* इंग्रजांकडे जाऊन तीच मागणी केली आणि इंग्रजांनी ती मागणी मंजूर केली. *विशेष म्हणजे शिदनाकने बहुजन समाजातील पाचशे (५००) शूरवीर योध्यांना जमा केले आणि इंग्रजांच्या सैन्यात भरती केले व पेशव्यांच्या विरोधात युद्धाची घोषणा केली.*

१ जानेवारी १८१८ रोजी युद्ध होईल ही घोषणा केली गेली. इकडे शिदनाक महार आणि त्यांचे शूरवीर योद्धे *वढू बुद्रुक येथे संभाजी महाराजांच्या समाधीवर गेले.* तिथे सर्वांनी शपथ घेतली की, *महाराज आम्ही आपल्या हत्येचा बदला घ्यायचा निघालो आहोत, आम्हाला आशीर्वाद द्या.* आणि तेथून पाचशे (५००) विर भिमा नदीच्या पैलतीर इंग्रजी छावणीत जमले. नदीच्या एका काठावर पेशव्यांचे सैन्य, दुसऱ्या काठावर महार बटालियन.

समोर पेशव्यांची तीस हजारांची (३००००) फौज पाहून इंग्रजांनी घाबरून माघार घेण्याचे ठरविले. परंतु *शिदनाक महार आणि सैन्य काही माघार घ्यायला तयार नव्हते.* कारण बहुजन समाजाच्या अस्तित्वाचा प्रश्न होता. त्यांनी इंग्रज अधिकार्यांना ग्वाही दिली की; *"तुम्ही माघार घेऊ नका, आम्ही हे युद्ध आपणास

जिंकून देऊ."* इकडे पेशव्यांचे सैन्य ३१ डिसेंबर १८१७ ला गाफील होते. मौज मस्तीत होते. कारण युद्ध १ एक तारखेला होणार होते. अशा परिस्थितीत ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री महार बटालियनच्या सैनिकांनी हल्ला चढविला आणि रात्रीचा फायदा घेऊन पेशव्यांच्या सैन्याला नामोहरम केले. *हे युद्ध ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री सुरू झाले आणि १ जानेवारी १८१८ला दुपारी संपिले.* पेशवे हारले आणि इंग्रज जिंकीले. *यात पेशवे सैनिक ३०००० तीस हजार सैनिक होते यापैकी २००० दोन हजार सैन्य भितीने पळून गेले आणि २८००० अठ्ठावीस हजार सैन्याबरोबर ५०० पाचशे बहुजन सैनिक लढले.* एका बहुजन सैनिकांबरोबर पेशव्यांचे ५६–५६ छप्पन–छप्पन सैनिक लढले. तेंव्हापासून महाराष्ट्रामधे एक म्हण प्रचलित झाली की, *"तुझ्यासारखे ५६ छप्पन बघितलेत."*

कोरेगांवच्या या लढाईत धारातीर्थी पडलेले, व जखमी झालेले ते शूर वीर महार सैनिक, व त्यांचा सैन्यातील हुद्दा पुढील प्रमाणे :–

१) सोननाक कमलनाक – नाईक. २) रामनाक येसनाक – नाईक. ३) गोंदनाक कोढेनाक – शिपाई. ४) रामनाक यसनाक – शिपाई. ५) भागनाक हरनाक – शिपाई. ६) अंबरनाक काननाक – शिपाई. ७) रूपनाक लखनाक – शिपाई. ८) गणनाक बाळनाक – शिपाई. ९) काळनाक कोंडनाक – शिपाई. १०) वपनाक रामनाक – शिपाई. ११) विटनाक धामनाक – शिपाई. १२) राजनाक गणनाक – शिपाई. १३) वपनाक हरनाक – शिपाई. १४) रैनाक वाननाक – शिपाई. १५) गणनाक धरमनाक – शिपाई. १६) देवनाक आमनाक – शिपाई. १७) गोपाळनाक बाळनाक – शिपाई. १८) हरनाक हिरनाक – शिपाई. १९) जेठनाक दैनाक – शिपाई. २०) गणनाक लखनाक – शिपाई.

जखमी झालेले वीर सैनिक :–

१) जाननाक हिरनाक – शिपाई. २) भीकनाक रतननाक – शिपाई. ३) रतननाक धाकनाक – शिपाई.

या महार सैनिकांच्या पराक्रमाची गौरवगाथा संपूर्ण जगाला कळावी, म्हणून त्यांच्या या महान पराक्रमाबद्दल भीमा कोरेगांवच्या या विजयस्तंभावर इंग्रजीत पुढील प्रमाणे गौरववाक्य लिहिलेले आहे –

"One of the proudest triumphs of the British Army in the East."

अर्थात – "पूर्वेकडील देशांत ब्रिटीश सैन्याला जे अनेक विजय मिळालेले आहेत, त्यामध्ये अतिशय गर्व बाळगण्यासारखा हा विजय आहे.....!"

जुलमी, अन्यायकारक पेशवाई संपवून, जातीअंताची ही लढाई जिंकून, सन्मानाने गौरवान्वित होणाऱ्या त्या ५०० महार शूरवीर पूर्वजांना माझा स्वाभिमानाचा जय भीम.......!!!

या वीस (२०) शहिदांसोबत पाचशे (५००) महारांचे नेतृत्व करणाऱ्या स्वाभिमानी लढवय्या सोननाक कमलनाक महार यांना विनम्र अभिवादन.....!!!

म्हणजे जर छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येचा बदला म्हणून आणि बहुजनांवरील गुलामीचा विरोध म्हणून जर पेशव्यांची सत्ता नष्ट केली गेली असेल तर बहुजनांवरती गुलामी कुणी लादली होती? तर ती पेशवे ब्राम्हणांनी लादली होती.


मग आजच्या सध्यास्थितीत ३१ डिसेंबरला या दिवसी दारू, पार्ट्या, मौजमस्ती, रात्री उशिरापर्यंत नाचगाणे, करायचे आणि दुसऱ्या दिवशी उशिरापर्यंत म्हणजेच दुपारपर्यंत झोपून राहायचे ही रीत कुणी आणि का का घालवून दिली? तर ती रीत ब्राम्हणी षडयंत्राद्वारे नोकरी–धंदा करणाऱ्या बहुजन समाजात प्रचलित केली गेली. कारण, *१ जानेवारीचा सत्य इतिहास दाबला जावा. कुणी जाणून घेऊ नये की, १ जानेवारी १८१८ ला काय घडलं होतं?*

हा इतिहास दडपण्याचा प्रयत्न का होतो तर विश्वरत्न परमपूज्य भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, *"जो समाज आपला इतिहास जाणतो आणि त्यापासून बोध घेतो तो समाज इतिहास घडविल्याशिवाय राहात नाही."*

बोल महामानवाचे !

"तुम्ही शूरवीरांची संतान आहात. ही गोष्ट काल्पनिक नव्हे ! भिमा कोरेगावला जाऊन बघा, तुमच्या पूर्वजांची नावे तेथील विजय स्तंभावर कोरलेली आहेत. तो पुरावा आहे की, तुम्ही मेंढी (भेड) बकरींची संतान नसून सिंहाचे छावे आहात." (महाड, २५ डिसेंबर १९२७.)








☸ ☸ 🦚 🦚 🦚 💎 *** पेशवे साम्राज्याची अखेरची रात्र : भिमा कोरेगांवची लढाई – १ जानेवारी १८१८.*** 💎 🦚 🦚 🦚 ☸ ☸

----

५ नोहेंबर १८१७ रोजी पेशवा दुसरा बाजीराव आणि इंग्रज यांच्यात खडकी येथे लढाई झाली, आणि बाजीराव पेशव्याची महाराष्ट्रावर असलेली जुलमी सत्ता पुढे लवकरच अल्पावधीत संपुष्टात आली. हे युद्ध होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे ३१ डिसेंबर १८०२ रोजी पेशवे व ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीमध्ये झालेला तह बाजीरावाने मोडला. दुसरे महत्वाचे कारण म्हणजे बडोद्याच्या गायकवाडांना पेशवे काही देणे लागत होते. त्यासंबंधाने इंग्रजांच्या संरक्षणाखाली पेशव्यांशी बोलणी करण्याकरीता गंगाधरशास्त्री हे वकील म्हणून पुण्याला आले. परंतु, त्यांचा पंढरपूर येथे संशयास्पदरीत्या खून झाला. हा खून बाजीराव पेशव्याच्या सांगण्यानुसार त्रिंबकजी डेंगळे यांनी केला, असे गायकवाडांच्या वतीने इंग्रजांनी आपले म्हणणे मांडले व त्रिंबकजी डेंगळेला पकडून ठाण्याच्या तुरुंगात त्यांनी ठेवले. परंतु तो तेथून पळाला. त्याला पकडून आपल्या ताब्यात देण्यास बाजीराव पेशवा टाळाटाळ करीत आहे, असे वाटल्याने ८ मे १८१७ रोजी इंग्रजांनी पुण्याला आपल्या सैन्याचा वेढा दिला. त्यावेळी नाईलाजास्तव बाजीरावास इंग्रजांशी दि.१३ जून १८१७ रोजी तह करून इंग्रजांच्या सर्व अटी मान्य कराव्या लागल्या. या तहास 'पुण्याचा तह' असे म्हटले जाते. या तहाने पेशव्यांचा फार मोठा प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला. तहानुसार इंग्रजांनी पेशव्यांसाठी प्रशिक्षित केलेली आपली पलटण परत घेतली. अशा प्रकारे, या तहाने इंग्रजांची सत्ता वाढत गेली व पेशव्यांची सत्ता कमी होऊ लागली. ही बाब बाजीरावाच्या मनाला लागून राहिली व त्यासाठी तो मार्ग शोधू लागला. या कामी त्याने हैदराबादहून त्याला भेटण्यास आलेला निजामाचा वकील सर जॉन माल्कम याचा सल्ला घेतला असता, पेशव्यांनी इंग्रजांशी इमानेइतबारे वागून नेहमी त्यांना मदत व सहकार्य करावे, असा सल्ला दिला. त्याप्रमाणे उत्तर भारतातील पेंढाऱ्यांचे बंड मोडून काढण्याच्या

कामी इंग्रजांना मदत करण्यासाठी बाजीराव सैन्य ठेवू लागला. परंतु, पेशव्यांच्या पुणे दरबारात असलेला इंग्रजांचा रेसिडेंट एल्फिन्स्टन याचा मात्र बाजीरावावर विश्वास नसल्याने, बाजीराव हा नवीन सैन्य जमवून आपल्यावर हल्ला करीन, असा एल्फिन्स्टन याचा समज झाला.

याच सुमारास, उत्तर भारतातील पेंढाऱ्यांचे बंड मोडून काढण्यासाठी इंग्रजांचे एक मोठे सैन्य ठिकठिकाणी जमा होत होते. त्यापैकी ब्रिगेडियर जनरल स्मिथ याच्या ताब्यातील फोर्थ डिव्हिजन मधील लष्कर खानदेशातून कूच करीत हळूहळू अहमदनगरकडे येत होते व मुंबईची एक युरोपियन पलटन, व मद्रास नेटिव्ह पलटन, मद्रास नेटिव्ह घोडदळाची दुसरी पलटन, आणि मद्रास नेटिव्ह इन्फन्ट्रीच्या पंधराव्या रेजिमेंटमधील दुसरी पलटन, अशा प्रकारचे सैन्य मुंबईहून पुण्याकडे चाल करून येत होते. मुंबईकडून येणारे सैन्य, आणि अहमदनगरकडे येणारे जनरल स्मिथ याचे सैन्य हे एकत्र व्हायचे होते. या इंग्रजी सैन्याला 'आर्मी ऑफ दि डेक्कन' असे नाव दिले होते. अशा प्रकारे दोन्हीही बाजूंकडून आपापल्या सैन्याची जमवाजमव सुरु होती. यावेळी पेशव्यांनी इंग्रजांशी लढाई करावी, की करू नये, या महत्वाच्या प्रश्नावर बाजीरावाने कारभारी व सरदारांशी सल्लामसलत केली असता, फारच कमी सरदारांनी लढाई करण्यास अनुकूलता दर्शविली. कारण, इंग्रज फौजा आपल्यापेक्षा सरस असल्याने, त्यांच्याशी आता लढाई करून यशप्राप्ती साध्य होणार नाही, असे त्या अनुभवी सरदारांचे मत होते. परंतु, बाजीरावास त्यांचा सल्ला न पटल्याने त्याने लढायचे ठरवून लढाईची जय्यत तयारी केली. पुण्यात त्याच्या आदेशावरून अनेक सरदार जमा झाले. त्यात निपाणकर, अक्कलकोटचे भोसले, निंबाळकर, घोरपडे, जाधव, विंचूरकर, पटवर्धन, बापू गोखले, भोईटे, पुरंदरे यांचे व नवीन फौज मिळून लाख–सव्वालाख घोडदळ उभे ठाकले. याव्यतिरिक्त अरब, रोहिले, पठाण, सिद्दी, गोसावी, रजपूत, रांगडे, मुसलमान असे मिळून ५०,००० पायदळ तयार झाले. या सर्व दीड लाख लष्कराचे नेतृत्व बापू गोखल्याकडे देण्यात आले.

बाजीरावाच्या लष्कराची छावणी पुण्यातच गारपिराच्या आसपास पडू लागली. परंतु, गारपिरावर कर्नल बर याच्या कमांडखाली इंग्रजांच्या पलटनी अनेक दिवसांपासून आपला तळ ठोकून होत्या. या इंग्रजी लष्करात नेटिव्ह इन्फन्ट्रीच्या सहाव्या, आणि सातव्या रेजिमेंटमधील मिळून १२०० शिपाई होते व त्यांच्याकडे दोन तोफाही होत्या. हे सर्व लष्कर सध्या जिथे पुण्याचे जिल्हाधिकारी कार्यालय आहे, त्याच्या सभोवतालचा परिसर, म्हणजेच गारपिरावर होते. इंग्रजांच्या या छावणीच्या सभोवताली पेशव्यांच्या लष्करी छावण्या येऊन पडल्या व गोसावी लोकांच्या छावण्या वानवडीच्या मैदानावर उतरल्या. त्याचप्रमाणे संगमावरील रेसिडेंट मि. एल्फिन्स्टन याचा बंगला व भांबुर्डे गावच्या (सध्याचे शिवाजी नगर) दरम्यान विंचूरकरांचे घोडदळ, पायदळ आणि तोफखाना यांचा तळ येऊन पडला. अशा प्रकारे इंग्रजांची फौज ही पेशव्यांच्या लष्कराकडून हळूहळू चोहोबाजूंनी वेढली गेली. अशा रीतीने पेशव्यांच्या सैन्याची जय्यत तयारी झाल्यानंतर, इंग्रजांच्या छावणीवर ताबडतोब हल्ला चढवावा, असे सरदारांचे मत होते, परंतु बाजीरावाने हा बेत रहित केला.

बाजीराव पेशव्याचे सैन्य केव्हाही आपल्यावर हल्ला करेल, असे वाटल्याने इंग्रज रेसिडेंट मि. एल्फिन्स्टनने मुंबई व अहमदनगरच्या युरोपियन पलटणींनी ताबडतोब मदतीस यावे, असा हुकूम पाठविला. ततपूर्वी, मुंबईचे सैन्य हे लगेचच, म्हणजे ३० ऑक्टोबर १८१७ रोजी खडकीस येऊन पोहोचले. कर्नल बर याच्या कमांडखालील गारपिरावर असलेले इंग्रजांचे सैन्य हे असुरक्षितेमुळे ताबडतोब खडकी येथे हलविण्यात आले. हे सैन्य सध्याच्या होळकर पुलाच्या जवळपास व खडकी गावापर्यंत जाऊन पोहचले. पेशव्यांनी मेजर फोर्ड याच्याकडून जी प्रशिक्षित पलटन तयार करवून घेतली होती, तिचे वास्तव्य जवळच दापोडी येथे असल्याने वेळप्रसंगी ती इंग्रजांच्या खडकीतील सैन्याच्या मदतीस येऊ शकणार होती.

पेशवे व इंग्रज यांनी एकमेकांस आदेश पाठविले की, जमवाजमव केलेले सैन्य त्यांनी दूर पाठवून द्यावे, अन्यथा परिणामास तयार राहावे. इंग्रजांकडून मेजर फोर्ड व पेशव्यांकडून विठोजी नाईक यांनी हे निरोप परस्परांना दिले. तथापि, दोन्हीकडूनही हे म्हणणे मान्य न केले गेल्याने पेशव्यांचे सैन्य खडकीस इंग्रजांवर हल्ला करण्यासाठी ५ नोव्हेंबर १८१७ रोजी दुपारी ३ वाजता पुण्यातून बाहेर पडले. रेसिडेंड मि. एल्फिन्स्टन हा संगमावरील आपल्या रेसिडेन्सिमधून आपल्या ५०० सैन्यासह खडकीला सुरक्षित पोहचला व त्याने ताबडतोब लढाईस सुरुवात करण्याचे आदेश दिले व दापोडी येथे मेजर फोर्डलाही आपल्या सैन्यासह खडकीच्या सैन्याला येऊन मिळण्याचा तातडीचा निरोप पाठविला. मराठ्यांचे पायदळ, घोडेस्वार तोफा वगैरे सर्व लष्कर चतु:श्रृंगीजवळ गणेशखिंडीच्या डोंगरापासून, संगमावरील रेसिडेन्सिच्या जागेपर्यंत मधल्या मैदानात चोहोकडे पसरले होते. त्यात बापू गोखले, मोरे, दीक्षित, मराठे, चिंतामणराव पटवर्धन, तासगांवकर, मिरजकर, आप्पाजी पाटणकर, घोरपडे, पुरंदरे, राजेबहाद्दर व अक्कलकोटवाले इ. राजे व सरदार होते. पेशव्यांची फौज फारच मोठी होती. त्यामानाने इंग्रजांचे लष्कर लहान असून, ते कर्नल बर याच्या नेतृत्वाखाली पेशव्यांच्या सैन्याला खडकीच्या मैदानावर तोंड देण्यासाठी सज्ज झाले होते. इंग्रज सैन्याच्या मध्यभागी युरोपियन पलटन, रेसिडेंटने आपल्याबरोबर आणलेले शिपाई आणि सहाव्या रेजिमेंटच्या दुसऱ्या बटालियनपैकी एक तुकडी, तसेच मुळा नदीच्या बाजूला सातव्या रेजिमेंटची पहिली बटालियन, तर खडकी गावाजवळ पहिल्या रेजिमेंटपैकी दुसरी बटालियन होती. आणि दोन्ही टोकाला एक एक तोफही होती. दापोडीहून खडकीकडे आगेकूच करीत असलेल्या मेजर फोर्डच्या सैन्याला खडकीपर्यंत जाऊ न देण्यासाठी पेशव्यांचे मुख्य प्रधान, मोरे, दीक्षित व रास्ते त्या दिशेला वळले. त्यांनी मेजर फोर्डवर हल्ला करण्याचे ठरवले. मोरे, दीक्षितांचे घोडेस्वार मेजर फोर्ड याच्या उजव्या बाजूच्या शिपायांजवळ येत चालले आहेत, असे पाहून व पेशव्यांचे स्वार आपल्या माऱ्याच्या टप्प्यात आले असल्याचे पाहून मेजर फोर्ड याने आपल्या बटालियनला तोफांमधून व बंदुकीतूनगोळीबार सुरू करण्याविषयी हुकूम दिला. त्यामुळे मोरे व दीक्षितांचे सैन्य खडकीच्या बाजूला वळले. तेथेही त्यांच्यावर तोफगोळ्यांचा भडीमार झाला.

त्यात मोरे व दीक्षित तोफगोळा लागल्याने ठार झाले. त्यामुळे त्यांच्या सैन्यात धांदल उडाली व सैन्य मागे फिरले. मेजर फोर्डच्या मार्गातील अडथळा दूर झाल्यामुळे तो कर्नल बर यांच्या सैन्याला येऊन मिळाला. पेशव्याकडील अरब व गोसावी यांनी सातव्या रेजिमेंटची पहिली बटालियन व सहाव्या रेजिमेंटची दुसरी बटालियन यांच्यावर हल्ला चढविला या हल्ल्याचे नेतृत्व पेशव्यांच्या सैन्यातील पोर्तुगिज सेनापती डी. पिंटो याच्याकडे होते. परंतु, तो या हल्ल्यामध्ये ठार झाल्याने इंग्रज सैन्य प्रतिहल्ल्यासाठीपुढे सरसावले. पपरंतु, कर्नल बर याने त्यांना थांबविले व गोळीबार करण्याचा आदेश दिला. बापू गोखले हा यशस्वीरीत्या पुढे घुसला. परंतु त्याचा घोडा जखमी झाल्यामुळे त्याला माघार घ्यावी लागली. त्यावेळी त्याच्या मागे असलेले दुसरे सरदार पुढे सरसावले, व त्यांनी आपल्या सैन्याची जोरदार मुसंडी मारली. पुढे त्यांना दलदल व चिखलाने भरलेला खोल ओढा लागला व ते या दलदलीच्या चिखलात एका पाठोपाठ एक असे येऊन पडले. अशा प्रकारे या लढाईत हल्ले–प्रतिहल्ले होत राहिले. यात दोन्हीकडचे अनेक सैनिक ठार झाले, तर कित्येक जखमी झाले. ही लढाई चालू असतांना हळूहळू अंधार पडू लागल्याने संध्याकाळी सातच्या सुमारास ही लढाई संपली व पेशव्यांचे सैन्य पुणे शहराकडे परत गेले. पेशव्यांचे सैन्य माघारी फिरल्यानंतर मेजर फोर्ड हा देखील आपल्या सैन्यासह दापोडीला परतला. आणि कर्नल बर हा आपल्या ब्रिगेडसह कूच करून रात्री आठ वाजता खडकी येथील आपल्या छावणीत परतला. या लढाईत पेशव्यांचा पराभव झाला असला, तरी इंग्रजांचे संपूर्णपणे वर्चस्व राहिले नाही पुढील आठ दिवस दोन्हीकडूनही कसलीच कारावाई झाली नाही. परंतु या कालावधीत इंग्रजांनी मात्र आपल्या पलटणींची जय्यत तयारी करून घेतली.

खडकीची लढाई सुरू होण्यापूर्वीच ब्रिगेडियर जनरल स्मिथ याला फोर्थ डिव्हिजनचे लष्कर लवकरात लवकर व जलदगतीने कूच करून खडकीच्या सैन्याच्या मदतीसाठी घेऊन यावे, असा आदेश रेसिडेंट मि. एलफिन्स्टन याने पाठवला होता. परंतु हे लष्कर वेळेवर पोहचू शकले नाही, आणि खडकीच्या लढाईस सुरूवात झाली.

जनरल स्मिथ आपले फोर्थ डिव्हिजनचे लष्कर घेऊन अहमदनगरहून जलदगतीने कूच करीत होता. पेशव्यांचे काही सैन्य त्याच्या येण्याला प्रतिबंध करण्यासाठी त्याच्या वाटेत आडवे आले होते. त्यांच्यामध्ये कोंढापुरी येथे काही चकमकी देखील झाल्या. परंतु या अडथळ्यांचा फारसा परिणाम जनरल स्मिथवर झाला नाही आणि जनरल स्मिथ आपल्या सैन्यासह दि. १३ नोव्हेंबर १८१७ रोजी पुण्यास येरवड्याजवळ पोहचला. येरवड्याच्या नदीच्या काठावर उजवीकडे सादलबाबाची टेकडी म्हणून जी जागा आहे, तिथे तो तळ देऊन राहिला. तेथून जवळच खडकीला कर्नल बर याची छावणी होती. या दोन्ही सैन्यास एक होऊ द्यायचे नाही, असा पेशव्यांचा डाव होता व त्यासाठी पेशवा तसा प्रयत्न करीत होता. परंतु त्याच्या या प्रयत्नास यश आले नाही. आणि इंग्रजांचे दोन्ही सैन्ये एकत्र येऊन त्यांनी सादलबाबाच्या टेकडीच्या मागे आपला तळ ठोकला. मुळा–मुठा नदीच्या मधून पलीकडे जाण्यासाठी जी नदीच्या उताराची वाट होती, त्या उतारवाटेने जाऊन पुण्यातील गारपिरावरील पेशव्यांच्या सैन्यावर हल्ला करण्याचा इंग्रजांचा बेत होता. म्हणून त्यासाठी त्यांनी 'पिकेट हिल' टेकडीवरून दोन तोफा डागल्या.

नदीच्या उतारवाटेने पलिकडे जाणाऱ्या इंग्रज सैन्याला प्रतिबंध करण्याकरता पेशव्यांच्या काही सैन्याने अडथळे नदीच्या पात्रात निर्माण केले होते. या सैन्यात अरबांचे घोडेस्वार होते. त्यामुळे पेशव्यांचे आणखी काही सैन्य त्यांच्या मदतीला धावून आले व इंग्रज आणि पेशवे सैन्यात नदीपात्रातच काही चकमकी झडल्या. तथापि, पेशव्यांच्या या हल्ल्याला न जुमानता इंग्रज सैन्य नदी ओलांडून पैलतीरावर पोहचले. इंग्रज सैन्याच्या या भागाचा प्रमुख लेफ्टनंट कर्नल मिलने हा होता. या सैन्यात मुंबईची युरोपियन पलटन, रेसिडेंटच्या तैनातीतील सैन्य आणि पहिल्या, सहाव्या व सातव्या नेटिव्ह पलटनीतील एक एक बटालियन होती. हे सैन्य १६ नोव्हेंबर १८१७ रोजी मध्यरात्री पैलतीरावर पोहचले. त्यानंतर १७ नोव्हेंबर १८१७ रोजी पहाटे जनरल स्मिथ याच्या छावणीतील सैन्य संगमाजवळच्या नदीतील उतारवाटेने पलिकडे पुण्याला पेशव्यांच्या सैन्यावर हल्ला करण्यासाठी निघाले. अशा रितीने इंग्रजांची एकत्र आलेली दोन्ही सैन्ये वेगवेगळ्या बाजूने पेशव्यांच्या सैन्यावर हल्ला करण्यासाठी निघाली. परंतु, हे सैन्य जेव्हा गारपिराकडे आले, पेशव्यांचे सैन्य आपला तळ उठवून रात्रीतून कूच करून तेथून निघून गेले होते. त्यामुळे १७ नोव्हेंबर १८१७ रोजी त्याच दिवशी तिसरे प्रहरी म्हणजेच दुपारी तीन वाजता शनिवारवाड्यावरील पेशव्यांचा 'भगवा जरीपटका' खाली उतरवून, इंग्रजांचा 'युनियन जॅक' शनिवारवाड्यावर फडकावला.

पेशव्यांनी जेव्हा येरवडा येथे इंग्रजांवर हल्ले केले, तेव्हा त्यांच्यातील अरब, गोसावी हे लढत होते. ते टेकडी चढून वरही आले. परंतु त्यांना दारूगोळा अथवा रसद यांचा पुरवठा न झाल्याने, आणि वरून इंग्रजांच्या तोफांचा मारा मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने त्यांनी माघार घेतली. त्यामुळे मग पेशव्यांनीही माघार घेतली. हे पाहून पेशव्यांच्या सैन्याचे नेतृत्व करीत असलेले सेनापती बापू गोखले यानेही माघार घेतली. या लढाईत अनेक अरब, गोसावी मारले गेले व उरलेल्यांनी आपला जीव वाचविण्यासाठी पळ काढला. अशा वेळी इंग्रज सैन्याने त्यांचा पाठलाग केला. परंतु, बाजीराव पेशवा हा दिवे घाटातून आपल्या सैन्यासह सासवडला पळून गेला. अशा रितीने येरवड्याच्याही लढाईत पेशव्यांचा पराभव झाला.

येरवड्याच्या लढाईत माघार घेतल्यानंतर दुसरा बाजीराव पेशवा आणि त्याचा सेनापती बापू गोखले हे मोठ्या सैन्यासह पुरंदरच्या बाजूला पळून गेले. त्यांचा ताबडतोब पाठलाग करने जनरल स्मिथला शक्य नव्हते. दि. १७ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर हे पाच दिवस त्याने आपल्या सैन्याची तयारी करण्यात घालवले.

या कालावधीत बाजीरावानेही आपल्या सैन्यासह बराच लांबचा पल्ला गाठला. त्याला साताऱ्याजवळ माहुली मुक्कामी निपाणीचे आप्पासाहेब निपाणकर हे आपल्या दोन हजार घोडेस्वार व एक हजार अरब सैन्यासह येऊन मिळाले. बाजीराव माहुलीहून पुसेसावळी येथे २७ नोव्हेंबर रोजी आला. तेथे दोन दिवस मुक्काम करून, २९ नोव्हेंबर १८१७ रोजी तो निपाणकर व सांगलीचे पटवर्धन यांचेकडील पाच हजार घोडदळ घेऊन मिरजेकडे निघाला. बापू गोखले, विंचूरकर आणि घोरपडे यांचेकडे पेशव्यांचे मुख्य लष्कर सोपवण्यात आले होते.

